
डा. बाबासाहेब आंबेडकर यांचा

३२९७

जनतेला संदेश



म. रा. सं. ठाणे
विषय ... निवड
क्र. क्र. ३२९७

REFBK-0025762

संदर्भ विभाग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

डॉ. बाबासाहेबांचा जनतेला संदेश

रमेश रघुवंशी यांच्या प्रस्तावनेसह

REFBK-0025762

ग्रंथ मिळण्याचे ठिकाण

श्रीगजानन बुक डेपो
कबुतरखाना
दादर, मुंबई २८.
फोन नं. ४२२७५८४

श्रीगजानन बुक डेपो
भरत नाट्यमंदिरासमोर
पुणे ३०.
फोन नं. ४४३३०४

जोशी ब्रदर्स
अप्पा बळवंत चौक
पुणे २.
फोन नं. ४४९४२४

आजचे दलितांचे प्रश्न व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी दलितांना उद्देशून केलेले आवाहन, उपदेश, संदेश या ग्रथात एकत्र करण्यात आला आहे. बाबासाहेबांचे महानिर्वाण होऊन आज बत्तीस वर्षे झाली आहेत. त्यांनी जनतेला जो उपदेश केला होता, उद्याच्या भारताचे जे स्वप्न त्यांनी पाहिले होते, त्याबाबत आज परिस्थिती काय आहे. आजचे जे दलितांचे प्रश्न आहेत; त्यांना बाबासाहेबांचा उपदेश कितपत उपयोगी पडणारा आहे आज दलितांनी नेमके काय करायला हवे याचा या ठिकाणी आपण विचार करणार आहोत.

बाबांच्या महानिर्वाणानंतर रिपब्लिकन पक्षाची छकले झालीत व प्रत्येक नेत्याने आपली वेगळी चूल मांडली. अधून मधून दलितांच्या प्रचंड दबावामुळे त्यांना एकत्र यायची सुरसुरी यायची पण पुन्हा त्यांच्यात लाथाळ्या व्हायच्या व ते वेगवेगळ्या मार्गाने वाटचाल करू लागायचे. या सर्व गल्लीबोळातल्या पुढाऱ्यांना एकत्र ठेवू शकेल असा बाबांएवढा प्रचंड ताकदीचा महापुरुष दलितांमध्ये निर्माण झाला नाही. जे पुढारी होते ते खुजे, स्वार्थी पायापुरते पाहाणारे लोचट होते. आपल्यापैकी कोणा एकाला पुढारीपण देऊन त्यांच्या हाताखाली काम करण्याची त्यांची तयारी नव्हती. यापैकी एकाही पुढाऱ्याला दुरदृष्टी नव्हती. दलितांचे आजचे प्रश्न कोणते आहेत; कोणत्या प्रश्नावर लढा द्यायला हवा याचे ज्ञान त्यांना नव्हते. रा. सू गवई सारखे सत्तेला हपापलेले पुढारी तर खुर्चीसाठी कोणाशीही चुंबाचुंबी करायला एका पायावर नेहमीच तयार असतात.

बाबांनी निर्माण केलेल्या जागृतीमुळे; मिळालेल्या सवलतीमुळे दलितांतील काही तरुण पदवीधर झाले. त्याच्यापैकी काहींना बऱ्यापैकी नोकऱ्या मिळाल्या व ते सुखासिन झाले पांढर पेशात जाऊन बसले. काही आत्मचरित्रे कविता लिहून उच्चवर्णियाकडून तथाकथित मान मान्यता मिळवण्यासाठी धडपडू लागले. काही-थोडे तरुण अस्वस्थ होते. त्यांना समाजात निर्माण झालेली विफलता, औदासिन्य, जडत्व, बधिरता जाणवत होती. व ही भयानक बधिरता घालवण्यासाठी काहीतरी करायला हवे असे त्यांना वाटत होते हे तरुण फार अस्वस्थ होते. समाजासाठी काही तरी करावे म्हणून फार बेचैन होते त्यांना परंपरेची चौकट मोडून तोडून टाकायची होती तारुण्य हे नेहमी उसळ्या घेत असते. तरुणांना आजूबाजूचे जग फार साचेबद वाटत असते. तेथे त्याच खूप कोंडमारा होत असतो. तरुणाना यात आमूलाग्र बदल हवा असतो. वडिलधाऱ्याविरुद्ध तरुणांचा राग सतत धुसमसत असतो. तारुण्याचे हे अबाधित वैशिष्ट्य आहे.

या अस्वस्थ, दलित तरुणांच्या संतप्त मनस्थितीतूनच दलित पँथर जन्माला आली; सुरवातीला सर्व थरातील दलितांमध्ये त्यामुळे नवा उत्साह निर्माण झाला. दलित पँथर सपूर्ण महाराष्ट्रात खूप जोरात फोफावू लागली. परप्रांतामध्ये देखील दलित तरुणांमध्ये त्यामुळे नवचैतन्य निर्माण झाले. देशातील सर्व दलित एकत्र आले तर आपली धडगत नाही ही भीती काँग्रेसमधल्या मराठा लॉबीमध्ये निर्माण झाली. व त्यांनी आपली जुनीच चाल पुन्हा खेळायला सुरवात केली; बाबांच्या महानिर्वाणानंतर जसा अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष यशवंतराव चव्हाणांनी चातुर्याने फोडला तशी दलित पँथर पण फोडण्यात आली. दलित पँथर फुटण्यात

या संतप्त तरुणांची बालीश मनोवृत्तीही कारणीभूत ठरली. या दलित तरुणांचा प्रस्थापिताविरुद्ध जो राग होता तो बालीश होता. त्यांना चळवळ कशी उभारावी याचे ज्ञान नव्हते. अनुभव नव्हता. दूरदृष्टी नव्हती. ते होळीचे होळकर सिद्ध ठरले. कोणावर हल्ला चढवावा कोणाला जबर करावे याचे त्यांना ज्ञान नव्हते.

बाबांनी जेव्हा तारुण्यात दलित चळवळ सुरू केली होती त्यावेळी गांधीजी वल्लभभाईनी बाबांना आमिष दाखवून त्यांना आपल्याकडे ओढण्याची वरील चाल खेळून पाहिली होती. बाबांना तर खूप मोठमोठी आमिषे दाखवण्यात आली होती. पण बाबा त्यांना कधी बधले नाहीत काँग्रेसमध्ये येण्याचे गांधीजींनी बाबांना पुन्हा पुन्हा आमंत्रण दिले पण बाबा या उच्चवर्णियांच्या खेळीला चांगले ओळखून होते. या पुस्तकात बाबांनी या कट कारस्थानाची आपल्या अनुयायांना पुन्हा पुन्हा आठवण करून दिली आहे. बाबा धूर्त होते. चाणाक्ष होते. उच्च वर्णियांच्या डावपेचाची त्यांना चांगली माहिती होती. आपण जर यांच्या जाळ्यात अडकलो, यांच्या अभिषाला बळी पडलो तर हे उच्चवर्णिय जगजीवनराम बाबूसारखे घाण्याला जुंपलेल्या झांपड बांधून गरागरा फिरणाऱ्या बैलासारखे आपल्याला फिरवतील हे बाबा जाणून होते.

देशाच्या भवितव्यासाठी, दलितांच्या उत्कर्षासाठी बाबाएवढी दूरदृष्टी त्यांच्या काळातील एकाही पुढाऱ्याकडे नव्हती. दुसऱ्या राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या-वेळी त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघ मागितला होता. तो भविष्याचा विचार करूनच मागितला होता दलितांना हे स्वतंत्र मतदार संघ मिळाले नाही तर भविष्यात हे उच्चवर्णिय दलितांना बाहुल्यासारखे नाचवतील हेही बाबांना स्पष्ट दिसत होते. पण पुणे कराराच्या वेळी गांधीजींनी बाबांच्या या मागणीविरुद्ध प्राण पणाला लावले व दलितांचा संपूर्ण विश्वासघात केला.

या देशातील दलितांचा व मुसलमानांचा विश्वासघात अनुक्रमे गांधीजी व जीना यांनी केला व देशाचे संपूर्ण वाटोळे केले जीनाने पाकिस्तान मागून देशातील सहा कोटी मुसलमानांना वाऱ्यावर सोडून दिले. गांधीजींनी पुणे कराराचा आग्रह धरून दलितांना वाऱ्यावर सोडून दिले. जीनाने पाकिस्तान न मागता हिंदूस्थाना-तच स्वतंत्र मतदार संघाचा आग्रह धरला असता तर दलितांच्या मागण्यांना योग्य न्याय द्यावा लागला असता. व उच्च वर्णियांच्या अरेरावीला चिमटा बसला असता.

आज या देशातील दलितांकडे कोणतीही राजकीय सत्ता नाही त्यांची देशात लॉबी नाही. दबावाचे राजकारण खेळून त्यांना आपल्या मागण्या पदरात पाडून घेता येत नाहीत. आपल्याला उपयोगी असे प्यादे राखीव मतदार संघातून काँग्रेस निवडून आणते व हे नंदी बैल उच्चवर्णियांच्या प्रत्येक मागण्याला माना डोलावतात ज्याच्या हातात ससा तो पारधी या म्हणीप्रमाणे ज्या लॉबीकडे देशात आज सत्ता आहे ते आपली तुंबडी व्यवस्थित भरत आहेत मोठ्या शहरातून बडे उद्योगपती, बडे राजकीय पुढारी अब्जाधीश होत आहेत. आपल्या बड्या राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपये परदेशात गुप्तपणे ठेवले आहेत. रोज नव्या नव्या त्याबद्दलच्या बातम्या प्रसिद्ध होत असून ते निर्लज्जपणे त्या गोष्टीचे समर्थन करत आहेत. सर्व बड्या उद्योगपतींनी आपला पैसा परदेशातच साठवलेला आहे. लुंग्यासुंग्या

उद्योगपतींनी, राजकीय पुढाऱ्यांनी मुंबई, दिल्ली, बंगलोर येथे व त्यांच्या त्यांच्या गावी अब्जावधी रुपयांची मालमत्ता केलेली आहे. सर्व सामान्यांना ती उघड्या डोळ्यांनी पाहावी लागत आहे.

आज मुंबईत पोलिस इन्स्पेक्टरचा बाजारभाव जसा पन्नास ते साठ हजार रुपये आहे तसे आमदारकीचे तिकीट दिल्लीला पन्नास ते साठ लाखाला खुले विकले जात आहे. हा खर्च केलेला पैसा जनतेला लुटूनच मिळवावा लागतो सत्तेवर येताच जो पैसा देतो त्याची कामे केली जातात. त्यांनाच फक्त सवलती दिल्या जातात. राजकारण हा बडे उद्योगपती व गुंडपुंड या सिद्ध साधकांचा कारस्थानाचा अड्डा झाला आहे दलितांना देशात स्वतंत्र मतदार संघ मिळाला असता तर त्यांचे काही प्रतिनिधी लोकसभेत, विधानसभेत दिसले असते. व आज भारतीय राजकारणाचा जो तोल ढासळला आहे तो थोडातरी सावरला असता.

दलित संघटीत होऊ नयेत असाच प्रयत्न हे सत्ताधीश सतत करणार हे सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ गोष्ट आहे. दलितांनी एक लक्षात ठेवावे. सत्ताधीशांना नेहमी गरीब, कंगाल लोकांची फार भीती वाटत असते मध्यमवर्गाची, उच्चवर्गाची त्यांना मुळीच भीती वाटत नाही एकतर वरील वर्ग हे मुळात भित्रे असतात. सत्ताधिशांचे ते मिंधे असतात जगात जीही आजवर बंड झालीत, क्रांत्या झाल्या, त्या सर्व दलित व कंगाल लोकांनी केलेल्या आहेत कारण या लोकांना या जगात गमावण्यासारखे काहीच नसते. सर्व गमावलेल्या परिस्थितीतच ते जन्माला येतात. जगातला कुठलाही समाज घ्या. राजकर्ती जमात घ्या. मग ती रशियातील असो, अमेरिकेतील असो, जपानची असो यांना नेहमी भीती या गरीब, कंगाल लोकांची वाटत असते कारण या लोकांना सत्ता संपत्ती, ऐश्वर्य हे नेहमी गरीब, कंगाल लोकांच्या डोक्यावर पाय देऊनच उभे राहिलेले असते.

आज दलित संघटीत नाहीत कारण त्यांना योग्य मार्ग दाखवणारा, त्यांच्या न्याय मागण्यासाठी भांडणारा, चळवळी उभा करणारा मोठा नेता त्यांच्याकडे नांही बाबा जेव्हा सामाजिक राजकीय क्षेत्रात दंड थोपटून उभे राहिले. तेव्हापासून ते दलितांच्या हक्कासाठी सतत भांडत राहिले. त्या त्या वेळच्या ज्या समस्या होत्या त्यासाठी सतत त्यांनी झुंज दिली. चळवळी, मोर्चे, लढे करून त्यांनी सतत रान उठवले तयाकथित मोठ्या पुढाऱ्यांचे बुरखे फाडले. त्यांना स्वतःला काही मिळवायचे नव्हते त्यांना दलितांमध्ये नवीन आत्मप्रतिमा निर्माण करायची होती. त्यांना नवीन अस्मिता द्यायची होती त्यांना अनुभवाने माहित होते की या देशात लढ्याशिवाय संघर्षाशिवाय एक पैसा मिळणार नाही. आपण जर संघटीत झालो नाही, स्वतः बलवान झालो नाही, सामर्थ्यशाली झालो नाही तर या जगात आपल्याला कुत्राही विचारणार नाही बळी तो कान पिळी हा जगाचा न्याय आहे या देशात चमत्काराशिवाय लोक नमस्कार करत नाहीत. जेथे येथील हिंदू जनता देवाला लाथोंके देव बातोसे नहीं मानते असे म्हणते. जो देव चमत्कार करत नाही त्याला ते भजत नाही. मग ते माणसाला माणूस म्हणून कसा मान देणार ? गेली पाच हजार वर्षे येथील उच्चवर्णियांना दलितांना सतत पायाखालो तुडवण्याची सवय आहे ते विनवणी करून, भीक मागून, याचना करून काहीही देणार नाही. उच्चवर्णियांना फक्त दंडूकेशाही कळते. गहू का आटा

उच्चवर्णियोंका बेटा पिटा उतना मिठा, ही म्हण उच्चवर्णियांना तंतोतंत लागू पडते त्यांना बाप दाखव नाही तर श्राद्ध कर हीच भाषा समजते. म्हणून आयुष्यभर बाबांनी दलितांसाठी लढे दिले चळवळी उभारल्या.

आज बाबांची शिकवण दलित पूर्णपणे विसरून गेले आहेत. असे खदाने म्हणावे लागते. बारापुर भैये व सतरा चुली अशी त्यांची गत झालेली आहे. अगदी २ ३ टक्के दलित सुस्थितीत आहेत बाकीचे आज भयानक दारिद्र्यात खिचपत पडलेले आहेत, त्याच्याकडे कोणतीही राजकीय सत्ता नाही म्हणून ते हीन दीन झालेले आहेत.

दलितांचा आजचा खरा प्रश्न आर्थिक उन्नतीचा आहे. त्यांनी हे कधीच विसरू नये. शिक्षणात, नोकरीत ज्या सवलती त्यांना मिळत आहे त्या यावत् चंद्रदिवाकरौ मिळणार नाहीत. आजच या सवलती उच्चवर्णियांच्या डोळ्यात येत आहेत. मागे अहमदाबाद, मराठवाड्यात ज्या दंगली झाल्या– बाबांच्या रामकृष्णाचे कोडे या लेखाविरूद्ध जो गदारोळ उठला त्यामागे ही सवलतीचीच पोटदुखी होती. व या मिळालेल्या सवलतीचा देखील गेल्या ४० वर्षांत दलित फारसा फायदा उठवू शकले नाहीत अवघे २–३ टक्के लोकांनी सवलतीचा फायदा घेतला. बाकीचे घेऊ शकले नाही याचे कारण आर्थिक दौर्बल्य. आजही दलित समाज खूप मोठ्या संख्येने खेड्यापाड्यातून विखूरलेला आहे, त्यांचे पोट त्यांच्या हातावर आहे. खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांच्या मेहरबानगीवर आहे. खेड्यातील शेतकऱ्यांना दलित शिक्षण घेऊन पुढे जाणे अजिबात सहन होणारे नाही. कारण त्यामुळे त्यांचा हक्काचा गडी हातचा जाणार आहे दलित बाबांच्या शिकवणीमुळे आज जरी जागृत झाला असला तरी आपली स्थिती सुधारण्यासाठी नेमके काय करावे हे त्याला आज नीटसे समजत नाही. तो भांबावलेला आहे. त्याच्यात जोश आहे, लढण्याची उर्मी आहे पण त्याला योग्य दिशा दिसत नाही. दिवसेंदिवस लोकसख्या वाढत आहे. अज्ञानामुळे दलितही या गोष्टीला जोराने हातभार लावत आहे या सर्व कारणामुळे महागाई वाढत आहे. व दलितांचे दारिद्र्य आणखी वाढत आहे.

आता दलितांनी घाई करणे जरूर आहे. आजच जीवन संघर्ष तीव्र झाला आहे. उद्या तो आणखी तीव्र होणार आहे. जेव्हा जीवन संघर्ष तीव्रतर होतो त्यात नेहमी गरीब दीन दुबळे जास्त भरडले जातात. आर्थिक परिस्थिती सुधारावी असे त्यांना वाटत असेल तर पारंपारिक जीवन पद्धतीची त्यांनी त्याग केला पाहिजे व ज्या क्षेत्रात भरपूर पैसा मिळणार आहे. त्या क्षेत्रात मुसुंडी मारून शिरले पाहिजे. असे करताना प्रचलित नीती मूल्ये त्यांना तोडावी लागली तर ती त्यांनी बेशक तोडावी. दारिद्र्य हे नेहमी पारंपारीक नीतीमूल्ये जे उराशी कवटाळतात त्यांचे वाढत असते. जगातील सर्व दारिद्र्याचे मूळ कारण मानसीक असते. मानसीक अटकावामुळे मनुष्य हात पाय हलवत नाही. नवीन काही करायला धजत नाही. धाडस करायला भितो.

ज्याच्याकडे गमावण्यासारखे काही नसते तो धाडस करायला सर्वात जास्त भितो हा एक मोठा गमतीदार विरोधाभास आहे पण तो १०० टक्के खरा आहे.

दलित धाडस करायला भितात. आक्रमक होत नाही. त्यांच्यामध्ये कमालीचा न्यूनगंड आहे हजारो वर्षं गुलामीत काढल्यामुळे त्यांच्यात अजिबात आत्मविश्वास नाही. हे सर्व जरी खरे असले तरी आज परिस्थिती इतक्या थराला आली आहे की त्यांनी काही हालचाल केली नाही तर त्यांचे अस्तित्वच धोक्यात येईल.

स्वत:चे अस्तित्व धोक्यात आले तर वानरीने पण आपल्या पिलाला पायाखाली दाबून आपले प्राण वाचवले हे बिरबलच्या सुप्रसिद्ध कथेतून सर्वांनी ऐकलेले आहे. बाबासाहेब आपल्या भाषणात नेहमी ग्रीक पुराणातील एक कथा सांगत, पुन्हा पुन्हा ती त्यांनी आपल्या दलित बांधवांना सांगितली आहे. ती त्यांच्या या संग्रहात आलेली आहे. ती कथा मी देत नाही पण त्या कथेतून काय शिकण्यासारखे आहे त्याबद्दल त्यांनी काय लिहिले आहे हे सागतो. बाबा म्हणतात : ही कथा काय शिकवते. मला वाटते कष्ट आणि त्याग यामुळेच थोरपण प्राप्त होते. असे ती शिकवते. मनुष्यपण किंवा देवपण अग्निदिव्यातून गेल्याशिवाय प्राप्त होत नाही. अग्नी शुद्ध करतो, अग्नी शक्ती देतो. याप्रमाणेच कष्ट आणि यातनाही देतो. कष्ट आणि यातना सोसल्याशिवाय कोणीही पदललित माणूस मोठेपणा प्राप्त करू शकत नाही. आपला भविष्यकाळ घडविण्यासाठी त्याने आपल्या वर्तमान काळातील सुखाचा व गरजांचा ही त्याग करावयास तयार असले पाहिजे. बायबलची भाषा वापरुन सांगायचे म्हणजे जीवनाच्या शर्यतीत सर्वांनाच आमंत्रण असते. परंतु थोड्यांचीच का निवड होते ? कारण उघड आहे. या शर्यतीत मोठेपणा मिळविण्यात बहुतेक पददलित अपयशी ठरतात कारण त्यांच्या भविष्यातील गरजासाठी वर्तमानातील सुखांचा त्याग करण्याचे धाडसही त्यांच्या जवळ नसते आणि दृढ निश्चयही नसतो.

हा लांबलचक उतारा दलितांमध्ये जो न्यूनगंड आहे, जी बधीरता आली आहे ती घालवण्यासाठी दिला आहे. दलितातील तरुण वर्गाला आज पुन्हा उठा ! निश्चय करा ! आपले दैन्य दूर करण्यासाठी कमर कसा, जागे व्हा, उद्याचा तुमचा भविष्यकाळ उज्ज्वल व्हावा असे तुम्हाला वाटते ना ? तर आमूलाग्र बंड करा. जे कोणी आपल्या वाटेत येतील त्यांना तुडवून पुढे चला. आज तुम्ही आमूलाग्र बंड केले नाही तर उद्याच्या यादवी युद्धात ' तुमचा निभाव लागणार नाही. उद्या या देशाची स्थिती किती भयंकर होणार आहे. तरुणांना किती मोठी निराशा येणार आहे हे जाणून घ्यायचे असेल तर माझे 'देशाचे वाटोळे करणारी हिंदूंची रोगट ब्राह्मणी मनोवृत्ती ' हे पुस्तक आपण जरुर वाचा. दलितांनी हे विसरू नये ब्राह्मणी संस्कार त्यांच्यावरही प्रत्यक्षपणे अप्रत्यक्ष पणे लादले गेले आहे. ते कोणते आहेत व ते घालवण्यासाठी काय करायला हवे हे मी सविस्तरपणे त्या पुस्तकात सांगितले

आहे. माझी १०० टक्के खात्री आंहे जो कोणी त्या पुस्तकात दिल्याप्रमाणे आपल्या कुटुंबाविरुद्ध आपल्या जातीच्या मुखंडा विरुद्ध बंड करून उठेल त्यालाच काही तरी भविष्यकाळ राहाणार आहे. माझी दलित तरूणींना कळकळीची विनंती आहे. त्यांनी ते पुस्तक नरुर वाचावे व आपला मुलगा आत्मविश्वासपूर्ण आक्रमक, धाडसी उपक्रमशीलकारक व्हावा असे त्यांना मनपूर्वक वाटत असेल तर ग्रीक पुराणातील डिमेटर लहानग्या डेफोफूनला अग्निदिव्यातून जशी तावून सुलाखून काढत होती तसे तुम्ही आपल्या लहानग्याला तावून सुलाखून काढा.

श्री गजानन बुक डेपो, पुणे ३० — रमेश रघुवंशी

अनुक्रमनिका

१. 'जनतेचे' सामर्थ्य वाढवा	१
२. गोलमेज परिषदेचे कामकाज	८
३. राजकीय सत्ता हेच आपले ध्येय	१२
४. सार्वजनिक कार्यासाठी फंड जमवा	१६
५. मला हिंदु धर्माची पर्वा नाही, अस्पृश्यांचे हित साधणे एवढेच माझे कर्तव्य !	२०
६. स्वाभिमान शून्य लोकांच्या आहारी जाऊ नका.	२७
७. पुणे-करार स्मृति दिन	३१
८. तुम्ही दुसऱ्याचे गुलाम म्हणून किती दिवस राहणार ?	३६
९. तुमच्या मताची किंमत मीठमिरचीसारखी समजू नका	३९
१०. या कुचकामी धर्मातून मी जाणार !	४१
११. धर्मांतराची कारणे	४८
१२. अस्पृश्य समाज व निवडणुकी	५२
१३. नीतिने आयुष्यक्रम कंठता येत नसेल तर ऐश्वर्य नको !	५७
१४. श्री राजा हे परिया म्हणूनच जगतील व परिया म्हणूनच मरतील	६०
१५. स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा	६४
१६. लायक प्रतिनिधी निवडून द्या	६८
१७. समता सैनिक दलाला संदेश	७२
१८. गैरसमजाने फसू नका	७७

१९. या जागा मानाच्या नसून मान्याच्या आहेत. ८१
२०. अधिकार ग्रहण नाकारण्यात काँग्रेसच दोषी ८६
२१. आम्हाला लाभालोभासाठी कोणत्याही संस्थेत विरून जावयाचे नाही. ८८
२२. स्वावलंबनाने संघटनेचे कार्यक्षेत्र वाढवा ९३
२३. हा काँग्रेसचा जय नसून ब्राह्मणशाहीचा जय आहे ९५
२४. अशी फसवाफसवी का ? ९९
२५. धर्मांतर हे होणारच ! १०१
२६. पक्षाशी पूर्ण इमानी राहिले पाहिजे १०३
२७. मृतमांस खाणे व भीक मागणे सोडा १०८
२८. तुम्ही आपले अस्तित्व भिन्न राखले पाहिजे ११०
२९. समाजकार्य अव्याहत चालून ते चिरकाल टिकले पाहिजे ११२
३० जातीभेद ही वरून वाहात आलेली गटारगंगा आहे ११४
३१. या लढ्यात तुमच्याजवळ हरण्यासारखे काय आहे ? ११६
३२. शेतकरी बांधवांना स्फूर्तीदायक संदेश ११९
३३ तुमचे हितकर्ते कोण याचा नीट विचार करा
३४. राष्ट्रीयतेसाठी सामाजिक बंधने तोडली पाहिजेत १२६
३५ मुंबई प्रांताचे भिकार बजेट ! १२८
३६. गरिबांचा पक्ष गरिबांनीच चालविला पाहिजे १३०
३७. स्वावलंबनाच्या लढ्याचा परिणाम ! १३२
३८. कर्नाटक विभक्तीकरण १३३
३९ मुंबईच्या गुंडांवर गंडांतर १३५
४०. प्राण पणाला लावून हक्क बजावण्यास तयार व्हा १३८
४१. काँग्रेस गरिबांच्या कल्याणाकरिता नाही १४१
४२. राजकारणातील आपली प्रगती ब्रह्मदेवही थांबवू शकणार नाही ! १४६
४३. फेडरेशन विरोधी प्रचंड चळवळ उभारा १५१
४४. श्रमजीवी वर्गास जाहीर विनंती १५४
४५. जबाबदार राज्य पद्धतीची तत्त्वे १५७
४६. मंत्रिमंडळाला निवडणारे मतदार हेच अंतिम सत्ताधारी होत ! १६४
४७. गांधी विश्वासघातकी आहेत ! १६८
४८ मी सोशालिस्ट आहे १७३

प्रकाशक :– गजेंद्र विठ्ठल रघुवंशी, रघुवंशी प्रकाशन
१० सत्यनिवास, भवानीशंकर रोड, दादर मुंबई २८
मुद्रक :– शांताराम दगडू गोरे
महेश मुद्रणालय, स. नं. १३२, पर्वती, पुणे ३०.
किंमत ३६ रुपये

ग्रंथालय ठाणे
दा. क्र. .....
(स्थळ प्रत)

१. 'जनतेचे' सामर्थ्य वाढवा

(तिसऱ्या राऊंड-टेबल-परिषदेसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर दिनांक ७-११-३२ रोजी मुंबईहून व्हिक्टोरिआ बोटीने इंग्लंडला रवाना झाले. जनतेच्या वाचकांस पोर्टसय्यदवरून दि. १४-११-३२ रोजी लिहिलेले हे त्यांचे पत्र आहे. जनता, दिनांक १० डिसेंबर १९३२.)

गेल्या सोमवारी मी मुंबईला होतो; या सोमवारी पोर्टसय्यदला आहे. एका आठवड्याच्या अवधीत एक हिंदी-महासागर व दुसरा लाल समुद्र असे दोन सागर मी ओलांडले व सरासरी तीन हजार मैलांचा पल्ला गाठला ! इतक्या या जलद प्रवासाचे श्रेय या आमच्या 'व्हिक्टोरिआ' बोटीच्या वेगवान गतीला आहे हिंदुस्थान व युरोपमध्ये जा-ये करणाऱ्या बोटींपैकी व्हिक्टोरिआ ही एक सर्वात सुंदर व अत्यंत गतिमान अशी बोट आहे. केवळ सौंदर्याच्या दृष्टीनेच नव्हे तर सुखसोयींच्या दृष्टीने पाहताही ही आगबोट इतकी सरस आहे की हिच्या मानाने इतर कंपन्यांच्या बोटी म्हणजे केवळ 'कचऱ्याची पिंपे' (Dust Bins)च समजली पाहिजेत. ग्यांग (Gange) आणि कॉन्ट-रोसो (Conte Rosso) या दोन सुप्रसिद्ध बोटींवरही व्हिक्टोरियाने ताण केली आहे. मागील खेपेला या दोन बोटींनी मी प्रवास केलेला आहे, पण त्यापेक्षाही व्हिक्टोरिआ बोटीवरील प्रवास मला अधिक सुखसोयीचा व जलदसा वाटला. वेगाच्या बाबतीत साउथ्याम्टन व न्यूयार्कमध्ये फिरणाऱ्या 'ब्रेमेन' (Bremen) अथवा 'युरोपा' (Europa) या बोटींना मागे टाकणारी अन्य आगबोट नाही, असे म्हणतात. पण या व्हिक्टोरिआ बोटीने हिंदुस्थान व युरोपम ये प्रवास करणाऱ्या आपल्या इतर सर्व प्रतिस्पर्धी बोटींना मागे टाकून 'ब्रेमेन' व 'युरोपा' या बोटींशी वेगाच्या बाबतीत जवळ जवळ बरोबरी केली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. व्हिक्टोरिआ बोटीचा वेग दर चोवीस तासाला ४८६ नॉटिकल मैलांचा आहे. म्हणजे युरोपा अगर ब्रेमेनपेक्षा फक्त १०० मैलांनीच तो कमी आहे. पण या दोन बोटींच्या आकारात जो मोठा फरक आहे तो विचारात घेता व्हिक्टोरिआ ही बोट फार वेगवती समजली पाहिजे.

आतापर्यंतचा प्रवास फार मजेचा झाला. पावसाळ्याच्या दिवसात अपरिचित प्रवाशांच्या हृदयात भीतीची धडकी उत्पन्न करणाऱ्या हिंदीमहासागराचे तुफानी पाणी या वेळेला काचेच्या विस्तृत पृष्ठभागाप्रमाणे स्थिर व चकचकीत दिसत

होते. आणि लाल समुद्रात या सुमारास प्रवास करावयाचा म्हणजे जणू काय आगीच्या भट्टीतून जाण्यासारखे असते ! अरेबियाच्या वालुकामय प्रदेशातून येणाऱ्या उष्ण वाऱ्याच्या झळींनी प्रवाशांचा जीव बहुधा अगदी बेजार होत असतो पण या खेपेला लाल समुद्रावरून शीतल वाऱ्याची झुळूक सारखी वाहात होती. त्या भागात क्वचितच पडणाऱ्या पावसाची कृपादृष्टी या सुमारास अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर नुकतीच झाल्यामुळे हे थंड वारे सुटले असावेत.

मी या बोटीवर असल्याची जाणीव मुंबईहून निघताच आपल्या लोकांनी केलेल्या जयगर्जनांनी इतर प्रवाशांना त्याच वेळेस करून दिली होती. 'डॉ. आंबेडकरांची प्रसिद्धी' या जयजयकारामुळे अगदी आरंभापासूनच बोटीवरील लोकात झालेली होती. त्याला त्यांचाही इलाज नव्हता आणि माझाही नव्हता. सर्वांचे डोळे अगदी आरंभापासूनच, आणि अर्थात कुतुहलामुळे माझ्याकडे लागले होते खरे सांगायचे म्हणजे असली ही 'जयजयकाराची प्रदर्शने' मला बेचैन करतात व माझ्या मनाला त्यामुळे एक प्रकारचा संकोच वाटू लागतो. माझ्या लोकसत्तात्मक (Democratic) प्रवृत्तीला या जयजयकारांनी व्यक्त केली जाणारी 'विभूती-पूजेची' भावना व्यथित व व्यग्र करून सोडते.

दुसऱ्याही एका कारणामुळे हे 'जय जयकाराचे' सुखसोहळे माझ्या मनाला कष्टदायी वाटतात. कारण ते आपल्या या प्रेमळ लोकांना माझ्याबद्दल वाटणाऱ्या अपेक्षेचे व माझ्या त्यांच्या विषयीच्या कर्तव्याचे मला तीव्रपणे स्मरण करून देतात. एखाद्या वेळेस असे वाटते की जगात एकटे असावे, स्वत:शिवाय इतर कोणाचीही कसलीही जबाबदारी आपल्या शिरावर असू नये. शांत व स्वतंत्र असा जीवनक्रम उपभोगता यावा. अशा तऱ्हेच्या सुशांत, अलिप्त व बिनभान-गडीच्या आयुष्यक्रमाची माझ्याइतकी आवड फारच थोडयांना असू शकेल; आणि अशा तऱ्हेच्या निवांत व सुखप्रद आयुष्यक्रमावर माझ्यापेक्षा अधिक हक्क तरी अन्य कोणाचा असू शकणार ! 'दु:खाअंती सुख' अगर 'कष्टाअंती विश्रांती' हा सिद्धांत अचूक व सर्वांना सारखा लागू पडणारा असता तर मला पाहिजे असलेला निवांत, स्वतंत्र व अलिप्त असा जीवनक्रम मला आतापर्यंत कधीच लाभावयाला पाहिजे होता. कारण तो प्राप्त करून घेण्याचा खराखुरा अधिकार मी संपादिला आहे. पण 'दु:खाअंती सुखाचा' हा सिद्धांत मला लागू पडणार नाही. हे मी आता समजून चुकलो आहे. गर्दीचा व गोंगाटाचा आयुष्यक्रम माझ्या पाचवीला पूजलेला असून तो मला शेवटपर्यंत पुरून उरणार, हे भवितव्य मला स्पष्टपणे दिसत आहे; आणि कर्तव्याच्या प्रबल जाणिवेने या भवितव्यतेपुढे मान वाकविण्यास मला भाग पाडले आहे; व हीच कर्तव्याची जाणीव मला माझी कामगिरी बजावण्यास सदैव उत्तेजन देईल व समर्थ करील याबद्दलही मला

बिलकूल शंका उरलेली नाही. मला शंका फक्त एकाच गोष्टीची वाटते. आणि ती गोष्ट म्हटली म्हणजे मी आपले कर्तव्य करावे अशी मोठ्या श्रद्धेने अपेक्षा व आशा करीत टपून बसलेले माझे लोक–माझी जनता आपले स्वत:चे कर्तव्य करण्यास तयार होईल की नाही व शेवटपर्यंत आपल्या कर्तव्याला जागून राहिल की नाही, याबद्दलची होय ! आपल्या हातात असलेल्या राजकीय सत्तेचा पूर्ण फायदा घेता यावा म्हणून अस्पृश्य समाजाने काय केले पाहिजे, हे मी त्यांना वारंवार बजावून सांगितलेलेच आहे. आपली चळवळ जिवंत व कार्यक्षम राखण्यासाठी कमीतकमी दोन लाख रुपयांचा तरी फंड जमविणे कसे व का अगत्याचे आहे हेही मी आपल्यातील कार्यकर्त्या मंडळींना समजावून दिले आहे. हे कार्य सुरू करण्याला मला अवसर सापडला नाही. आणि म्हणून लोकांकडून या कार्याला सक्रिय पाठिंबा किती मिळेल हे मला आज नक्की सांगता येत नाही. पण परत आल्याबरोबर हे कार्य हाती घेण्याचे मी ठरविले आहे; आणि आपल्या लोकांची कितपत तयारी आहे, हे अजमावून पाहण्याची व आत्मोद्धारासंबंधीची त्यांची उत्सुकता कसाला लावून पाहण्याची त्याचवेळेस मला आपोआप संधी मिळावयाची आहे.

'जनतेचे' सामर्थ्य वाढवा

'जनता पत्राचे वर्गणीदार व आश्रयदाते व्हा आणि त्याचे सामर्थ्य वाढवून त्याचा सर्वत्र प्रसार करा' हे महाराष्ट्रातील अस्पृश्य समाजाला माझे दुसरे आग्रहाचे सांगणे आहे. अस्पृश्य समाजाचे मनोगत व त्यांच्या आकांक्षा निर्भयपणे बोलून दाखविणारे 'जनता' हेच एक आपले पत्र आहे; व त्याला करवेल तितके सामर्थ्यवान करणे आणि त्याला भरभराटीला आणणे हे अस्पृश्य समाजाचे सध्या एक प्रमुख कर्तव्य आहे. 'जनते'च्या वर्गणीदारांची संख्या वाढविण्याचे कार्य मी येण्यापूर्वीच सुरू झाले पाहिजे. मी येईपर्यंत वाट पाहात बसण्याची या बाबतीत मुळीच आवश्यकता नाही. मी विलायतेहून परत येण्यापूर्वीच श्री. देवराव नाईकांनी केलेला पाच हजार वर्गणीदारांचा संकल्प पुरा झाला पाहिजे. माझ्या मते तर हा पाच हजारांचा आकडा आपल्या संख्येच्या व आपल्यापुढील कार्याच्या मानाने फारच अल्प आहे. अस्पृश्य समाज गरीब असला तरी 'जनते'करिता दर आठवड्याला एक आणा खर्च न करण्याइतका तो गरीब नाही. आपल्या गरीबीची दैन्यवाणी सबब या समाजातील जाणत्या व स्वाभिमानी स्त्री वा पुरुष व्यक्तीने पुढे आणणे रास्त होणार नाही. जनतेप्रीत्यर्थ स्वखुषीने दर आठवड्याला एक आणा खर्च करणे हे अस्पृश्य समाजाला स्वकर्तव्याविषयी वाटणाऱ्या आस्थेचे व स्वाभिमानाचे एक निदर्शक समजले पाहिजे. मनावर घेतल्यास एकटी मुंबईच

हा पाच हजारांचा संकल्प पार पडू शकेल, असा मला विश्वास आहे. मुंबईबाहेरच्या अस्पृश्य समाजाने जनतेच्या वर्गणीदारात आणखी इतकीच भर घातली पाहिजे, व प्रत्येक खेडचापाडचातून त्याचा प्रसार झाला पाहिजे. पुढील वर्षासाठी अस्पृश्य समाजातील सर्व लहान-थोर कार्यकर्त्यांनी हा कार्यक्रम हाती घेऊन त्याची पूर्तता केलीच पाहिजे. मी माझे कर्तव्य करावे अशी माझ्या बाबतीत आशा बाळगणाऱ्या व अपेक्षा करणाऱ्या सर्व लोकांना 'तुम्हीही पण हे एक लहानसे कर्तव्य करून दाखवा' असे सांगण्याचा मला हक्क पोहोचतो; आणि त्याच हक्काच्या जोरावर जनतेच्या वर्गणीदारांची संख्या वाढवून तिचे सामर्थ्य वाढवा, असे मी पुन्हा एकदा अस्पृश्य समाजास आग्रहपूर्वक सांगू इच्छितो.

माझ्याशी बोलण्याचा बोटोवरील मंडळींचा मुख्य विषय म्हटला म्हणजे 'पुणे-करार' हा होय. हिंदी जगाला हलवून सोडणारा महात्मा गांधींचा दहा दिवसाचा उपवास व त्याचे गंभीर स्वरूप याची कित्येकांच्या मनावर इतकी विलक्षण छाप बसलेली आहे, की त्या प्रसंगाचे विस्मरण त्यांना पडूच शकत नाही एक युरोपियन प्रवासी माझ्याकडे बोट दाखवून आपल्या इतर मित्रांना माझा परिचय करून देताना हळूच म्हणतो: "हा पाहा तो तरुण माणूस! याच्या हातून हिंदुस्थानच्या इतिहासाची नवीन पाने लिहिली जात आहेत!" हिंदुस्थानच्या अलीकडील इतिहासात हे 'उपोषण-कांड' म्हणजे एक अभूतपूर्व घटना घडल्याचे बोटीवरील सर्वांना वाटत आहे या डावात अस्पृश्य समाजाची कल्पनातीत सरशी झाली ही गोष्ट कित्येकांना ज्याप्रमाणे कौतुकाची वाटते त्याच-प्रमाणे पुष्कळांना ती तापदायी वाटते. सरकारच्या अंतर्गृहात काय चाललेले आहे याची बित्तंबातमी असणाऱ्या एका मोठ्या गृहस्थाकडून मला असे कळले की अस्पृश्यांना मध्यवर्ती कायदे कौन्सिलात मुळीच प्रतिनिधित्व न देण्याचा सरकारचा निश्चय ठरलेला होता. त्यांचे म्हणणे असे होते की अस्पृश्यांच्या हितसंबंधांची बाब ही प्रांतिक सरकारच्या कक्षेतील असल्यामुळे दर प्रांतात त्यांना थोडेफार प्रतिनिधित्व दिले म्हणजे त्यांचे काम झाले. मध्यवर्ती कायदे कौन्सिलात अस्पृ-श्यांना प्रतिनिधित्व मग पाहिजे कशाला? अशी सरकारची वरकरणी विचारसरणी होती. पण अस्पृश्यांच्या तोंडाला अशा रीतीने पाने पुसण्याचा अंतस्थ हेतू मुसलमानांच्या व राजेरजवाडचांच्या वाटणीत प्रसंगोपात कमी अधिक भर घालण्यास सवड ठेवावी हा असला पाहिजे आता उघडकीस आलेल्या या प्रकारा-वरून पाहता 'पुणे-करार' हा अस्पृश्य समाजाच्या बाबतीत एक सुदैवाचाच खेळ समजला पाहिजे. पण अस्पृश्यांना मध्यवर्ती कायदे कौन्सिलात पुणे करारामुळे शेकडा १८ जागा मिळाल्याचे पाहून हा आपल्या योजनेला दुर्दैवाने दिलेला एक प्रखर तडखाच आहे, असे सरकारी अधिकाऱ्यांना व मुत्सद्यांना वाटत असल्यास त्यात बिलकुल आश्चर्य नाही.

माझा पाय अद्याप थोडा दुखत आहे. फिरल्याम तो अधिक दुखेल या भीतीने मागच्या खेपेप्रमाणे संध्याकाळी डेकवर झपाटचाने चालण्याचा व्यायाम घेण्याचा मोह मी आवरीत असतो. माझा बहुतेक वेळ राऊंड-टेबल-परिषदेचे रिपोर्टस्, प्रो. स्लोन (Sloane) कृत नेपोलियन चरित्र व गांधीजींची अस्पृश्यता निवारक पत्रके वाचण्यात जातो. गांधीजींच्या या पत्रकातील काही विचार वाचून मला एक प्रकारे आनंददायी आश्चर्य वाटले. गांधीजींच्या विचारात केवढी मोठी क्रांती घडून आल्याचे यावरून दिसून येते. गांधीजींना आता आपण 'आपला माणूस' (Our man) म्हणावे; कारण ते आता आपली भाषा व आपले विचार बोलू लागले आहेत अस्पृश्य लोक अस्वच्छ असतात या सबबीवर त्यांच्याशी सहवास करण्यावर हरकत घेणाऱ्या एका टीकाकाराच्या पत्रास गांधींनी दिलेले उत्तरच पाहा ना ! 'जनता' तरी हेच सांगत नाही का आली आहे ? त्याचप्रमाणे अस्पृश्यांना भोगाव्या लागणाऱ्या हाल-अपेष्टांचे गांधीजींनी दुसऱ्या एका पत्रकात केलेले वर्णनही किती यथार्थ आहे. ते वाचीत असता मला वाटले की आपण जनता, समता अगर बहिष्कृत-भारत या आपल्या पत्रातील काही लेखाचे शब्दशः इंग्लिश भाषांतरच जणू काय वाचीत आहो ! भाषेच्या, त्याचप्रमाणे आकलन-शक्तीच्या बाबतीत गांधीजी आज आपल्या कितीतरी जवळ आलेले दिसतात. सह-विवाहाच्या व सह-भोजनाच्या बाबतीतही गांधीजींच्या विचारात आज केवढी अपूर्व क्रांती घडून आल्याचे दिसून येत आहे. दहा वर्षांपूर्वी चातुर्वर्ण्याच्या गडबड-गुंड्यात गुरफटून गांधीजी या गोष्टींना विरोध करण्यास सज्ज असलेले दिसत होते ! पण आता त्यांचा या गोष्टींना विरोध नसून उलट तसे होणे हे त्यांना श्रेयस्कर वाटत असल्याचे त्यांच्या एका पत्रकावरून स्पष्टपणे ध्वनित होत आहे. याप्रसंगी पुण्यास परवा घडलेल्या एका गोष्टीची मला आठवण झाली. पुणे-कराराबर आम्हा सर्वांच्या सहचा झाल्यावर ही आनंदाची बातमी घेऊन आम्ही सर्वजण गांधीजींकडे येरवड्यास गेलो. गांधीजींशी या बाबतीत बोलत असता श्री. राजगोपालाचारी असे म्हणाले : " डॉ. आंबेडकर आता आपल्या मताचे बनले. यावर गांधीजी उद्गारले : 'किती छान !' पण आता गांधीजींची ही पत्रके वाचून गांधीजींच्या मतांचा मी अनुयायी बनलो असे म्हणण्यापेक्षा गांधीजींची मते व विचारसरणीच आपल्या मताप्रमाणे व विचारसरणीनुरूप बनत चालली आहे असे म्हटल्यास ते सत्याला अधिक धरून नाही का होणार, असे मला विचारावेसे वाटते !

पण अद्याप एका बाबतीत गांधीजी हे आपल्यापासून विचाराने दूर व अलग आहेत. अस्पृश्यतानिवारणाशी सह-भोजन व आंतरजातीय विवाह यांचा कसा अन्योन्य संबंध आहे हे अद्यापिही गांधीजींच्या नीटसे ध्यानी आलेले दिसत नाही.

कारण, असे असते तर अस्पृश्यतानिवारण कार्यात सहभोजन व आंतरजातीयविवाह याचा समावेश होत नाही, असे जे त्यांनी आपल्या एका पत्रकात विधान केले आहे तसे ते त्यांनी केले नसते. या विषयासंबंधी ब्राह्मण-ब्राह्मणेतर, समता व जनता वगैरे पत्रांतील आपल्या लेखातून श्री. देवराव नाईक यानी ब्राह्मणी धर्माचे जे सुंदर व संयुक्तिक विवेचन केलेले आहे त्याचे परिशीलन गांधीजींसारख्यांनी केल्यास या बाबतीतील त्यांचा भ्रम दूर झाल्याशिवाय खचित राहणार नाही. 'जनता' पत्राचा अंक गांधीजींकडे नियमितपणे पाठविण्यात यावा, अशी माझी सूचना आहे.

गांधीजी पुन्हा उपवास करणार या कल्पनेने आम्हा सर्वांनाच एक प्रकारची काळजी वाटत आहे. पुष्कळांना अशीही भीती वाटते की हे ब्राह्मणी धर्मानुयायी कर्मठ व जीर्णमतवादी शास्त्री–पंडित, पुजारी आणि त्यांचे पाठीराखे गांधींना मरू देतील पण आपला 'धर्म' सोडणार नाहीत ! असे होणे ही एक मोठी आपत्तीच समजली पाहिजे. कारण गांधीजींसारख्यांचा बहुमोल प्राण त्या मानाने अशा कमी महत्त्वाच्या गोष्टीकरता नाहक खर्ची पडू पाहात आहे. 'मी मेलो तर माझा प्राण अस्पृश्यांच्या हिताकरता कामी आला व सत्कार्यी लागला या विचाराने मला समाधान वाटते' असे गांधीजी म्हणतात. पण मला त्यांना असे विचारावेसे वाटते की या प्रतिज्ञेपायी ते मेले पण अस्पृश्यता कायम राहिली तर त्यांच्या या मृत्यूपासून अस्पृश्यांचा कसा व कोणता फायदा होणार आहे ? गांधीजींनी आपल्या प्राणाचा विनियोग केवळ स्वतःचा लौकिक अगर व्यक्तिविषयक महत्त्व वाढविण्याकडे होऊ देऊ नये. अस्पृश्यांचे जर खरे हित त्यांना साधावयाचे असेल तर त्यांनी आपल्या प्राणाचा उपयोग अशा रीतीने करावा की त्यामुळे अस्पृश्य समाजाचे खरोखरच काही हित साधेल.

माझ्यासह या बोटीवर राऊंड–टेबल परिषदेकरिता चाललेले सरासरी दहा सभासद आहेत. परिणामाविषयी प्रत्येक जण साशंक आहे. ११ व १२ तारखेला दोन दिवस दोन–दोन तास एकत्र जमून आम्ही विचार विनिमय केला. अधिक मागण्याची व ते मिळविण्याची वेळ निघून गेली; व म्हणून आता तरी जे काही मिळेल ते पदरात पाडून घ्यावे अशी सर्वांची विचारसरणी दिसते. पण या परिस्थितीबद्दल कोणालाही आम्हाला दोष देता यावयाचा नाही. या राऊंड-टेबल-परिषदेतून मोठेसे काही निष्पन्न होणार नाही, हे संस्थानिकांच्या धोरणावरूनही स्पष्ट होत आहे. कारण प्रत्येक संस्थानचे प्रतिनिधी जे काय बोलतील ते फक्त आपापल्या संस्थानाच्या वतीने ते बोलणार आहेत ! संस्थानिकांच्या धोरणात त्यामुळे एकवाक्यता अगर संघटितपणा अथवा शाश्वती असणार नाही. त्यामुळे फेडरेशनची योजना मूर्त स्वरूप धारण करणार नाही. एक दुसऱ्याला जबाबदार

नाही अगर बांधलेला नाही आणि म्हणून मध्यवर्ती कारभारात जबाबदारी मिळण्याची आशाही सफळ होणार नाही. मुसलमान प्रतिनिधींचे धोरण व संस्थानी प्रतिनिधींचा तुटकपणा या दोन्ही घटना राऊंड-टेबल-परिषदेला अपशकून करीत आहेत काही अकल्पित चमत्कार जर घडून आला नाही तर सायमन कमिशनने दिले त्यापेक्षा अधिक काही हिंदुस्थानला मिळण्याचा संभव दिसत नाही. आणि सायमनच्या देणगीलाही सेकंड चेंबरचे शुक्लकाष्ठ लागले जाऊन तिच्यात जे काही थोडेफार उपयोगी आहे तेही त्यामुळे निरुपयोगी होण्याची भीती वाटते. 'देशाच्या पात्रतेप्रमाणे त्याला राज्यशासन पद्धती लाभत असते,' असे कोणी एकाने म्हटले आहे.

विशेष लंडनला गेल्यावर दुसऱ्या पत्रात.

— भीमराव

— ० —

२. गोलमेज परिषदेचे कामकाज

(दि. २४–११–३२ रोजी लंडनवरून 'जनते'साठी लिहिलेले दुसरे पत्र जनता, दि. १७ डिसेंबर १९३२)

मागील पत्रात म्हटल्याप्रमाणे १४ तारखेच्या मध्यरात्री आमची 'व्हिक्टोरिआ' बोट पोर्टसय्यदहून पुढे चालू झाली व नंतर तिने भूमध्य समुद्रात प्रवेश केला. हिंदी–महासागराप्रमाणेच भूमध्य समुद्रही वर्षाकाठी काही दिवस शांत व काही दिवस खवळलेला असतो. नोव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत तो बहुधा खवळलेलाच असतो त्याप्रमाणे पंधरा तारखेला सकाळी त्याने उग्र रूपच धारण केलेले दिसले. त्या दिवशी दुपारी बारा वाजेपर्यंत त्याचे तुफान सुरू होते; व त्यामुळे बोटीवरील सर्वांच्या हालचाली बंद होत्या. जो तो आपापल्या 'केबिन'चा आश्रय धरून बसलेला होता खवळलेल्या अगर तुफानी दर्याचे व्यक्तिशः मला काहीच वाटत नाही. मी एक चांगला दर्यावर्दी आहे पण बहुत करून इतर पुष्कळांना खवळलेल्या समुद्राची भीती वाटते; व त्यांना फार त्रास होतो. दुपारी बारानंतर समुद्र शांत होत गेला. त्यामुळे बरे वाटू लागले. पण पुन्हा रात्री त्याने उग्र स्वरूप धारण केले. मोठमोठ्या प्रचंड लाटा उसळू लागल्या व खेळाडूंच्या लाथांनी फुटबॉल जसा वरखाली उसळतो तशी आमची बोट या प्रचंड लाटांच्या प्रहारांनी वरखाली उसळ्या घेऊ लागली व आजूबाजूला हेलकावे खाऊ लागली. या घालमेलीत सर्वांची झोप पळाली. ती सारी रात्र सर्वांनी जागून काढली. पहाटेच्या सुमारास वादळ शांत झाले. जिनेव्हाला येऊन पोहोचेपर्यंत मग पुढे समुद्र तसाच शांत राहिला. यापुढे बांधण्यात येणाऱ्या इटालियन आगबोटी अशा तयार व्हावयाच्या आहेत म्हणतात की समुद्र कितीही खवळला व लाटा कितीही उसळल्या तरी त्या अगदी स्थिर राहतील ! हालणार नाहीत अगर डोलणार नाहीत. अशा 'स्थितप्रज्ञ' व 'अचंचल' नमुन्याच्या काही बोटी फ्रेंच लोकांनी बांधल्याचेही मी ऐकतो. मानवी बुद्धीला काहीच अशक्य नाही. अशा तऱ्हेच्या न हालणाऱ्या-डोलणाऱ्या बोटी लवकरच सर्वत्र सुरू देखील झालेल्या दिसतील. अमेरिकेस झाल्यास समुद्र-प्रवासात सध्या होणारी दगदग व त्रास ही बहुतेक सारी मिटून जातील.

स्नेही–सोबती जोडण्याची कला माझ्या ठायी नाही. माझी मुद्रा अतिशय कडक व उग्र दिसते आणि त्यामुळे मजजवळ येण्यास लोक बचकतात, असे म्हणतात. असे असणे काही अशक्य नाही. पण माणसांपेक्षा पुस्तकांचा सहवास

मला अधिक आवडतो, ही गोष्ट मात्र खरी आहे. तिसरी गोष्ट अशी की माझ्या पुढे आज इतके प्रश्न उभे आहेत आणि इतक्या नानाविध विचारांनी माझे मन सदा व्यापलेले असते, की इतरांच्या सहवासाची अगर स्नेहसंबंधाची मला उणीव अगर आवश्यकताही कधी भासत नाही. असे असले तरी मला इतरांच्या स्नेह-भावाचा लाभ मुळीच मिळत नाही अगर मी नवे स्नेही अगदीच जोडीत नाही, असे नाही. या खेपेलासुद्धा तसा मी एक नवीन मित्र संपादन केला. जत संस्थानच्या तरुण महाराजांशी माझा स्नेह जुळून आला. हे जत-संस्थानाधिपती स्वभावाने फार प्रेमळ व मनाचे मोकळे आहेत. मुंबईहून निघाल्यापासून त्यांचे व माझे जेवण एकाच टेबलावर होत असे. आमच्या बरोबर त्यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी व फलटण संस्थानचे दिवाण श्री. गोखले हेही असत. श्री. गोखले हे खरोखरच फार सज्जन व सुशील गृहस्थ आहेत. जतच्या तरुण महाराजांना समुद्राचा प्रवास फारच जाणवला. समुद्राने जरा हालचाल केली की ते आपले सारखे केबिनमध्ये जाऊन बसत. ते सतरा तारखेला नेपल्समध्ये उतरले. त्यांना निरोप देताना मला खरोखरच वाईट वाटले.

अठरा तारखेला सकाळी सात वाजता आमची बोट जिनोवाला येऊन पोहोचली. आठ वाजता आम्ही बोटीतून खाली उतरलो. सामान तपासण्यासाठी येथे जो एक 'कस्टम हॉल' बांधण्यात आला आहे तो खरोखरच शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना समजला पाहिजे. लंडनला जाणारी आमची गाडी जिनोवाहून ११-४० ला सुटणार होती. इकडे तिकडे हिंडण्याला त्यामुळे सरासरी आम्हाला दोन तासांची सवलत होती. आम्ही काही जणांनी घोडचाची गाडी केली आणि जिनोवा शहरातून इकडे तिकडे भटकलो. हे शहर फार जुने असून त्याच्या पाठीमागे एक मोठी परंपरा आहे. बरोबर ११-४० ला आमची ट्रेन सुटली. मध्यंतरी टचुरीनला आम्ही गाडी बदललली व एकोणवीसला सकाळी पॅरिसला येऊन पोहोचलो. पॅरिसला पुन्हा आम्हाला गाडी बदलावी लागली. पॅरिसहून आम्ही साडेआठ वाजता निघालो व अकराला कॅलेला आलो. इंग्लिश खाडीतील बोटीत आम्ही शिरताच आम्हाला श्री. जोशी, पेट्रो वगैरे मंडळी भेटली. ही मंडळी पी. ॲण्ड को कंपनीच्या बोटीनं मुंबईहून आमच्या दोन दिवस अगोदर निघाली होती. खाडीत सर्वत्र धुके पसरले होते; आणि त्यामुळे बोट अगदी सावकाश चालली होती. खाडीत तुफान नव्हते हीच मोठी नशिबाची गोष्ट समजली पाहिजे. तसे असले म्हणजे या खाडीतला प्रवास फार त्रासदायी वाटतो. डोव्हरला येण्याला आम्हाला नेहमीपेक्षा पन्नास मिनिटे अधिक लागली. जवळ जवळ दोन वाजता आम्ही डोव्हरला उतरलो. सव्वादोनला आम्ही डोव्हरहून आगगाडीत बसलो. आधीच एक तास उशीर झाला होता. तो लंडनला पोहोचेपर्यंत भरून काढता आला असता. पण मध्येच आमच्या

ट्रेनचे इंजिन बिघडले. त्याची नाडी तपासण्यात आणखी अर्धा तास खर्ची पडला. त्यामुळे लंडनला नेहमी साडेतीनला जाणारी आमची ट्रेन त्यादिवशी पावणे पाचला पोहोचली. येथेही सर्वत्र धुके पसरलेले होते. चोहोकडे अंधार पडला होता. आपापल्या स्नेहघासोबत्यांना भेटण्याकरिता व्हिक्टोरिआ स्टेशनवर मंडळी येऊन तिष्ठत उभी होती. आम्हा प्रतिनिधींच्या स्वागतार्थ सरकारचे प्रतिनिधीही उपस्थित झाले होते. स्टेशनवर सर्वत्र गर्दी झाल्यामुळे मी आपला एकटाच जो तडक निघालो तो मला जेथे उतरावयाचे होते त्या रॉयल हॉटेलमध्ये येऊन पोहोचलो.

राउंड टेबल परिषदेची पहिली बैठक आम्ही येथे येण्यापूर्वीच म्हणजे १७ तारखेला झाली. तिच्यात पुढील कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. परिषदेच्या काम ला २१ तारखेपासून खरी सुरुवात झाली आहे. आमची अशी अपेक्षा होती की मुसलमान प्रतिनिधी आता इतर प्रतिनिधींशी एकमत करून हिंदुस्थानकरता हिंदी लोकांना जबाबदार अशा राज्यपद्धतीची मागणी करतील; कारण जातिविशिष्ट अशा त्यांच्या बहुतेक मागण्या त्यांच्या पदरात पडलेल्या आहेत. पण ही आमची आशा सफल होईलसे वाटत नाही. नेहमीच्या परिपाठाप्रमाणे मुसलमान प्रतिनिधींनी आपला स्वतंत्र गट स्थापन केलेला असून नामदार आगाखान हे त्यांचे अध्यक्ष आहेत; व मि. झफरुल्लाखान हे त्यांची बाजू मांडणारे त्यांचे 'स्पोक्समन' (spokesman) आहेत. सर्व राउंड-टेबल परिषदेत हा मुसलमानांचाच फक्त सुसंघटित असा एक गट आहे. हिंदू हे आपल्या पूर्वपरंपरेनुसार विभक्त व परस्परांपासून अलिप्त आहेत. हिंदूंपैकी प्रत्येकजण जे काही बोलेल व करील ते स्वतःच्या नावाने व स्वतःकरिता बोलेल अशी वस्तुस्थिती आहे. आणि सगळ्यात खेदाची व चिंतेची गोष्ट वाटते ही की हिंदु-मुसलमानांचे येथेही एकादेखील मुद्यावर एकमत अगर एकवाक्यता होऊ शकत नाही. हिंदूंबरोबर एकमत करून घेण्याची मुसलमानांना आवश्यकताच मुळी भासत नाही. आपण म्हणू ते हिंदूंनी मान्य करावे, असे मुसलमानांना वाटते. असे का असावे याचा येथील लोकांना अचंबा वाटतो. काहींच्या मते हिंदूंशी मतभेद ठेवण्यात मुसलमानांचे हित साधले जाते. कारण हिंदू-मुसलमानातील या मतभेदामुळे ब्रिटिशांना दोघांच्या भांडणात निर्णय देण्याची साहजिक संधी मिळते. आणि मुसलमानांना आशा वाटते की ब्रिटिशांनी दिलेला कोणत्याही वादग्रस्त बाबतीतील निर्णय आपल्याला हितकारक व अनुकूल असाच असेल! या त्यांच्या अंदाजात बरेचसे तथ्य आहे, असे मला वाटते. ते कसेही असो; पण ब्रिटिशांना हिंदू मुसलमानांच्या वादात मध्यस्थी करून निर्णय देण्याचा अधिकार व संधी आहे ही वस्तुस्थिती हिंदू मुसलमानातील ऐक्याला विघातक आहे. यामुळे हिंदू-मुसलमानात सलोखा होणे अशक्यप्राय झालेले आहे, हा गोष्ट हिंदूंनी आता ओळखली असून आपणही सुसंघटितपणे वागावे असे त्यांना वाट् लागले आहे. सर पेट्रोखेरीज सर्व हिंदू प्रतिनिधींना ऐक्याची जरुरी तीव्रपणे भासू

लागली आहे. सर पेट्रो हे माझ्या शेजारीच बसतात. आणि आपल्या प्रत्येक भाषणाच्या शेवटी "का ? मी कसे बोललो" या भावार्थाने माझे मत विचारतात. त्यांना मुसलमानांचा जिव्हाळा वाटतो. हिंदुस्थान अगर हिंदू यांना त्यांच्या हृदयात फारच अल्प स्थान आहे.

ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे जर कामकाज झाले तर बीस डिसेंबरला परिषद खलास होईल आतापर्यंत ज्या प्रश्नांची वाटाघाट झाली त्यात अस्पृश्यांच्या मतदार–संघाचा व प्रतिनिधित्वाचा प्रामुख्याने विचार झाला. मला कळविण्याला आनंद वाटतो की आपल्या या प्रश्नाच्या बाबतीत कसल्याही प्रकारची घासाघीस अगर प्रतिकूल टीका कोणीच केली नाही; व आपले हे प्रश्न समाधानकारकपणे निकालात निघाले. अजून परिषदेपुढे दुसरा फार मोठा कार्यक्रम व दुसरे अनेक भानगडीचे प्रश्न आहेत. बीस डिसेंबरपर्यंत हे सारे कसे आटोपेल ते आटोपो, पण या एकंदर कार्यक्रमाविषयी येथे फारच थोड्यांना उत्साह अगर आपलेपणा वाटत असलेला दिसून येतो. खरे व लोकांना जबाबदार असणारे स्वराज्य कधी पदरात पडेल याचा सर्वांना ध्यास लागलेला दिसतो. पण या खऱ्या स्वराज्याचा प्रश्न तर या परिषदेच्या कार्यक्रमात कोठे दिसतच नाही ! याचा अर्थ असा की राज्यपद्धतीचे कागदी स्वरूप काय असावे हे ठरवून आम्ही परत येऊ पण हे 'स्वराज्य' अमलात कधी येणार हे मात्र आम्हाला नक्की सांगता येणार नाही. ती गोष्ट गुलदस्तातच राहणार आहे. पण याही प्रश्नाचा निकाल लावून घेण्याचे कोणीतरी ठरविले आहे म्हणतात. असे झाल्यास या प्रश्नामुळे उत्पन्न होणाऱ्या वादळात परिषदेचे तारू बुडण्याचा संभव आहे. या खेपेला आम्हा महाराष्ट्रीयन प्रतिनिधींना आणि त्यातल्यात्यात विशेषत: मला महत्त्वाचा व कौतुकाचा असा एक नवीन ठेवा लाभल्यासारखे वाटत आहे. हा ठेवा म्हणजे महाराष्ट्राचा 'मोहरा' समजले जाणारे पुण्याचे आपले रा. केळकर हे होत. पुणेरी ब्राह्मणांनी केळकरांच्या कर्तृत्वाची हंडी राऊंड -टेबल-परिषदेच्या सर्वात उंच खुंटीला आधीच लटकावून देण्याची करामत केलेली आहे ! तात्यासाहेबांच्या तेजाखाली केवळ आम्ही महाराष्ट्रीय प्रतिनिधीच नव्हेत तर बाकीचे इतर सारे प्रतिनिधी पार दिपून फिक्के पडणार असे या मंडळींनी केळकरासंबंधीचे भविष्यपुराण आधीच वर्तवून ठेवलेले आहे त्यामुळे आमच्या या प्रतिस्पर्धाच्या तडाख्यातून आमच्या लौकिकाचे रक्षण करण्यासाठी व आमचा हा 'दक्षिणी वीर' हिंदुस्थानचे पाऊल कसे व किती पुढे ढकलणार हे कौतुक पाहण्यासाठी आम्ही अगदी डोळ्यात तेल घालून टपून बसलो आहो ! तात्यासाहेबांच्या बुद्धितेजाचे खग्रास ग्रहण लागण्याची भीती मला तरी निदान काही वाटत नाही. आता राहिला प्रश्न देशाचे पाऊल रा. केळकर किती व कसे पुढे ढकलतात यासंबंधीचा ! तेही आता दिसणारच आहे ! घोडा मैदान काही फारसे दूर नाही.

— ० —

३. राजकीय सत्ता हेच आपले ध्येय

(दिनांक ४ मार्च १९३३ रोजी मुंबईला बाबासाहेबांना मानपत्र देण्यात आले. त्या मानपत्राला बाबासाहेबांनी दिलेले उत्तर. जनता, दिनांक ११ मार्च १९३३)

या मानपत्रात माझ्या संबंधाने गौरवपर जे काही लिहिले आहे ते कितपत खरे आहे, हे सांगणे कठीण आहे. परंतु एवढे मात्र खरे की त्यात स्तुतिपर अलंकारयुक्त भाषेने तुम्ही तुमच्याच सारख्या एका माणसास गुणातीत ईश्वर बनविले आहे. हे खरे मानले तर या तुमच्या भावना स्वहित नाशक आहेत, असेच मी समजतो. व आज मुले कुठारः म्हणूनच प्रथम दोन शब्द सांगणे प्राप्त आहे. दुसऱ्याला ईश्वर बनवायचे व आपल्या उद्धाराचा भार त्याच्यावर टाकावयाचा ही भावना तुम्हास कर्तव्यपराङ्मुख करणारी आहे. या भावनेला जर का चिकटून बसलात तर तुम्ही प्रवाहाबरोबर वाहणारे लाकडाचे ओंडके बनून तुमच्या अंगी वास करीत असलेली शक्ती निकामी ठरेल व या नवयुगात प्राप्त झालेली राजकीय सत्ता निरर्थक ठरेल. आजपर्यंत तुम्ही या नादान भावनेस तुमच्या मनात घर करू दिल्यामुळे तिने तुमच्या वर्गाचा समूळ नाश केला आहे. मी याच्याही पुढे जाऊन असे सांगतो की असल्या नादान भावनेने तुमचाच काय पण सर्व हिंदू-समाजाचा नाश केला आहे. आपल्या या हिंदुस्थान देशाच्या हीनत्वाला काही कारण असेल तर हे देवपण होय.

इतर देशातील लोक समाजात काही बखेडा माजल्यास, किंवा समाज संकटात सापडल्यास एकोपा करून व सर्व सामर्थ्य एकवटून आपला स्वतःचा उद्धार करून घेतात. परंतु आपल्या धर्माने आमची अशी समजूत करून दिली आहे की माणूस काही करू शकत नाही; समाजावर मोठे संकट आल्यास किंवा समाजाची प्रगती खुंटल्यास देव आपल्यामध्ये अवतार घेतो व आपले संकट निवारण करतो. सार्वत्रिक रीतीने संकटास तोंड न देता ईश्वराच्या अवताराची वाट पाहात बसतात.

आमचा हिंदू-धर्म पुरातन आहे, ग्रीक, रोमन इत्यादी पुरातन व प्रसिद्ध राष्ट्रे लयाला गेली. परंतु आमचा हिंदू समाज अद्याप जिवंत आहे; अशी हिंदू लोक शेखी मिरवितात. परंतु नुसत्या जगण्यात कवडीची किंमत नाही. मनुष्य इज्जतीने जगतो की नाही याला महत्त्व आहे. या दृष्टीने पाहिल्यास हिंदू समाजाने

जिवंत राहून काय दिग्विजय लावला आहे ? दुसऱ्याचे लाजिरवाणे दास्य पत्करण्यापलीकडे त्याने काय केले आहे ? असल्या जगण्यात काही अर्थ नाही. मर्दुमकी गाजवून दोन दिवस जगणे हे दुसऱ्याचे गुलाम होऊन १०० वर्षे जगण्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठपणाचे लक्षण होय. दोघांच्या झुंजीत एकजण पलायन करूनही जिवंत राहतो व जगतो. तर दुसरा प्रतिपक्षाचा पाडाव करून जगतो. पळून जाऊन व दुसऱ्याचे वर्चस्व स्वीकारून जीव जगविणारा मनुष्य काय मिळवितो ? दुसऱ्याचा गुलाम बनतो, स्वत्व विसरून जातो व गुलामांचा तांडा अधिक वृद्धिगत करतो; आणि नामर्दपणाचा फैलाव करतो. यापेक्षा मरणे काय वाईट ? आता हिंदूसमाज दुसऱ्यांचा दास किंवा गुलाम होऊनच का राहिला याचा विचार केल्यास तो आपल्या उद्धारासाठी 'ईश्वराची वाट' पाहात बसला हेच त्याला कारण आहे, अशी माझी दृढ समजूत आहे.

या जगात ईश्वर असो किंवा नसो त्याचा विचार करण्याची तुम्हास काही जरुरी नाही. एवढी गोष्ट मात्र खरी आहे की जगात ज्या हरघडी घडामोडी होतात त्या माणसेच करीत असतात. काही थोडे सुशिक्षित व स्वार्थपरायण लोक दुसऱ्या असंख्य लोकांना अज्ञानांधःकारात ठेवून त्यांना ईश्वराविषयीच्या खोट्या कल्पनांच्या पाठीमागे लावून व त्यांच्या धर्मभोळेपणाचा फायदा घेऊन आपले स्वतःचे हित साधीत असतात. कारण या क्लृप्तीने तुमची संघशक्ती नष्ट होऊन तुम्ही मेंढरासारखे पोकळ भावनांच्या पाठीमागे लागता व तुम्हाला सर्वतोपरी लुबाडण्याचा त्यांचा मार्ग निष्कंटक होतो. आज आपण दीनावस्थेस पोहोचलो आहोत. त्या स्थितीतून बाहेर पडून तुमचा उद्धार करून घ्यावयाचा असेल तर तुम्ही या कल्पनांना अजिबात फाटा दिला पाहिजे. तुम्ही सर्वांनी–स्त्रीपुरुषांनी खात्री बाळगली पाहिजे की तुमचा उद्धार करण्यास दुसरा कोणीही येणार नाही; किंवा तो मीही करणार नाही. तर मनात आणाल तर तुमचा उद्धार तुम्हीच करून घेण्यास समर्थ व्हाल. मला सांगण्यास आनंद वाटतो की आपल्या वर्गात चळवळीचा वारा चोहीकडे पसरला आहे. पण ही जागृती जरी झाली असली तरी सुद्धा मला तुम्हाला एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची आहे ती ही की यापुढे तुमचे सर्व भवितव्य राजकारणात आहे; दुसऱ्या कशातही नाही. पंढरपूर, त्र्यंबकेश्वर काशी, हरिद्वार वगैरे यात्रा करून किंवा शनिमाहात्म्य, शिवलीलामृत, गुरुचरित्र इत्यादी पोथ्यांची पारायणे करून किंवा एकादशी, सोमवार वगैरे उपवास धरून तुमचा उद्धार होणार नाही. तुमचे वाडवडील हजारो वर्षे या गोष्टी करीत आले तरीही तुमच्या शोचनीय स्थितीत एक तसूभर तरी फरक पडला आहे काय ? पूर्वीच्या फाटक्या चिंध्या तुमचे अंगावर, अर्ध्याकच्च्या भाकरीचेच तुकडे अद्याप तुमच्या पोटास, गुराढोरापेक्षाही गलिच्छ अशी आजतागायत तुमची राहाणी, व कोंबड्याप्रमाणे रोगराईस बळी पडण्याची पूर्वीचीच तुमची निर्बलता ! या दुःसह

परिस्थितीत अद्याप का बदल झाला नाही ? एकच औषध घेऊन रोग बरा होत नाही तर आपल्याला औषधात फेरबदल करावयास नको का ? वैद्य बदलावयास नको का ? तुमच्या आजपर्यंतच्या वाऱ्या तुमच्या कामी आल्या नाहीत, किंवा तुमचे उपवास जन्माची उपासमारी टाळण्यास समर्थ झाले नाहीत.

तुमची स्थिती पालटण्यास, तुमचा उद्धार करून घेण्यास आता तुम्हाला एकच उपाय आहे आणि तो म्हणजे राजकारण–कायदे करण्याची शक्ती ! तुम्हास पोटभर खाण्यास मिळत नाही; तुम्हाला लहानशा खोलीत गर्दी करून राहावे लागते; तुम्हाला द्रव्यार्जन करण्याचे साधन मिळत नाही व तुम्हाला बेकार राहावे लागते. याचे कारण काय ? देव का दैव ? या दोनही गोष्टी कारण नाहीत. तुम्हाला अन्न, वस्त्र, वसतिस्थान व शिक्षण देणे हे देशातील कायदे करणाऱ्या सत्तेचे काम आहे; व या सत्तेचा कारभार तुमच्या सामर्थ्याने यापुढे चालणार आहे. या कायदे करणाऱ्या शक्तीत तुमचा समावेश झालेला आहे. संसार सुखाचा करून घेण्याकरिता त्या प्रकारचे कायदे तुम्ही करून घेतले पाहिजेत. समजा आज या रेल्वेच्या चाळीत तुम्हास प्रत्येक कुटुंबास एकच खोली मिळते. परंतु कायदा होईल तर तो तुम्हास २–२ खोल्या सुद्धा मिळवून देईल.

तुमच्या मुलास शिक्षण देण्यास तुमच्याजवळ पैसा नाही परंतु कायदा होईल तर तुमच्या मुलांच्या शिक्षणाची सर्व सोय लागेल. तुमच्यात पुष्कळसे लोक बेकार आहेत. सर्व लोकांस काम देणे किंवा नसेल त्या वेळेस त्यांना पोसणे हे सरकारचे कर्तव्य आहे. असा कायदा होईल तर बेकारीत उपाशी मरण्याची पाळी तुमच्यावर येणार नाही.

श्रीमंत लोक आजारी पडले तर पैसे खर्च करून औषधोपचार करतात व बरे होतात. परंतु गरिबाची आजारपणात कायद्यानेच सोय होईल. सारांश, सध्या सर्व सुखाचे आगर कायदा आहे. म्हणून आपण सर्वांनी कायदा करण्याची शक्ती पूर्णपणे हस्तगत करून घेतली पाहिजे. म्हणून 'जप, तप, पूजा–अर्चा करणे' इकडील आपले लक्ष काढून राजकारणाची कास धरणे हाच तुमच्या उद्धाराचा मार्ग आहे. हीच गोष्ट आज प्रामुख्याने मला सांगावयाची होती; आणि ती मी तुम्हास स्पष्टपणे सांगितली आहे.

थोड्या दिवसांपूर्वी काँग्रेसचे व वरिष्ठ वर्गाचे लोक असे म्हणत असत की आम्हाला हवे तसे स्वराज्य दिल्याशिवाय आम्ही ते चालविण्यास मदत करणार नाही. परंतु आज ते निराळीच भाषा वापरू लागले आहेत.

कालच कायदेभंग करून तुरुंगात शिक्षा भोगत असलेले काँग्रेसचे एक पुढारी सरकारची माफी मागून बाहेर आले आहेत व ते म्हणू लागले आहेत की " म. गांधींची कायदेभंगाची चळवळ चुकीची आहे. मी यापुढे कायदेभंग करणार नाही. " त्यापूर्वी महात्मा गांधींचे पट्टशिष्य श्री. राजगोपालाचारी यांनी जाहीर केले आहे की नवीन सुधारणा मिळाल्यावर काँग्रेस शक्यतर त्यांचा स्वीकार

करील. केसरीचे रा. केळकर यांचे म्हणणे आहे की नवीन मिळणाऱ्या सुधारणा अपुऱ्या असल्या तरीसुद्धा त्या मान्य करावयास आम्ही कबूल आहोत.

सारांश, ते लोक आज आपली पूर्वीची भाषा बदलीत आहेत. हे जे मतपरिवर्तन झाले आहे ते का झाले आहे ? या प्रश्नाचे उत्तर अगदी सीधे आहे. आता बहिष्कार पुकारणाऱ्या लोकांना असे वाटू लागले आहे की जर या पुढेही काँग्रेसच्या लोकांनी बहिष्कार तसाच चालू ठेवला तर येणारी सत्ता इतर समाजातील लोक बळकावून बसतील. म्हणून त्यांच्या दृष्टीने नको असलेली सुधारणा ते स्वीकारण्यास तयार झाले आहेत. सारांश, जे लोक बहिष्काराची घोषणा करीत होते ते देखील स्वहित साधण्यात दक्ष आहेत.

यापुढे हिंदुस्थानात जो लढा चालू राहणार आहे तो ब्रिटिश लोक व हिंदुस्थानातील लोक यांच्यात चालू राहणार नसून हिंदुस्थानातीलच पुढारलेले लोक व मागासलेले लोक यांच्यात चालणार आहे. तुम्ही कदाचित असे म्हणाल की मागासलेला वर्ग बहुसंख्याक आहे, म्हणून त्यास पुढारलेल्या वर्गापासून भीती बाळगण्याचे कारण नाही. परंतु तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे की एखादा समाज बहुजन समाज आहे एवढ्यावरच भागणार नाही तर तो जागृत, सुशिक्षित, स्वाभिमानी असेल तरच त्याचे सामर्थ्य वाढेल. नाहीतर गिरणीच्या मालकाने किंवा एखाद्या श्रीमंत सावकाराने तुम्हास लाचलुचपत दाखविली व त्यासाठी तुम्ही आपली मते त्यांना विकली तर तुमच्या समाजाचे वैशिष्ट्य नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. आपल्या वर्गातील माणसाशिवाय भाडोत्री माणसे तुमच्या समाजाचे कवडीचेही कल्याण करू शकणार नाहीत. आपल्या समाजाला काही तरी वैशिष्ट्य आहे, ही भावना नेहमी जागृत ठेवली पाहिजे. तसेच आपसातील मतभेद दूर करून आपण आपले संघटन वाढविले पाहिजे, व परिस्थितीचे ज्ञान करून घेतले पाहिजे. यासाठी आपल्या समाजातील प्रत्येक माणसाने जनता पत्राचे वर्गणीदार होऊन परिस्थितीचे ज्ञान करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण परिस्थितीचे बरोबर ज्ञान झाल्याशिवाय तुमचा फायदा तुम्हास करून घेता येणार नाही. शेवटी व्हॉलिंटिअर (समता सैनिक दल) बद्दल मला काही सूचना कराव्याच्या आहेत. व्हॉलिंटिअर म्हणजे आमच्यातील ज्ञानवान व जाणता माणूस आहे, असे मी समजतो. नुसते खाकी रंगाचे कपडे अंगावर घातले म्हणजे लगेच व्हॉलिंटिअर होतो असे मी समजत नाही. आपल्या समाजाला सज्ञान करणे हे व्हॉलिंटिअर लोकांचे मुख्य कर्तव्य आहे. अज्ञान समाजाला ' जनता पत्र ' वाचून दाखवून त्यात काय लिहिले आहे हे समजावून देणे हे त्यांचे कर्तव्य आहे व ते आपले कर्तव्य बजावतील, अशी मला आशा आहे. आपणा सर्वांचे पुन्हा आभार मानून मी आपली रजा घेतो.

---

४. सार्वजनिक कार्यासाठी फंड जमवा

(नगर जिल्ह्यातर्फे दि. १२-४-३३ रोजी मानपत्र देण्यात आले. त्याप्रसंगी दिलेले भाषण. जनता, दिनांक २२ एप्रिल १९३३)

हा आजचा समारंभ नगर जिल्ह्यातील मंडळींकडून साजरा करण्यात येत आहे. त्यांच्याकरिता कोणतीही स्पेशल कामगिरी मी केली नसताना फक्त माझ्यावरील त्यांच्या प्रेमामुळेच हा समारंभ घडून येत आहे, याबद्दल या मंडळींचे मी आभार मानतो. नगर जिल्हा इतर जिल्ह्यांपेक्षा थोडा मागासलेला आहे. या जिल्ह्यातील सामाजिक परिस्थिती अडचणीची आहे, हे मी जाणून आहे. या जिल्ह्यातील महार लोकांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यामुळे दोन पंथ झाले आहेत. असे असता या जिल्ह्याकडे विशेष लक्ष पुरविणे मला शक्य झाले नाही, याबद्दल वाईट वाटते. मला नवीन असे काही सांगण्यासारखे राहिलेले नाही. तरीपण या खुर्चीवर बसल्यापासून माझ्या मनात खेदाचे प्रकार घुटमळू लागले आहेत. जमलेल्या लोकांना असे वाटत असेल की आपण पुढारी झालो असतो तर किती चांगले झाले असते ! डॉ. आंबेडकरांचे नाव बऱ्या वाईट प्रकारे वर्तमानपत्रातून वाचायला मिळते तसे आपले झाले असते. माझी स्वतःची अशी प्रबळ इच्छा आहे की माझ्या स्थानी दुसरा कोणी येईल तर मी स्वतःला भाग्यवान समजेन. माझ्या गळ्यात हार घालणाऱ्याला आनंद झाला असेल, परंतु त्याच्या उलट माझी स्थिती झाली आहे. तुम्ही माझी जी स्तुती केली आहे, त्यामुळे माझी जबाबदारी वाढलो आहे. तुम्ही माझ्यापासून काहीतरी कार्याची अपेक्षा करीत असता. मला पुष्कळ वेळा वाटते की समाजाची जबाबदारी न घेता मी एकटा राहिलो असतो तर दैववान झालो असतो. माझे सर्व आयुष्य विद्यार्थीदशेत जावे अशी माझी इच्छा होती. म्हणून जिभेला टाचा मारूनसुद्धा मी अनेक पुस्तके खरेदी केली. एखादी प्रोफेसराची नोकरी पत्करून पुस्तके वाचण्यात सुखाने काळ काढावा अशी माझी पहिली इच्छा होती. परंतु सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा मला अस्पृश्यांच्या चळवळीत पडावे लागले. आता मात्र यातून पाय काढण्याची मला भीती वाटते. अस्पृश्य समाजाची जबाबदारी साधी सोपी नाही, निव्वळ स्तुतीने किंवा सभेने फायदा होईल, असे मला वाटत नाही. तसे असते तर यापूर्वीच सर्व काही झाले असते. रोज मजकडे २५-३० पत्रे येतात. ती वाचणाराला पाझर फुटल्याशिवाय राहणार नाही. त्या कामात नित्य लक्ष घालणारी माणसे

पाहिजेत तुमच्यात जी थोडीबहुत माणसे आहेत ती माझ्या दुर्गुणामुळे म्हणा किंवा तुमच्या दुर्दैवामुळे म्हणा माझ्याबरोबर काम करण्यास तयार नाहीत. नुसता कार्य करणाऱ्या माणसांचा अभाव आहे एवढेच नसून पैशांचीही टंचाई आहे. मजकडे जो येतो तो हात हालवीत येतो. न पैसा, न माणूस, न बुद्धिमत्ता. असे असताना या समाजाचे काम करणे कठीण आहे डॉ सोळंकींनी मला या कामातून मुक्त करावे. इतर समाजातील लोक चतुर्थाश्रमात वयाची ५० वर्षे उलटल्यानंतर समाजकार्यास आरंभ करतात परंतु मला वयाच्या २५ व्या वर्षीच समाजकार्य सुरू करावे लागले. आता आपल्या समाजाला राजकीय सत्ता मिळालेली आहे. याउपर माझी समाजाला विशेष आवश्यकता आहे, असे वाटत नाही. शिकलेली माणसे तयार होत आहेत. अजून जरी आयुष्याची काही वर्षे माझ्या स्वाधीन होतील तर मला माझे व्यक्तिगत हित साधता येईल तुम्ही स्वतःचे पायावर काम करा. ज्यांना माझे व डॉ. सोळंकींचे वैषम्य वाटत असेल त्यांनी आम्हास सुचवावे, आम्ही एका पायावर तयार आहोत. प्रत्यक्ष सर्व प्रकारची जबाबदारी यापुढे मी घेऊ इच्छित नाही. सार्वजनिक कार्याची साधन-सामग्री तुम्ही तयार केली पाहिजे. काँग्रेसने आपल्या चळवळीसाठी आतापर्यंत २ कोटी रुपयांपेक्षाही जास्त खर्च केला असेल. मुसलमानांनी आपल्या चळवळीसाठी तितका किंवा त्यापेक्षाही जास्त खर्च केला असेल. आपल्या लोकांनी आपल्या चळवळीसाठी किती खर्च केला! फारतर २-३ हजार रुपये ! अमला सर्वंग सौदा मला लाभला आहे. य पुढे मात्र तुम्हाला तुमची जबाबदारी ओळखणे प्राप्त आहे. माझे बरेच दिवसाचे हृद्गत स्पष्ट शब्दात सांगितले. ते ऐकून घेतल्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानून आपली रजा घेतो

० ० ०

(मुंबई येथे दि. १३-४-३३ रोजी डॉ. सोळंकींना मानपत्र देतेवेळी अध्यक्ष या नात्याने केलेले भाषण.)

आजच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मला अतिशय आनंद होत आहे. सदर प्रसंगी आपणास तीन कार्ये पार पाडावयाची आहेत (१) डॉ. सोळंकी साहेबांना मानपत्र अर्पण करावयाचे आहे (२) म्यु. स्कूल कमेटीचे चेअरमन प्रो. राव यांनी अस्पृश्य वर्गाची अभिनंदनीय कामगिरी केली त्याबद्दल त्यांचा सन्मान करावयाचा आहे व (३) नगर जिल्ह्याच्या शिक्षणाप्रीत्यर्थ बोर्डिंग उघडण्याच्या कार्याचा विचार करावयाचा आहे. डॉ. सोळंकी साहेबांनी अस्पृश्य वर्गासंबंधी केलेली कामगिरी तुमच्या परिचयाची आहे. ती विशद करून सांगण्याची जरुरी नाही. लोकापवादाचो पर्वा न करता आपल्या लोकांच्या हितासाठी त्यांनी

...२

आपली सर्व शक्ती खर्च केली आहे. मला स्वत:ला कबूल करणे भाग आहे की त्यांनी कायदे कौन्सिलमध्ये किंवा मुंबई म्यु. मध्ये माझ्या शतपटीने कामगिरी केली आहे मला माझ्या इतर कामामुळे कौन्सिलमध्ये फारसे हजर राहता येत नाही. कामगिरीचे सर्व श्रेय त्यांच्या चिकाटीला व कार्यकारीपणाला आहे.

श्रीमंत लोक नेहमीच राजकारण व समाजकारण करीत असतात. ज्यांचा बँकेत पुष्कळ पैसा आहे, अशी माणसे सार्वजनिक कार्यात असतात दर महिन्याला चेक फाडून उदरनिर्वाह चालवितात व आयुष्यातील फावला वेळ मनरंजनार्थ समाजकार्यात खर्च करतात स्वत:चा चारितार्थ चालवून समाजकार्य कारणे ही गोष्ट साधी सोपी नाही. त्यांची वैद्यकीची परीक्षा पास झाली असूनही स्वत:चा दवाखाना नाही. २४ तास सार्वजनिक कार्यात गुंतलेले असतात. हा त्यांचा समाजावर उपकार आहे.

इंग्लंडात मजुरांचे राजकारण करणारांना चांगले वेतन मिळत असे. १९१० साली पार्लमेंटच्या सभासदांना पगार देण्यात येत नव्हता. त्यावेळी त्यांना ४०० पौंड मजुरांच्या संस्थांतून मिळत असत. इकडे काहीच नाही. असे असताना डॉ. सोळंकींनी समाजकार्य चालू ठेवले आहे.

मानपत्रापेक्षा अन्य तऱ्हेने त्यांचे उतराई होणे जरूर आहे. त्यांच्या ठायीचे प्रेम व्यक्त करण्याकरिता आपण त्यांना मानपत्र देत आहोत.

० ० ०

(दिनांक १६-४-३३ रोजी महार समाजसेवा-संघ-मुंबई यांचे विद्यमाने रात्री माझगाव बोगद्याची वाडी सिमेंट चाळ येथे सहभोजन समारंभ झाला. त्याप्रसंगी दिलेले भाषण.)

प्रिय बंधू भगिनींनो,

आज मला अतिशय महत्त्वाची कामे होती. दोन-चार दिवसांनीच मी विलायतेस जाणार असल्यामुळे माझ्यामागे अतिशय निकडीची कामे आहेत परंतु आजच्या समारंभाला माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्व असल्यामुळे मी मुद्दाम या सहभोजनाला आलो आहे. जातिभेद काढून टाकल्याशिवाय आपल्याला उन्नतीचा मार्ग मोकळा होणार नाही. महार समाज हा मुसलमान समाजाप्रमाणे जातिभेद न मानणारा समाज आहे. ही महार समाजाबद्दल अतिशय चांगली गोष्ट आहे. कोणत्याही प्रांतातील महार एकत्र जेवू शकतात. मी मुंबई इलाख्यात सर्वत्र फिरलो आहे. त्यावेळेस महारात भेद नसल्याचे मला दिसून आले आहे. फक्त कोकणात काही ठिकाणी महारात बेळे व पान असे भेद आहेत. ते तेथे का झाले

हे माहीत नाही. यापुढे हे दोन भेद महार समाजात का चालू ठेवावे हेही कोणी सांगू शकत नाही. असे जर आहे तर बेळे व पान-महार यांच्यात भोजन व विवाह का होऊ नयेत ? पूर्वापार वडिलांची चाल हे कोणी कारण सांगू शकतील परंतु पूर्वापार चालत आलेल्या वडिलांच्या चालीच चालवावयाच्या असतील तर आपणास त्यांच्यासारखेच खितपत पडावे लागेल, याचा विचार करा. त्यांच्या काळी परिस्थिती अगदी निराळी होती. त्यांना पूर्ण अज्ञानात ठेवण्यात आले होते. त्यांची परिस्थिती पूर्ण गुलामीची होती, त्यांना राजकीय, धार्मिक स्वातंत्र्य नव्हते. त्यांची आर्थिक परिस्थिती वाईट होती. वडिलांच्या चुकामुळेच आज आपणास दुःख भोगावे लागत आहे. हे दु.ख नाहीसे होऊन आपल्या मुलाबाळास सुख लाभावे, असे आपणास वाटत असल्यास आपण वडिलांनी केलेल्या चुका दुरुस्त केल्या पाहिजेत. या बाबतीत जुन्या लोकांपेक्षा तरुणांवर जास्त जबाबदारी आहे. ती जबाबदारी ते पार पाडतील अशी मला खात्री आहे. या आपसातील भेदामुळे आतापर्यंत रत्नागिरी जिल्ह्यात बोर्डिंग निघू शकले नाही. तोच अनुभव सार्वजनिक चळवळीतही येत आहे. समजा एका गावात बेळे महार व पान महार अशा दोन्हीही पोटभेदाचे लोक असले तर एकाने मृतमास खाण्याचे सोडून दिले तर दुसरा ते खातो. आणि त्यामुळे होते काय की दोघांवरही गावच्या लोकांचे वर्चस्व वाढते. परंतु त्यांच्यात भेद नसेल तर असा दुष्परिणाम होणार नाही आपली प्रगती करून घेण्यासाठी आपण जातिभेद मोडला पाहिजे.

आपल्यातील ही भेदाची घाण काढून टाकली तरच आपणास दुसऱ्याला तशीच घाण काढून टाकण्यास सांगता येईल.

मला आनंद वाटतो की अशा प्रकारचे जोराचे प्रयत्न आपल्या लोकात सुरू झाले आहेत व थोड्याच दिवसांत आपल्यातले हे भेद नाहीसे होतील, अशी माझी खात्री आहे. आजच्या प्रसंगाबद्दल मी सर्वांचे अंतकरणपूर्वक आभार मानतो.

— ० —

५. मला हिंदुधर्माची पर्वा नाही, अस्पृश्यांचे हित साधणे एवढेच माझे कर्तव्य !

(सोपारे (वसई) येथे दिलेले भाषण. तारीख जनतेत नमूद नाही. जनता दिनांक २९ एप्रिल १९३३.)

अध्यक्ष महाराज, प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो,

श्री वनमाळी यांनी म्हटल्याप्रमाणे सदर परिषद मागेच व्हावयाची. परंतु मला तिसऱ्या राऊंड-टेबल परिषदेचे आमंत्रण आल्यामुळे त्यावेळी सभेस हजर राहता आले नसते व त्यामुळे मंडळींची निराशा झाली असती. असो, आजचा प्रसंग ज्या चेवली चांभार मंडळींनी घडवून आणून या भागातील अस्पृश्य वर्गापुढे बोलण्याची मला संधी प्राप्त करून दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. पहिल्या राऊंड-टेबल परिषदेसाठी मी लंडनला गेलो असताना माझी केविलवाणी स्थिती झाली होती. त्यावेळी हिंदू-मुसलमान सभासदात बेबनाव उत्पन्न झाल्यामुळे अस्पृश्यांची बाजू मांडणे फार त्रासाचे झाले. शेवटपर्यंत आमच्यात बदल न होऊ शकल्याने पहिले वर्ष फुकट गेले असे आम्हा सर्वांनाच वाटले. शिवाय काँग्रेस व तिचे सर्वाधिकारी म गांधी परिषदेपासून अलिप्त होते. दुसऱ्या राऊंड टेबल परिषदेसाठी महात्मा गांधी व काँग्रेसचे इतर प्रतिनिधी हजर राहून त्यांनी भाग घेतल्यामुळेच महत्त्व आले. दुसऱ्या परिषदेत काहीतरी भरीव कार्य होईल अशी सर्व हिंदी सभासदांनी आशा व्यक्त केली होती, परंतु अखेर ती फोलच ठरली. त्यावेळी राऊंड-टेबल परिषदेच्या सर्व हिंदी सभासदांत इतकी दुही माजली की कोणताच प्रश्न धसाला लावता आला नाही. त्यावेळी असे होण्याचे कारण एकटे म. गांधी हेच होत. एकीकडे मुसलमान व एकीकडे स्पृश्य हिंदू व मध्ये अल्पसंख्याक अस्पृश्य वगैरे जातींचे प्रतिनिधी अशी चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाल्यामुळे मी भांबावून गेलो होतो. अस्पृश्याविषयी म. गांधी काही स्वतंत्र योजना करतील याची मला आशा नव्हती. कारण मी पहिल्या परिषदेला जाण्यापूर्वी त्यांच्या माझ्यात झालेल्या मुलाखतीवरून मला हे समजलेच होते. परंतु अस्पृश्य वर्गासाठी मी जी योजना पुढे मांडीन तिला महात्माजी विरोध मात्र करणार नाहीत, अशी मला पूर्ण आशा होती. परंतु सगळेच उलट घडले. 'इतरांनी पसंत केलेल्या अस्पृश्यांच्या योजनेला मी विरोध करणार नाही' असे ज्या महात्माजींनी

हिंदुस्थानात कबूल केले होते-नव्हे जवळजवळ मला वचन दिले होते तेच महात्माजी शीख व मुसलमानांना कोऱ्या कागदावर सही करून देण्यास तयार झाले; व अस्पृश्यांना सुईच्या अग्रावर राहील इतका हक्कसुद्धा देण्यास आपण तयार नाही, असे म्हणाले. महात्मा गांधींच्या या प्रतिज्ञेमुळे आपल्या समाजाच्या हितासाठी मला अल्पसंख्यकांच्या गोटात शिरावे लागले महात्माजींचे म्हणणे असे होते की " अस्पृश्य व स्पृश्य वर्गाचा मीच एकटा प्रतिनिधी असून त्यांचे हिताहित कशात आहे, हे मला चांगले समजते. डॉ. आंबेडकर यांच्यामागे अस्पृश्य समाज मुळीच नसून त्यांनी तयार केलेली योजना व मते ही त्यांची स्वतःची आहेत. त्यांचा अस्पृश्य वर्गाशी मुळीच संबंध नाही. " त्यांच्या या बोलण्यास त्यावेळी हिंदुस्थानात मोठा आधार मिळत होता. काँग्रेस व हिंदुमहासभा याच्या कार्यकर्त्याकडून अस्पृश्यात फूट पाडण्याचे सारखे प्रयत्न चालू होते व त्याप्रमाणे चांभार समाजातील काही पोटजाती त्यावेळी माझ्या विरुद्ध गेल्या. त्यावेळी खोटचा सभा, खोटच्या तारा वगैरेचा नुसता वर्षाव चालू होता. त्याचवेळी इतर चांभार जातींकडून होत असलेला विरोध ही चूक आहे, हे श्री. वनमाळी व चांदोरकर यांच्या लक्षात आले. मला विरोध करण्यात चांभार समाजाचे हित नाही हे पूर्णपणे ओळखून माझ्या मागण्यास पाठिंबा देणाऱ्या ज्या अनेक तारा आल्या त्यात चेवली चांभार समाजातर्फे श्री. वनमाळी व चांदोरकर यांचीही एक तार होती. ही मी कधीच विसरणार नाही.

दुसऱ्या राऊंड टेबल परिषदेनंतर अल्पसंख्याकांचा निर्णय सरकारकडून लवकरच प्रसिद्ध करण्यात आला. त्यात अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ देऊन स्वराज्यात अस्पृश्यांचे स्वातंत्र्य मान्य करण्यात आले होते. सरकारी निर्णय प्रसिद्ध झाल्यावर प्रतिज्ञेप्रमाणे म. गांधींना प्राणांत प्रायोपवेशन सुरू करावे लागले व त्यातच पुणे-करार जन्माला आला. त्या कराराने आपणाला जे राजकीय महत्त्व व हक्क प्राप्त झाले आहेत त्यांचे पालन करणे हे आता तुमच्या हाती आहे. आपल्या जातीचे पुढारी सांगतील तसे ऐकणे व वागणे हा हिंदुधर्मीयांचा गुण आहे, त्याप्रमाणे तुम्ही आपल्या जातीच्या पुढाऱ्यावर विश्वास ठेवा. मला असे वाटत नाही की हिंदू लोक व त्यांचे पुढारी व तरुण मंडळी तुमच्यासाठी काहीतरी करतील. तुम्हाला देवळात घेऊन जातील तुम्हाला आपल्या तळ्याविहिरीचे पाणी पाजतील ही आशा फोल आहे. जे लोक सनातन्याची मर्जी सांभाळून अस्पृश्यता निवारण करीत आहेत त्यांनी हिंदुस्थानच्या भूगोल व नकाशाकडे अजून दृष्टी लावली नाही. ते थोडे निरीक्षण करतील तर त्यांना कळून येईल की त्यांची दृष्टी अटकेवर की विंध्याद्रीवर आहे ! मला हिंदू-समाज व धर्म यांची पर्वा नाही. मला एवढेच पाहावयाचे आहे की माझा ज्या अस्पृश्य समाजाशी लागाबांधा आहे त्यांचे हित साधणे एवढेच माझे कर्तव्य आहे; आणि

तेच मी सध्या करीत आहे. तुम्हाला माझे इतकेच सांगणे आहे की धर्म व सामाजिक बाबी दूर ठेवा आणि भाकर, शिक्षण व राज्यसत्ता मिळविण्याकडे आपल्या बुद्धीचा व्यय करा. येथे आताच सार्वजनिक विहिरी, शाळा वगैरेवर पाटच्या लावण्याची याचना करणारा ठराव आणला होता. याचना करण्याचे वास्तविक कारणच नाही. म्युनिसिपालिटी व लो बोर्डात जर तुमचे खरे व भरपूर प्रतिनिधी असतील तर ते भांडून असे करणे भाग पाडतील. यासाठी असले प्रतिनिधी तयार करण्याकडे व निवडून देण्याकडे लक्ष ठेवा. म. गांधी देवळे उघडण्याचे उपाय शोधण्यात गुंतले आहेत. हिंदू लोक देवळे उघडोत अगर सात कुलपात बंद करोत, मला त्याची पर्वा नाही. हिंदू तरुण जर्मन राजकारणाचा अभ्यास करतील तर त्यांना दिसून येईल की नाझीपक्ष कम्युनिस्टांविरुद्ध लढत आहे. एकाच राष्ट्रातील लोक न्यायासाठी एकमेकांचे रक्त सांडीत आहेत. १८६३ साली अमेरिकेत निग्रो लोकांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी उत्तर व दक्षिणेकडील गोरे आपसात लढले, हे हिंदी तरुणांना कळत नाही. अस्पृश्यता निवारणासाठी चार हिंदू तरुणांनी चार सनातन्यांची डोकी सडकून काढली असती-तरुणांचे शिपीभर रक्त सांडले असते तर काय बिघडले असते ? परंतु येथे खरे अस्पृश्यता निवारण कोणाला करावयाचे नाही. असो, हिंदू-धर्म व समाज यांचे काहीही होवो, अस्पृश्यता निवारण केली जावो अगर तसेच पूर्ववत् राहो तुम्ही त्याकडे आपले लक्ष गुंतवू नका. आपसातील महार-चांभार भेद नाहीसे करून एकी व संघटन वाढवून मिळालेले राजकीय हक्क जपण्याकडे आपले तन-मन-धन खर्ची घाला. इतके सांगून मी आपली रजा घेतो.

० ० ०

(दिनांक २४-४-१९३३ रोजी कुर्ला येथे बाबासाहेबांचा सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी दिलेले भाषण. जनता, दि. २९-४-१९३३)

पाच-सात वर्षांपूर्वी घडलेल्या एका प्रसंगाची मला आठवण होते. कुर्ल्यात येण्याची ही माझी दुसरी वेळ आहे. पाच-सात वर्षांपूर्वी मी अध्यक्ष व्हावे असे आमंत्रण येथील लोकांनी मला दिले होते. दिवस पावसाचे असूनही मी ठरलेल्या वेळी आलो होतो. परंतु आश्चर्य हे की सभेच्या ठिकाणी कोणीच नव्हते. मला त्याचे अत्यंत मोठे आश्चर्य वाटले. प्रत्येक ठिकाणी माझ्या सभेला असंख्य लोक जमत असून येथे असे का झाले याची चौकशी केल्यावर मला समजले की त्या सभेचे हँडबिल फक्त नाशिक जिल्ह्याच्या लोकांनीच काढले होते. त्यावर नगर सातारा इत्यादी जिल्ह्यांच्या लोकांची नावे नव्हती, म्हणून असे झाले. ज्या वेळेस या समारंभाचे आमंत्रण देण्यास येथील लोक आले त्या वेळेस मी त्यांना सांगितले की सर्व लोकांतर्फे कार्यक्रम होत असेल तर मी येतो. त्यांनी ते कबूल केले व

त्याप्रमाणे घडवून आणले; त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. सर्वांनी जुटीने वागणे अत्यंत जरूर आहे. एकाचे दुःख ते सर्वांचे दुःख अशी वृत्ती सर्वांनी ठेवली पाहिजे आपल्यापुरते पाहण्याची व कूपमंडूक वृत्ती सोडून द्या. तुम्ही सर्व एक झाल्याबद्दल मला आनंद होत आहे. मानपत्र अर्पण करून तुम्ही जो माझा गौरव केला त्याबद्दल मी तुमचा आभारी आहे.

तुम्ही दिलेल्या थैलीचे पैसे मी माझ्या प्रपंचाला लावणार नाही. यापूर्वी पुष्कळ पैसे मला मिळालेले आहेत. परंतु त्यापैकी एक पैही मी माझ्यासाठी घेतली नाही. हे सर्व पैसे मी सार्वजनिक कामाला लावलेले आहेत व तुम्ही आज दिलेले पैसेही मी सार्वजनिक कार्याला देणार आहे. या ठिकाणी जमलेले लोक पाच-सहा हजार तरी होतील. एवढ्या लोकसमुदायाकडून फक्त ८० च रुपये सार्वजनिक कार्याला मिळतात, ही लाजिरवाणी गोष्ट आहे. आता त्याबद्दल काही करता येणार नाही. परंतु पुढे केव्हातरी याची भरपाई होईल, अशी मला आशा आहे. सार्वजनिक काम पैशाशिवाय होत नाही. काम करणाराला वेतन देणे जरुर आहे. काही माणसे सार्वजनिक काम फुकट करतात. परंतु सर्वच लोक फुकट काम करणे शक्य नाही. आपल्या जनता पत्रामध्ये ५-६ माणसे लिहिण्याचे काम करतात. इतर ठिकाणी अशा कामाबद्दल १००-२०० रु. द्यावे लागतात. परंतु पाच-सात वर्षांपासून हे लोक मोबदला न घेता अग्रलेख वगैरे लिहिण्याचे काम करतात. तीच गोष्ट 'भारत-भूषण' प्रेसची. या छापखान्यात व्यवस्थापक वगैरे जी मंडळी आहेत त्यांना कमीत कमी पगार दिला जातो. हे लोक स्वार्थत्याग करणारे आहेत म्हणून ठीक आहे परंतु नेहमीच असे चालणे शक्य नाही. म्हणून तुम्हो पैसे दिले पाहिजेत.

० ० ० ०

(दिनांक २३-४-१९३३ दामोदर हॉल मागील पटांगणात बाबासाहेबांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी दिलेले भाषण. जनता, २९-४-१९३३)

अध्यक्ष महाराज, प्रिय बंधू आणि भगिनींनो,

आज या समारंभाला आपण सर्वजण या ठिकाणी एकत्रित झालात ही माझ्या दृष्टीने फार समाधानकारक गोष्ट आहे. कारण, जर पूर्वी इच्छिल्याप्रमाणे हरेक जिल्ह्याच्या लोकांनी निरनिराळे कार्यक्रम केले असते तर मला त्यांना हजर राहणे अशक्य झाले असते. शिवाय, आज जमला इतका लोकसमुदाय एकत्रित होण्याचा प्रसंगही लाभला नसता. दुसरी गोष्ट-उद्या बंदरावर सर्वांनी येऊन निरोप देण्याचा जो अतिप्रसंग होणार होता तो उद्या होण्याचे काही कारण नाही. याच ठिकाणी मी तुमचा व तुम्ही माझा निरोप घेऊ या. बंदरावर येऊन

तुम्ही जो गोंगाट व जयध्वनी करता त्यामुळे मी स्वतः गांगरतो. तसेच माझ्याबरोबर बोटीने जाणाऱ्या प्रतिनिधींच्या मनाला संकोचही वाटत असेल. पुष्कळ लोकांना निरोप देताना कधी कधी चार माणसेही हजर नसतात, परंतु मी मात्र याला अपवाद आहे कारण माझ्यावेळी किडी-मुंगीलाही जागा राहाणार नाही इतकी माणसे बंदरावर येतात, ही अनर्थाची गोष्ट आहे. गरीब लोकांनी आपला रोजमुरा बुडवून बंदरावर मला पोहोचविण्यास हजर राहावे ही गोष्ट मला उचित व पसंत वाटत नाही. तेव्हा तुम्ही उद्या कोणीही बंदरावर येऊ नये. येथेच एकमेकांना जे काही सांगावयाचे असेल ते सांगता येईल. ज्या जिल्ह्यांतर्फे ही मानपत्रे देण्यात आली त्यांच्या संस्था-चालकांचे मी आभार मानतो.

गेल्या आठवड्यात नगर जिल्ह्यातील मानपत्राचे वेळी मी केलेल्या भाषणाचा असा व इतक्या लवकर परिणाम होईल, असे मला वाटत नव्हते. परंतु तुम्हाला समाजकार्याची पूर्ण जाणीव झाली असल्यामुळे समाजकार्य उत्तम तऱ्हेने चालावे यासाठी एकी करून तुम्ही थोड्या अवधीत आज ज्या थैल्या अर्पण केल्या आहेत त्याबद्दल मी तुमचे आभार मानतो.

मला काल व आज मिळालेल्या निधीचा विनियोग मी समाज-कार्याकडेच करणार आहे. त्यासाठी मी एक योजना ठरविली आहे. माझ्या मनातून समाजातील लोकांना चांगल्या प्रकारचे ज्ञान प्राप्त होईल अशा प्रकारची व्यवस्था करण्याचे पुष्कळ दिवसापासून होते. मुलांनी शाळेत जाऊन चांगले शिक्षण घेतले पाहिजे त्याप्रमाणे वयात आलेल्या स्त्री-पुरुषांनाही चांगले सुधारणेला कारणीभूत होईल असे ज्ञान प्राप्त होणे जरूर आहे. त्यासाठी कमीत कमी चार आणे किमतीची उपयुक्त व चांगल्या माहितीने भरलेली अशी पुस्तके प्रसिद्ध करण्याकरिता एक संस्था स्थापन करावी असा माझा हेतू आहे व त्यासाठी काल व आज मिळालेले पैसे मी देणार आहे.

राऊंड-टेबल परिषदेसंबंधी यावेळेस विशेष काही सांगण्याची जरूर आहे, असे मला वाटत नाही. कारण ती परिषद आता जुनी झाली आहे. या शिळ्या बाबीविषयी दोन शब्द सांगण्याबद्दल मला अनुकंपा वाटते. रा. टे. परिषदेच्या तीन वाऱ्या झाल्याच आहेत; व आता ही शेवटची वारी आहे. त्यासंबंधी विशेष वाच्यता करण्याची माझी इच्छा नाही. एक गोष्ट खरी की गेल्या चार वर्षांत अस्पृश्यांच्या कार्याचे मोठे लोढणे माझ्या गळ्यात होते. ते जर नसते तर माझे राजकारण काही निराळ्या प्रकारचे झाले असते. मी त्यावेळेस दोन पेचात सापडलो होतो. एक, इंग्रजांबरोबर वाद करावा तर गांधींकडून काही फायदा होणार नाही; व दुसरा गांधींना साहाय्य करावे तर इंग्रजांकडून काही लाभ होणार नाही म्हणून व्यापक स्वरूपाच्या राष्ट्रकार्याकडे मी काणाडोळा केला होता.

माझी मनोदेवता आता मला सांगू लागली आहे की कोणत्याही प्रकारचे स्वराज्य आले तरी आता अस्पृश्यांचा फायदा होणार आहे. या बाबतीत ज्या काही उणिवा राहिल्या आहेत त्याही भरून काढण्याचा मी प्रयत्न करणार आहे. परंतु अस्पृश्यांच्या कार्यावर आता विशेष भर देण्याची मला जरुरी दिसत नाही.

अस्पृश्यांना नुसती राजकीय सत्ता मिळून उपयोग नाही. ती मिळून जर सत्ता इंग्रज सरकारच्या हातीच राहणार असली तर १५–२० किंवा २५ प्रतिनिधी जरी आम्हाला मिळाले तरी त्यांचा काही उपयोग नाही. पंक्तीला बसण्याचा हक्क मिळविल्यानंतर आपल्यापुढे जे काही पात्र येणार आहे त्यावर भरपूर अन्न वाढले जाईल याचीही खबरदारी घेतली पाहिजे. तेव्हा अशा तऱ्हेने इंग्रज सरकारपासून या देशाला विशेष हक्क मिळविण्यासाठी मी आता भांडणार आहे. जे लोक परदेशात जातात व परत येतात त्यांना एक गोष्ट समजते की आपल्या देशात फार दारिद्र्य आहे येथे आजारी माणसे, गरीब लोक यांची काही व्यवस्था नाही. या दृष्टीने इंग्लंड देशात कित्तीतरी व्यवस्था आहे. तेथे ज्यांना ऐपत नाही अशा लोकांना सरकार मार्फत डॉक्टरची मदत दिली जाते एखादा माणूस बेकार झाला तर सरकार त्याला नोकरी मिळवून देते, किंवा नोकरी मिळेपर्यंत बेकारीचे वेतन देते.

साठ वर्षापेक्षा जास्त वयाच्या माणसाची कोणत्याही प्रकारची व्यवस्था नसल्यास सरकार त्याला म्हातारपणाचे पेन्शन देते. गरीब लोकांना घरभाडे जास्त पडू नये इकडेही तिकडचे सरकार लक्ष पुरविते. या बाबतीत सरकार घर मालकाला ग्रॅन्ट देऊन 'त्याजजवळून भाडे जास्त घेणार नाही' अशी अट लिहून घेते.

तिकडे सर्वत्र प्राथमिक शिक्षण सक्तीचे आहे व ते फुकट देण्यात येते. एवढेच नव्हे तर दुय्यम व कॉलेजचे शिक्षणही तिकडे फुकटच देण्यात येते. तेच इंग्रज सरकार या देशात काही करीत नाही.

मुंबईत लवकरच एक प्रसंग ओढविण्याचा संभव आहे. येथील गिरणीचे मालक कामगारांना अडवून त्यांचे पगार कमी करीत आहेत व त्यामुळे संप होऊन गिरण्या बंद होत आहेत. परंतु येथचे सरकार इकडे लक्ष पुरवीत नाही. इंग्लंड, जर्मनी वगैरे देशात अशी परिस्थिती उत्पन्न झाली असती तर तेथले सरकार असे थंड बसले नसते. शांतता ठेवण्यापलीकडे आपले कर्तव्य नाही, असे येथले सरकार समजत असेल तर त्यामुळे येथल्या प्रजेला सुख–स्वास्थ्य मिळणे शक्य नाही. राष्ट्राकरताच नव्हे तर तुमच्यासाठीसुद्धा व्यापक स्वरूपाची सत्ता

येथल्या लोकांच्या हाती येणे जरूर आहे. म्हणून इंग्रज सरकारच्या हातून सत्ता काढून घेण्याचा प्रयत्न मी करणार आहे. आता मला दिल्या गेलेल्या एका मानपत्रात असा उल्लेख आहे की "सुदाम्याच्या पोहचाप्रमाणे आमच्या अल्पशा थैलीचा स्वीकार करावा." त्याबद्दल मला सांगावयाचे आहे की सुदाम्याच्या पोहचांनी काही होणार नाही. स्वर्गात तुम्हाला चांगली स्थिती प्राप्त होण्यासाठी माझे प्रयत्न नाहीत व ते माझे कामही नाही. या लोकीचेच तुमचे क्लेश कमी व्हावेत व तुम्हाला सुख प्राप्त व्हावे, असे माझे प्रयत्न आहेत व त्यासाठी कलदार पैसा पाहिजे आहे. तो मी तुमच्या जवळून घेणार आहे व तुम्ही तो मला दिला पाहिजे. आजचा हा समारंभ तुम्ही यशस्वी केलात याबद्दल मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे.

— ० —

६. स्वाभिमान-शून्य लोकांच्या आहारी जाऊ नका

(दिनांक ७–६–१९३३ रोजी जनतेकरिता लिहिलेले पत्र. जनता दिनांक २४–६–१९३३)

मी येथून निघताना 'जनते'करिता काहीतरी लिहीत जाईन असे तुम्हास सांगितले होते; परंतु विलायतेच्या सफरीला निघतानाच माझे डोळे दुखत होते. 'डोळ्यांची काळजी अवश्य घ्या' असा मला माझ्या डॉक्टरांनी सल्ला दिल्यामुळे जाताना बोटीतला प्रवास विश्रांती घेण्यात गेला. डोळे मिटून विश्रांती घेणे माझ्यासारख्याला अशक्य होते. मधूनमधून मी जॉईंट पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्षीपुराव्यासाठी घेतलेली पुस्तके वाचण्याचा प्रयत्न करी, परंतु डोळे मनस्वी दुखू लागत, आणि त्यामुळे स्वस्थ पडून राहिल्याशिवाय गत्यंतर नव्हते. विश्रांती–साठी डोळे मिटावे तो आपल्या लोकांच्या परिस्थितीचे व भावी राजकीय लढ्याविषयीचे विचार माझ्या डोक्यात खेळू लागत. आपल्या समाजाने संघटनेच्या बळावर आपली सर्वांगीण उन्नती करून घेण्याचा अधिक प्रयत्न केला तर आजच्याहीपेक्षा आपल्या समाजाचे अधिक हित होईल. शिक्षण, चळवळीचे महत्त्व व स्वत:च्या हिमतीची जाणीव झाल्याशिवाय 'नुसती पुढारीपणाची हाव' बाळगणे म्हणजे सरडचाची धाव कुंपणापर्यंत ठरेल. माझ्या गैरहजेरीचा फायदा घेऊन आपल्या समाजातील काही स्वाभिमान–शून्य माणसे दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिऊन तुमची दिशाभूल करतील. परंतु माझा विश्वास आहे की ज्याला स्वत:चा, स्वत:च्या समाजाचा स्वाभिमान आहे, तो आपली स्वावलंबन वृत्ती सोडून स्वाभिमान–शून्य लोकांच्या आहारी पडणार नाही. असो, विलायतेला पोहोचलो तरी माझे डोळे दुखणे थांबले नव्हते. म्हणून विलायतेला पोहोचल्यावरही तुम्हास पत्र पाठविता आले नाही. माझे डोळे आता चांगले होत आहेत.

जॉईंट–पार्लमेंटरी कमिटीच्या कामकाजात प्रामुख्याने भाग घ्यावा लागत असल्यामुळे त्या कामातच सर्व वेळ जातो. तरी वेळातवेळ काढून मी आपणास सविस्तर पत्र पाठवीन. 'जनते'च्या आश्रयदात्यास मला एवढीच गोष्ट सांगावयाची आहे की कोणत्याही चळवळीच्या यशाचे चिन्ह म्हटले म्हणजे वर्तमानपत्र असते. आपल्या स्वावलंबनाच्या भावी राजकीय हक्काच्या लढ्यासाठी वर्तमानपत्र भरभराटीस आणले पाहिजे. जनता पत्राची आज तुम्हास किंमत वाटत नसली तरी त्याची खरी जाणीव होण्याचा काळ लवकरच प्राप्त होणार आहे. तरी मी

परत हिंदुस्थानात येईपर्यंत 'जनता' पत्राचे वर्गणीदार आजच्यापेक्षा दुप्पटीने वाढले पाहिजेत. लवकरच मोठे पत्र पाठविण्याचे आश्वासन देऊन तुमची रजा घेतो.

० ० ०

(जुलै १९३३ च्या पहिल्या आठवड्यात इंग्लंडमध्ये 'व्हाईट पेपर' बद्दल विचारविनिमय करून त्यातील योजनांचा फोलपणा ब्रिटिश जनतेच्या निदर्शनास आणण्यासाठी हिंदू-पुढाऱ्यांची सभा घेण्यात आली. या सभेत डॉ. गौर, डॉ. आंबेडकर, डॉ. मुंजे, सच्चिदानंद व पं. नानकचंद वगैरे मंडळींची भाषणे झाली. सर्वांची भाषणे ऐकून घेतल्यावर बाबासाहेबांचे भाषण झाले जनता १५ जुलै १९३३)

हिंदुस्थानात आज अस्तित्वात असलेल्या अस्पृश्य वर्गाने स्वतःच्या सर्वांगीण उन्नतीसाठी स्वतंत्र-मतदार संघाची मागणी करण्यास सर्वस्वी हिंदू समाजच कारणीभूत आहे. आजची हिंदू समाजातील एकंदर परिस्थिती सूक्ष्म रीतीने अवलोकन केल्यास अस्पृश्य समाजाला आपले स्वातंत्र्य संयुक्त-मतदार संघातून कधीही मिळविता येणे शक्य नाही. आणि ही परिस्थिती उघड्या डोळ्यांनी पाहिल्यावर ज्याचा स्वाभिमान जागृत झालेला आहे-ज्याला स्वावलंबनाचे महत्त्व कळले आहे अशा कोणाही मनुष्याला स्वतंत्र मतदार संघाची मागणी करणे केवळ नाइलाजास्तव भागच पडले असते. हिंदू पुढाऱ्यांनी अस्पृश्य समाजाला स्वतःच्या स्वार्थाशिवाय आपल्या विश्वासात कधी घेतले नाही. मुसलमानांच्या राजकीय हक्काचा प्रश्न उपस्थित होताच हिंदूंचे धाबे दणाणले व त्यांना अस्पृश्यांविषयी वरपांगी पान्हा फुटला इतकेच. तेव्हा हिंदू पुढाऱ्यांना माझी इतकीच विनंती आहे की हिंदू समाजाने कृतीने अस्पृश्य समाजाचा विश्वास संपादन करावा व मुसलमानांबरोबर व्यर्थ भांडण्यात आपल्या वेळेचा व शक्तीचा व्यय करू नये ही सारी शक्ती आपल्या समाजाच्या सामाजिक सुधारणेकडे प्रामाणिकपणाने खर्च करावी. अशा तऱ्हेने जर हिंदू समाज आपला कार्यक्रम आखील तरच अस्पृश्य समाजाला हिंदू समाजाशी सहकार्य करून कार्य करण्याची उमेद प्राप्त होईल.

० ० ०

(जनते'करिता लिहिलेले पत्र. जनता, दि. १२-८-१९३३.)

येथे आल्यापासून 'जनता' पत्राला पत्र न पाठविल्यामुळे आपली बरीच निराशा झाली असेल. परंतु येथील जॉईंट सिलेक्ट कमिटीच्या कामकाजामुळे मला विशेष वेळ मिळाला नाही. आपल्या लोकांच्या न्याय्य हक्काचे संरक्षण करणे

किती जबाबदारीचे काम आहे हे तुम्हास सांगावयास नकोच; तरी पण मी वेळात वेळ काढून महात्मा गांधींवर एक स्वतंत्र लेख लिहीत आहे तो 'जनते' करिता पुढील आठवड्यात जरूर पाठवितो. माझी प्रकृती आता बरी आहे. डोळ्यांचे दुखणे आता कमी झाले आहे. नवीन सुधारणांबाबतच्या मसुद्याचे मला बरेच काम करावयाचे असल्यामुळे विस्तृत असे पत्र पाठविण्यास अजून मिळावा तसा वेळ मिळत नाही. 'जनते'च्या ज्या आश्रयदात्यांनी 'जनतेला' आपलेपणाने साहाय्य केले त्याबद्दल मला आनंद होत आहे. प्रत्येक सुशिक्षित इसमाने 'जनता' पत्राचे वर्गणीदार होणे किती महत्त्वाचे आहे हे मीच सांगायला पाहिजे असे नाही. जो स्वाभिमानी आहे, ज्याला स्वावलंबनाच्या कार्याची जाणीव आहे तो 'जनते'चा अ पण स्वतः वर्गणीदार होऊन आपुलकीच्या नात्याने खात्रीने हातभार लावील.

० ० ०

('जनते'करिता पत्र जनता, दि. २ डिसेंबर १९३३)

'जनता' पत्रासाठी एक स्वतंत्र लेख लिहावयाचे वचन मी मागेच दिले होते. परंतु येथील कामकाजामुळे आणि मध्यंतरी माझी प्रकृती थोडीशी नादुरुस्त झाल्यामुळे 'जनता' पत्राकरिता लेख लिहिता आला नाही. तशात 'दि इंडियन आर्मी' या पुस्तकाचे काम पूर्ण करायला बऱ्याच ऐतिहासिक कागदपत्रांची व पुस्तकांची पाहणी करावी लागल्यामुळे जनतेकरिता लेख पाठविणे अगदीच अशक्य झाले आणि त्यामुळे तुम्हा सर्वांची निराशा झाली आहे. 'जनते'च्या प्रसारार्थ झटण्यासाठी आणि या आपल्या वर्तमानपत्राची सर्वांगसुंदर सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे प्रत्येक अस्पृश्य स्त्री-पुरुषाचे कर्तव्यच आहे. 'जनते'चे हल्लीचे सर्व अंक मी वाचले. जनतेची आजची स्थिती समाधानकारक नाही हे वाचून अत्यंत वाईट वाटले. आपल्या समाजाच्या अवस्थेकडे पाहता आपली होत असलेली कुचंबणा व मानहानी याचा प्रतिकार करण्याकरिता एखाद्या वर्तमानपत्राची आवश्यकता भासत होती व त्याप्रमाणे 'जनता' पत्रासारख्या पत्राचा प्रसार आपल्या समाजात करून लोकजागृतीचे कार्य आरंभिले. परंतु या कार्याला जनतेने जितक्या आपुलकीने आश्रय द्यावयास पाहिजे होता तितका दिलेला नाही. कोणत्याही समाजाला, पक्षाला किंवा देशाला जेव्हा आपल्या सर्वांगीण उन्नतीचा लढा लढावयाचा असतो त्यावेळी त्याच्या हाती एखादे वर्तमानपत्र नसेल तर ते कार्य त्यांना सुलभ रीतीने कधीही करता येणार नाही. आपल्या समाजाची आपण स्थिती पाहा. आपल्या समाजाइतका दडपलेला व परिस्थितीने दुबळा बनलेला दुसरा एखादा समाज अन्य देशीही सापडणार नाही. आणि या आपल्या सांप्रतच्या परिस्थितीतून निभावून जाण्यासाठी व आपल्या

स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी 'जनता' पत्राची योजना करण्यात आली आहे. आपल्या पत्राचे ध्येय व त्याचे महत्त्व किती आहे हे मी तुम्हाला सांगायला पाहिजे असे नाही. आपणास अजून आपल्या हक्कासाठी लढावयाचे आहे. आजचा लढा त्या मानाने काहीच नाही. यापुढे जो लढा उत्पन्न होणार आहे त्याला धैर्याने तोंड देण्यासाठी व आपल्या वर्तमानपत्राला जिवंत ठेवण्यासाठी आपण आपलेपणाने आश्रय दिल्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही. आमच्या समाजाचे कार्य ज्यांना प्रामाणिकपणाने करावयाचे आहे त्यांना आपल्या परिस्थितीविषयी यापेक्षा अधिक जाणीव करून देण्याची आवश्यकता नाही.

मी आता लवकरच स्वदेशी परत येईन. माझ्या आजपर्यंतच्या गैरहजेरीत आपण सर्वांनी आपले कार्य धैर्याने, ऐक्याने आणि प्रेमाने करून आपली जबाबदारी सांभाळीत आहात. हे काही लहान सहान कार्य नाही. चळवळ जिवंत ठेवण्यासाठी आपण सर्वांनी यापेक्षा अधिक उमेदीने आणि संघशक्तीने कार्य करणे आवश्यक आहे. आपल्यापुढील कार्याच्या जबाबदारीबद्दल मी स्वदेशी परत आल्यावर जाणीव करून देईन. तरीपण हे सर्व कार्य पार पाडण्यास आपणास 'जनता' पत्राचे सामर्थ्य वाढवावयास पाहिजे, ही गोष्ट विसरून चालणार नाही. ,

---

७. पुणे-करार स्मृति-दिन

(दि. २९-९-१९३४ रोजी पुणे-कराराची स्मृती जागृत ठेवण्याकरिता मबई येथे सभा घेण्यात आली त्या प्रसंगीचे भाषण जनता, दि. २०-११-१९३४)

जवळ जवळ गेली दोन हजार वर्षे अस्पृश्य समाज हा देशातील समाजाचा अभिन्न असा एक घटक म्हणून कधीच समजला गेला नाही. एखादे राजकीय अगर सामाजिक कार्य उपस्थित झाल्यास त्या कार्यासंबधी विचार करण्याची संधी अस्पृश्य समाजास कधीच मिळाली नव्हती, महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींकडे लक्ष दिल्यास ब्राह्मण, कायस्थ, मराठे इत्यादी जातीकडे या गोष्टीचा विचार करण्याचा जणू मक्ताच दिला होता, असे दिसते.

या कार्यात महाराची कामगिरी वर्दी देण्यापलीकडे म्हणजे जासूदगिरीपेक्षा वरच्या दर्जाची कधीच नव्हती. इतर जातींना आमंत्रणे पोहोचती केल्यावर फार तर त्यांनी दरवाज्याबाहेर बसून अंतर्गृहात चाललेल्या गोष्टींचा कानोसा घ्यावा. आत काय विचार चालू आहे त्याची गंधवार्ताही त्यास नव्हती.

आता मनु पालटला. अस्पृश्य समाज जिवंत प्राण्यांचा बनलेला असून त्यांना इतर मानवजातीप्रमाणेच गरजा आहेत. मनुष्यमात्राला ज्याप्रमाणे सुख-दुःखाच्या भावना आहेत. त्याचप्रमाणे या समाजालाही भावना आहेत, ही कल्पनाही स्पृश्य समाजास कधी शिवली नाही. व त्यामुळे अस्पृश्य समाजास देशातील सामाजिक काय किंवा राजकीय काय कोणत्याच प्रकारच्या उलाढालीत वाव मिळाला नाही. पृथ्वीवरील कोणत्याच देशात न आढळणारी अशी विपरीत पद्धती हिंदुस्थान देशात मात्र कित्येक शतके दृढमूल झाली होती. या कालात समाज-शास्त्र्यांनी, राजकर्त्यांनी किंवा तत्त्वज्ञान्यांनी या समाजघातकी विचारसरणीस आळा घालून विचारास नवीन वळण लावण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. याचा अनिष्ट परिणाम अस्पृश्य जनतेवर होऊन त्यांचे जीवन कष्टमय, स्वाभिमानशून्य व निष्प्रभ झालेच पण त्याची कडू फळे सर्व देशाला विशेषत: हिंदुसमाजाला चाखावी लागली आहेत. आता मात्र मनु पालटला आहे. १९३२ साली गोलमेज परिषदेला अस्पृश्य समाजाच्या प्रतिनिधीस हजर राहण्यास हिंदुस्थानच्या राज-कर्त्यांकडून निमंत्रण आले. तो प्रसंग या बदललेल्या कालाचा प्रारंभ होय, असे मी समजतो. पूर्वकालीन हिंदू समाजाच्या आमदानीत जे घडले नाही, मोगल

बादशाहीत जे घडू शकले नाही, मराठ्यांच्या हिंदवी स्वराज्यात जे घडू शकले नाही ते विसाव्या शतकात घडून आले आहे.

हिंदुस्थानच्या भावी राज्यव्यवस्थेसंबंधी भिन्न-भिन्न समाजांशी विचार विनिमय करीत असताना अस्पृश्य समाजाला दूर ठेवणे म्हणजे तो विचारविनिमय अपुरा ठेवणे होय, तसेच या विचारविनिमयातून निघणारे निर्णय अस्पृश्य समाजाची मते आजमावून त्यात त्यांच्या आकांक्षा समाविष्ट केल्याशिवाय ते निर्णय अपुरे ठरतील असे राजकर्त्यांना वाटले. इतकेच नव्हे तर त्या निर्णयावर उभारलेल्या राज्यव्यवस्थेस खऱ्या लोकशाहीचे स्वरूप प्राप्त होणार नाही; ही जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांस झाली; आणि त्यामुळे त्यांनी अस्पृश्यांच्या प्रतिनिधीस राऊंड टेबल कॉन्फरन्सला आमंत्रण केले. या आमंत्रणाच्या द्वारे अस्पृश्यांच्या प्रतिनिधीस इतिहासास माहीत नसलेल्या समानतेचा, उच्च मानल्या जाणाऱ्या इतर समाजांच्या तोलाचा मान मिळाला. संपूर्ण देशाच्या हितसंबंधात अस्पृश्य समाजाचे हितसंबंध निगडित झाले असून त्यांच्या हक्कांचे रक्षण केल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही ही जाणीव या प्रसंगाने सर्व समाजास करून दिली; व अस्पृश्यांच्या प्रतिनिधीस इतरांबरोबर देशाचे भवितव्य ठरविण्याची संधी मिळाली याच पलटलेल्या मनूचा भरभक्कम पाया तयार करावा म्हणून तुमच्या प्रतिनिधींनी आपल्या भविष्यकाळात उज्ज्वल इतिहासास आरंभ केला. हा आरंभ करणे मात्र सोपे गेले नाही. त्यांना आपल्या समाजाचे हक्क प्रस्थापित करण्याकरिता इतरांशी अभूतपूर्व झगडा करणे प्राप्त झाले.

दुसऱ्या राऊंड टेबल कान्फरन्सपूर्वी जातीजातीतील तंटयाने सर्वजण हताश झाले होते; आणि आम्ही सर्व महात्मा गांधींच्या आगमनाची वाट पाहात होतो. पक्षातीत गणले गेलेले महात्मा गांधी हा तंटा सोडवितील असे सर्वांना वाटत होते. मी स्वत: न्याय्य हक्क कबूल केले जाऊन त्यांना पुढील राज्यकारभारात रीतसर वाव मिळेल अशी अपेक्षा करीत होतो. कोणाला एकेक पत्रावळ मिळेल तर कोणाला दोन दोन पत्रावळी मिळतील. माझ्या समाजाच्या वाटयास निदान एक तरी द्रोण येईल, अशी माझी समजूत होती. पण ती आशा फोल ठरली.

" मुसलमानांना मी हवे ते देईन, ख्रिश्चन समाजास मी जरूर ते देईन, युरोपियन किंवा अँग्लो इंडियनांचे हक्क मी मान्य करीन, शिखांस मी त्यांच्या मागण्या बहाल करीन, पण अस्पृश्य समाजाचे हक्क मी काडीइतकेही मान्य करणार नाही. " असा रोखठोक जबाब मला महात्मा गांधींकडून मिळाला व मी विमनस्क झालो. महात्मा गांधींच्या या कृतीस मला इतिहासात उदाहरण मिळत नाही. पण महाभारतातील एका प्रमुख प्रसंगाची स्मृती झाल्याशिवाय राहात नाही. कौरव-पांडवांचे भांडण विकोपास न जाता सलोख्याने मिटावे व रक्तपात टाळावा

या उद्देशाने श्रीकृष्णाने दुर्योधनाजवळ भारतीय युद्धापूर्वी शिष्टाई केली होती, हे आपणा सर्वांना माहीत आहे. त्यावेळी दुर्योधनाने ' पाच पांडवांना अर्धे राज्य काय पण पाच गावे देखील देण्यास आपण तयार नाही, इतकेच नव्हे तर सुईच्या अग्रावर मावेल एवढी देखील जमीन मी देण्यास तयार नाही ' असे स्पष्ट सांगितले. त्याच प्रकारचा जबाब मला मिळाला. यानंतरचा इतिहास आपणास विदितच आहे.

अस्पृश्य समाजाचे न्याय्य हक्क ब्रिटिश सरकारने मान्य करून या हक्कांच्या आधारे जातीय निर्णयात त्यांना स्थान दिले. हा निर्णय जाहीर होताच केलेल्या पापाचे क्षालन करण्याकरिता म्हणा अगर मनाची जळण शांत करण्याकरिता म्हणा किंवा त्यांच्या समजुतीने झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करण्याकरिता म्हणा महात्मा गांधींनी प्राणांतिक उपवास केला व त्या उपवासाचा शेवट पुणे करारात झाला हे सर्वश्रुतच आहे. आणि त्याच कराराची स्मृती जागृत ठेवण्याकरिता आज आपण येथे जमलो आहोत.

या कराराच्या भवितव्याबद्दल काही जणांनी आज भीती दर्शविली व जातीय निर्णयावर अनेक बाजूंनी आघात होत असल्यामुळे सरकारने तो मागे घेतल्यास पुणे-करारास बाध येईल किंवा काय अशी शंका प्रदर्शित केली. मी तुम्हाला निक्षून सांगतो की ही शंका किंवा भीती अगदी निराधार आहे. तुम्हाला पुणे-करारावद्दल धास्ती बाळगण्याचे काहीच कारण नाही. राष्ट्रीय सभेत असे जाहीर केले आहे की व्हाईट पेपरचा इन्कार करून तो नष्ट केल्यास जातीय निर्णय देखील आपोआप नष्ट होतो. या वादात आपणाला शिरण्याचे कारण नाही. तुम्हाला भीती वाटत आहे ती ही की अशा रीतीने जातीय निर्णय नष्ट झाल्यास पुणे करारदेखील नष्ट होईल. तार्किकदृष्ट्या किंवा कायद्याच्या दृष्टीने या प्रकारची भीती बाळगण्याचे काहीच कारण नाही. ते कसे हे पाहा. ब्रिटिश सरकारच्या जातीय निर्णयात कलम ५ मध्ये स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, ' जातीजातीत वाद सलोख्याने न मिटल्यामुळे हा जातीय निर्णय सरकारास देणे भाग पडले. म्हणजे हा वाद आपसात मिटला असता तर सरकारला निर्णय देणे जरूर पडले नसते आणि यदाकदाचित् हिंदुस्थानला कोणत्याही जातीत यापुढे आपसात समजुतीने तडजोड झाल्यास ती सरकार जरूर मान्य करील.' पुणे करार ही या प्रकारची तडजोड आहे, व ती तडजोड सरकारने पूर्णांशाने मान्य केली आहे जातीय निर्णयात फक्त प्रांतीय कौन्सिलातील जागांची वाटणी झाली आहे, आणि सरकारतर्फे ज्या वेळेस पुणे करारास मान्यता मिळाली त्या वेळेस सरकारने कम्यूनल अवॉर्ड (जातवार निवाडा) मधील प्रांतिक कौन्सिलांतील जागांची वाटणी बदलून पुणे करारातील प्रांतिक जागांची वाटणी ग्राह्य धरली व वरिष्ठ कायदे कौन्सिलासंबंधी पुणे करारात समाविष्ट केलेले प्रमाण मान्य केले व त्याच

...३

तत्त्वानुसार पुढे व्हाईट पेपरमध्ये पुणे करारातील वरिष्ठ कौन्सिलातील जागांचे प्रमाण ठरविले. म्हणजे पुणे करारात झालेल्या हिंदू व अपृश्यांमध्ये तडजोडीचे तत्त्व सरकारच्या कम्यूनल अवॉर्डच्या पाचव्या कलमानुसार मान्य केले व त्यावर आपले शिक्का मोर्तब मारले. या करारात कोणत्याही प्रकारचा बदल करणे झाल्यास तो सरकारला करता येणार नाही, किंवा एकटचा हिंदूस करता येणार नाही. तो बदल हिंदू व अस्पृश्य यांनाच आपसातील परस्पर चर्चेने करण्याचा अधिकार आहे. अन्य कोणत्याही मार्गाने फरक होऊ शकत नाही. आणि म्हणून तुम्हास या बाबतीत निःशंक राहण्यास प्रत्यवाय नाही.

आता हिंदूकडून कदाचित् असे सांगण्यात येईल की ज्या वेळेस दोन पक्षात करार होतो त्यावेळेस कोणताही पक्ष संकटात असता कामा नये. महात्मा गांधींनी आपले प्राण पणास लावले व त्यामुळे अशी परिस्थिती उत्पन्न झाली की त्यांचे प्राण वाचविण्याची जबाबदारी माझ्यावर पडली त्यावेळी सर्व हिंदूसमाज माझ्यावर संतप्त झाला होता. मी नमते घेऊन त्वरेने कसातरी करार घडवून आणावा म्हणून चारही बाजूंनी मला पेचात धरले होते. देशातील कित्येक तरुण माझा जीव घेण्यास सज्ज झाले होते. बंगल्यातील अत्याचारी तरुणांकडून मला धमकीची पत्रे येत होती. कोणत्याही प्रकारे महात्मा गांधींच्या जीवितास अपाय झाल्यास मला त्याबद्दल जबाबदार धरून माझे प्राण घेण्यात तर येतीलच पण असहाय अशा सर्व अस्पृश्य समाजावर हिंदू समाजाकडून सूड घेतला जाईल, हे भीषण चित्र माझ्या डोळ्यापुढे होते. अशा मनःस्थितीत प्रतिपक्षाजवळ वाटाघाट करून मला करारावर सही करावी लागली. असे असता आपले प्राण संकटात होते म्हणून करार मान्य करणे आपल्याला भाग पडले, असे म्हणण्याचा कोणालाही हक्क पोचत असेल तर व कायद्याच्या दृष्टीने तो मला पोचत आहे, यात शंका नाही.

परंतु पुणे करारातील सर्व बाबी माझ्या मताप्रमाणे जरी घडून आल्या नसल्या तरी या प्रकारचा हक्क बजावण्यास मी तयार नाही. मी पुणे कराराच्या बाबतीत इमानी राहणार आहे अशा प्रकारे पुणे करार अभेद्य राखण्यास अस्पृश्य समाज तयार असला तरी सर्व हिंदुसमाजातील कित्येक जबाबदार पुढारी व संस्था यांच्या अलीकडच्या चळवळी पाहिल्या व उद्‌गार ऐकले तर हिंदुसमाज पुणे करारास इमानी राहील किंवा नाही यांची मला जबरदस्त शंका वाटते. आणि याकरिता आपण जागरूक राहून आपल्याला मिळालेल्या हक्कांचे संरक्षण केले पाहिजे.

आजच्या काही वक्त्यांनी पुणे करारास गांधी-आंबेडकर करार या नावाने संबोधिले. पण ते चुकीचे आहे. या करारावर महात्मा गांधीची सही नाही. महात्मा गांधी हे हिंदूंचे पुढारी गणले जात नाहीत. हिंदू समाजाचे खरे पुढारी पं. मदनमोहन मालवीय हे आहेत. आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली अखिल भारतीय हिंदू

समाजाचे पुढारी म्हणून त्या वेळच्या सर्व वाटाघाटी चालू होत्या आणि या नात्यानेच करारावर पहिली सही पं. मदनमोहन मालवीय यांची आहे. आपल्या सर्वमान्य पुढाऱ्याच्या शब्दाची हिंदू समाजाला चाड नसेल तर त्या समाजासारखा कृतघ्न व निर्लज्ज दुसरा समाज नाही, असे म्हणावे लागेल. पण मला आशा आहे की हिंदू पुढारी आपल्या शब्दास जागतील.

अस्पृश्य समाजास आपल्या शब्दांची चाड आहे, हेच जाहीर करण्याकरता तुम्ही आज येथे जमले आहा, असे मी समजतो. परंतु याच वेळी मी तुम्हास हे सांगू इच्छितो की गेल्या वर्षापासून आपण पाळतो तो पुणे करार दिन नव्हे. पुणे करार हा अस्पृश्यांच्या इतिहासात एक चिरस्मरणीय असा प्रसंग आहे या करा-राच्या द्वारे आपल्या समाजाने बेदरकार हिंदू समाजात आपले राजकीय अस्तित्व कबूल करण्यास भाग पाडले आहे. या करिता तो आपला राजकीय–दिन म्हणून आपण पाळला पाहिजे. पुणे-करारान्वये आपल्या समाजात मिळालेले अधिकार आपण योग्य रीतीने उपयोगात आणतो की नाही, हे पाहण्याकरिता या दिवशी जमले पाहिजे.

मुंबई प्रांताकरिता तुमच्या १५ जागा अडविण्याकरिता उभे राहणारे उमेदवार आपल्या समाजाचे खरे प्रतिनिधी आहेत किंवा नाहीत हे पाहून आपण त्यांची निवड करावयास हवी. या १५ प्रतिनिधींपैकी जर ५ भांडवलदारांच्या हाती गेले, ५ हिंदू समाजाचे हस्तक बनले, तर राहिलेल्या पाचांचा काय उपयोग आहे ? या करिता तुम्ही या १५ प्रतिनिधींच्या बाबतीत दक्ष राहिले पाहिजे. तरच मिळालेल्या हक्कांची सांगता होईल व अस्पृश्य समाजाचे पुढे पाऊल पडेल.

पुढील काळात प्रत्येकाने कर्तबगार बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बापाच्या नावावर खपण्याची हाव सोडून मी स्वतः काहीतरी करून दाखवीन, अशी महत्वा-कांक्षा मनात धारण केली पाहिजे. याबाबतीत मला एक साधा दृष्टांत द्यावासा वाटतो. * (अपूर्ण)

---

* 'जनतेचे' पुढील पान उपलब्ध होऊ शकले नाही.

८. तुम्ही दुसऱ्याचे गुलाम म्हणून किती दिवस राहणार ?

(हे भाषण दि. ११ जुलै १९३६ च्या जनतेच्या संपादकीय लेखाच्या जागी देण्यात आले असून त्याला धर्मांतराच्या घोषणेपूर्वी एक वर्ष असे शीर्षक दिलेले आहे. तळटीपेमध्ये बाबासाहेबांचे एक वर्षापूर्वीचे मुंबईचे भाषण, असा उल्लेख आहे. या भाषणाचे पहिले तीन परिच्छेद याच खंडातील 'पुणे-करार स्मृति-दिन' या भाषणातील परिच्छेदासारखेच आहेत म्हणून ते येथे गाळले आहेत.)

महात्मा गांधींपाशी अस्पृश्यता निवारणाबद्दल ज्यावेळेस माझे एकदा बोलणे झाले त्यावेळेस त्यांनी मला सांगितले की "अस्पृश्यता हिंदू समाजात कित्येक शतके घट्ट मूळ धरून बसल्यामुळे एकदम नष्ट होणे शक्य नाही व याकरता तुम्ही हिंदू समाजास अवसर द्या" कित्येक शतकाची चाल एकाएकी नाहीशी होणे शक्य नाही, ही गोष्ट अगदी खरी आहे ती नाहीशी करण्याकरिता अव्याहत प्रयत्न चालू ठेवला पाहिजे हेही मला कबूल आहे. पण ती चाल नष्ट करणे म्हणजे काय हे आपण पाहिले पाहिजे महात्मा गांधींनी मंदिरप्रवेशाची चळवळ हाती घेतली त्यावेळेस ते असे म्हणाले होते की, "अस्पृश्यांचा मंदिरात शिरकाव करून घेणे हे ध्येय ठेवून हिंदू-धर्मातील अत्यंत पवित्र अशा ठिकाणी त्यांचा रिघाव करून घेतल्यास अस्पृश्यता नष्ट होईल व आज विहिरी, तळी, शाळा इत्यादी स्थळांसारखी देवालयापेक्षा कमी दर्जाची जी स्थळे आहेत ती अस्पृश्यास मग आपोआप मोकळी होतील." या त्यांच्या विचारसरणीचा मतितार्थ असा की अस्पृश्यतेच्या वर्मावर घाव घालावयाचा व त्यायोगे अस्पृश्यतेची मगर मिठी सैल करावयाची. त्यांच्या दृष्टीने मंदिर-प्रवेश ही पहिली व शेवटची पायरी होय ! मला ही विचारसरणी संमत नाही. माझे ठाम मत आहे की अस्पृश्यता ही चातुर्वर्ण्य कल्पनेवर उभारलेली इमारत आहे. हिंदू-समाजातील जातिभेद हे त्याचेच प्रतिबिंब आहे हिंदू-समाज ग्रासून टाकणाऱ्या या कल्पनेस मूठमाती देऊन समाजातील प्रत्येक व्यक्तीस आपल्या बुद्धीचा विकास करावयाची संधी दिल्याशिवाय किंवा जातीभेदाच्या कल्पनेस मुळातच विरोध केल्याशिवाय हिंदू-समाजाची सर्वांगीण सुधारणा होणार नाही. अस्पृश्यतेचे मूळ वरपांगी दिसणाऱ्या हिंदू समाजरचनेच्या पृष्ठभागावरच पसरलेले नसून ते जातिभेदाच्या कल्पनेत खोल गेले आहे व तेथे ते दृढ झालेले आहे; आणि अस्पृश्यता समूळ नष्ट करावयाची असेल तर जातिभेदाचे हे मूळ आज सुधारकांनी उखडून काढले पाहिजे. आता हे

कार्य अवघड आहे व ते पार पाडण्यास अवधी लागेल हे न समजण्याइतके बुद्धीमांद्य माझ्या ठिकाणी नाही. मी इतकेच म्हणतो की हे ध्येय मानून किंवा हे तत्त्व मान्य करून तुम्हास जे जरूर वाटतील ते प्रयत्न करा. तपशीलाबद्दल माझे विशेष म्हणणे नाही. तो निरनिराळ्या ठिकाणी, निरनिराळ्या काळी व निरनिराळ्या समाजात भिन्न असू शकेल. पण खेदाची गोष्ट ही की ते तत्त्वच मुळी हिंदू-समाजास मान्य नाही.

हिंदू धर्मातील अगदी निकृष्ट स्थितीत असलेल्या समाजाने आपल्यावर कोणता जुलूम होतो हे जाणून त्यातून मुक्त होण्याकरता आपल्यास काय हवे आहे, हे स्वयंनिर्णयाच्या न्यायाने ठरविण्याचा अधिकार अस्पृश्य समाजास असला पाहिजे. पण हिंदू–समाज ही साधी गोष्टही मान्य करण्यास तयार नाही. अस्पृश्य समाजास आजपर्यंत गुलामगिरीत ठेवून त्यांनी भविष्यकाळी कोणत्या स्थितीत राहावे हे ठरविण्याचा अधिकार हिंदू समाज आतल्या हातातच ठेवू पाहात आहे. राजकीय क्षेत्रात डोमिनियन स्टेटस म्हणजे वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय ठेवून राजकीय अधिकार हप्त्याहप्त्याने हिंदुस्थानातील लोक घेत आहेत. तद्वतच अस्पृश्य समाज आज आपले एक ध्येय ठरवून ते हप्त्याहप्त्याने घेण्यास आपण तयार आहो असे सांगत आहे. ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानास डोमिनियन स्टेटस देऊन त्यास आपल्या बरोबरीच्या नात्याने वागविण्याचे आपले ध्येय आहे, असे कबूल केले आहे. पण हिंदु समाज मनाचा एवढा दिलदारपणाही दाखविण्यास तयार नाही इतकेच नव्हे तर अस्पृश्य समाजास 'समाज' म्हणून म्हणण्याची देखील त्यांची तयारी नाही.

महात्मा गांधीजींच्या प्राणांतिक उपवासानंतर वरिष्ठ कायदेमंडळात एका हिंदू सभासदाने मंदिर-प्रवेशाचे बील आणले होते. हिंदूःसमाजास अस्पृश्यांबद्दल प्रेमाचा पाझर फुटला आहे असा महात्मा गांधीजींच्या उपवासानंतर जिकडे तिकडे बोलबाला झाला होता. हे मंदिर-प्रवेश बील बिनविरोधाने पास होईल अशी बढाईही मारण्यात येत होती. या बिलापासून आपली उन्नती अधिक जवळ येईल अशी आशा बाळगण्याजोगे त्या बिलात काहीच नसल्यामुळे त्या बिलाच्या भवितव्यतेबद्दल अर्थातच अस्पृश्य समाज बेफीकीर होता. हिंदूच्या देवालयाबद्दल हे बील असल्यामुळे अस्पृश्य समाजास त्यात लुडबूड करावयास काहीच कारण नव्हते व त्यामुळेच हे बील कायदेमंडळासमोर आणताना किंवा ते गाडले गेल्यानंतरही त्या बिलाची विचारपूस त्यांनी केली नाही. बील पास झाले असते तर अस्पृश्य समाजास आनंदाच्या उकळ्या फुटल्या नसत्या, आणि ते मागे घेतले गेले म्हणून त्यांना खिन्नताही वाटली नाही. तुमच्या मंदिरांबद्दल तुम्ही पाहून घ्या. देवालयासारखी धार्मिक ठिकाणे अस्पृश्यांस खुली करून त्यांचे प्रेम संपादन करणे

अगर ती बंद करून त्यात प्रवेश करण्याचा अस्पृश्यांस मज्जाव करणे हे हिंदू समाजाचे कार्य आहे–आमचे नव्हे. पण इतका शहाणपणा दाखविला तर तो हिंदुधर्म कसला ! शेवटी व्हावयाचे तेच झाले, असे नाही तर सर्व हिंदू समाजाने त्यास असा कडक विरोध केला की बिलाचे जनकच ते बिल वादविवादाकरिता पुढे आणावयास धजले नाहीत. ते बील काखेत मारून मि. रंगा अय्यरांना मागे पळ काढावा लागला. आपण हिंदू समाजास आपले हृद्‌गत खुले करण्यास पूर्ण मुभा दिली व आपण तटस्थ वृत्ती धारण केली. आता मात्र या बिलाच्या मृत्यूपासून आपण बोध घेतला पाहिजे. हिंदू समाजाचे मनोगत आपल्यास कळले आहे. तो अस्पृश्य समाजास 'आपला' म्हणावयास तयार नाही, हे आपल्याला स्पष्टपणे कळले आहे. अशा रीतीने हिंदूंनी तुम्हास लाथाडल्यावर तुम्ही हिंदूंचा कासोटा किती दिवस धरून चालणार ? अस्पृश्यांस हिंदू समाज शरीराचा एक अभिन्न अवयव म्हणून समजण्यास आज कोणी तयार नाही. पायातील वाहणेचा जरूर तितका उपयोग करून घेऊन मनुष्य तीस घराच्या बाहेर ठेवतो व जरूर नसल्यास ती फेकून देतो. आज हिंदू लोक तुमची पायातल्या वहाणेपेक्षा अधिक किंमत समजत नाहीत तुम्हाला गुलाम म्हणूनच वागवावयाचा त्यांचा कृतनिश्चय आहे. असे असता हा अपमान तुम्ही किती दिवस सहन करणार ?

तुम्ही दुसऱ्यांचे गुलाम म्हणून किती दिवस राहणार ? आजची परिस्थिती तुमच्या स्वाभिमानास पोषक आहे का ? स्वाभिमानरहित गुलाम आपली स्वतःची किंवा देशाची कधी तरी उन्नती करू शकला आहे का ? या प्रश्नांचा तुम्ही नीट विचार करा. आपल्यास हिंदू म्हणवून घेऊन दुसऱ्याचे गुलामच तुम्ही राहू इच्छिता का ? या प्रश्नांचा विचार करता हिंदू म्हणवून घेण्यास माझी तरी मनोदेवता मला सांगत नाही.

मी गेली दोन वर्षे या प्रश्नाचा खोल विचार करीत आहे. आणि माझी पूर्ण खात्री झाली आहे की माझा स्वाभिमान जागृत ठेवावयाचा असेल, मला समतेच्या वातावरणात वागावयाचे असेल तर मला हिंदू म्हणवून घेता येणार नाही. मी हिंदू नाही, तरी पण मी स्वतःला काय म्हणवून घेईन–ख्रिश्चन म्हणेन किंवा मुसलमान म्हणेन की बौद्ध धर्मीय म्हणेन हे मी आजच सांगत नाही. आतापर्यंत मी हिंदू राहिलो, तुमच्याबरोबर राहिलो हे केवळ तुमच्याच करिता. तुमच्या सध्याच्या अशिक्षततेमुळे तुम्हास सोडून जाणे म्हणजे तुम्हास आंधळे करणे होय, हे जाणूनच मी आजपर्यंत तुमच्याबरोबर राहिलो आहे. परंतु लवकरच आपण या गोष्टीची शहानिशा करू या व जे काय करावयाचे ते सर्वजण एकदम करू या. कड्यावरून उडी टाकणे झाल्यास सर्वजण एकदम उडी टाकू. सध्या तुम्ही आपल्या मनाशी हिंदूंचे आपल्याशी कोणत्या प्रकारचे वर्तन आहे याची खूणगाठ बांधून ठेवा.

— ० —

९. तुमच्या मताची किंमत मीठमिरचीसारखी समजू नका

दिनांक २४ जानेवारी ११३६, स्वतंत्र मजुर पक्षाच्या प्रचार दौऱ्यावर असताना सोलापूरला दिलेले भाषण, जनता, दि. २२-२-१९३६)

बंधुंनो व भगिनींनो,

मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या आगामी निवडणुकीत कोणाला मते देऊन निवडून आणावे, याचा विचार करण्यासाठी आज आपण येथे जमलो आहोत. या देशात अनेक राजे होऊन गेले व इंग्रजांना येथे येऊन उणीपुरी १५० वर्षे झाली. इंग्रजांच्या या १५० वर्षांच्या कारकीर्दीत सुमारे ६० वर्षांपासून ही कौन्सिले अमलात आली असून त्यांच्या द्वारे जनतेचे प्रतिनिधी आपल्या लोकांची गाऱ्हाणी सरकारकडे मांडीत आहेत. परंतु अस्पृश्य मानलेल्या ८ कोटी प्रजेतर्फे त्यांचे गाऱ्हाणे मांडणारा त्यांचा प्रतिनिधी कौन्सिलात असावा ही गोष्ट आतापर्यंत जगाच्या इतिहासात घडून आली नव्हती. ती गोष्ट आता आपल्या प्रयत्नाने झाली आहे. येत्या एप्रिल १९३७ पासून सुरू होणाऱ्या कायदेमंडळासाठी सोलापूर जिल्ह्यातील आपल्या लोकांस एक प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार मिळाला आहे. आता जे कौन्सिल भरणार आहे ते आपल्या समाजाच्या बचावाचे साधन आहे. तेथेच आपल्या सुखदुःखाची दाद लागणार आहे. तेथेच महारांच्या वतनासंबंधी, पडित जमिनी मिळविण्यासंबंधी, अस्पृश्यतेमुळे आलेली दैन्यावस्था टाळण्यासंबंधी, सरकारी नोकरीत योग्य त्या प्रमाणात शिरकाव होण्यासंबंधी अशा एक ना दोन शेकडो गोष्टी या कायदेमंडळाच्या द्वारे झगडा करून आपणास मिळवावयाच्या आहेत. अर्थात तेथे जाणारा तुमचा प्रतिनिधी मानासाठी जाणार नसून आपल्या समाजाच्या हिताच्या बाजूने लढण्यासाठी जाणार आहे, हे लक्षात घ्या. तसेच नेहमीच्या व्यवहारात आपण पाहतो की घर बांधताना दगडकामासाठी गवंडी व लाकूड कामासाठी आपण सुतार लावतो. कोठे एखादा रेल्वेचा पूल बांधावयाचा असल्यास इंजिनिअरची जरुरी असते. शाळा मास्तरला ते काम करता येत नाही. पण तुमच्या येथील शिवशरण मास्तरने या जबाबदारीच्या जागेसाठी आपली निवड करावी म्हणून मला पत्र लिहिले. इंग्रजी न जाणणाऱ्या या मास्तराबद्दल मी मुग्ध राहिलो. तब्बल दोन महिने विचार केला आणि नंतर श्री. जिवाप्पा ऐदाळे यांचे नाव जाहीर केले. इतके होईपर्यंत श्री. मागाडे यांचे नाव मला कळविले नाही, मागाहून कळविले. पण याच्या बुडाशी काँग्रेसचा हात आहे

व याबद्दल माझ्याकडे पुरावा आहे. बंधूंनो काँग्रेसला स्वराज्य पाहिजे आहे. आम्हालाही स्वराज्य पाहिजे. पण ते मिळवण्याचा काँग्रेसचा जो मार्ग–कायदेभंग– तो आम्हास मान्य नाही. कायदेभंगाने स्वराज्याचा खुंटा हलवून बळकट केला आहे. काँग्रेसवाले तुम्हाला सांगतील की, 'आपल्या सर्वांच्या एकजुटीने इंग्रज सरकारला आपल्या देशातून हाकन लावू या; आणि स्वातंत्र्य मिळवू या.' पण ढेकूण मारण्याची ज्यांना छाती नाही ते सर्वपरी सुदृढ आणि सुसज्ज अशा इंग्रज सरकारला कसे हाकून लावणार? अथवा समजा : उद्या इंग्रज सरकार इग्लंडला निघून गेले तर आम्हाला धार्मिक, आर्थिक, सामाजिक अवनतीच्या खड्ड्यात कुजत ठेवणारे खोत-जमीनदार हे कुठे परदेशी जाणार आहेत काय? आणि काँग्रेस तर शेठ–सावकर, जमीनदार, भांडवलदार लोकांची संस्था! म्हणून अशा लोकांच्या कसल्याच भूलथापा तुम्ही ऐकू नका.

बंधूंनो, तुमच्या मताची किंमत मीठ–मिरचीसारखी समजू नका. तुमच्या प्राणाइतकीच किंबहुना जास्तच तुमच्या मताची किंमत आहे, हे विसरू नका. भलत्याच उमेदवाराला मत द्याल तर खाटकाच्या हातात बकऱ्याने सुरी दिल्यासारखे होईल! श्री. जिवाप्पा ऐदाळे हे माझ्या पक्षाचे उमेदवार आहेत. त्यांना ध्येय आहे. त्यांना तत्त्व आहे. त्यांची आणि तुमच्या भावी हिताहिताची सर्व जबाबदारी माझ्या शिरावर आहे. म्हणून श्री. जिवाप्पा ऐदाळे यांना आपली तिन्ही मते देऊन निवडून आणा. दुसरे उमेदवार कोणी माझे शत्रू नाहीत. पण ज्यांना पक्ष नाही, ध्येय नाही, तत्त्व नाही अशा अधांतरी लोंबकळणाऱ्या लोकांची जबाबदारी मी घेणार नाही. आतापर्यंत तुम्हाला कोणी तुमच्या जिल्ह्याचा तालुक्याचा, नात्यागोत्याचा अभिमान धरा म्हणून सांगितले असेल किंवा पुढे कोणाबद्दल असा अभिमान धरावयाचा झाल्यास शेवटी–शेवटी तुम्हाला आपल्या गावचा व घराचा सुद्धा अभिमान धरावा लागेल. आणि असे घरोघरी उमेदवार उभे राहतील तर तुमच्या भावी कल्याणाचा सत्यानाश होईल, याचा विचार करा.

शेवटी तुम्हाला सांगावयाची गोष्ट ही की या शहरातील मजुरांच्यातर्फे तुम्हाला एक मत देण्याचा अधिकार आहे. त्या जागेसाठी–मजुरांच्यातर्फे श्री. रघुनाथराव बखले हे उभे राहिले आहेत. आतापर्यंत त्यांनी कौन्सिलात केलेली गोरगरीब, मजूर, शेतकरी, अस्पृश्य यांची सेवा मला मान्य आहे. त्यांनाच सोलापूरच्या मजुरांनी मते द्यावी. शेठसावकार, गिरणीवाले यांच्या हस्तकांना मते देऊन तुमचे कल्याण होणार नाही. तरी श्री. बखले यांनाच आपली मते द्या.

— ० —

१०. या कुचकामी धर्मातून मी जाणार !

(कुलाबा जिल्हा उत्तर भाग व ठाणे जिल्हा दक्षिण भाग यांच्या विद्यमाने झालेल्या अस्पृश्यांच्या संयुक्त परिषदेतील पनवेलचे भाषण.)

जनता, २४–३–१९३६)

हा भाग मुंबईच्या नजीक असूनही मला सभेकरिता म्हणून इकडे येत आले नाही, याबद्दल मला खेद वाटतो. अनेक व्यवसायांमुळे मी आपली भेट येऊ शकलो नाही हजारो ठिकाणाहून लोकजागृतीच्या कामाकरिता मला आमंत्रणे येतात; परंतु सर्वांचे समाधान करणे मला एकट्याला अशक्य आहे. मी काही शतमुखी रावण नाही. किंवा अंगास राख फासून संन्यासी झालेलो नाही. तुमच्याप्रमाणेच मला स्वत:ला पोटाचा उद्योग करावा लागतो. तुमच्यासारखाच परिस्थितीशी झगडणारा मी एक माणूस आहे.

आजचा प्रसंग जरी महत्त्वाचा असला तरी फार पाल्हळिक भाषण करून आपल्याला मी तिष्ठत बसविणार नाही मी फक्त थोड्या मुद्यांविषयी बोलणार आहे. विशेषत: तुमचे कर्तव्य काय आहे व तुमचा वाटाड्या म्हणून माझे कर्तव्य काय आहे, हे मी आज सांगणार आहे.

सद्गृहस्थहो, तुम्ही आज हजारो वर्षे या देशात वास्तव्य करीत आहात, तसेच तुमचे शेजारी म्हणून इतर लोकही येथे नांदत आहेत. तुमच्या स्थितीचे अवलोकन करून तुमच्या शेजाऱ्यांची स्थिती तुम्ही नीट ध्यानात आणा. तुमच्या दोघांच्या परिस्थितीची तुलना करा. तुम्हाला पहिली गोष्ट दिसून येईल ती ही की तुम्ही इतर समाजापेक्षा दरिद्री आहात. इतर समाजांना नानाप्रकारचे उद्योग करून भाकरी मिळविण्याचे मार्ग मोकळे असल्यामुळे त्यांची स्थिती तुमच्यापेक्षा अधिक चांगली आहे. सभेला जावयाचे म्हणून तुम्ही आज आपली नेहमीची लक्तरे बाजूला ठेवून जरा बऱ्यापैकी कपडे अंगात घालून आलेले दिसता. तुम्ही सभेकरिता नीटनेटके आलात याबद्दल मला संतोष वाटतो. पण तुमची खरी स्थिती काय आहे याची तुमच्याच हाडामासाच्या मला पूर्ण जाणीव आहे. आठवड्यातून तीन दिवस पोटभर अन्न मिळण्याची तुम्हाला मारामार ! अंगावर एखादा फाटका सदरा व एक लंगोटी. ती लंगोटीदेखील लवकर बदलता येत नाही. अशी तुमची कंगाल स्थिती ! याच्या उलट पांढरपेशा वर्गाची काय स्थिती

आहे ? तुमच्या मानाने ते शतपट सुखी आहेत. त्यांच्या घरावर कौले तर तुमच्या घरावर पुरेसे बांबू किंवा झावळ्याही टाकावयास तुम्हास मिळत नाहीत ! त्यांच्या घरात पितळेची भांडी तर तुमच्या घरात मातीची मडकी; अशी तुमची दैन्यावस्था ! याचे पहिले कारण, त्यांना जी उपजीविकेची साधने खुली आहेत ती तुम्हाला खुली नाहीत. तुम्हाला आज डेप्युटी कलेक्टर, मामलेदार किंवा पोलिस ऑफिसर वगैरे बडचा पगाराच्या जागा मिळत नाहीत. का ? तर तुमच्यामध्ये सुशिक्षित तरुण नाहीत म्हणून. असे जरी गृहीत धरले तरी ज्या अंमलदारापेक्षा कमी दर्जाच्या अनेक नोकऱ्या आहेत त्यादेखील तुम्हास मिळत नाहीत. तेथेही तुम्हास मज्जाव आहे. साधी पोलिसाची नोकरी घ्या. ती तुम्हास का मिळत नाही ? या जागेची जबाबदारी पार पाडण्यास काही फार शिक्षण लागत नाही. दोन–तीन इयत्ता शिकणाऱ्या स्पृश्य समाजातील कोणाही माणसाला ती नोकरी मिळू शकते; पण तुम्हास ती जागा मिळत नाही. तुमच्यात प्रामाणिकपणाचा किंवा सचोटीचा अभाव आहे असे म्हणावे, तर आज लाखो रुपयांचा वसूल महारांकडून केला जात आहे. या वसूलाची ने–आण महारच आज कित्येक वर्षे करीत आले आहेत. पण महाराने या वसूलात अफरातफर करून दगलबाजी केली आहे, असे कोणाच्या तरी ऐकिवात आहे का ? याच्या उलट मामलेदारीसारख्या वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्या करणाऱ्या स्पृश्य समाजातील लोकांकडून अनेक दगलबाज्या झाल्या आहेत. त्याचे दाखले दाखविता येतील. हे झाले नोकऱ्यांसंबंधी. इतर लहानसहान धंदे घ्या. तुम्ही दुधाचा, दह्याचा किंवा लोणी विकण्याचा धंदा करू म्हणाल तर तुमचे दूध कोणी घेणार नाही व तुमच्या हातच्या लोण्याने गिऱ्हाईकांचा धर्म बुडेल ! तुम्ही भाजी विकण्याचा धंदा करावयास जा; तरी तीच गत ! तुम्हाला डोके वर करावयास म्हणून कोठेच जागा नाही, अशी तुमची आज शोचनीय परिस्थिती आहे. तुम्ही या स्थितीचा कधी विचार केला आहे का, असा मी तुम्हास प्रश्न विचारतो. इतर लोक आपल्या मुलाबाळांची नीट निगा राखून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करतात व त्यामुळे ते आपली स्थिती सुधारू शकतात. तुम्हाला तसे का करता येत नाही ? तुमचा सर्व बाजूंनी का कोंडमारा होतो ? या प्रश्नाचा तुम्ही आज विचार करावयास पाहिजे. तुमच्या आड येणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्या कशा दूर करता येतील हे तुम्ही पाहिले पाहिजे. तुम्हास मला असे विचारावेसे वाटते की तुम्हाला आपली स्थिती सुधारावयाची आहे की नाही ? आजपर्यंत तुम्ही या चिखलात लोळत पडला तसेच तुम्हाला राहावयाचे आहे का ? ज्या ठिकाणी पायातील जोडयाइतकी तुमची किंमत नाही त्याच ठिकाणी तुम्हास कुजत राहावयाचे आहे का ? थोडक्यात सांगायचे म्हणजे तुम्हाला गुलामाप्रमाणे राहायचे आहे की स्वतंत्र माणसाप्रमाणे जगावयाचे आहे, याचा आज तुम्हाला विचार करावयाचा

आहे. तुमच्या मार्गात येणाऱ्या अडचणी कशा दूर करता येतील हे तुम्हास पाहावयाचे आहे.

प्रामुख्याने आज तुमच्यापुढे तीन अडचणी आहेत. पहिली : तुमचे दारिद्र्य; दुसरी : तुमची असाह्यता आणि तिसरी तुमचे मनोदौर्बल्य–मनाच्या कमकुवतपणा. तुम्ही सर्वजण दारिद्र्याने गांजून गेला आहात आणि त्यामुळे परावलंबी बनला आहात. स्वतंत्र वृत्तीने तुम्हास काहीच करता येत नाही. तुम्ही साध्या माणुसकीकरता झगडावयास लागलात तर स्पृश्य लोकांकडून तुम्हाला जोराच्या विरोध होतो. आणि तुमचे जीवन सर्वस्वी त्यांचेवर अवलंबून असल्यामुळे तुमच्या लढ्यापासून परावृत्त करण्याकरिता ते तुम्हास हरएक प्रकारे नाडतात. त्यांनी भाकरीचा तुकडा दिला तर तुम्हास पोटास अन्न मिळणार ! म्हणून हे परावलंबी जिणे नाहीसे करण्याच्या उद्योगास तुम्हास लागले पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे तुमची असहाय्य स्थिती. तुम्हास कोणाचे साहाय्य नाही. मित्र म्हणून तुमच्या पाठीमागे उभे राहण्यास आज कोणीच तयार नाही. तुमच्यात व गावकऱ्यात तंटा उपस्थित झाल्यास तुमच्या मदतीस कोणीच धावून येत नाही. या देशात हिंदू समाजाशिवाय, मुसलमान ख्रिस्ती व शीख असे समाज आहेत. पण मुसलमान किंवा ख्रिस्ती तुमच्या मदतीस धावून येत नाहीत. याचा तुम्ही नीट विचार करा. ज्या धर्मात आपण जन्मास आलो, ज्या धर्माची तत्त्वे आपण पाळतो, ज्या धर्माला आपण आपला धर्म म्हणतो तोच आपल्याला आज गांजीत आहे. त्याची गांजणूक आपण असहाय्य स्थितीत किती दिवस सहन करणार ? तुम्हाला मी विचारतो की कोणाचीही मदत न घेता तुम्ही हिंदूंच्या लढ्यात कधीतरी यशस्वी होऊ शकाल का ? ज्यांच्यावर तुम्ही जगता ते तुम्हास कधीतरी माणुसकीचे हक्क देतील अशी आशा बाळगण्याचे तुम्हास कारण नाही. मी तुम्हास खात्रीपूर्वक असे सांगतो की हिंदूंपासून तुमचा कधीही फायदा होणार नाही. मुलाच्या प्रत्यक्ष बापाने त्याला विहिरीत ढकलून दिल्यावर त्यास हात देऊन बाहेर काढणारा मनुष्य त्या मुलाचा मित्र होईल की जीव घेण्यास प्रवृत्त झालेला बाप त्याचा हितचिंतक ठरेल ? तेव्हा अशाप्रकारे हात देणारा मित्र तुम्हास शोधून काढावयाचा आहे.

आज मुसलमानांच्या वाटेस हिंदू का जात नाहीत ? ते त्यांच्या धर्माचा द्वेष करतात, निंदा करतात पण गावातील दोन मुसलमानांच्या घरातील पोरास हात लावण्याची हिंदूंची ताकद नाही. याचे कारण काय ? या मुसलमानांच्या पोरास जर हात लावला तर हिंदूंना माहीत आहे की हिंदुस्थानातील सर्व मुसलमान समाज त्याच्या मदतीस धावत येईल व हिंदूंचा समाचार घेईल. पण हिंदू लोक तुम्हास गांजतात याचे कारण हेच की तुमच्या मदतीस आज कोणीच धावून येत नाही.

पुष्कळ लोक तुम्हास सांगतात की तुम्ही स्वतःच्या पायावर उभे राहा. परंतु ज्याचे दोनही पाय कापले आहेत तो उभा कसा राहणार ? तुम्ही कोणाचा तरी हात धरूनच उभे राहिले पाहिजे, आणि तेव्हाच तुम्ही सामर्थ्यवान बनाल. तुमच्या आजच्या असहाय्य परिस्थितीत जो तुम्हास हात देईल तोच तुमचा खरा मित्र व वाली. आणि म्हणून मी म्हणतो की याकरताच तुम्हाला धर्म बदलणे प्राप्त आहे. माणसाला धर्म प्रिय नाही, माणसाला माणुसकी प्रिय आहे.

कातकऱ्यासारखी अत्यंत मागासलेली जात पण तिलादेखील हिंदुधर्मात माणुसकी आहे. त्यांना स्पृश्यांच्या घरात जाता येते; पण तुम्हाला मात्र दारातदेखील मज्जाव ! तुमच्या हाताचे दूधदेखील कोणी घ्यावयास तयार नाही. नोकऱ्या करून किंवा इतर धंदे करून आपली उन्नती करून घेण्याच्या जेवढ्या म्हणून वाटा आहेत त्या सर्व तुम्हाला बंद आहेत मुसलमान किंवा ख्रिस्ती या धर्मातील लोक ज्या नोकऱ्या करतात त्या तुम्ही करू म्हटल्यास तुम्हाला मात्र हिंदूंचा विरोध. म्हणून तुम्हाला मी पुन्हा सांगतो की या हिंदू धर्मात राहून तुम्हाला आपली उन्नती करून घेणे शक्य नाही. तुम्ही हिंदू आहात म्हणूनच तुमची ही कुचंबणूक. तुम्ही मुसलमान असता, ख्रिस्ती असता किंवा शीख असता तर या सर्व वाटा तुम्हास खुल्या असत्या व तुम्ही काही अंशी आपली आर्थिक सुधारणा करू शकला असता. पण जोपर्यंत तुम्ही हिंदू आहात तोपर्यंत जाचणुकीची ही पकड, त्यांचे वर्चस्व कधी दूर होणार नाही आणि यामुळे तुम्ही जिवंतपणे नरकात खितपत पडला आहात. म्हणून तुम्ही या परिस्थितीचा नीट विचार करा. तुम्ही या आत्मघातकी धर्माला किती दिवस कवटाळून बसणार ! मेल्यानंतर तुम्हाला स्वर्ग पाहिजे की मोक्ष म्हणजे माणुसकी पाहिजे ? दुसऱ्या जन्माशी किंवा काल्पनिक स्वर्गाशी मला काही कर्तव्य नाही.

तिसरी गोष्ट अशी की या हिंदुस्थानच्या खुळचट शिकवणुकीने तुमची मने मारली गेली आहेत. ज्याप्रमाणे सर्प पाहिल्याबरोबर एखादा मनुष्य गर्भगळीत होतो आणि त्याच्या नाडच्या आखडतात, त्याचप्रमाणे तुमची आज स्थिती आहे. तुम्हाला असे वाटते की आपण अगदी नीच आहो–हलके आहो. तुम्हाला हिंदुधर्म अतिशूद्र मानतो आणि तुम्ही आपल्या स्वतःला शूद्र मानता. त्यामुळे रस्त्याने चालतानादेखील तुम्ही स्पृश्यांजवळून न जाता बाजूस होता. याचे कारण तुमचे मन मेलेले आहे. तुमचा स्वाभिमान निजलेला आहे. तुम्हाला आपण मनुष्य आहो असे वाटत नाही. त्यामुळे आपल्यावर जुलूम करणाऱ्या हिंदूंबरोबर झगडा करणे हा विचार तुम्हास शिवत नाही. तुम्हाला मी निक्षून सांगतो की तुम्ही जोपर्यंत हिंदू धर्माच्या चौकटीत आहा, जोपर्यंत तुमच्या हातापायात या बेडच्या आहेत, जोपर्यंत या धर्मातील शिकवणुकीचा पगडा आहे तोपर्यंत तुम्ही अगदी कुचकामीच राहणार.

तुम्ही सर्वजण शेतकरी आहात. झाडे कोणत्या परिस्थितीत फोफावतात हे तुम्ही चांगले जाणता. तुम्हाला माहीत आहे की एका झाडाच्या सावलीखाली दुसरे झाड जगत नाही; व जगले तर ते खुरटे झाल्याशिवाय राहात नाही. आंब्याचे कलम लावायचे झाले तर पंधरा-वीस फुटाचे अंतर ठेवावे लागते. तरच त्या कलमांना चांगला मोहर फुटून फळे येतात. याचे कारण काय ? मोठ्या झाडाच्या छायेखाली लहान झाडाला पुरेसा उजेड मिळत नाही. त्यावर सूर्याचा पूर्ण प्रकाश पडत नाही. इतर पोषक द्रव्येही त्यास पुरेशी मिळत नाहीत. या लहान झाडाप्रमाणेच तुमची गत झालेली आहे तुम्ही हिंदू लोकांच्या छायेखाली राहिल्यामुळे तुमची वाढ झाली नाही. तुम्ही खुरटचा झाडाप्रमाणे झाला आहात. सद्गृहस्थहो, इतके दिवस तुम्ही झोपलेले होता. इतर लोकांनी या जगात काय लुटालूट केली याचा आता आपण विचार केला पाहिजे.

मी सांगितलेल्या तीन अडचणी दूर करण्याचा तुम्ही जर मनापासून प्रयत्न केलात तर तुमची उन्नती झाल्याशिवाय राहणार नाही. आता पहिली अडचण म्हणजे तुमचे दारिद्र्य. हे दारिद्र्य घालविणे तुमच्या हाती नाही; पण आपण दोघांनीही हे दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या बाबतीत तुमच्यापेक्षा माझ्यावर अधिक जबाबदारी आहे. मी व माझे इतर सहकारी यांचेवर ती आहे. आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता राजकीय हक्क आपल्याला मिळविले पाहिजेत. आज तुम्हाला कायदेमंडळात १५ जागा मिळाल्या आहेत. त्या जागेवर जाणाऱ्या प्रतिनिधीवर हरएक प्रकारे तुमची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची जबाबदारी आहे. तर तुम्ही मात्र आपल्या स्थितीची पूर्ण जाणीव ठेऊन या तुमच्या म्होरक्यांना आपले कर्तव्य पार पाडण्यास भाग पाडले पाहिजे.

दुसरी व तिसरी अडचण म्हणजे तुमची 'असहाय्यता' व तुमच्या 'मनाचा कमकुवतपणा' या दूर करणे मात्र सर्वस्वी तुमच्या हातात आहे. मी माझे कर्तव्य म्हणून ती अडचण कशी दूर करता येईल हे सांगेन. त्याप्रमाणे वागणे न वागणे हे तुमच्या हातात आहे. माझ्या मताप्रमाणे या दोनही अडचणी तुम्ही हिंदू धर्म सोडल्याने दूर होणाऱ्या आहेत. मी तुम्हाला सांगितले आहे की तुमची असहाय्यता दूर करण्याकरिता तुम्ही दुसऱ्या धर्मातील समाजास मित्र करावयास पाहिजे. तसेच तुमचे मनोदौर्बल्य नाहीसे करण्याकरिता तुम्हाला दुसऱ्या धर्माच्या शिकवणुकीची कास धरल्याशिवाय गत्यंतर नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे या दोनही अडचणींवर तोडगा म्हणजे धर्मांतर ! ते करण्यास तुम्ही आता तयार झाले पाहिजे. केव्हा धर्मांतर करावयाचे, कोणत्या धर्मात जावयाचे हे मी योग्य वेळी सांगेन. माझे म्हणणे तुम्हाला योग्य वाटत असेल तर माझ्या मागे या. नसेल तर खुशाल याच धर्मात राहा व खितपत पडा. ज्या अर्थी मी तुमच्या जातीत

जन्माला आलो आहे त्याअर्थी माझे कर्तव्य म्हणून मी तुम्हास हे सांगत आहे. तुमच्या बऱ्यावाईटाची जबाबदारी जर तुम्ही माझेवर टाकीत असाल तर मी सांगेन तसे वागण्यास तुम्ही तयार झाले पाहिजे; व मी जिकडे जाईन तिकडे माझ्यामागे आले पाहिजे.

शेवटी तुम्हास माझे असे सांगणे आहे की हा प्रसंग फार आणीबाणीचा आहे. आपण काय करावयाचे हे आज निश्चित केले पाहिजे. ५–१० वर्षांची मुदत तुम्हा सर्वांना दिली आहे. याचे कारण एवढेच की हा प्रश्न फार मोठा आहे. म्हणून त्याची वासलात लागणे सोपे नाही. तुमच्यापैकी निम्मे-अर्धेच लोक जर धर्मांतर करावयास तयार झाले तर आपला फायदा होणार नाही. सर्व जणांनीच ते केले पाहिजे. आणि त्याकरताच ही ५–१० वर्षांची मुदत दिली आहे. या अवधीत तुमच्या मनावर बसलेला हा हिंदू धर्माचा पगडा दूर केला पाहिजे. एक गोष्ट ध्यानात ठेवा. ज्या वेळेस मला वाटेल की तुम्ही धर्मांतर करण्यास तयार नाही त्यावेळेस असे समजा की तुमची व माझी फारकत झाली. मी मात्र या कुचकामी व निरुपयोगी धर्मातून जाणार हे खास.

० ० ०

ज्या धर्मात समता, प्रेम व आपुलकी नाही तो धर्म, धर्म नव्हे

(दिनांक ४–५–१९३६ रोजी अमरावतीस दिलेले भाषण, जनता, दि. १६–५–१९३६)

मी अमरावतीस आज सात-आठ वर्षांनी येत आहे. मागे येथे अंबादेवीच्या सत्याग्रहाकरिता आलो होतो. त्यावेळी माझ्या अस्पृश्य बांधवांची सत्याग्रह करण्याची काहीच तयारी नव्हती. सत्याग्रहाने तुरुंगवासात जाण्यास फक्त सहा माणसे तयार झाली होती. परंतु ही परिस्थिती आज पालटलेली पाहून मला आनंद होत आहे. येथे येण्यापूर्वी मला महात्माजींनी भेट घेण्यास वर्ध्यास बोलाविले होते. तेथे मी गेलो असताना श्री. जमनालाल बजाज यांनी जे आपल्या मालकीचे श्री. लक्ष्मीनारायणाचे देऊळ अस्पृश्यांकरिता खुले आहे ते पाहण्याकरता मला नेले होते. मी देवळात प्रवेश केला व देवळाच्या बाहेर येतो तर ती माझी अस्पृश्यता जशीच्या तशीच. कारण त्या देवळाकरिता लागणारे पाणी व फुले ही सुद्धा आम्हाला मिळू शकत नाहीत तर मग आमची देवळात जाऊन अस्पृश्यता कशी निघू शकेल ? असो. आम्हाला पूर्वी देवळावर सत्याग्रह करण्यात जितका आनंद वाटत होता तितकाच आता तिरस्कार वाटत आहे. जेव्हा महात्मा गांधीजींनी स्वराज्याचा प्रश्न हाती घेतला तेव्हाच आम्ही त्यांना अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे

दुर्लक्ष करू नका असे बजाविले. परंतु अस्पृश्यतेचा प्रश्न हा स्वराज्यातले एक अंग आहे, असे सांगून ते स्वस्थ राहिले. आम्ही धर्मांतराची घोषणा केल्याबरोबर हिंदू लोकांना इतका बाऊ वाटण्याचे कारण काय हेच आम्हाला समजत नाही. हिंदू धर्म जर आम्हाला हिंदू म्हणवून घेण्यास तयार नाही तर आम्ही देखील स्वतःला हिंदू म्हणवून का घ्यावे ? या धर्मात समता, प्रेम व आपुलकीची भावना नाही त्या धर्माला धर्म म्हणावयास मी तयार नाही. दोन हजार वर्षांपूर्वी आमचे पूर्वज अज्ञानी होतें त्यांना कोणत्याही प्रकारची विद्या संपादन करण्याची व शस्त्र हाती धरण्याची परवानगी नव्हती. म्हणून त्यांना कोणतेही नवीन कार्य करण्याचे धैर्य नव्हते. अज्ञानाने त्यांची मने मारून दुबळी केली होती. चार वर्णाच्या चौकटीत हिंदू धर्माला बसवून ठेविला आहे या वर्णव्यवस्थेमुळे आमची लायकी ब्राह्मणापेक्षाही श्रेष्ठ असली तरी गुलामगिरीची कामे आम्हाकडे देण्यात आली. या गुलामगिरीमुळेच आपले पूर्वज स्वतःचा अभिमान साफ विसरून गेले. पण आज परिस्थितीपालट झाला आहे त्या स्थितीनुसार आम्हाला हिंदू धर्माच्या अनुदारपणाच्या चौकटीत राहता येत नाही. म्हणून ही धर्मांतराची घोषणा करणे भाग पडले आहे.

— ० —

११. धर्मांतराची कारणे

(ठाणे जिल्हा पूर्व व दक्षिण विभागाच्या विद्यमाने झालेल्या अस्पृश्य परिषदेत कल्याण येथे दिनांक १७-५-१९३६ रोजी दिलेले. भाषण जनता दिनांक २३-५-१९३६)

आज आपण मुख्यतः धर्मांतरासंबंधी मी काय सांगणार आहे हे ऐकण्याकरता आला आहात. म्हणून त्याबद्दल मला खुलासेवार सांगणे प्राप्त आहे. काही लोक धर्मांतरासंबंधी असा प्रश्न करतात की आम्ही धर्मांतर का करावे ? परंतु याला माझा उलट प्रश्न असा आहे की आम्ही धर्मांतर का करू नये ? मी धर्मांतर का करावे याची कारणे माझ्या आयुष्यामध्ये घडलेल्या अनेक प्रसंगावरून तुम्हाला सहज समजू शकतील. माझ्याप्रमाणेच तुमच्याही आयुष्यामध्यें अशा प्रकारचे प्रसंग उद्भवले असतील. ज्या कारणांमुळे मला धर्मांतर करावे असे वाटते ती कारणे सिद्ध करून देण्याकरिता माझ्या आयुष्यामध्ये ज्या काही चार-पाच गोष्टींचा माझ्या मनावर कायमचा ठसा उमटला आहे त्यापैकी दोन-तीन गोष्टी मी आपणाला आजच्या प्रसंगी सांगणार आहे.


माझा जन्म मु. महु (इंदोर) येथे माझे वडील फलटणीत असताना झाला. त्यावेळी माझें वडील फलटणीत सुभेदार होते. आम्ही फलटणीतच राहात असल्यामुळे आम्हाला बाहेरच्या जगाचा संपर्क झाला नव्हता. त्यामुळे अस्पृश्यतेसंबंधी कोणत्याही प्रकारची कल्पना मला नव्हती. परंतु जेव्हा माझ्या वडिलांनी पेन्शन घेतले तेव्हा आम्ही सर्वजण सातार्‍यास येऊन राहिलो. माझी आई मी अवघा पाच वर्षाचा असताना निवर्तली. सातारा जिल्ह्यात गोरेगावी दुष्काळ पडला होता. म्हणून दुष्काळी कामे सरकारने काढली. यावेळी एक पाण्याचा तलाव सुरू करण्यात आला होता. या तलावाचे काम करणार्‍या मजुरांना पगार वाटण्याच्या कामावर माझ्या वडिलांची नेमणूक झाली. ते गोरेगावी गेले व आम्हा चार मुलांना सातार्‍यास ठेविले. जवळ जवळ चार-पाच वर्षे आम्ही सातार्‍यास काढली. आम्ही सातार्‍यास आल्यापासून आम्हाला खर्‍या अस्पृश्यतेची जाणीव होऊ लागली. प्रथम आमचे केस कापण्यास आम्हाला न्हावी मिळेना. आमची मोठी पंचाईत झाली. मग माझी वडिल बहिण (ती अजून जिवंत आहे) ती आम्हा चार मुलांच्या हजामती ओटयावर बसून करीत असे सातार्‍यास इतके न्हावी असूनही ते आमची हजामत का करीत नाहीत हे मला प्रथमच कळले.

दुसरा एक प्रसंग असा घडला की, आमचे वडिल गोरेगाव येथे असताना ते आम्हाला पत्र पाठवीत असत त्यांनी आम्हाला एकदा 'गोरेगावला या' असे पत्र पाठविले होते. गोरेगावला आम्ही आगगाडीत बसून जाणार म्हणून मला फार आनंद झाला होता. तोपर्यंत मी आगगाडी पाहिली नव्हती वडिलांनी पाठविलेल्या पैशाचे आम्ही चांगले कपडे केले व मी, माझा भाऊ आणि बहिणीच्या मुली इतकेजण वडिलांना भेटावयास निघालो. त्यापूर्वी त्यांना पत्र लिहिले होते. परंतु ते पण नोकराच्या हलगर्जीपणामुळे त्यांना मिळाले नाही. आणि त्यामुळे आम्ही गोरेगावी केव्हा येणार हे त्यांना कळले नाही. आम्ही मात्र वडिल आम्हाला नेण्याकरिता नोकर वगैरे पाठवतील या आनंदात होतो परंतु या बाबतीत आमचा निराशा झाली. आम्ही आगगाडीतून उतरताच नोकराची वाट पाहिली. माझा पोशाख ब्राह्मणासारखा दिसत होता. गाडी येऊन निघून गेली. आम्ही अर्धा पाऊणतास स्टेशनवर वाट पाहात राहिलो. स्टेशनवर आम्हाशिवाय कुणीच राहिले नाही. तशात आम्ही सर्वजण मुले पाहून स्टेशनमास्तर आमच्याजवळ येऊन आम्हास कुठे जायचे, तुम्ही कोण वगैरे विचारू लागला आम्ही 'महार' असे म्हणताच स्टेशन मास्तरला धक्का बसल्यासारखा झाला. तो दचकून पाच-सहा कदम मागे हटून गेला. तरीपण आमच्या पोषाखावरून आम्ही कोणीतरी सुखवस्तु महाराची मुले आहोत, हे त्यांनी जाणले व आम्हाला गाडी करून देण्याचे ठरविले. परंतु संध्याकाळी सहा-सात वाजेपर्यंत एकही गाडीवान आम्हाला आम्ही महाराची मुले म्हणून–घेऊन जायला तयार होईना. शेवटी एक गाडीवान तयार झाला. परंतु त्याने अशी अट घातली की आपण काही गाडी चालविणार नाही. मी फलटणीत दिवस काढल्यामुळे मला गाडी हाकणे कठीण वाटले नाही. आम्ही कबूली देताच गाडीवान गाडी घेऊन आला व आम्ही गोरेगावच्या मार्गाला लागलो. गावाच्या बाहेर बरेच दूर गेल्यावर आम्हाला एक नाला लागला. 'येथेच तुम्ही भाकरी खाऊन घ्या पुढे तुम्हाला पाणी प्यायला मिळणार नाही' असे गाडीवानाने सांगितले. आम्ही खाली उतरलो. भाकरी खाल्ल्या. नाल्याचे पाणी इतके अस्वच्छ होते की त्यात बऱ्याच प्रमाणात शेणाचे मिश्रण होते. गाडीवान तेवढ्यात कुठेतरी भाकरी खाऊन आला पुन्हा आमची गाडी चालू झाली रात्र बरीच झाली तेव्हा गाडीवान हळूच गाडीत येऊन बसला. रस्त्यावर दिवा नाही माणूस तर कोणी दिसेना. आम्हाला रडू कोसळले अशा रीतीने आम्ही रात्री बारा वाजेपर्यंत वेळ काढली. मनात तर्ककुतर्क चालू होतेच आपण काही गोरेगावास जात नाही, असे वाटले. इतक्यात एका टोलनाक्यावर आमची गाडी येताच आम्ही गाडीतून उड्याच घेतल्या, भाकरी खाण्याकरिता टोल नाक्यावरील मनुष्यास विचारले. मला पर्शियन भाषा चांगली येत असल्यामुळे त्या मनुष्याशी बोलण्यास अडचण पडली नाही. परंतु त्याने मला उर्मटपणाने उत्तर देऊन

पाण्यासाठी समोरचा डोंगर दाखविला. शेवटी कशीतरी ती रात्र टोल नाक्यावर काढली. सकाळी पुन्हा गाडी चालू केली व शेवटी दुपारी अर्धमेल्या अवस्थेत गोरेगावी येऊन पोहचलो.

माझ्या आयुष्यातील तिसरा प्रसंग म्हटला म्हणजे बडोदे सरकारची नोकरी. बडोदे सरकारच्या स्कॉलरशिपा मिळाल्यावर मी विलायतेला जाऊन उच्च शिक्षण घेतले. तेथून परत आल्यावर स्कॉलरशिपच्या अटीप्रमाणे मला बडोदे संस्थानात नोकरी करणे भाग होते. बडोद्यात मला राहावयास एकही घर मिळेना. हिंदू किंवा मुसलमान कोणीच राहावयास जागा देईना. शेवटी एका पारशी धर्मशाळेत पार्शी म्हणून राहण्याचे ठरविले विलायतेहून परत आल्यावर मी दिसायला रुबाबदार व गोरा दिसत होतो. शेवटी मी एदलजी सोराबजी असे पार्शी नाव धारण करून राहिलो. रोजी दोन रुपये घेऊन राहावयास जागा देण्याचे धर्मशाळेच्या रखवालदाराने कबूल केले. यापूर्वीच श्रीमंत महाराज सरकारने बडोद्यास एक शिकलेले महाराचे पोर आणले आहे, ही कुणकुण लोकांना कळली होती. माझे पार्शी म्हणून धर्मशाळेत गुप्तपणे राहणे वगैरे गोष्टी लोकांना शंका येण्यास कारणीभूत होऊन माझ्या गुप्तपणाचा स्फोट झाला. धर्मशाळेत राहणारा मीच तो महार हे तेथील पार्शी लोकांना कळले. दुसरे दिवशी मी जेवण वगैरे करून ऑफिसला जाण्याकरिता निघालो असताना पंधरा-वीस पार्शी हातात काठ्या घेऊन मला ठार करण्याकरिता तेथे आले. त्यांनी प्रथम 'तू कोण आहेस ?' असे विचारले मी फक्त 'हिंदू' आहे, असे उत्तर दिले. परंतु त्यांचे या उत्तराने समाधान झाले नाही. त्यांनी हमरीतुमरीवर येऊन जागा ताबडतोब सोडण्यास सांगितले. त्यावेळी माझ्या मनोधैर्याचे मला विलक्षण पाठबळ मिळाले. मी त्यांच्या जवळ निर्भयपणे आठ तासांची मुदत मागितली; व ती त्यांनी दिली. मी संबंध दिवस राहावयास जागा मिळविण्याचा कसून प्रयत्न केला. परंतु मला कुठेच जागा मिळेना. कित्येक मित्रांकडे गेलो त्यांनी निरनिराळी कारणे सांगून मला वाटेला लावले, मी शेवटी इतका कंटाळलो की आता पुढे काय करावे हेच मला कळेना. मी एका ठिकाणी खाली बसलो. माझे मन उद्विग्न बनले व डोळ्यातून सारखा अश्रूप्रवाह वाहू लागला. (यावेळी डॉ. बाबासाहेबांच्या डोळ्यातून नकळत अश्रू वाहू लागले. अस्पृश्यतेच्या भडाग्नीने त्यांचे अंतःकरण होरपळून गेलेले दिसत होते.) शेवटी अगदीच नाइलाज झाल्यावर मला बडोद्याची नोकरी सोडून रात्रीच्याच गाडीने मुंबईस यावे लागले. माझ्यावरील प्रसंगाप्रमाणे तुमच्यावरही असले अनेक प्रसंग येऊन गेले असतील, म्हणून म्हणतो की ज्या समाजात माणुसकी नाही, नीतीला थारा नाही त्या समाजात निष्कारण मानहानी भोगीत जीवन कंठण्यात काय अर्थ ! जो असल्या निर्दय धर्मात राहील तो गुलाम आहे. ज्याला माणुसकी पाहिजे तो या सैतानी धर्मात राहणार नाही.

माझे वाड–वडील या हिंदू धर्मात राहिले परंतु त्यांना हिंदु धर्माच्या नियमाप्रमाणे शिक्षण घेता आले नाही. त्यांना शस्त्र हातात धरण्याची धर्माने परवानगी नव्हती. मुबलक संपत्ती मिळविणे धर्माच्या नियमाप्रमाणे त्यांना अशक्य होते. यामुळे आमच्या वाडवडिलांना या तिन्ही गोष्टी संपादन करता आल्या नाहीत. मला उच्च शिक्षण घेताना संस्कृत भाषा शिकावयाची होती. परंतु ती गोष्ट मला धर्म बंधनामुळे त्यावेळी शक्य झाली नाही. परंतु आता विद्या शिकणे संपत्ती मिळविणे व शस्त्र हाती धरणे शक्य झाले आहे. अशा परिस्थितीत ज्या धर्माने तुमच्या पूर्वजांना गुलामगिरीत खितपत ठेवले, कोणत्याही परिस्थितीचा उपयोग करू न देता तुम्हाला अज्ञानात व दारिद्र्यात राहावयास भाग पाडले त्या हिंदू-धर्माची तुम्ही का पर्वा बाळगता ? वाडवडिलांप्रमाणेच त्या हतबल, स्वाभिमानशून्य परिस्थितीचीच पाऊलवाट तुम्हाला आक्रमण करावयाची असल्यास तुम्हाला कुणी विचारणार नाही. तुमची कोणीही पर्वा बाळगणार नाही धर्मांतराच्या प्रश्नाचे आज महत्त्व आहे ते याचमुळे. हिंदु–धर्मात राहिल्याने तुम्हाला गुलामापेक्षा श्रेष्ठ दर्जा प्राप्त होणार नाही. मी जरी अस्पृश्य राहिलो तरी हिंदू-समजातील एखादी व्यक्ती जे करू शकेल ते मला सहज करता येईल माझ्या हिताहिताचा प्रश्न हिंदू धर्मात राहिल्याने किंवा न राहिल्याने सुटणार नाही, असे नाही. मी आजच्या परिस्थितीत हायकोर्टाचा जज्ज होऊ शकेन; कायदे कौन्सिलमध्ये मिनिस्टरचीसुद्धा जागा मिळवू शकेन. परंतु केवळ तुमच्या माणूसकीकरता मला धर्मांतर करणे अगदी आवश्यक झाले आहे आपल्या मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस प्राप्त होण्यासाठीच मला धर्मांतराची आवश्यकता भासत आहे. तुमची स्थिती सुधारण्यासाठी माझ्याकडून व सहकारी मित्रांकडून अवश्य साहाय्य मिळेल, अशी मला खात्री वाटते. तुम्हाला कर्तबगार बनविण्यासाठी मला धर्मान्तर करावयाचे आहे माझ्या हिताच्या प्रश्नाबद्दल मी अगदी बेफिकीर आहे. आज जे मी कार्य करीत आहे ते सर्व तुमच्या हितासाठी करीत आहे. मला तुम्ही ईश्वर मानता. परंतु मी ईश्वर नाही; मी तुमच्यासारखाच एक माणूस आहे. माझ्यापासून तुम्हाला जी काही मदत पाहिजे आहे ती मी द्यायला तयार आहे. तुम्हाला तुमच्या आजच्या वाईट स्थितीतून मुक्त करण्याचे मी ठरविले आहे माझ्यासाठी मी काही करीत नाही, तुम्हाला कर्तबगार बनता येईल इतके कसोशीचे प्रयत्न मात्र मी करीत राहणार. तुम्ही आपल्या जबाबदारीची जाणीव करून घ्या व मी जो मार्ग दाखवीन तो अनुसरा. म्हणजे तुमचे हित–तुमची कर्तबगारी उदयास आल्याशिवाय राहणार नाही.


3291
२५०६२
२८।१२।६८

१२. अस्पृश्य समाज व निवडणुकी

(दि. १–६–३६ रोजी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकीय परिषदेपुढे केलेले भाषण. जनता, दि. ४–७–१९३६ अग्रलेख)

मी कालच धर्मान्तरासंबंधी भाषण करताना सामाजिक सुधारणा आधी की राजकीय सुधारणा आधी या विषयाचा बराच उहापोह केलेला आहे. मनुष्यमात्राच्या आणि समाजाच्या प्रगतीला अनेक साधनांचा उपयोग करावा लागतो. अमुक एक गोष्ट आधी की अमुक एक मागाहून हा वाद शुष्क आहे अस्पृश्यांना धर्मान्तराची जितका आवश्यकता आहे तितकीच राजकारणाची आवश्यकता आहे, असे मी म्हणू शकेन. ज्याप्रमाणे धर्मांतरासंबंधी आपले मत काय आहे, हे जसे काल आपण अजमावून पाहिले तसे राजकारणासंबंधी आपले मत अजमावून पाहणे अत्यंत अवश्य आहे. आपण एके ठिकाणी बसून राजकीय विषयावर चर्चा करावी असे मला बरेच दिवसांपासून वाटत होते. परंतु तशा प्रकारची संधी आजपर्यंत प्राप्त झाली नव्हती ती आज प्राप्त झाली याबद्दल मला मोठे समाधान वाटते राजकारणाचा विषय हा काही सोपा विषय नाही. तरी तुम्हा सर्वांना हा विषय समजावा म्हणून मी आपणाला माझे विचार सोप्या भाषेत सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

आपल्यापैकी जे कोणी जनता–पत्र किंवा इतर वृत्तपत्रे वाचीत असतील त्यांना माहीत असेलच की पुढच्या सालच्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस हिंदुस्थान देशात नवीन सुधारणा येणार आहेत. या सुधारणासंबंधाने आपले धोरण कोणत्या प्रकारचे असावे व त्या सुधारणांचा उपयोग करून घेण्याकरिता आपणास कोणत्या प्रकारची संघटना केली पाहिजे, हे ठरविणे आवश्यक आहे.

या राजकीय सुधारणासंबंधी हिंदुस्थानातील लोकांचे काय मत असेल ते असो. या राजघटनेने हिंदुस्थान देशाची स्थिती बरी किंवा वाईट होणार हे पाहण्याचे आपणास प्रयोजन नाही. या ज्या राजकीय सुधारणा अंमलात यावयाच्या आहेत त्या केवळ अपुऱ्या असल्यामुळे त्या फेटाळून लावल्या पाहिजेत अशा प्रकारची घोषणा काँग्रेस व इतर पक्ष करीत आहेत. ज्या लोकांकडून या सुधारणा राबवून घेऊ नयेत असे सांगण्यात येते त्यांच्याशी मला कर्तव्य नाही. प्रचलित राज्यव्यवस्थेपेक्षा या नवीन राजकीय सुधारणा वाईट आहेत, असे काही लोकांचे म्हणणे आहे. या मतासबंधी मला इतकेच सांगावयाचे आहे की या नवीन राजकीय

सुधारणान्वये देशाचे अपरिमित कल्याण घडून येणार नाही, हे जरी खरे असले तरी त्या राबविल्या असता मुळीच प्रगती होणार नाही, असे माझ्याने म्हणवत नाही. त्या राजकीय सुधारणा अपुऱ्या आहेत, असे म्हणणारांचा मुद्दा मला मान्य आहे; पण त्या राजकीय परिस्थितीशी ताडून पाहता नव्या सुधारणामुळे पीछेहाट झाली आहे, हे मला मान्य नाही जे लोक असे म्हणतात त्यांनी राजकारणाचा अभ्यास केला नाही, असे नाही. पण त्यांच्यासारखाच मीही राजकारणाचा थोडासा अभ्यास केला आहे.

या नवीन राज्यघटनेने देशाची पीछेहाट झाली आहे, असे काही लोक म्हणतात, त्यांचेही म्हणणे मला मान्य नाही. इतकेच नव्हे तर उलटपक्षी त्या राजकीय सुधारणा जरी अपुऱ्या असल्या तरी त्यामुळे हल्लीच्यापेक्षा पुष्कळच चांगले होणार आहे, असे माझे प्रामाणिक मत आहे.

या राजकीय सुधारणा स्वीकारू नयेत-त्याचा उपयोग करू नये, असे जे लोक म्हणतात त्या लोकांना असा प्रश्न विचारणे प्राप्त आहे की जर तुम्हाला सुधारणा नको, आणि तुम्हाला पूर्ण स्वातंत्र्यच पाहिजे तर स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यायला तुमच्याजवळ काय साधन आहे ? पूर्ण स्वातंत्र्य मिळवावयाचे असेल तर इंग्रज सरकारबरोबर सैन्य व सामुग्री जमवून, ज्याप्रमाणे आयरिश लोकांनी बंड केले तसे बंड केले पाहिजे. पण ही गोष्ट हिंदुस्थानच्या लोकांना शक्य आहे काय ? ब्रिटिश साम्राज्य किती अफाट व मोठे आहे-त्याची युद्ध-सामुग्री किती प्रचंड आहे हे मी इंग्लंडमध्ये राऊंड-टेबल कॉन्फरन्सला गेलो असताना पाहिले आहे.

ज्या लोकांना सुधारणा नकोत-स्वातंत्र्य पाहिजे त्यांना पक्के माहीत आहे की इंग्रज सरकारबरोबर लढाई करण्याकरिता अवश्य अशी साधन-सामुग्री मिळविणे अशक्य आहे या कारणाने म्हणा किंवा विश्वास आहे म्हणून म्हणा या स्वातंत्र्यासाठी लोकांचा मार्ग अनत्याचाराचा मार्ग आहे. तो मार्ग म्हणजे असहकार व कायदेभंग. हा मार्ग किती परिणामकारी आहे याचा अनुभव नुकताच सर्वांना येऊन चुकला आहे. वाऱ्याने जसे झाड हलते तसे इंग्रज सरकार हलले; पण ते काही उलथून पडले नाही हा असहकाराचा एकच एक काँग्रेसने शोधून काढलेला मार्ग स्वातंत्र्यासाठी अपुरा पडला. आता पुन्हा त्याच मार्गाचा अवलंब करण्यात काय हंशील आहे ते मला समजत नाही. माझ्या मते तर हा असहकाराचा मार्ग फार विघातक आहे. तो साधला नाही तर त्यामुळे नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही.

याप्रसंगी मला इंग्लंडच्या इतिहासातील एका गोष्टीची आठवण होते. फ्रांस देशामध्ये राज्यक्रांती सुरू असता इकडे इंग्लंड देशात लोकांना राजकीय हक्क प्राप्त व्हावेत म्हणून जोराची चळवळ सुरू झाली होती. हे राजकीय हक्क

मिळविण्याच्या बाबतीत जे लोक इंग्लंडच्या पार्लमेंटबरोबर लढत होते त्यात चार्लस जेम्स हा जहाल गणल्या गेलेल्या राजकीय पक्षाचा पुढारी होता. या पक्षाने नागरिकांना माणसागणिक मतदानाचा हक्क मिळवून देण्यासाठी जोराचा प्रयत्न केला. त्यावेळी पार्लमेंटम ये धनिक लोकाचे प्राबल्य होते. त्या धनिक लोकांच्या पार्लमेंटबरोबर चार्लस जेम्स फॉक्स हा व त्याचे अनुयायी निकराने भांडत असत परंतु त्यांना त्यात अपयश आले. शेवटी अखेरचा उपाय म्हणून त्याने व त्याच्या पक्षाने पार्लमेंटबरोबर असहकार केला. हिंदुस्थानात ज्याप्रमाणे महात्मा गांधींची नॉनकोऑपरेशनची चळवळ चालली होती त्याप्रमाणे इंग्लंडमध्ये ही असहकारतेची चळवळ त्यावेळी जोरात होती. या जहाल पक्षाची अधिष्ठात्री लेडी पार्टलॅन्ड या नावाची एक बाई होती. या बाईला जेव्हा चार्लस जेम्स फॉक्स याने पार्लमेंटमधून वॉकआऊट केले असे समजले तेव्हा तिने आपल्या घरी त्यास चहापार्टीस बोलाविले. जेव्हा फॉक्स व त्याची सहकारी मंडळी या बाईच्या घरी आली तेव्हा ते आपापसात आपल्या असहकारीतेची प्रौढी मिरवू लागले. त्या बाईने त्यांना सवाल केला, तो फार महत्वाचा असल्यामुळे तो मी आपणाला सांगत आहे. ती बाई म्हणाली : " मि. फॉक्स जर तुमच्या असहकारितेमुळे तुमचा शत्रू चीत होत असेल तर तुमचा असहकारितेचा मार्ग ठीक आहे. पण तसे जर नसेल तर या असहकारात काही अर्थ नाही. तुम्ही प्रतिपक्षाशी दोन हात करण्याचे सोडून अपयश आले म्हणून रडतरावाप्रमाणे रडत बसला आणि भागूबाईप्रमाणे रणमैदान सोडून पळून गेलात तर आपला शत्रू आपल्यावर विजय मिळविल्या. शिवाय खचित राहणार नाही, आणि म्हणून रणांगणामधून निघून जाणे हे शुद्ध मूर्खपणाचे आहे. " ही टीका काँग्रेसच्या लोकांना लागू पडते, असे मला वाटते.

आपल्याला मिळालेल्या राजकीय सुधारणा जरी अपुऱ्या असल्या तरी त्या राबवून घेऊन झिडकारून न देता त्याच्याच जोरावर आणखी आपल्याला पुष्कळ प्राप्त करून घेता येईल. या मिळालेल्या राजकीय सुधारणांन्वये आपल्याला पुष्कळशा गोष्टी करून घेता येतील. कोणतीही गोष्ट कायदा झाल्याशिवाय घडून येत नाही. म्हणून त्याच्याकरिता कायदाच झाला पाहिजे. निदान अस्पृश्य समाजाचे भवितव्य मुख्यतः कायद्यावर अवलंबून राहणार आहे. आणि म्हणून तुम्हाला या राजकीय सुधारणा स्वीकारणे आवश्यक आहे.

आपली सामाजिक सुधारणा कायदे करून होणार नाही. परंतु आपली आर्थिक, शैक्षणिक व औद्योगिक उन्नती कायद्याने करून घेता येईल. त्यांच्यावरच तुम्हाला अवलंबून राहिले पाहिजे. आपल्या उन्नतीचे कायदे कसे घडून येतील हे आपण कायदेमंडळात ज्या लायकीचे सभासद निवडून देणार आहोत त्यांच्यावर अवलंबून राहणार आहे. आपण जे प्रतिनिधी निवडून देऊ ते आपल्या समाजहिताला जागणारे आहेत किंवा नाहीत, हे पाहिले पाहिजे, जे आपल्या समाजहिताच्या

दृष्टीने कायदेमंडळात कायदे घडवून आणतील अशाच लोकांना तुम्ही निवडून द्या. आतापर्यंत आपल्याला इंग्रज सरकारकडे दाद मागावी लागत असे; पण या नव्या राज्यघटनेनुरुप इंग्रज सरकारचे हातात काही राहिले नाही.

तुम्ही जे प्रतिनिधी कायदे-कौन्सिलात पाठवाल त्यांच्यावरच तुम्हाला अवलंबून राहिले पाहिजे. तुम्हाला ज्या काही अडचणी भासतील त्या नाहीशा करण्याकरिता त्यांना तुम्ही भाग पाडले पाहिजे नुसते प्रतिनिधी कायदे-कौन्सिलात पाठवून तुमचे काम भागणार नाही. निवडून आल्यानंतर ते काय करतात यावर-देखील तुम्ही नजर ठेवली पाहिजे. मी तुम्हाला पुन्हा पुन्हा सांगतो की तुम्ही जो मनुष्य कायदे मंडळात निवडून द्याल तो लायक असला पाहिजे तुम्ही भोळे लोक आहात. एक म्हणेल : हा माझ्या गावचा येशा महार, दुसरा म्हणेल : हा माझ्या गावचा रामा महार, तिसरा म्हणेल माझा शंकर महार निवडून आला पाहिजे. असा अभिमान तुम्हाला का असावा ? कायदे मंडळात तुमचे हित कोण करू शकेल हेच तुम्ही मुख्यतः पाहिले पाहिजे. विनाकारण गावचा, तालुक्याचा, जिल्ह्याचा अभिमान धरून बसू नका.

जर तुम्ही उमेदवार निवडून देते वेळी दक्षता बाळगली नाही तर तुमच्या सर्व कार्याचाच नाश होणार आहे. दुसरी गोष्ट मला आपणास सांगितली पाहिजे ती ही की एकटा मनुष्य कायदे-मंडळात काही करू शकत नाही. मी १९२६ सालापासून मुंबई कायदे-मंडळात आहे. मला थोडेबहुत ज्ञानही आहे पण समाजहिताच्या दृष्टीने मला कोणतेच कार्य करता आले नाही. याचे कारण आम्ही दोन माणसे-मी व डॉ. सोळंकी असे-कायदे मंडळात आहोत. एकटा-दुकटा मनुष्य कायदे मंडळात काही करू शकत नाही एकजुटीने-संघटितपणाने तुम्ही निवडून दिलेले प्रतिनिधी वागतात किंवा नाही हे पाहणे तुमचे कर्तव्य आहे पक्षाला न धरून वागणाऱ्या माणसाला निवडून दिल्यास काही हित होणार नाही. नुसता हुशार आहे एवढे बघून चालणार नाही. त्याला पक्ष आहे किंवा नाही हेही तुम्ही पाहिले पाहिजे.

आपल्या सुदैवाने आपणाला पंधरा जागा प्राप्त झाल्या आहेत. परंतु ज्या पंधरा जागा आपणाला मिळाल्या आहेत ते पंधरा प्रतिनिधी एकजुटीने राहिले नाहीत तर त्या जागांचा दुरुपयोग झाल्यासारखेच होईल. म्हणून आपण निवडून दिलेले सभासद कायदे-मडळात एकजुटीने कसे राहतील याबद्दल आपणाला योजना तयार करावयास पाहिजे आणि ती योजना अशा प्रकारची असली पाहिजे की जेणेकरून हे पंधरा सभासद पाच वर्षे एक दिलाने कायदे-कौन्सिलात राहून आपल्या समाज हिताकडे दुर्लक्ष करणार नाहीत. ज्या ज्या जिल्ह्यात आपल्या-करिता जागा राखल्या आहेत त्या त्या जिल्ह्यात दहा लोकांची एक कमिटी

स्थापण्यात यावी अशा निरनिराळ्या जिल्ह्यात कमिट्या स्थापून झाल्या म्हणजे या सर्व लोकांमधून जे जे लोक लायक असतील त्या सर्वांचे एक मध्यवर्ती मंडळ स्थापण्यात यावे व या मध्यवर्ती मंडळातर्फे सर्व जिल्ह्यातील प्रतिनिधींची निवड करण्यात येईल. ज्या कोणा उमेदवारास निवडणुकीला उभे राहावयाचे असेल त्याने आपल्या उमेदवारीचा अर्ज स्थानिक कमिट्यांकडे करावा; व तो अर्ज त्यांच्या शिफारसीसह मध्यवर्ती मंडळाकडे आल्यावर त्या अर्जाचा विचार करून कोणीतरी एक उमेदवार मुकर केला जाईल. ही योजना सफलित व्हावयाची असेल तर तुमच्या संघटनेशिवाय आणि सहकार्याशिवाय काहीच होणे शक्य नाही. तुम्ही जर असा निश्चय केला की आमच्या बोर्डाने जो उमेदवार नेमून दिला आहे त्यालाच आम्ही मते देऊ तर आपल्याला ज्या पंधरा जागा मिळाल्या आहेत त्यापेक्षाही जास्त उमेदवार आपण निवडू शकू. मध्यवर्ती–मंडळ ज्या उमेदवाराला निवडून देईल त्या उमेदवाराने आपल्या पक्षाच्या सर्व अटी पाळल्या पाहिजेत. या अटी कोणत्या असाव्यात त्या मी टरविल्या आहेत. त्या मी मागाहून जाहीर करीन.

आपल्याला राजकारणामध्ये अत्यंत महत्त्वाचा डाव खेळता येईल. दिसायला जागा पंधरा असल्या तरीसुद्धा जर आपण एकसूत्राने वागलो तर माझी खात्री आहे की निवडणुकीच्या वेळी आपल्याला पंधराऐवजी पंचेचाळीस सभासद सहज निवडून आणता येतील इतकी संधी तुम्हाला सध्या प्राप्त झाली आहे.

जी राजकीय सत्ता तुम्हाला प्राप्त झालेली आहे त्याची कल्पना जरी तुम्हाला नसली तरी वरिष्ठ वर्ग ती जाणून आहे. आणि म्हणून ते तुमच्या दाढीला हात लावण्यास कमी करणार नाहीत. त्यात आपले हित पाहणारे कोण याचा विचार करून जर आपण आपली मते दिली तर वरिष्ठ वर्गाचे काही लोक जे आपल्याकरिता झटतात त्यांना निवडणुकीत आपल्याला मदत करता येईल. अशा रीतीने आपला गट मोठा होऊ शकेल. अस्पृश्यात अनेक जातींचा समावेश होतो. अस्पृश्य समाजात महार जात ही वडील बंधूप्रमाणे आहे. म्हणून सर्व जातीशी त्यांनी बंधुभावाने, आपुलकीने, समतेने वागले पाहिजे. त्यांच्याशी सहकार्य करण्याचे आपण औदार्य दाखविले पाहिजे. सर्वच जागा तुम्हीच बळकावून बसू नका. तुमच्या स्वार्थाकरिता तरी तुम्ही इतरांना या पंधरा जागात भागीदार केले पाहिजे. ही शिस्त पाळण्यास तुम्ही तयार आहात का ? तुम्ही जर तयार असाल तरच मी राजकारणात पडणार आहे. तुम्ही शिस्त पाळणार नसाल तर मला राजकारणाची काही हौस नाही, हे मला आपणास स्पष्टपणे सांगणे भाग आहे.

— o —

१३. नीतिने आयुष्यक्रम कंठता येत नसेल तर ऐश्वर्य नको

(देवदासी, वाघ्या, मुरळ्या इत्यादी देवाला वाहिलेल्या लोकांची दिनांक १६ जून १९३६ रोज सभा झाली. त्या प्रसंगी दिलेले भाषण. जनता, दिनांक ४ जुलै १९३६.)

आजच्या सभेचे महत्त्व नुकत्याच भरलेल्या महार परिषदेपेक्षा मला शतपटीने अधिक वाटते. समाजात जो भाग अत्यंत हीन किंवा टाकाऊ गणला जातो, असा तुमचा समाज आहे. धर्माच्या नावाखाली अनैतिक रीतीने आपला निर्वाह करणाऱ्या अशा तुम्ही स्त्रिया आहात. ज्यांचा स्वाभिमान लुप्त झालेला आहे, देह-विक्रय करून पोट भरणे हेच ज्यांचे जीवित सर्वस्व आहे, अशा वर्गाने जगात काय चाललेले आहे हे समजून घेण्याची जिज्ञासा दाखवावी व आपला चरित्रक्रम सुधारण्याची तयारी करावी ही गोष्ट खरोखर तुम्हास भूषणावह आहे. आणि म्हणूनच महार परिषदेत २५००० लोक समुदाय जमला याचे मला महत्व वाटत नाही. पण आज तुम्ही जरी ४००-५०० येथे जमला आहात तरी त्याचे मला अधिक महत्व वाटत आहे. आजच्या तुमच्या या सभेबद्दल मी तुम्हाला धन्यवाद देतो.

एवढ्या प्रस्तावानंतर मी मुख्य विषयाकडे वळतो. आज मुंबई शहरात महार समाजाला कोठे लज्जेने मान खाली घालावी लागत असेल तर तुमच्या कामाठीपुऱ्यातून जाताना आपल्या भगिनी त्या ठिकाणी इतर समाजाकडून आपली कशी विटंबना करून घेत आहेत हे चित्र डोळ्यासमोर उभे राहिल्याबरोबर प्रत्येक महाराला खेद वाटल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही आज महार समाजाबरोबर धर्मांतर करण्याची तयारी दाखविलेली आहे. परंतु या तुमच्या निश्चयाने माझ्या अनुयायांची संख्या वाढली म्हणून मला आनंद वाटत नाही किंवा माझ्या धर्मांतराच्या घोषणेस अधिकाधिक पाठिंबा मिळत आहे म्हणूनही मला समाधान वाटत नाही. आमच्या धर्मांतराचा अर्थ नीट लक्षात घ्या. आम्ही धर्मांतर करीत आहोत ते या दुर्गंधीच्या वातावरणातून बाहेर पडण्याकरिता

करीत आहोत. समतेचे, बंधुत्वाचे व स्वाभिमानाचे आदर्श जीवित लाभून आपला आयुष्यक्रम उज्वल व्हावा या दृष्टीने आम्ही धर्मांतरास तयार झालो आहोत. तुम्हाला जर आमच्याबरोबर यावयाचे असेल तर तुम्ही प्रथम हा आपला दुर्गंधित आयुष्यक्रम अजिबात सोडून दिला पाहिजे तुमच्या मलीन वृत्तीचा तुम्ही त्याग केला पाहिजे. हे करण्यास तुम्ही तयार असाल तर तुम्ही आमचे-बरोबर या नाहीतर तुम्ही आमचेबरोबर येऊ नका. वाटल्यास तुम्ही आहात त्याच ठिकाणी राहा. तुम्ही मुसलमान व्हा किंवा ख्रिश्चन व्हा, आमची त्यास हरकत नाही परंतु जर आमचेबरोबर तुम्हाम यावयाचे असेल तर तुम्ही काया, वाचा व मन याची शुद्धी करून व या त्रिशुद्धीने शुचिर्भूत होऊनच तुम्हाला आमचे बरोबर येता येईल. नाहीतर मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की तुम्हाला आमचे बरोबर येता येणार नाही.

आणि जर तुम्ही आपला आयुष्यक्रम पूर्ववत चालू ठेवून महार जातीस बट्टा लावण्याचे कार्य सोडणार नाही तर मी तुम्हास बजावून सांगतो की हजारो तरुण स्वयंसेवक तयार करून मी तुमचा कामाठीपुऱ्यातून उठाव करीन.

तुम्हाला समजले पाहिजे की स्त्रीजात समाजाचा अलकार आहे. प्रत्येक समाज स्त्रियांच्या चारित्र्याला अधिक मान देतो. आपली गृहिणी होणारी स्त्री उत्तम कुलातील असावी अशी प्रत्येकजण अपेक्षा करतो. कारण त्याला माहीत असते की आपला, आपल्या मुलाबाळांचा, आपल्या कुटुंबाचा व कुळाचा नाव-लौकिक स्त्रियांच्या शीलावर अवलंबून आहे. परंतु तुमच्या कामाठीपुऱ्यातील चरित्रक्रम पाहिला तर समाजाला व स्त्री जातीला काळीमा फासण्यासारखा आहे. म्हणून तुम्हा स्त्रियांचे समाजात काय स्थान आहे, हे जाणून आपल्या मलीन आयुष्यक्रमाचा त्याग केला पाहिजे; व आपला स्वतःचा आणि जातीचा दर्जा व नावलौकिक वाढविला पाहिजे. तुम्ही कदाचित असा प्रश्न कराल की हा धंदा आमच्या उपजिविकेचे साधन आहे. इतकेच नव्हे तर या धंद्यामुळेच आज आम्हाला कशाची ददाद नाही–आमचे आयुष्य सुखाने चालू आहे. आम्हाला यात नोकर-चाकर वगैरे सुखसोयी आहेत असा ऐषआरामाचा व थाटाचा चरित्रक्रम सोडून आम्ही काय करावे ? ज्यावेळेस मी तुम्हास हे लाजिरवाणे जिणे सोडण्यास सांगतो त्यावेळेस असेही निक्षून सांगतो की तुम्हास उपजिविकेची साधने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मी घेणार नाही. आज हजारो स्त्रिया गरीब नवऱ्याशी लग्न लावून त्यांच्या सहवासात अठराविश्वे दारिद्र्यात दिवस कंठीत आहेत. त्यांना पोट भरण्याकरिता हरएक तऱ्हेचे कष्ट करावे लागतात. हजारो स्त्रिया गिरण्या, कारखाने यात नोकऱ्या करून संसारातील इतर हालअपेष्टा सोसून आपल्या मुलाबाळात गरीबीने अर्धपोटीही राहतात परंतु त्या तुमच्या धंद्यात सुख लाभते म्हणून त्यात शिरत नाहीत. त्या तसे का करीत नाहीत ? दु.ख का सहन करतात, याचा तुम्ही विचार करा. महाभारतातील कथा तुम्ही

ऐकल्या आहेत. ज्यावेळी पांडव द्युतात हरले त्यावेळी ते बलकले व मृगचर्म धारण करून वनवासास जाण्यास निघाले. तशीच वस्त्रे परिधान करून द्रौपदीदेखील त्यांच्याबरोबर होती. वाटेत, कौरवांपैकी दुर्योधनाने तिला म्हटले; " दौपदी, या मूर्ख नवऱ्याबरोबर सहवास करून तू आपले हाल का करून घेतेस ? तुझ्या सुकुमार देहाला का कष्ट देतेस ? तू मजबरोबर राहा. मी तुला पूर्ण ऐश्वर्यात ठेवीन व तुला काडीचेही दुःख होणार नाही. " पण त्या वेळेस मानी साध्वी द्रौपदीने दुर्योधनास जे उत्तर दिले ते तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. तो म्हणाली की " जर मला नितिने आयुष्यक्रम कंठीता येत नसेल तर मला ऐश्वर्य नको. राजवाड्यापेक्षा कष्टमय वनवास मला अधिक प्रिय आहे. " तुम्ही देखील हाच बाणा बाळगला पाहिजे. तुम्ही कष्ट करण्यास का भ्यावे ? तुमच्या इतर हजारो भगिनींप्रमाणे आपापल्या गावी जाऊन किंवा नोकऱ्या करून काबाडकष्टाने उपजीविका करण्यास तुम्हास का जड वाटावे ? तुम्हाला आपल्या जातीचा अभिमान का नसावा ? हे स्वतःची विटंबना करणारे व जातीला काळिमा फासणारे जीवित तुम्ही का सोडू नये ? तुमच्या या लांछनास्पद धंद्याने संबंध महार जातीला किती लाज आणली आहे याची तुम्हाला कदाचित कल्पना नसेल. पण आम्हाला हरघडी तुमच्यामुळे मान खाली घालावी लागते. काही वर्षापूर्वी कामाठीपुऱ्यात मी एका सभेला गेलो होतो. त्यावेळेस माझे मित्र डॉ सोळंकीही हजर होते शिक्षणाविषयी भाषण करताना मी म्हणालो की सरकार शिक्षणाच्या बाबतीत मुसलमानांना ज्या सवलती देते त्या अस्पृश्य समाजास देत नाही; ही गोष्ट अगदी खरी आहे त्या ठिकाणी काही मुसलमान गृहस्थ हजर होते त्यापैकी एकाने सांगितले की ' महारास मुसलमानाविषयी का वैषम्य वाटावे ? आम्ही दोन-दोन, चार-चार महारीनी ठेवतो, ' या बोचक वाक्याचे प्रत्युत्तर मी दिले नाही पण या वाक्याने मला किती वाईट वाटले असेल, याची तुम्हीच कल्पना करा. मला कोणत्या गोष्टीची अतिशय चीड येत असेल, ज्या गोष्टीचा अतिशय संताप येऊन तळपायाची आग मस्तकात जात असेल तर या तुमच्या आयुष्यक्रमाची व तुमच्या कामठीपुऱ्यातील राहणीची ! म्हणून मी तुम्हास परत एकवेळ बजावून सांगतो की तुम्हास महार म्हणवून घ्यायचे असेल तर हा गलिच्छ धंदा तुम्हाला एकदम सोडलाच पाहिजे. या धंद्यात राहून मी तुम्हास आमचेबरोबर येऊ देणार नाही, आणि इतकेही करून तुम्ही ऐकणार नाहीतर मी तुमचा या ठिकाणाहून उठाव केल्याशिवाय राहणार नाही. तर तुम्ही ताबडतोब जाण्या व्हा, व या हीन चरित्रक्रमाचा त्याग करा.

मला आशा वाटते ती ही की आजची सभा तुम्ही स्वयंस्फूर्तीने बोलाविली आहे व आपली सुधारणा करून घेण्यास तुम्ही उद्युक्त झाला आहात. करिता ही माझी आशा लवकर सफल होईल अशी इच्छा प्रदर्शित करून मी माझे भाषण संपवितो.

— ० —

१४. श्री राजा हे परिया म्हणूनच जगतील व परिया म्हणूनच मरतील !

(बाबासाहेबांचे हे एक पत्रक असून ते जनतेच्या दि. १५-८-१९३६ च्या अंकात प्रसिद्ध झाले.)

अस्पृश्यांनी शीख धर्मांत प्रवेश करण्याच्या शक्यतेसंबंधी रा. ब. राजा आणि डॉ. मुंजे यांचा पत्र-व्यवहार वर्तमानपत्रात आला असून तो मी वाचला आहे. प्रथमच मला हे सांगितले पाहिजे की श्री राजा यांनी सदरहू पत्र-व्यवहार प्रसिद्धीसाठी वर्तमानपत्रांकडे पाठविला ही त्यांची कृती अत्यंत आक्षेपार्ह झाली आहे. डॉ. मुंजे यांनी श्री. राजांना लिहिलेल्या पत्राच्या शेवटी असा स्पष्ट उल्लेख केला होता की या धर्मांतराच्या प्रश्नाबाबत अस्तिपक्षी किंवा नास्तिपक्षी शेवटचा निर्णय होईपर्यंत हा पत्र व्यवहार अगदी खाजगी स्वरूपाचा समजून तो गुप्त ठेवण्यात यावा. या गोष्टीकडे श्री. राजा यांचे लक्ष गेले नसेल असे वाटत नाही. श्री. राजा यांनी पत्र-व्यवहार प्रसिद्धीसाठी पाठविण्यापूर्वी डॉ. मुंजे यांची परवानगी घ्यावयास पाहिजे होती. याबाबतीत श्री. राजा यांचे वर्तन कोणाही सभ्य गृहस्थाला न शोभण्याइतके निंद्य झाले आहे.

धर्मांतरासाठी अस्पृश्य वर्ग बहुधा शीख धर्माची निवड करील ही गोष्ट माझ्या पुष्कळ हिंदू मित्रांना आणि अस्पृश्य वर्गातील ज्या लोकांनी या प्रश्नाकडे लक्ष पुरविले होते त्या सर्वांना माहीत होती. अर्थात आपण आंबेडकराचे एक मोठे गुपित बाहेर फोडले, असे श्री. राजा यांनी समजण्याचे कारण नाही. श्री राजा यांच्या पत्राला मी मुळीच महत्व देत नाही. माझ्या मते श्री. राजा यांना अस्पृश्य वर्गात कवडीचीही किंमत उरलेली नाही. त्यांच्या मताला काही किंमत आहे, असे जर मला वाटते तर माझ्याशी सहकार्य करण्याकरिता त्यांचे मन वळविण्याचा प्रथम मीच प्रयत्न केला असता.

श्री. राजा यांना अर्धचंद्र मिळून रा. ब. श्रीनिवासन यांची आणि माझी गोलमेज परिषदेत नेमणूक करण्यात आली तेव्हापासून श्री. राजा यांच्या मनात माझ्याबद्दल अढी उत्पन्न झाली आणि त्यांच्याकडून मला होत असलेला विरोध कदाचित त्या अढीचाच निदर्शक असावा असे मला वाटते. सार्वजनिक कामात आणि वर्तमानपत्रात आपला बोलबाला करून घेण्यासाठी मला अखंड विरोध

करीत राहण्याची कला श्री. राजा यांनी चांगलीच अवगत करून घेतली आहे असे दिसते

परंतु हा प्रश्न बाजूला ठेवला तरी अस्पृश्य वर्गाने हिंदूधर्माचा त्याग करून अन्य धर्म स्वीकारण्याची जी चळवळ चालविली आहे तिच्यामुळे श्री. राजा यांच्या हृदयाला जखम का पडावी हे मात्र मला मुळीच समजत नाही. श्री. राजा यांना हिंदूधर्माच्या बाहेर पडावयाचे नसेल तर तसे करण्याबद्दल त्यांच्यावर कोणीही सक्ती करीत नाही आणि म्हणून धर्मांतराच्या बाबतीत तक्रार करण्याचा श्री. राजा यांना यत्किंचितदेखील अधिकार पोहोचत नाही. " मी हिंदू म्हणूनच जगेन आणि हिंदू म्हणूनच मरेन " असे श्री राजा म्हणतात, असे माझ्या कानी आले आहे तसे करण्याला श्री. राजा हे स्वतंत्र आहेत. परंतु त्यांना मला अशी जाणीव करून द्यावयाची आहे की त्यांनी वक्तृत्वाचा आवेश आणून हिंदूधर्मावरील आपल्या गाढप्रेमाचे कितीही जग जाहीर प्रदर्शन केले तरी जोपर्यंत ते धर्मांतर करीत नाहीत तोपर्यंत ते परिया म्हणूनच जगतील आणि परिया म्हणूनच मरतील. हिंदूधर्मात राहून त्यांची अस्पृश्यता रेसभरदेखील कमी होणार नाही, हे सत्य त्यांनी जरूर ध्यानात ठेवावे. " आध्यात्मिक उन्नतीसाठीच जरूर तर धर्मांतर करावे. " हे श्री. राजा यांचे म्हणणे म्हणजे शुद्ध वायफळ बडबड आहे असेच मला वाटते. मी श्री. राजा यांना विचारतो की केवळ आध्यात्मिक समाधानासाठीच ते हिंदू धर्मात राहात आहेत काय ? आध्यात्मिक सुखाशिवाय श्री. राजा यांना दुसऱ्या कोणत्याही सुखाची गरज नसेल तर कायदे मंडळातल्या राखीव जागांच्या अधिभौतिक आणि ऐहिक फायद्याचा वाद घालण्याची त्यांना काय आवश्यकता आहे ? हिंदू म्हणून जगण्यासाठी आणि हिंदू म्हणून मरण्यासाठी त्यांना राखीव जागांचा हव्यास धरण्याचे कारण नाही.

श्री. गांधी आणि पं मालवीय यांना अस्पृश्यांच्या धर्मान्तराविरुद्ध तक्रार करण्याला तोंड नाही, असे मी म्हणतो. पुणे कराराच्या वेळी अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीसाठी त्यांनी जी वचने दिली ती पाळण्यात त्यांना सर्वस्वी अपयश आलेले आहे. श्री. गांधी म्हणतात, ' माझी भूमिका काय आहे हे समजण्यास ते असमर्थ आहेत.' मला देखील त्यांची भूमिका आणि त्यांची भाषा यांचा अर्थ नीटसा उमगत नाही. ते म्हणतात, " अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न माझ्यापुरता अगदी स्वतंत्र पायावर आधारलेला आहे. " गांधींची ही भाषा एक गुढवादी दुसऱ्या गुढवाद्याजवळ बोलल्यास त्याला कदाचित तिचा अर्थबोध होऊ शकेल. परंतु सामाजिक जीवनातील रोजच्या व्यवहाराच्या चाकोरीबाहेर जाण्यास तयार नसलेल्या माझ्यासारख्या सामान्य माणसाला गांधींच्या म्हणण्यात काहीच अर्थ दिसत नाही.

हा प्रश्न म्हणजे व्यावहारिक देवघेवीचा प्रश्न नव्हे असे गांधी सांगतात. त्याला माझे असे उत्तर आहे की त्यांनी इतक्या उशिरा उपस्थित केलेला हा

नवा मुद्दा त्यांच्या तोंडात शोभत नाही. पुणे कराराच्या वेळी या प्रश्नाचे देवघेवीचे स्वरूप त्यांनी मान्य केलेले आहे. भाकरीसाठी भुकेलेल्या आणि माणुसकीच्या मूलभूत हक्काच्या तहानेने तळमळणाऱ्या लोकांना 'आध्यात्मिक आनंदाच्या अन्नावर जगा' असे सांगण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत. अस्पृश्य वर्ग धर्मांतराच्या देवघेवीचा सौदा करीत आहे, असा कांगावा करणाऱ्या गांधी-सारख्या लोकांनी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे, ती ही की धर्मा राची चळवळ कोणी आपल्या स्वतःच्या खाजगी फायद्यासाठी चालू केलेली नाही. 'सवर्ण हिंदूंनी पश्चातापपुर्वीत अंतकरणांनी केवळ स्वयंस्फूर्तीने केलेल्या प्रयत्नांनीच अस्पृश्यता निवारण झाली पाहिजे, स्वतः अस्पृश्यांनी अस्पृश्यता निवारण्याच्या बाबतीत हातपाय हलविता कामा नयेत असा गांधींचा आग्रह दिसतो. "देवा सवर्ण हिंदूंची सद्सद्विवेकबुद्धी जागृत कर! त्यांना कृतकर्माचा पश्चात्ताप होऊ दे, आणि त्यांना आपले वर्तन सुधारण्याची सद्बुद्धी दे" अशी ईश्वराची प्रार्थना करीत अस्पृश्यांनी हात जोडून स्वस्थ बसावे, असा गांधींच्या म्हणण्याचा स्पष्ट आशय आहे. गांधीचे हे म्हणणे कोणालाही पटणार नाही. प्लेगाने दूषित झालेल्या भागातील रहिवाशांना एखाद्या दीड शहाण्याने उपदेश करावा की "बाबांनो, थांबा! रोगाची पर्वा करू नका. म्युनिसीपालिटीच्या सभासदांना आपल्या कर्तव्याची हेळसांड केल्याबद्दल कधीतरी पश्चाताप होईलच; आणि रोगाला प्रतिबंध करण्यासाठी ते काहीतरी उपाय योजना करतीलच. तोपर्यंत स्वस्थ राहा. जागा सोडण्याची घाई करू नका." या उपदेशकाच्या म्हणण्यात जितका समंजस-पणा (?) आहे तितकाच महात्मा गांधींच्या म्हणण्यात आहे.

श्री. राजगोपालचारी यांना रागाचा झटका आला असावा. ह्या गृहस्थाच्या मेंदूला कठोर विशेषणांच्या अतीव सेवनाने अजीर्णाचा रोग जडला आहे, असे दिसते. म्हणूनच धर्मांतराच्या योजनेला 'सैतानी' हे विशेषण त्यांनी लावलेले असावे. अस्पृश्य लोक शीख होण्याचा विचार करीत असतील तर ते त्यांचे कृत्य "सैतानी" आहे की काय हे हिंदू लोकांनी ठरवावे. माझी खात्री आहे की ज्या हिंदू लोकांना हिंदू समाजाच्या भवितव्याबद्दल थोडीतरी चिंता वाटत असेल त्यांना "हा गृहस्थ राजगोपालाचारी दिवाना तर झाला नाही ना!" अशी शंका आल्यावाचून राहणार नाही.

वास्तविक जर कोणाच्या कृत्याला 'सैतानी' हे विशेषण लावावयाचे असेल तर ते ज्याने डॉ मुंजे यांची परवानगी घेतल्यावाचून त्यांचा अगदी खाजगी आणि गुप्त पत्र-व्यवहार प्रसिद्ध केला त्याच्याच कृत्याला लावले पाहिजे. या विषयावर यापेक्षा अधिक चर्चा करण्याची माझी इच्छा नाही.

अस्पृश्यांनी शीख धर्माचा स्वीकार करण्याला शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी व इतर अनेक प्रमुख हिंदू पुढारी यांनी आपली संमती दिली आहे, वास्तविक

त्यांनीच अस्पृश्यांनी शीख धर्माचा स्वीकार करावा असा प्रचार करण्याचा उपक्रम केला आणि तसे करण्याविषयी मलाही प्रवृत्त केले. मी देखील शीख धर्म पसंत केला. याचे कारण हिंदू संस्कृतीच्या भवितव्याची जबाबदारी थोड्या-बहुत प्रमाणात माझ्याही शिरावर आहे, या गोष्टीची मला जाणीव होती हेच होय.

प्रसिद्ध झालेल्या पत्र-व्यवहारातील माझे पत्रक वाचल्यानंतर श्री. गांधी, श्री राजा आणि श्री. राजगोपालाचारी यांनी धर्मांतराच्या प्रश्नासंबंधी स्वीकारलेले धोरण हिंदु समाजाच्या हिताला पोषक आहे की काय हे ठरविण्याचे काम मी हिंदू जनतेवरच सोपवितो.

— ० —

१५. स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा

(जनता दिनांक २२-८-१९३६)

स्वतंत्र मजूर पक्षाने कायदे-मंडळात नवीन सुधारणांखाली आखलेल्या कार्यक्रमाचे साधारण स्वरूप पुढे दिल्याप्रमाणे आहे :-

(१) नवीन सुधारणांविषयी धोरण

या पक्षाचे असे मत आहे की नवीन सुधारणात भरपूर दोष व व्यंगे असल्यामुळे त्या पूर्ण जबाबदारीचे स्वराज्य प्राप्त करून देण्यास असमर्थ आहेत. प्रांतिक कारभारातील कित्येक घटना विशेषत: सेकंड चेवरची घटना ही या पक्षाला आक्षेपार्ह वाटते तथापि या नवीन सुधारणा राबविण्यास हरकत नाही. मात्र जबाबदारीच्या स्वराज्याचे स्वरूप निष्फळ करून टाकण्याजोगे जे खास व अनियंत्रित स्वरूपाचे अधिकार गव्हर्नरास मिळालेले आहेत त्यांचा उपयोग या मुदतीत होऊ नये, याबद्दल हा पक्ष जागृत राहील.

(१) आर्थिक धोरण

(१) शेतीची प्रगती होऊन तो धंदा जास्त फलद्रूप व्हावा म्हणून लँडमार्गेज बँका, उत्पादक शेतकरी वर्गाच्या सहकारी पतपेढ्या व खरेदी-विक्री करणाऱ्या मंडळ्या (मार्केटिंग सोसायटीज) यांची स्थापना करण्याचा या पक्षाचा कार्यक्रम आहे.

(२) शेतकऱ्यांचे दारिद्र्याचे प्रत्यक्ष कारण जमिनीची लहान लहान तुकड्यात होणारी विभागणी हे असून त्यामुळे तीत भांडवल गुंतविण्यास व सुधारलेल्या पद्धतीने शेती करण्यास वाव मिळत नाही, असे या पक्षाचे मत आहे.

जमिनीचे तुकडे आणि त्यामुळे शेतकरी वर्गात वावरणारे दारिद्र्य याचे मुख्य कारण म्हणजे वाढत्या लोकसंख्येला केवळ जमिनीवर अवलंबून राहावे लागते, हे होय ! आणि जमिनीवर अवलंबून राहणाऱ्या जादा लोकसंख्येची पोषणाची शेतीव्यतिरिक्त इतर व्यवसायात तजवीज लावल्यावाचून शेतकऱ्याचे दारिद्र्य हटणार नाही या पक्षाचे असे मत आहे की शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आणि त्यांची उत्पादन शक्ती वाढविण्यासाठी इलाख्यातील उद्योगधंद्याची वाढ करणे हे मुख्य साधन आहे. म्हणून हा पक्ष चालू उद्योगधंद्यांना पुनर्जीवित करून त्या इलाख्यात उत्पन्न होणाऱ्या कच्च्या मालाच्या अनुरोधाने नवीन उद्योगधंदे निर्माण करण्याचा प्रयत्न करील.

(३) लोकांना आपल्या धंद्यात प्राविण्य संपादन करण्यास आणि आपली उत्पादन शक्ती वाढविण्यास साधनीभूत होणाऱ्या धंदेशिक्षणाचा विस्तृत कार्यक्रम हाती घेण्याचा हा पक्ष प्रयत्न करील.

(४) लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा प्रसंगी देशातील उद्योगधंद्याची मालकी व व्यवस्था सरकारने आपल्याकडे घ्यावी, असे या पक्षाचे मत आहे.

(५) जीवनाचा पूर्ण आणि स्वतंत्र उपभोग घेण्याच्या मार्गात उपस्थित होणाऱ्या सर्व अडचणी नाहीशा करण्यासाठी जी आर्थिक पद्धती एखाद्या विशिष्ट वर्गाला किंवा जनतेच्या विभागाला अन्यायकारक होत असेल ती पद्धती बदलणे, सुधारणे किंवा नष्ट करणे हेही या पक्षाचे अंगीकृत कार्य आहे.

(६) सर्वसाधारणपणे जमीनदारांकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक अगर त्याजकडून जमिनीचे भागेलपण काढून घेण्याची जमीनदाराची प्रवृत्ती-विशेषता : (१) खोती व (२) तालुकदारी या पद्धतीत असणारी ही प्रवृत्ती शेतकऱ्यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे अशा स्वरूपाचे कायदे करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

(७) शेतकरी वर्ग व कामगार वर्ग यांना सुधारलेल्या राहणीप्रमाणे राहता यावे यासाठी त्यांच्या मुशाहिऱ्याची किमान मर्यादा ठरविण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

(८) कारखान्यातील कामगार वर्गाच्या हितासाठी कारखान्यातील नोकरी बडतर्फी व पगारवाढ यांजवर सरकारी नियंत्रण, कामाचे जास्तीत जास्त तास कामास योग्य असे वेतन, पगारी रजा वगैरे स्वरूपाच्या उपकारक योजना व वृद्धपण अगर दुसरे योग्य कारण यामुळे कार्यनिवृत्त होताना बोनस, पेन्शन अगर तशाच प्रकारची दुसरी मदत अशासाठी कायदेमंडळात कायदे मंजूर करून घेण्याचे प्रयत्न हा पक्ष करील. आणि आजारीपण, बेकारी किंवा अपघात अशा-प्रसंगी कामगारांची तरतूद करणारी विम्याची खाजगी योजना व कामगारांसाठी स्वस्त झाडयाच्या आरोग्यशीर इमारतींची उभारणी ही कामे हाती घेण्याचा हा पक्ष प्रयत्न करील.

(९) कारखान्यातील कामगारांच्या हिताला आवश्यक असे जे कार्य हा पक्ष करणार आहे तेच कार्य शेतकऱ्याच्या हितासाठी आवश्यक अशा स्वरूपात हा पक्ष करील.

(१०) बेकारी निवारण करण्याची जबाबदारी सरकारवर आहे, हे तत्त्व या पक्षाला कबूल आहे व त्यासाठी शेतकी-वसाहती व जमीन नसणाऱ्या व बेकार कामगारांना काम मिळण्यासाठी सुरू करण्याच्या योजना अमलात आणण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

...५

(११) जबर व्याज, खोटे व घोटाळचाचे व्यवहार करणाऱ्या सावकारांपासून गरीब ऋणकोंचे संरक्षण होण्यासाठी व शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठी योग्य असे कायदे घडवून आणण्याचा हा पक्ष प्रयत्न करील.

(१२) मोठमोठ्या शहरातील व औद्योगिक कारखान्यांच्या भागात पडणाऱ्या मध्यम स्थितीतील लोकांना सोईस्कर असे घरभाडे पडावे अशा प्रकारचे कायदे हा पक्ष पुढे मांडील.

(३) कर-धारा पद्धतीविषयी या पक्षाचे धोरण :

या पक्षाचे असे मत आहे की प्रजेचे कल्याण व वाढता उत्कर्ष होण्यास सरकारने राष्ट्रसंवर्धक असे अनेक कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. पण सरकारच्या हाती पैसा असला तरच या गोष्टी सरकारला करणे शक्य होईल. हा पैसा अर्थात कराच्या रूपाने प्रजेकडून यावयाचा भरपूर पैसा असेल तर सुराज्याची हमी घेता येते. "कर कमी झाला पाहिजे आणि तो राष्ट्रोन्नतीला पोषक अशी कार्ये करता न आली तरीही कर कमी झाला पाहिजे; तरच त्यात तुमचे हित आहे." या मताचा प्रचार बहुजन समाजात करणे म्हणजे अज्ञ व गरीब जनतेची दिशाभूल करून फसवणूक करणे होय. तथापि कर–धारा पद्धती आहे ती राहू द्यावी असे हा पक्ष म्हणत नाही. एवढेच नव्हे तर चालू पद्धत या पक्षाला नापसंत आहे; कारण ती अन्याय्य असून गरीब वर्ग त्यात भुरडून जात आहे. ही विषमता दूर करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील. चालू जमीन–धारा पद्धती अत्यंत आक्षेपार्ह असून ती सुधारण्याविषयी या पक्षाचे प्रयत्न सुरू होतील.

(४) सामाजिक सुधारणा

(१) सर्व प्रकारच्या आवश्यक अशा सामाजिक सुधारणा म्हणजे (अ) सनातन्यांकडून समाजसुधारकांवर पडणाऱ्या बहिष्कारास आळा घालणे (ब) लोकांना कायद्याने मिळालेले हक्क व जीवनस्वातंत्र्य यांचा योग्य उपभोग घेण्याच्या कामी व्यक्तीला अगर विशिष्ट वर्गाला दहशत अगर बहिष्कार घालण्यासारखे प्रयत्न कायद्याने शिक्षेस पात्र ठरविणाऱ्या कायद्याची योजना.

(२) धार्मिक द्रव्यनिधीचा दुर्विनियोग अगर गैरव्यवस्था होऊ नये यासाठी सार्वजनिक धर्मदायिका संस्थांवर सरकारी नियंत्रण ठेवणारे कायदे करणे आणि या द्रव्यनिधीतून संकल्पित विनियोग होऊन शिल्लक राहिल्यास त्याचा शिक्षणासारख्या लौकिक कार्यात उपयोग करता येणारे कायदे करणे.

(३) भिकारी व दुसरे अनाथ निराश्रित लोक यांच्या तरतूदीची कायद्याने योजना करणे.

(५) ग्राम–संघटना :

(१) ग्राम–संघटनेच्या दृष्टीने आवश्यक अशी सुखाची राहणी ग्रामीण जीवनात प्राप्त व्हावी यासाठी शक्य त्या उपायांची योजना.

(२) सामान्यतः नगर रचनेच्या पद्धतीवरच खेड्यांची रचना असावी; अशा प्रकारच्या योजनेने खेड्यातील घरे बांधवून आरोग्य सुधारणे.

(३) खेड्यात वाचनालये, सार्वजनिक हॉल, रेडिओ, फिरते सिनेमा यांची योजना करून जनपदांची विचारपरंपरा उत्क्रांत व प्रगमनशील करणे.

(६) शिक्षण :

(१) मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अमलात आणणे.

(२) सर्वसाधारण साक्षरता प्रसारासाठी अशिक्षित प्रौढ मनुष्याच्या शिक्षणाची योजना.

(३) औद्योगिक शिक्षणावर विशेष भर देणे.

(४) शिक्षणात मागासलेल्या जातीतील होतकरू तरुणास हिंदुस्थानात व परदेशात उच्च शिक्षण घेता येण्यासाठी सरकारी मदत मिळेल अशी कायदेशीर योजना करणे.

(५) इलाख्यात आवश्यक भागात प्रत्यक्ष शिक्षण देणारी प्रादेशिक विश्वविद्यालये स्थापन करून विश्वविद्यालयीन शिक्षणाची पुनर्घटना करण्याचे कायदे हा पक्ष पुढे आणील. विद्यार्थ्यांचे श्रम व त्याची बुद्धिमत्ता मातीमोल करून टाकणाऱ्या परीक्षांची प्रस्तुतची अनिष्ट पद्धती नष्ट करण्याचा या पक्षाच्या मते हाच एक उपाय दिसतो.

(७) राज्य–कारभार

(१) राज्य कारभाराची पद्धती सूक्ष्म, इष्टपरिणामकारक व दोषरहित चालावी, असे या पक्षाचे प्रयत्न चालू राहतील.

(२) वरील नं. १ पोटकलमातील उद्देशासाठी हा पक्ष (१) न्याय व अंमलबजावणी खात्याची फारकत करणे. (२) आधुनिक परिस्थितीला अनुरूप अशी वतनपद्धत योजणे, या दोन योजना हाती घेईल.

(३) सरकारी नोकरीत एके ठिकाणी एकाच जातीचा अगर वर्गाचा भरणा होऊ नये, असे या पक्षाचे धोरण आहे. राज्यकारभार परिणामकारक होण्याकरिता इलाख्यातील सरकारी नोकरीत सर्व जाती व वर्ग यांस योग्य प्रमाणात प्रवेश मिळेल असे प्रयत्न हा पक्ष करील.

१६. लायक प्रतिनिधी निवडून द्या

(पुणे येथे दिनांक ७-९-१९३६ रोजी, पुढे होऊ घातलेल्या निवडणूकी विषयी दिलेले भाषण. जनता, दिनांक १२-९-१९३६)

प्रिय बांधवहो,

मी निवडलेल्या उमेदवाराबद्दल जो काही थोडीशी टीका केली जात असेल त्याबद्दल मला मुळीच खंत वाटत नाही; किंवा आश्चर्य वाटत नाही. कारण त्या मानाने प्रतिकूल असे मत फारसे दृष्टोत्पत्तीस येत नाही. यावरून माझी उमेदवारासंबंधीची निवड समाजास पसंत पडली आहे, असे म्हणावयास मुळीच हरकत नाही. मी ज्या माणसांची निवड केली त्यात कोणी माझे नातेवाईक, चुलते, मुलगे जावई किंवा व्याही वगैरे कोणी नाहीत. मी सर्व प्रकारचा विचार करून, तीन गोष्टींची कसोटी लावून त्यातील जे कसोटीस उतरले त्यांचीच निवड केली आहे. पहिली कसोटी म्हणजे, इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान. कारण तेथे सर्व कामकाज इंग्रजीतूनच चालणार आहे आपापल्या जिल्ह्यातर्फे, तालुक्यातले जाच-त्रासादि गाऱ्हाण्यांचे प्रश्न असेंब्लीमध्ये इंग्रजीतून विचारत आले पाहिजेत. म्हणून उमेदवार इंग्रजी जाणणारा पाहिजे दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे उमेदवार वयाने तरूण असला पाहिजे. म्हाताऱ्या मंडळींना काही तेथे पालखीतून बसवून न्यावयाचे नाही. एखाद्या असेंब्लीच्या सभासदाला असेंब्लीचे कामकाज चालू असताना एखाद्या खेडचातून निकडीची तार आली तर त्याला तेथे वेळ पडल्यास पायी चालत जाता आले पाहिजे. रात्री-बेरात्री आपल्या जिल्ह्यातील लोकांसाठी फिरता आले पाहिजे. ते कार्य एखाद्या म्हाताऱ्या, संधीवाताने जखडलेल्या कौन्सिलरच्या हातून कदापीही होणार नाही. तिसरी महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे आपल्या पक्षाचा उमेदवार पक्षाच्या शिस्तीखाली राहिला पाहिजे. पक्षाच्या नियमानुसार वागून कार्य करण्याची त्याच्या अंगात धमक पाहिजे. आणि तो पक्षाकरिता निस्वार्थबुद्धीने काम करणारा पाहिजे वगैरे. स्वार्थी माणसाला मी कवडीचीही किंमत द्यायला तयार नाही.

तुमच्या जिल्ह्यातर्फे निवडलेले श्री. राजाराम भोळे यांचे उदाहरण घ्या. त्यांच्यापेक्षा कोणताही जास्त शिकलेला व तितका लायक मनुष्य पुण्यात नाही. मला भाऊबंदकीकडे किंवा जिल्ह्याच्या दुराभिमानाकडे अथवा वतनदारीकडे लक्ष द्यावयाचे नाही. नुसत्या नावावर लायकी किंवा महत्व अवलंबून नाही; तर

ते कामावर अवलंबून आहे. श्री. भोळे जर बिनविरोध निवडून आले तर आपल्या पदरात एकंदर तीन जागा पडतील. त्यांना जर विरोध नसला तर ते सहज निवडून येतील व त्यांना न दिल्या गेलेल्या मतांनी आपल्या पक्षाचा दुसरा उमेदवार निवडून येईल. आणि दुसऱ्या भागात देखील आपल्या पक्षाचा उमेदवार आ ल्या दुसऱ्या भागातील मतांनी सर्वसाधारण निवडणूकीत निवडून येईल अशा तऱ्हेने आपण शिस्तीने वागलो तर आपणास एकटचा पुण्यात तीन जागा मिळविता येतील. तेव्हा आपण तालुक्याचा, गावचा किंवा जिल्ह्याच दुराभिमान सोडून आपल्या पक्षाच्या हिताकरिता लायक माणसालाच निवडून दिले पाहिजे. कौन्सिल म्हणजे म्हारकी नव्हे की बाप मेला म्हणजे ती मुलाला मिळेल.

सध्या माझी प्रकृती ठीक नाही. ब्लड प्रेशर झाले असल्यामुळे, थोडे अंतरदेखील चालून जाता येत नाही. तेव्हा प्रत्येक ठिकाणी जाऊन मला शंकाकुशंका सोडवावयास वेळ सापडणार नाही. माझ्या कसोटीस उतरलेल्या उमेदवारांच्या विरुद्ध जर कोणास काही करावयाचे असल्यास ते त्यांनी नीट विचार करून आणि जबाबदारी ओळखून करण्याचे धाडस करावे. मी त्याच्या स्वार्थी कृतीची चूक सिद्ध करून दाखवीन, दिवसेंदिवस माझ्या शिरावर अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या येऊन पडत आहेत. आपल्या समाजाच्या स्वातंत्र्याच्य कार्यात मला हितशत्रू उत्पन्न झालेले आहेत. या आ ाच्या लढचात माझ्यावर कोणते प्राणांतिक प्रसंग उत्पन्न होतील ते मलाच सांगता येत नाहीत. अशाही बिकट परिस्थितीत मी तुम्हाबद्दलची सर्वप्रकारची जबाबदारी घ्यावयास तयार आहे. माझ्यावर विश्वास असेल तर तुम्ही मी निवडलेल्या लायक माणसालाच आपली मते देऊन निवडून आणून समाजाचे हित साधावे. सगळचाच ठिकाणी जर म्हाताऱ्यांना हक्क आहे तर सगळी म्हाताऱ्यांचीच भरती होईल मला स्वतःलाही कोठेच जागा राहणार नाही. माझ्यापेक्षा सुभेदार घाटग्यांनी ५० वर्षे जास्त काम केले आहे. श्री. शिवराम जानबा कांबळचांनी ६० वर्षे जास्त काम केलेले आहे. त्यांच्या वयाच्या मानाने मला देखील काम करता येणार नाही तेव्हा या असल्या वादविवादात मला पडण्याचे काहीच कारण नाही. जोपर्यंत तुमचा माझ्यावर विश्वास आहे तोपर्यंत मी तुमचे पुढारीपण स्वीकारीन. आपणाला यावेळी मोठा समुद्र ओलांडून जावयाचे आहे तेव्हा मी म्हणेन तेच नावाडी व चांगली नाव मला मिळाली पाहिजे. मोडकी नाव व कुचकामाचे नावाडी दिलेत तर मी नावेत मुळीच पाय ठेवणार नाही. मलाही तुमचे पुढारीपण नको आहे. यासाठी तुम्ही सर्वांनी पूर्णपणे ध्यानात ठेवा की प्रत्येकाला लायकी पाहिजे. 'नाम के नहीं काम के है' ही गोष्ट लक्षात ठेवा.

(वि. ८–१०–१९३६ रोजी जळगावी दिलेले भाषण. जनता, दिनांक १७–१०–१९३६)

आजची ही सभा श्री. दौलतराव गुलाजी जाधव यांच्या उमेदवारीस पाठिंबा देण्यासाठी भरविण्यात आली आहे. तुमच्या पूर्व खानदेश जिल्ह्यातील पूर्व भागाचे राखव जागेकरिता ते उभे आहेत. या जागेकरिता आणखीही उमेदवार उभे आहेत, असे मी ऐकतो. त्यापैकी मी मेढे, बिऱ्हाडे यांची नावे ऐकतो. या दोघांना मी चांगले ओळखतो. त्यांचा माझा संबंध आज १५–२० वर्षापासून आहे त्यातल्यात्यात श्री. मेढेशी माझा जास्त संबंध आहे. श्री. मेढेंनी येथे काही काम केले आहे, हे मी जाणून आहे. असे असता मी श्री. जाधवांनाच का उभे केले असे पुष्कळांना वाटत असेल. पण त्याला कारण एकच आहे ते म्हणजे कायदे–मंडळात हुशार, चाणाक्ष व समाजदक्ष लोकांची जरूरी आहे. आपणाला त्या कामास योग्य असाच इसम हवा आहे भलत्या कामावर भलत्याच इसमाची निवड केली तर त्यास ते काम झेपणार नाही व त्याला ते काम करता येणार नाही. तुम्हाला जर एखादे घर बांधावयाचे असेल तर तुम्ही योग्य माणसांनाच जी ती कामे सांगता. सुताराला लोहाराचे काम सांगीतले तर त्याला ती कामे करता येणार नाहीत. तुम्ही गवंड्याला गवंड्याचेच काम सांगणार. आणि असे जर तुम्ही केले नाही तर घराऐवजी बेडौल डोलारा मात्र तुम्हाला दिसेल. पण योग्य ते काम योग्य त्या इसमाला दिले तर तुमच्या डोळ्यांची पारणे फिटणारी सुंदर इमारत तुम्ही पाहू शकाल. हीच गोष्ट व्यवहाराची आहे. व ती तुम्ही प्रत्येकाने थोडा विचार केला तर तुम्हास कळून येणार आहे. मे. मेढे–बिऱ्हाडे हे म्युनिसीपालिटी, लोकल बोर्ड व स्कूल बोर्ड यांच्या कामालाच योग्य आहेत. पण त्यांनी जे काम त्यांना पाहता येणे अशक्य आहे, अशा कामाची इच्छा करू नये. जर त्यांना खरेच समाजाचे हित व्हावे अशी कळकळ असेल तर त्यांनी थोडा वेळ मनाशी विचार करावा व अंतःकरणापासून त्या कामाला कोण लायक आहे, हे ठरवावे. व जर त्यांनी प्रामाणिकपणे विचार केला तर श्री. जाधवच त्या कामास योग्य आहेत, असेच त्यांचे मन त्यांना उत्तर देईल. ते काम त्यांच्याने होणार नाही. ते नालायक आहेत असे मी म्हणत नाही; तर ज्या-त्या कामाला जो–तो इसम लायक असतो; आणि या कामास श्री. जाधव जास्त लायक आहेत. कौन्सिलचे सर्व काम इंग्रजीतून चालते आणि म्हणूनच उमेदवाराला उत्तम तऱ्हेचे इंग्रजीचे ज्ञान पाहिजे. त्याला वाटेल ते प्रश्न विचारण्याची ताकद पाहिजे. या सर्व गोष्टी उत्तम इंग्रजी जाणणाऱ्यालाच शक्य आहेत. इंग्रजी न जाणणाऱ्यांचा येथे उपयोग नाही. आम्हाला आमच्या मोजक्या खुर्च्या शोभवावयाच्या नाहीत. आम्हाला कार्य करावयाचे आहे. आज त्यांच्या इतका शिकलेला इसम तुमच्या जिल्ह्यात दुसरा नाही. तो बी. ए. झाला आहे. तो काही माझा

नातेवाईक नाही. किंवा तो त्याचा भत्ता मला देणार नाही. मी तुमच्याच फायद्याकरिता त्याची निवड केलेली आहे. मी काही पक्षपात केला नाही. मी सर्व सारासार विचार करून व पूर्वखानदेशचा नकाशा माझ्या नजरेसमोर ठेवून श्री. जाधवांची निवड केली आहे. आणि मी सांगतो की तो लायक आहे.

तुम्ही म्हणाल की अडाणी मराठे व कुणबी कौन्सिलमध्ये जातात; त्यांना कोठे इंग्रजी येते ? पण मी तुम्हाम असे सांगतो की मराठे, कुणबी आणि तुमच्यात जमीन अस्मानचे अंतर आहे त्यांना सर्व काही अनुकूल आहे. त्यांना कसलीही उणीव नाही, पण तुम्ही कंगाल आहात. तुम्हास सर्व काही कष्टाने प्राप्त करावे लागते; आणि ते सुलभरीतीने प्राप्त करावयाचे असेल तर फक्त कायद्याने मिळवता येणे शक्य आहे. एवढ्याकरिता तुमचे मुर्ख उमेदवार चालणार नाहीत, तज्ज्ञ हवे आहेत. कारण तुमची ग्रहदशा काढून टाकावयाची आहे आणि म्हणूनच श्री. जाधवरावासारख्या लायक उमेदवारास तुम्ही निवडून देणे तुमचे कर्तव्य आहे. जर तुम्ही तसे न कराल तर स्वतःचा नाश करून घ्याल, ही मी तुम्हाला आजच धोक्याची सूचना देतो. जर एखाद्याने मूर्खपणा केला तर तुम्ही तो करू नका. एकाने चोरी केल्यास दोरी बांधून फुकट मरू नका आज दोन हजार वर्षापासून तुमचे पूर्वज या हिंदुस्थानात आहेत. पण कोणकोण ब्राह्मणाच्या मांडीला मांडी लावून बसले होते ? तो भाग्योदय आज तुम्हाला प्राप्त झाला आहे. आणि अशावेळी जर तुम्ही अंध व स्वार्थी दृष्टी ठेवली तर सर्व समाजाचाच नव्हे तर स्वतःच्या बायका मुलाचा घात कराल. म्हणून मी या सर्व मंडळीतर्फे मे. मेढे–बिऱ्हाड यांना विनंती करतो की तुम्ही समाजाच्या आड येऊ नका व विनाकारण गोंधळ करू नका. पण इतके सांगूनही त्यांनी ऐकले नाही तर तुम्ही काय कराल ? तुम्ही मला विरोध कराल काय; (सर्वत्र आवाज नाही ! नाही ! ! नाही! ! !) समाजाचा घात कराल ? (फिरून नाही–नाही) मग काय कराल ? तुमच्या भागात ५००० मतदार आहेत प्रत्येकाला मतदानाचा हक्क प्राप्त झाला आहे. आणि त्याचा तुम्ही योग्य तोच उपयोग केला पाहिजे. म्हणून प्रत्येकाने विचार केला पाहिजे व सर्व समाजाचे कार्य उत्तम व्हावे असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुमचे कर्तव्य करा आणि सर्वांनी वाटेत ती खटपट करून श्री. जाधवाला निवडून आणा. जर तुम्ही फुटकी नाव व कुचकामाचे नावाडी देऊन ती नाव पैलतीरावर न्या, असे मला म्हणत असाल तर त्या नावेला मी केव्हाही पैलतीराला नेणार नाही. इतकेच नव्हे तर त्या नावेत मी पायदेखील ठेवणार नाही. म्हणून मी सांगेन तेच नावाडी मला दिले पाहिजेत. तरच मी त्या जहाजाला सहजरित्या पार नेईन. शेवटी श्री जाधवालाच तुम्ही निवडून आणावे अशी मी तुम्हास विनंती करतो.

— ० —

१७. समता सैनिक दलाला संदेश

(दिनांक ११-११-३६ रोजी बाबासाहेब विलायतेस गेले. त्यापूर्वी त्यांनी समता सैनिक दलाची जाहीर सभा घेतली. त्याप्रसंगी दिलेले भाषण. हे भाषण जनतेच्या दि. ५ डिसेंबर १९३६ च्या अंकात दिलेले आहे.)

मी उद्या काही जरूरीच्या कामकाजाकरिता विलायतेला जात आहे. माझ्या गैरहजेरीत आपणास फार मोठी जबाबदारीची कामगिरी बजवायची आहे. आपणास ठाऊक आहेच की नवीन राज्यघटनेनुसार आपल्या अस्पृश्य समाजाला कायदे-मंडळात १५ राखीव जागा मिळाल्या आहेत, त्या कायदे मंडळाची निवडणूक येत्या फेब्रुवारी महिन्यात होईल. आपणास मिळालेल्या या पंधरा जागा या इलाख्याच्या निरनिराळ्या जिल्ह्यात विभागल्या गेल्या आहेत. या जागांकरिता मी आपल्या स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निरनिराळ्या ठिकाणी उमेदवार उभे केले आहेत. या निवडणुकी लढविण्यासाठी मी व माझ्या सहकारी मित्र मंडळींनी मिळून हा स्वतंत्र मजूर पक्ष का स्थापन केला याचा खुलासा प्रथम करतो. काँग्रेससारखी बलाढ्य व सुसंघटित संस्था या देशात असताना ही नवीन संस्था काढण्याची आवश्यकता का भासली याचे उत्तर अगदी सरळ आहे. काँग्रेसचे मुख्य ध्येय म्हटले म्हणजे स्वातंत्र्य. मला व माझ्या सहकाऱ्यांना हे ध्येय मान्य आहे. परंतु हे साध्य करणे म्हणजे साधी सुधी गोष्ट नव्हे. त्याला सत्याग्रहासारखे गांधीजींचे शस्त्र बोथट पडणारे आहे कायदे-भंगानेही सरकारकडून स्वातंत्र्य मिळविता येणे अशक्य कोटीतली बाब आहे. शक्तीबाहेरची वल्गना करण्यात काय अर्थ आहे ? जोपर्यंत खरेखुरे स्वातंत्र्य मिळविण्याची अंगी धमक नाही. तोपर्यंत सनदशीर मार्गाने आपल्या ध्येयाचा मार्ग आक्रमिणे अधिक हिताचे आहे असे आमचे प्रामाणिक मत आहे. तशात हिंदुस्थान हे एकराष्ट्र नाही. या देशात निरनिराळ्या ४०२० जाती आहेत. या निरनिराळ्या जातींच्या बंडामुळे जातिभेद, प्रांतभेद, तंटे, बखेडे आणि धर्म-भेदांचे गंभीर प्रसंग यामुळे एकी होणे अशक्य आहे. हिंदू, मुसलमान व ख्रिस्ती यांचे ध्येय एकच नाही. समजा आजच्या परिस्थितीत इंग्रज सरकारचे छत्र नाहीसे झाले तर ज्यांना एकराष्ट्रीयत्वाचे ध्येय मान्य नाही, असे जात्याभिमानी आणि धर्माभिमानी लोक आपापसात झगडून स्वतःच्या हाती राजकीय सत्ता घेण्याचा प्रयत्न करतील.

दुसऱ्या बाजूने विचार करता काँग्रेस व आमचा पक्ष यात पुढीलप्रमाणे भेद आहे. काँग्रेसला आजच्या नवीन सुधारणा अपुऱ्या वाटतात, आणि यासाठी कायदे मंडळात जाऊन या सुधारणांच्या निषेधार्थ ती मंडळे मोडून टाकणे तिला आवडते. परंतु आम्हाला या सुधारणा अपुऱ्या वाटत असूनही कायदे मंडळात जाऊन या सुधारणान्वये कार्य करून अधिकाराच्या बळावर अधिक हक्क मिळविण्याचा सतत प्रयत्न करणे आम्हाला आवडते. कायदे-मंडळ मोडून पोरखेळ खेळत राहण्याचे आजचे दिवस राहिलेले नाहीत. खरे स्वातंत्र्य मिळविण्याची जी खरी शक्ती ती आपल्या हाती नसताना–तितकी अंगी धमक नसताना स्वातंत्र्यचेा हवेत मनोरे बांधणे शेवटी अपायकारक ठरेल. तशात काँग्रेस हे एक कडबोळे आहे. तिच्यात बेकार, मजूर, भांडवलवाले, सावकार, शेतकरी, कुळे, जमीनदार लहानमोठे व्यापारी, मध्यमवर्ग वगैरे असून ती परस्पर विरोधी हितसंबंधांच्या लोकांची एक मोट आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ही एक आवळचांची, मोट आहे. रक्त शोषण करणारा व रक्त शोषल्या जाणारा यांची मित्र म्हणून कशी सांगड घातली जाणार ? आज काँग्रेस धनिकांच्या मगरमिठीत बसली आहे. ती गोरगरीब, शेतकरी व कामकरी जनतेचे कोणते हित करणार ? काँग्रेस ही संस्था शेतकरी–कामकरी वर्गाची संस्था नाही. ती भांडवलदारांची पाठीराखी आहे. तिच्या हातून बहुजन अशा श्रमजीवी लोकांचे हित होणे कठीण आहे. त्याच्या उलट आमचा स्वतंत्र मजूर पक्ष हा निर्भेळ वर्गतत्त्वाच्या पायावर उभारलेला आहे. आम्हाला जितके शेतकरी व कामकरी वर्गाचे हितरक्षण जिव्हाळ्याने करता येईल तितके काँग्रेसला करता येणे अगदीच अशक्य आहे. पददलित, गोरगरीब अशा श्रमजीवी वर्गाचे हितरक्षण व संवर्धन करणे हेच आमच्या पक्षाचे मुख्य कार्य आहे. तत्त्वाच्या बाबतीत तडजोड न करता कायदे मंडळातील कोणत्याही पक्षाशी तपशीलाच्या बाबतीत योग्य प्रसंगी आम्ही सहकार्य करू. तसेच मी अस्पृश्य समाजाला सोडून इतर जातींच्या लोकांशी संगनमत का केले. अशाप्रकारचा प्रश्न मला विचारण्यात येतो. त्या संबंधी सांगावयाचे म्हणजे असे की नवीन राज्यघटनेनुसार स्थापन होणाऱ्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्ये एकंदर १७५ सभासद निवडून जाणार आहेत. या १७५ सभासदामध्ये आपले अस्पृश्य समाजाचे १५ सभासद असणार. या पंधरा जणांच्या मदतीने कुणाला काहीच काम करता येणे शक्य नाही. यासाठी आपल्या मदतीला जास्त लोकांची आवश्यकता आहे. आणि हे लोकसुद्धा आपल्याच विचारसरणीचे व आपले मित्र असेच पाहिजेत. यासाठी ज्या ज्या स्पृश्य माणसांनी आजपर्यंत आपुलकीने सहाय्य केले, ज्यांनी आपल्या समाजकार्यासाठी स्वार्थत्याग केला अशा मनुष्यांना आपण निवडून देऊन

आपल्या पक्षात सामील करून घेणे आवश्यक आहे. यासाठी यापुढे आता निष्कारण तर्ककुतर्क काढून वेळ गमावू नका. आमच्या पक्षातर्फे ज्या कार्यक्रमाची आखणी केली आहे तो पार पाडण्यासाठी आपापसातील भांडणे, तंटे मारामारी वगैरे अनिष्ट प्रकार बाजूला ठेवा. शिस्तीला व तत्त्वाला जागून वागलात तर आज माझ्या हातून आपल्या समाजाकरिता जे अल्प प्रमाणात काम करता आले आहे ते अधिक प्रमाणात करून घेण्याची मला प्रबल अशी शक्ती प्राप्त होईल. तत्त्वाकरता व शिस्तीकरता लढता लढता मी कायदे मंडळाच्या निवडणुकीत पडलो तरी हरकत नाही. परंतु मुंबई 'जी' वार्ड व उपनगर विभागातर्फे उभे राहिलेले आपले उमेदवार मि. काळोखे यांना तुम्ही निवडून आणले पाहिजे. त्यातच तुमचे कल्याण आहे. त्यातच तुमची सारी अब्रू आहे. यावेळी महार–मांग हा जातिभेद मानू नका. आपण यापुढे सर्व एकच आहोत, ही उज्वल भावना निरंतर हृदयात ठेवा.

आता मी दुसऱ्या एका महत्वाच्या मुद्याकडे वळतो. तो म्हणजे : मी सर्वच उमेदवार महार जातीचे निवडून इतर समाजाच्या लोकांना उभे केले नाही, हा होय. खरे पाहिले म्हणजे या बाबतीत आम्ही अधिक खोलात जाऊ नये. हे बरे. तरी पण आज ज्यांनी राष्ट्रीय हरिजन पक्ष काढून या आरोपाला तोंड फोडले आहे त्यांना उत्तर हे दिलेच पाहिजे. या राष्ट्रीय हरिजन पक्षवाल्यांना मी एकाच नावाने संबोधू इच्छितो. हे लोक 'लेभागू' लोक आहेत. यांना चांभार म्हणून मी माझ्या पक्षातून वगळले नाही. ते तशी वाटेल ती ओरड करोत; त्याची मला बिलकुल कदर नाही. त्यांची निवड न करण्यात त्यांचा 'लेभागूपणाच' कारणीभूत झाला आहे. जिथे मिळेल तिथे जायचे. तत्त्वाची–शिस्तीची यांना कधीच जाणीव नसायची. मिळेल ते ओटीत टाकून स्वत:करताच घेऊन जायचे, हाच त्यांचा धर्म! आम्ही महाड सत्याग्रह केला, स्वावलंबनाच्या निरनिराळ्या चळवळी केल्या, नाशिक सत्याग्रह केला; फार कशाला पुणे-करार प्रसंगाचे उदाहरण घ्या. आम्ही तत्त्वाकरता प्राणावर बेतेपर्यंत काँग्रेसशी व तिचे पंचप्राण गांधीशी झगडत असता हे राष्ट्रीय हरिजनवाले अगदी अचूक आमच्या शत्रूच्या कँपात बसलेले ! अशा लेभागू लोकांना प्राप्तीच्या वाटचाच्या वेळी हात पसरला असता काहीतरी देण्यात आम्हीतरी का उदारपणा दाखवावा ? वटवाघुळाच्या वृत्तीने ज्यांना आपले जिणे जगावयाचे आहे त्यांच्या आरोपाची आणि कांगावखोरपणाची पर्वा मला वाटत नाही. इतकेच नव्हे तर पुणे कराराच्या पूर्वी गांधीजींनी प्राण पणास लावला तेव्हा ह्या लोकांना गांधीजींना वाचविण्यासाठी कायदे–कौन्सिलात मुळीच जागा नको होत्या. मग आता माझ्या प्रयत्नामुळे मिळालेल्या ह्या जागा हे का मागतात ? खरे पाहिले तर या राष्ट्रीय हरिजन पक्षातले प्रमुख पुढारी म्हणविणारे श्री. नारायणराव काजरोळकर वेळ पडल्यास डॉ. सावरकरांच्या ओटीत बसतील. श्री. पी. बाळ

देशभक्त वल्लभभाईच्या ओटीत धडपडत असताना दिसतील. अशा परिस्थितीत या पक्षाची शेवटी काय अवस्था होईल हे आजच सांगून उपयोगी नाही. अशा या खऱ्या परिस्थितीवर कधी कोणी प्रकाश पाडला आहे काय ? आमच्या पक्षाशी ज्याने आजपर्यंत सहकार्य केले व आमच्या कार्याच्या यशासाठी जे झटले ते श्री. शिवतरकर मास्तर हे चांभार समाजातले एक प्रमुख आहेत. त्यांना दुर्दैवाने म्युनिसिपल कमिटीकडून निवडणुकीसाठी उभे राहण्याची परवानगी मिळाली नाही. त्यामुळे त्यांना आमच्या पक्षातर्फे उमेदवार म्हणून उभे करता आले नाही असो.

खरे पाहिले असता मला या कायदे मंडळात जाण्यापेक्षा कायदे मंडळाच्या बाहेर राहूनच कार्य करण्यात अधिक बरे, असे वाटते. माझ्यापुढे आज धर्मांतराचा प्रश्न आहे. तरीसुद्धा आपणा सर्वांच्या इच्छेसाठी मी या नवीन पक्षाच्या संगनमताने कायदे मंडळात शिरण्याचा संकल्प केला आहे. माझी पूर्ण खात्री आहे की माझ्या या संकल्पात काँग्रेस काटे पेरल्याशिवाय राहणार नाही. पैशाच्या बळावर काँग्रेस मला विरोध करण्याचे अनेक प्रकारचे प्रयत्न करील. व आज त्यांनी त्याप्रमाणे प्रयत्न चालविले आहेत. यासाठी आपण सर्वांनी शिस्तीने संघटित झाले पाहिजे. आणि आपली प्रत्येकाची सर्व मते यावेळी मला मिळाली पाहिजेत. मी निवडून येण्यासाठी तत्त्वापासून ढळणार नाही, ही गोष्ट तुम्ही लक्षात ठेवली पाहिजे. आपणास कुणी मदत करणार नाही; आणि अशा वेळी फंदफितुरीच्या मोहाला तुम्ही बळी पडता कामा नये ज्यांना उमेदवार म्हणून घेता आले नाही असे असंतुष्ट लोक फंदफितुरीच्या मार्गाला लागलेले आहेत. त्यांच्या फंदफितुरीला केवळ स्वाभिमानासाठी तरी बळी पडू नका. तुम्ही विचार करा की ज्या वृक्षाच्या छायेखाली आपणास गुण्यागोविंदाने बसावयाचे आहे; ज्या वृक्षाच्या छायेने आपणास पूर्व समाधान मिळणार आहे ती छाया नष्ट करण्याचा तिच्या फांद्या कुऱ्हाडीने तोडून टाकण्याचा दुष्टपणा तुम्ही करणार नाही अशी मला खात्री आहे स्वार्थासाठी लोकांच्या चिथावणीला बळी पडून जे आज अविचाराचे आणि दुष्टपणाचे कृत्य करावयास प्रवृत्त झाले आहेत त्यांच्या पदरी यश कितपत मिळेल याबद्दल शंका आहे. परंतु ते आज आपलीच कुऱ्हाड आपल्याच पायावर मारून घेत आहेत. या सर्व प्रकारच्या कारवायापासून अलिप्त राहून मी माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने जो कार्यक्रम तुमच्यापुढे ठेवीत आहे तो तुम्ही समता सैनिक दलातील प्रत्येक सैनिकाने शिस्तीने पार पाडला पाहिजे.

आपल्याला बऱ्याच बलाढ्य शत्रूशी टक्कर द्यावयाची आहे. यासाठी कमीत कमी दोन हजार समता सनिकांची उभारणी या मुंबई शहरात झाली पाहिजे.

आपल्याजवळ मुबलक मनुष्यबळ असल्यावर शिस्तीच्या व संघटनेच्या बळावर वाटेल त्या बिकट परिस्थितीत मार्ग काढणे कधीही कठीण झाले नाही. माझ्या निवडणुकीबाबत काँग्रेस व इतर हितशत्रू पुष्कळ प्रकारची कारस्थाने, माझा त्याच्या मार्गातील काटा काढून टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझी खात्री आहे की माझ्या निवडणुकीच्या वार्डातील प्रत्येक अस्पृश्य मतदार मला मत दिल्याशिवाय राहणार नाही आणि हे कार्य समता सैनिक दलाने प्रत्यक्ष हाती घेऊनच करावयास पाहिजे. माझी खात्री आहे की माझ्या गैरहजेरीत ही मोठी जबाबदारी समता सैनिक दलाचा प्रत्येक शिस्तीचा शिपाई इमाने इतबारे पार पाडील. मी या कार्यासाठी एक कमिटी नेमली आहे तिच्या मदतीने तुम्हास तुमचे कर्तव्यकर्म पार पाडता येईल.

– ० –

१८. गैरसमाजाने फसू नका

(हे बाबासाहेबांचे मतदारांना उद्देशून काढलेले पत्रक आहे. ते जनतेच्या २६ डिसेंबर १९३६ च्या अंकात प्रसिद्ध झाले. उपलब्ध झालेला हा जनतेचा अंक अतिशय जीर्ण झालेला असून त्याचा बराच भाग फाटलेला आहे. त्यामुळे हे पत्रक खंडित स्वरूपात देण्याशिवाय गत्यंतर दिसत नाही.)

मुंबई कायदे-मंडळाच्या येत्या निवडणुकीत उमेदवार म्हणून मी उभा आहे. अस्पृश्य प्रतिनिधींच्या शेवटच्या निवडणुकीत अस्पृश्य मतदारांचा समावेश हिंदू, पारसी, ख्रिस्ती व यहुदी या धर्मांच्या लोकांचा मतदारांमध्ये झालेला आहे. फक्त मुसलमानांचा मतदारसंघ वेगळा आहे ही व्यवस्था म. गांधींनी प्राणांतिक उपासाची प्रतिज्ञा केल्यामुळे त्यांच्या व माझ्या दरम्यान इतर हिंदु पुढाऱ्यांच्या मध्यस्थीने व साक्षीने झालेल्या पुणे कराराच्या द्वारे ठरली आहे. अर्थात अस्पृश्य वर्गाचा उमेदवार केवळ अस्पृश्यांच्या मताच्या जोरावर खात्रीने निवडून येण्याची शक्यता नाहीशी झालेली आहे. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी मी केली होती व ती राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये मान्यही झाली होती. परंतु गांधींचे प्राण वाचविण्याकरिता मी त्या व्यवस्थेत फेरबदल करून घेण्यास कबूल झाला. स्पृश्य वर्गीय हिंदू व साधारण मतदारसंघातले इतर धर्माचे लोक यांची मते मी का मागत आहे, हे वरील खुलाशावरून त्यांच्या लक्षात येईलच.

गैर समाजाने फसू नका

माझ्या संबंधाने स्पृश्य वर्गीय हिंदू व इतर लोक यांच्यामध्ये अनेक गैरसमज पसरलेले आहेत त्या सर्वांचे निराकरण करण्यास हे हस्तपत्रक पुरे पडणार नाही तथापि मी थोडक्यात एवढेच सांगतो की माझ्या विरुद्ध लोकात गैरसमज उत्पन्न करणे हा कित्येक माणसांचा, पक्षांचा व वर्तमानपत्रांचा धंदाच झालेला आहे व त्यांनी मला सार्वजनिक आयुष्यक्रमातून नेस्तनाबूद करण्याची सैतानी प्रतिज्ञा केलेली आहे. तथापि बहुजन समाजाने खऱ्या-खोट्याची परीक्षा करावी आणि विचारपूर्वक आपल्या मतांचा उपयोग करावा, अशी माझी विनंती आहे. माझ्या धर्मांतर विषयक (पुढील अंदाजे १८ ओळी फाटल्यामुळे नष्ट झाल्या आहेत.)

परंतु मतदारांच्या पूर्व ग्रहदूषित मनांचा परिणाम त्यांच्या मतदानावर होण्याचा संभव असल्यामुळे सदरील बाबतीत मी खुलाशाबाबत एवढेच सांगू

इच्छितो की हिंदु समाजाच्या हिताला धोका येऊ नये म्हणून शीख धर्म स्वीकारण्याचा विचार करण्यास मी आपली तयारी दाखविली आहे. आणि हे किती योग्य आहे याची साक्ष लाहोर येथे भरलेल्या हिंदू महासभेच्या अध्यक्षपदांवरून डॉ. कुर्तकोटी यांनी केलेल्या भाषणावरून स्पष्टपणे पटणारे आहे. (पुढील अंदाजे सात ओळी फाटल्या आहेत.) मी निवडणूकीत यशस्वी झालो तर कायदे मंडळात कोणत्या धोरणाने वागेन याची कल्पना मतदारांना आजपर्यंत माझ्या सार्वजनिक कामगिरीवरून सहज करता येण्यासारखी आहे.

बहुजन समाजातर्फे कामगिरी

तिन्ही राऊंड टेबल परिषदांमध्ये मी भाग घेतला होता. यात केवळ अस्पृश्यांचीच बाजू मी मांडली असे नाहीतर हिंदूस्थानातील बहुजन समाजाची बाजू शक्य तितक्या रीतीने जोराने मांडण्यास मी कसूर केली नाही. ज्या 'फेडरेशनच्या' विरुद्ध सध्या इतकी हाकाटी चालली आहे त्या फेडरेशनच्या कल्पनेच्या बुडाशी असलेला डाव ओळखून तो हाणून पाडण्यासाठी मी माझ्या प्रयत्नांची शिकस्त केली. परंतु आता फेडरेशनच्या नावाने दगड फोडणाऱ्या काँग्रेसच्या अनन्य प्रतिनिधीने संस्थानिकांना शरणचिठ्ठी लिहून दिल्यामुळे मला पाठबळ मिळाले नाही व त्यामुळे ब्रिटिश नोकरशाहीचे आसन मजबूत ठेवण्याचा डाव राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये सिद्धीस गेला. याची साक्ष 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया' वगैरे वस्तुस्थिती जाणणाऱ्या पत्रांनी दिली आहे आणि राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या रिपोर्टामध्ये ती केव्हाही कोणाला सापडेल. नवीन राज्यघटनेमधील आर्थिक हितसंबंधाच्या बाबी ठरविताना ही सदरील कॉन्फरन्समध्ये वेळोवेळी मी लोकपक्षाची बाज शक्य तितक्या जोराने मांडली. मुसलमानांच्या बाबतीत काँग्रेसच्या अनन्य प्रतिनिधीने जे धोरण लंडनमध्ये ठेवले होते तेच धोरण अस्पृश्यांच्या बाबतीत ठेवण्यात आले असते आणि इतरांबरोबर कारस्थाने करून व माझ्यामागे ससेमिरा लावून अस्पृश्यांसंबंधीच्या प्रश्नातच मला गुंतवून ठेवण्यात आले नसते तर हिंदी लोक–पक्षाच्या वतीने आणखी पुष्कळ कामगिरी मी करू शकलो असतो. झाल्या गोष्टीस इलाज नाही, परंतु माझ्याविरुद्ध हाकाटी (पुढील अंदाजे २० ओळी नष्ट झाल्या आहेत.)

मी माझ्या प्राप्तीकडे लक्ष न देता मजूरांच्या वतीने केसेस कोर्टात लढविल्या आहेत. हल्ली अंबरनाथ येथील संपाच्या प्रकरणात तेथले कामगार पुढारी श्री. परुळेकर यांच्यातर्फे मी काम चालविले.

काँग्रेसच्या कायदेभंग चळवळीतून उपस्थित झालेल्या चिरनेर प्रकरणातील आरोपींच्या बचावाचे काम मी केले व ते कसे मनःपूर्वक व चांगल्यारीतीने केले

याची साक्ष त्या खटल्यातील माझे सहकारी वकील, बॅरिस्टर्स व खुद्द आरोपीही देतील.

स्वतंत्र मजूर पक्ष

गरीब वर्गातील लोकांसाठी संघटित रीतीने चळवळ करता यावी यासाठी 'स्वतंत्र मजूर पक्ष' (इंडिपेन्डन्ट लेबर पार्टी) नावाचा पक्ष मी स्थापलेला आहे. केवळ अस्पृश्य मानलेल्या जातींच्या हितासाठीच हा पक्ष नसून सर्व जातींच्या– शेतकरी, कामकरी, शेतकरी कुळे, मध्यम वर्गातील नोकरी पेशाचे लोक आणि किरकोळ व्यापारी उदमी लोक यांच्या योग्य हितसंबंधांचे संरक्षण करून त्यांना विशेष हक्क व सवलती मिळवून देणे हा या पक्षाचा उद्देश आहे. या पक्षात समाविष्ट होण्याला त्याची तत्त्वे व कार्यपद्धती मान्य असणाऱ्या सर्व लोकांना मोकळीक आहे. शेतकरी, कुळे व शेतमजूर–विशेषत: खोती आणि तालुकदारी कुळे यांच्या हितसंबंधाचे संरक्षण करणे, कामगारांच्या मजुरीची किमान मर्यादा ठरवून देणे, कामाचे तास कमी करणे, गिरण्या व कारखान्यातील नोकरीची शाश्वती व बढती यांची कायदेशीर तरतूद करणे, कामाचे योग्य वेतन, पगारी रजा, आजारीपणात भत्ता, वृद्धपणी पेन्शन, अपघाताबद्दल नुकसान भरपाई, बेकारीचा भत्ता, कामगारांसाठी स्वस्त भाड्याची आरोग्यशीर घरे, इत्यादी आवश्यक गोष्टींची कायदेशीर तरतूद करणे, शेतकऱ्यांचे व कामकऱ्यांचे कर्ज कमी करून व्याजाच्या दरावर, व खोटे दस्ताऐवज वगैरे करून घेण्याच्या बाबतीत नियंत्रण घालणे, मध्यम स्थितीतील लोकांसाठी घरभाड्याचा कायदा करवून घेणे वगैरे गोष्टींचा समावेश स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यक्रमात करण्यात आला आहे. हा कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी जरूर ते कायदे घडवून आणण्याचा मी माझ्या पक्षातर्फे प्रयत्न करीन.

काँग्रेससारखा पक्ष अस्तित्वात असताना हा नवा पक्ष का स्थापला, असे कोणी विचारील तर त्याला उत्तर हे की काँग्रेस ही फक्त गरीब वर्गाची नाही. तिच्यात धनिक व्यापारी, कारखानदार, जमीनदार, सावकार अशा वर्गातल्या लोकांचाही समावेश होतो. आणि धनिक वर्ग व गरीब वर्ग यांचे हितसंबंध एका स्वरूपाचे नाहीत; इतकेच नव्हे तर ते पुष्कळ वेळा एकमेकांच्या विरुद्ध असतात. नवीन कायदे मंडळात निरनिराळ्या प्रकारचे कायदे पसार होणार आणि ते जसे असतील त्याप्रमाणे गरीब वर्गांना फायदेशीर किंवा बाधक होणार, हे निश्चित आहे. मग काँग्रेस म्हणते त्याप्रमाणे कायदेमंडळे केव्हा मोडतील तेव्हा मोडोत किंवा नवीन राज्यघटना केव्हा उलथून पडणार असेल तेव्हा पडो. स्वतंत्र मजूर पक्षाची आवश्यकता यामुळे उत्पन्न झालेली आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार करून आणि सध्या ई व एफ भागातून निवडून येण्यासाठी जे उमेदवार उभे राहिलेले आहेत त्यापैकी कोणता उमेदवार कामकरी, शेतकरी, शेतकी कुळे आणि गरीब स्थितीतल्या नोकरपेशाचा व व्यापारी उदमी मध्यमवर्ग यांच्यातर्फे कायदेमंडळात लढेल व कामगिरी बजावील ते ओळखून मतदारांनी आपल्या मतांचा उपयोग करावा अशी विनंती आहे.

मतदारांनी माझ्यावर विश्वास ठेवून आपली मते मला दिली तर स्वतंत्र मजूर पक्ष मजबूत होईल आणि मतदारांनी ठेवलेल्या विश्वासाचे सार्थक करण्यासाठी काया-वाचा-मने करून मी झटेन, असे आश्वासन देतो.

— ० —

१९. या जागा मानाच्या नसून मान्याच्या आहेत

(नाशिक जिल्ह्यातील प्रचार दौऱ्यात दिलेल्या भाषणांचा अहवाल. जनता, दि. ३० जानेवारी १९३७)

प्रिय बंधू–भगिनींनो,

आजच्या प्रसंगी तुम्हास येथे बोलविण्याचे कारण प्रसिद्ध झालेल्या हस्तपत्राद्वारे तुम्हास कळविले आहेच. मुंबई कायदे मंडळाच्या आगामी निवडणुकीत आपण कोणास मते देऊन निवडून आणावे याचा विचार आपणास करावयाचा आहे. या देशात अनेक राजे होऊन गेले. इंग्रजानाही येथे येऊन उणीपुरी १५० वर्षे झाली आहेत. या १५० वर्षांच्या इंग्रजांच्या कारकीर्दीपैकी सुमारे ६० वर्षांपासून ही कौन्सिले अंमलात आली आहेत, व या कौन्सिलाद्वारे जनतेचे प्रतिनिधी आपल्या लोकांची गाऱ्हाणी सरकारकडे मांडीत आहेत. परंतु ८ कोटी अस्पृश्य मानलेल्या वर्गातर्फे त्यांचे गाऱ्हाणे मांडणारा त्यांचा प्रतिनिधी असावा ही गोष्ट जगाच्या इतिहासात आतापर्यंत घडली नाही. ती गोष्ट आपल्या प्रयत्नांनी झाली आहे. येत्या एप्रिल १९३७ पासून सुरू होणाऱ्या कायदेमंडळासाठी नासिक जिल्ह्यांतील लोकांस एक प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार मिळाला आहे. आता जे कौन्सिल भरणार आहे त्यात आपल्या सुखदुःखाची दाद लावण्याची संधी प्राप्त झाली आहे. आतापर्यंतचा शिरस्ता, आपली गाऱ्हाणी सरकारी अधिकाऱ्यांमार्फत मांडण्याचा असे. परंतु यापुढे आपले गाऱ्हाणे कायदेमंडळाकडे करावे लागेल. आपल्या सर्व सुखदुःखांचा जेथे विचार होणार आहे अशा कायदेमंडळाच्या रिंगणात तुमच्यातर्फे जाणारा मनुष्य चांगला मजबूत असला पाहिजे. या जागा मानाच्या नसून मान्याच्या आहेत. कायदे–मडळात जाणारा मनुष्य हा स्वतःसाठी जात नसून आपल्या समाजासाठी जात आहे. समाजहिताच्या दृष्टीने उद्भवणाऱ्या प्रश्नांचा साधकबाधक विचार करून कायदेमंडळात आपल्या वतीने लढणारा मनुष्य आपण निवडून द्यावयास हवा आहे. कायदे–मंडळ हे आपल्या बचावाचे साधन आहे.

आपल्या जिल्ह्यातील पश्चिम भागातर्फे एक प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार तुम्हास मिळाला आहे. या एका जागेसाठी श्री. भाऊराव गायकवाड व रामचंद्र रोकडे असे दोन उमेदवार उभे आहेत. या दोघांनाही तुम्ही चांगल्या तऱ्हेने ओळखता तेव्हा याबाबत मी शिफारस करण्याचे प्रयोजन नाही.

...६

या कायदेमंडळाद्वारे महार लोकांच्या वतनाचा विचार होणे जरूर आहे. तुम्हास जमिनी नसल्याने पिडित असलेल्या जमिनी तुम्हास हव्या आहेत. आपला समाज शिक्षणात मागासलेला असल्याने आपल्या मुलाबाळांना योग्य असे शिक्षण मिळाले पाहिजे गरीबी असल्यास सरकारी स्कॉलरशिपा मिळाल्या पाहिजेत. तुम्हास अस्पृश्य लेखल्यामुळे तुमची झालेली कुचंबणा थांबविण्यासाठी अस्पृश्यता निवारणाविषयी कायदा होणे जरूर आहे आपल्या लोकांची सरकारी नोकरीत योग्य त्या प्रमाणात भरती होणे जरूर असल्याने त्याबाबत तशी तरतूद झाली पाहिजे. अशा एक ना दोन शेकडो गोष्टी या कायदेमंडळाद्वारे झगडून मिळविल्या पाहिजेत हे कार्य या दोन उमेदवारापैकी कोण करील असे तुम्हास वाटते ? (हे काम गायकवाड करतील, असे सभेत लोक ओरडतात)

नेहमीच्या व्यवहारात आपण असे पाहतो की जर एखाद्या इसमास घर बांधावयाचे असल्यास सुताराची गरज लागली तर जो सुताराचे काम जाणतो त्यासच आपण त्या कामी लावतो. गवंड्याचे कामासाठी गवंडी काम करणाऱ्यासच नेमतो. तद्वतच कायदे-मंडळात व्हावयाची कामे कोण चांगल्या प्रकारे करील हे तुम्ही विचार करून ठरविणे अत्यंत जरूर आहे. तेथे आंगाजांघाचा पाहता कामा नये. सोयऱ्याधायऱ्याचे नाते ओळखता कामा नये, अगर आपसातील द्वेषाने प्रेरित होऊन सूडाच्या भावनेने भांबविता कामा नये. आपली गाऱ्हाणी कायदे-मंडळात मांडून जो ती निवारण करील असे तुम्हास वाटते त्यासच आपण मते देऊन निवडून आणणे जरूर आहे जो मनुष्य कायदेमंडळासाठी लायक असेल त्यासच कायदेमंडळात पाठवा.

आता आपल्यापुढे एका जागेसाठी उभे राहिलेल्या दोन उमेदवारात जास्त लायक कोण हे पाहणे अत्यंत जरूर आहे. श्री. भाऊराव गायकवाड यांनी गेली कित्येक वर्षे केलेली सार्वजनिक सेवा मशहूर आहे. लोकल बोर्ड व नाशिक म्युनिसिपालिटीसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर गेली कैक वर्षे जबाबदारीची कामे त्यांनी केली आहेत. आपल्या जिल्ह्यातील लोकांची गाऱ्हाणी सरकार दरबारात मांडून ती निवारण करण्याचे प्रयत्न गेल्या सहा-सात वर्षांपासून ते करीत आहेत. नाशिक जिल्हा हा अस्पृश्य मानलेल्या समाजाच्या चळवळीचे केन्द्र झालेला आहे. गेली पाच-सहा वर्षे या जिल्ह्यात चळवळीचा किती मोठा धुमाकूळ माजला होता, याची जाणीव तुम्हा सर्वांना आहे. त्या सर्व चळवळीत त्यांनी माऱ्याच्या व जबाबदारीच्या जागी राहून केलेली सेवा तुमच्या नजरेपुढे आहेच. त्या चळवळीत कित्येक प्रसंगी मारहाण तर कित्येक प्रसंगी सरकारकडून दंड तर कित्येक प्रसगी तुरुंगवासाच्या सक्त मजुरीची शिक्षाही त्यांनी भोगल्या आहेत. श्री. भाऊराव गायकवाड यांची ही कामगिरी लक्षात घेऊनच स्वतंत्र मजूर पक्षातर्फे मी त्यांचे नाव सुचविले आहे. श्री. गायकवाड यांच्याविरुद्ध

श्री. रामचंद्र रोकडे उभे आहेत. ते मंदीर–प्रवेश सत्याग्रहाचेवेळी कोठे दडून बसले होते ? सार्वजनिक सेवा म्हणून ज्याला म्हणतात ती काहीतरी त्यांच्या पाठीशी आहे काय ? (नाही–नाही म्हणून लोक ओरडतात.) १९३५ च्या इंडिया ॲक्टात स्पष्टपणे म्हटले आहे की यापुढे मुंबई कायदे–मंडळाच्या सभांचे कामकाज इंग्रजीतून चालेल जर आपले काही गाऱ्हाणे कायदेमंडळापुढे मांडणे असल्यास ते इंग्रजीतूनच मांडले पाहिजे, असा स्पष्ट निर्बंध आहे. असे असता आपले गाऱ्हाणे इंग्रजीतून मांडण्याइतके इंग्रजी श्री. रोकडे यांना येते काय ? (नाही–नाही म्हणून लोक ओरडतात.) रोकडे यांनी प्रसिद्ध केलेल्या विनंतीपत्रात ते म्हणतात की मी कोणत्याही पक्षातर्फे अगर संस्थेतर्फे उभा नाही. जर रोकडे कोणत्याही पक्षातर्फे उभे नसतील तर मग त्यांच्या कार्यात त्यांना कोण मदत करणार ? ना पशू ना पक्षी म्हणणाऱ्या वटवाघुळासारखी स्थिती अशा इसमाची झाल्याशिवाय राहील काय ? त्यापेक्षा सरळ काँग्रेस अगर अशाच इतर संस्थेतर्फे रोकडे उभे राहिले असते तर एकवेळ परवडले असते. परंतु ना ही धड, ना ती धड ही स्थिती बरी नाही.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता उभे राहिलेल्या उमेदवारात कायदे-मंडळासाठी लायक कोण नि नालायक कोण हे शोधून काढणे अत्यंत सोपे काम झाले आहे. कारण श्री. भाऊराव गायकवाड व श्री. रामचंद्र रोकडे यांची सार्वजनिक कार्याच्या दृष्टीने, हुशारीच्या दृष्टीने, कर्तबगारीच्या दृष्टीने, अनुभवाच्या दृष्टीने, शिक्षणाच्या दृष्टीने सर्व तऱ्हेने तुलना करता :

" कहां राजा नि कहां पोतराजा "
" कोठे पर्वत तर कोठे खडा "
" कोठे सोने तर कोठे कथील "
" कोठे घोडा तर कोठे गाढव "

इतके अंतर उभय उमेदवारात आहे, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. असे असता तुम्हाला बुचकळ्यात पडण्यासारखे काय आहे ? तरी सर्वांनी आपली चारही मते श्री. भाऊराव गायकवाड यांनाच द्यावी अशी मी विनंती करतो.

मला असे कळले आहे की काही विरोधकांनी आपल्याकडेस मते मागण्यासाठी आले असता दोन मते श्री. गायकवाडास द्या व दोन मते श्री. रोकडयास द्या, अशी विनंती करीत फिरत आहेत. कारण, दोन्ही उमेदवार जातीचीच लेकरे आहेत असेही ते प्रचारक सांगत फिरत असल्याचे समजते. याबाबत मला तुम्हाला स्पष्ट सांगावयाचे आहे की या जिल्हयातर्फे आपल्याला एकच इसम निवडून द्यावयाचा असल्याने मतांची अशी विभागणी करून भागणार नाही. आणि जर तुम्हास दिलेल्या एका जागेसाठी मिळालेली मते तुम्ही अशी निरर्थक वाटू लागलात

तर त्यात तुमचा आत्मघात आहे मोठे असे नुकसान आहे. हे विसरून चालणार नाही तसेच तुमच्या या मतांकरिता लोक तुम्हास पैशांची लालूच दाखवितील. कामापुरता मामा या न्यायाने गोड थापा मारतील. परंतु तुम्ही कोणत्याही मोहास बळी पडू नका मताचा मिळालेला अधिकार हे तुमच्या मुक्तीचे साधन आहे मुक्तीचे मिळालेले साधन जर तुम्ही पैशावारी विकाल तर मग तुमच्यासारखे आत्मघातकी समाजद्रोही व मुर्ख तुम्हीच. यासाठी बंधूनो आणि भगिनींनो कोणत्याही स्थितीत तुम्हास मिळालेला हा अधिकार पैशावारी विकू नका, अशी नम्र सूचना आहे.

मी काल येथे आल्यानंतर श्री. रोकडे हे फार श्रीमंत आहेत म्हणून त्यांना मते द्यावीत म्हणून काही लोक म्हणत असल्याचे मी ऐकले. या बाबत मी तुम्हास स्पष्टपणे सांगतो की बाबांनो, कायदे मंडळे ही काही श्रीमंतीची प्रदर्शने मांडण्याची ठिकाणे नाहीत. तेथे गरीब अगर श्रीमंत हा भेद नसून 'ज्याची तरवार खंबीर तो हंबीर' या न्यायाने कायदेमंडळात आपल्या पक्षाच्या वतीने भांडणारा रस्त्यावरचा भिकारी हा श्रीमंतीत आणि ऐषआरामात लोळणाऱ्या नादान, ऐदी व मुर्ख श्रीमंतापेक्षा अनेक पटीने श्रेष्ठ आहे. कायदे-मंडळात निवडावयाच्या उमेदवाराची लायकी ही श्रीमंतीवर अधिष्ठित झाली नसून ती कर्तबगारीवर, समाजसेवेवर व खडतर तपस्येवर अधिष्ठित झाली आहे. नुसत्या श्रीमंतीवर भुलण्याचे काही कारण नाही. कारण संभाजी रोकडे यांच्या निधनानंतर त्यांच्या संपत्तीचा वारसा त्यांच्या मुलाकडे गेलेला आहे. श्रीमंत धोंडिबा रणखाब्यांच्या निधनानंतर त्यांच्या संपत्तीचा वारसा त्यांच्या मुलाकडेच गेला आहे माझ्या निधनानंतर माझ्या संपत्तीचा वारसा माझ्या मुलाकडे जाईल. जर असे आहे तर मग श्रीमंतांच्या नुसत्या श्रीमंतीचे तुम्हा-आम्हाला काय ? कित्येक लोक असे म्हणतात की कायदे मडळात अत्यंत हुशार आणि कर्तबगार लोकांचीच जरूरी आहे, असे नाही. मराठा समाजाच्या उमेदवाराकडे व मागे कौन्सिलर असलेल्याकडे पाहिल्यास ही गोष्ट दिसून येईल. यावर माझे असे म्हणणे आहे की मराठ्यांचा एखादा वाटोळचा पगडीचा व अडाणी इसम कायदे मंडळात गेला तरी चालेल. परंतु तुमचा मनुष्य मात्र तसाच पाठवून भागणार नाही. तर तो त्यापेक्षा १५ पट हुशार व कर्तबगार असावयास हवा.

आपल्या या नाशिक जिल्ह्यात गायकवाड व रणखांबे हे दोघेही कार्यकर्ते असताना भांऊराव गायकवाडाचीच निवड मी का केली, याबद्दल बराच संशय माजल्याचे माझ्या ऐकिवात आहे. आपल्या नाशिक जिल्ह्यातील दोन इसम-गायकवाड व रणखांबे हे कायदे-मंडळात जाण्यास लायक आहेत, ही गोष्ट खरी. म्हणूनच चार (दिवस) असताना मी स्पष्टपणे सांगितले की नाशिक जिल्ह्यातर्फे कायदे मंडळाच्या निवडणुकीस (कोणी उभे) राहावे हे तुम्ही उभयता आपसात

ठरवून मला कळवा. तसेच तुम्हा उभयतात जर (निर्णय ठरला) नाही व निकाल देण्याची पाळी माझ्यावर आली तर मात्र मी भाऊराव गायकवाड यांच्या (बाजूने मत) देईन, असे रणखांबे यांनाही सांगितले. या उभयतात अधिक लायक कोण हे तुम्हापेक्षा मी चांगले जाणतो आतापर्यंत अमृतराव रणखांबे यांनी अध्यक्ष व स्वागताध्यक्ष म्हणून अनेक सभात जी भाषणे केली ती अमृतरावांची नसून भाऊराव गायकवाडांनी लिहून दिली आहेत, हे मी जाणतो. रणखांब्यांचा बोलविता धनी वेगळाची असल्याची मूळकथा मला पूर्णपणे माहीत आहे व म्हणून अमृतराव रणखांब्यांपेक्षा भाऊराव गायकवाड मला अधिक लायक वाटले.

दुसरे असे की रणखांबे यांनी राजीखुषीने अंमलपाणी न करता स्वतःच्या सहीने पत्र पाठवून मला स्पष्टपणे कळविले आहे की कायदेमडळात नाशिक जिल्ह्याच्या राखीव जागेसाठी श्री. भाऊराव गायकवाड यांनाच तिकिट द्या. असे असता आज श्री. रणखांबे यांनी श्री. गायकवाड यांच्या उमेदवारीस मदत करावयास हवी आहे. परंतु प्रत्यक्ष तसे न करता अगर तटस्थही न राहता रणखांबे उघड–उघड भाऊराव गायकवाड यांच्या उमेदवारीस विरोध करीत आहेत यास काय म्हणावे? तसे पाहता रणखांबे घराण्याचा व रोकडे घराण्याचा माझ्या माहितीप्रमाणे गेली सात-आठ वर्षे काही कारणामुळे वाद होता. उभयतात सलोखा अगर प्रेमभाव तर मुळीच नव्हता. असे असता रणखांबे यांचे नाव मी कायदे मंडळासाठी सुचविले नाही म्हणून गेली कैक वर्षे भावा–भावाप्रमाणे व गुण्यागोविंदाने राहिलेल्या गायकवाडाविरुद्ध रणखांब्यांनी जाऊन विरोधी गटाच्या गळचात मिठचा माराव्यात व ज्याला आजपर्यंत मित्र म्हणवून घेतले त्याला विरोध करावा हे रणखांब्यांचे करणे न्यायाचे नाही; अयोग्य आहे. नाशिक जिल्ह्यात असलेली संघटना दुभंगून जो निरर्थक बेबनाव व बखेडा माजविला आहे त्यास श्री. रणखांबे जबाबदार आहेत.

माझे भाषण संपविण्यापूर्वी मला तुम्हाला एक आग्रहाची विनंती करावयाची आहे की ता. १ जानेवारी १९३७ बुधवार रोजी मतदार बंधू भगिनींनी आपल्या स्वतःच्या खर्चाने अगर पायी आपल्या पोलिस स्टेशनवर जाऊन आपली चारही मते, स्वतंत्र मजूर पक्षातर्फे, मी उभे केलेले उमेदवार भाऊराव गायकवाड यांनाच द्यावीत. त्यांची निशाणी घोडा असून घोड्याच्या चित्राच्या उजव्या बाजूस चार फुल्या कराव्यात.

— ० —

२०. अधिकारग्रहण नाकारण्यात काँग्रेसच दोषी

(पत्रक, जनता, दिनांक १० एप्रिल १९३७.)

काँग्रेसने अधिकारग्रहण नाकारताच सहा प्रांतातील गव्हर्नरांनी हंगामी मंत्रीमंडळे स्थापन केली म्हणून काँग्रेसने त्या गव्हर्नरांना का दोष द्यावयास तयार व्हावे, हेच मला कळत नाही. ज्यावेळी कायदेमंडळातील बहुसंख्यांक पक्ष मंत्रीमंडळ स्थापन करण्याचे नाकारतो त्यावेळी दुसरा एखादा पक्ष बहुमत मिळविण्याचे आश्वासन देत असल्यास त्याला मंत्रीमंडळ स्थापण्याचे आमंत्रण गव्हर्नर देईलच. या बाबतीत काँग्रेसने गव्हर्नरला दोषी ठरविण्याऐवजी ते दोषाचे माप आपल्याच पदरात घेणे अधिक श्रेयस्कर ठरेल.

आता मुख्य प्रश्न असा आहे की मंत्रीमंडळ स्थापन करताना काँग्रेसने गव्हर्नरांकडून आश्वासन मागणे योग्य आहे काय ? आणि अशा प्रकारचे आश्वासन देणे कायदेशीररित्या गैर नव्हते असे काँग्रेसचे प्रमुख कायदे पंडित श्री. भुलाबाई देसाई व मद्रासचे पुढारी राजगोपालाचारी यांचे म्हणणे आहे. बहुसंख्यांक मतांचा पाठिंबा असलेल्या मंत्रीमंडळाविरुद्ध राजाला आपला व्हेटोचा अधिकार गाजविता येत नाही, असे मि. देसाई म्हणतात. परंतु अशाप्रकारच्या मंत्रीमंडळाविरुद्ध राजाने व्हेटोचा अधिकार गाजविल्याची कित्येक उदाहरणे इतिहासात दाखवून देता येतील. मि. देसाई हे राजाच्या व्हेटोच्या अधिकाराची नव्या घटनेनुसार गव्हर्नरला मिळालेल्या अधिकाराशी सांगड घालू पाहात आहेत. परंतु हे दोन्ही अधिकार अगदी भिन्न आहेत, याची जाणीव मि. देसाई यांना मी करून देऊ इच्छितो. व्हेटोच्या अधिकाराने राजा प्रधानाचा सल्ला नाकारू शकेल. परंतु स्वत: प्रधानमंडळाच्या विचारविनिमयाशिवाय तो काहीच करू शकणार नाही. याच्या उलट गव्हर्नर मंत्र्याचा सल्ला मान्य करणार नाही इतकेच नव्हेतर त्याच्या मदतीवाचून राज्यकारभार चालवू शकेल. तसेच पार्लमेंटरी पद्धतीतील मंत्री व नव्या घटनेप्रमाणे येणारे मंत्रीमंडळ यात मुळीच फरक नाही, असे श्री. राजगोपालाचारी यांना वाटत असावे. पण ती त्यांची चूक आहे. नव्या घटनेनुसार सर्वकाही बऱ्यावाईट कृत्याबद्दल गव्हर्नर जबाबदार आहेत. त्याचप्रमाणे तेथे राजा जबाबदार नसून प्रधान जबाबदार धरला जातो.

काँग्रेसच्या ठरावानुसार गव्हर्नरांनी जरी आश्वासन दिले असते तरी काँग्रेस अधिक असा कोणता लाभ झाला असता ? गव्हर्नरला आपले जादा अधिकार

कधी वापरावयाचे हे ठरविण्याचा अधिकार मंत्रीमंडळाला असावा, असे काँग्रेसने आश्वासन मागितले असते तर प्रश्न निराळा होता. व्हिक्टोरिआ राणीच्या कार-कीर्दीत मुख्य प्रधान ग्लॅडस्टनचे व राणीचे बरे नसताही त्याने कित्येक वर्षे राज्यकारभार सुरळीत चालविलाच की नाही? आश्वासनाची आवश्यकता बहुसंख्यांक मतदारांचा पाठिंबा असलेल्या मंत्र्यांना असण्याऐवजी ती अल्पसंख्यांक मतदारांचा पाठिंबा असलेल्या मंत्र्यांना अधिक भासली असती. आता ज्या बहुजन समाजाचा काँग्रेसला इतका पाठिंबा मिळाला त्यांच्या खऱ्या हितासाठी ती काय करते हेच पाहावयाचे आहे.

— ० —

२१. आम्हाला लाभालोभासाठी कोणत्याही संस्थेत विरून जावयाचे नाही

(दि. ७-५-३७ रोजी मुंबई येथे भरलेल्या अभिनंदनाच्या सभेतील भाषण. जनता, दि. १२-६-१९३७)

या ठिकाणी माझ्याबरोबर स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निवडलेल्या सर्व सभासदांचे अभिनंदन करण्यात आले असता या प्रसंगी भाषण करण्याची जबाबदारी माझ्या एकट्यावरच का टाकण्यात यावी, हे मला कळत नाही. तरीपण आपल्या इच्छेला मान देऊन मी दोन शब्द बोलणार आहे. मी आपल्या सार्वजनिक कामाची सुरवात केल्यापासून तो गेल्या वर्षांपर्यंत अस्पृश्य वर्गाच्या वळवळीतच मी कार्य केले. परंतु बदललेल्या परिस्थितीला अनुसरून मी आपल्या कामाची दिशा बदलली. आणि यापुढे धर्म आणि जात यांचा विचार न करता सर्व शेतकरी कामकरी वर्गाच्या हिताच्या दृष्टीने काम करण्याकरिता सुरवात केली. मी स्थापना केलेला स्वतंत्र मजूर पक्ष हाच माझ्या बदललेल्या कार्यक्रमाचा द्योतक आहे. गेल्या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाने स्पृहणीय यश मिळविले ही गोष्ट खरी असली तरी आमच्यातील दोन कळकळीचे कार्यकर्ते– डॉ. सोळंकी व सुभेदार सवादकर हे निवडणुकीत अयशस्वी झाले, याबद्दल माझ्याप्रमाणेच आपणा सर्वांना वाईट वाटत असेल यात शंका नाही. निवडणुकीत अपयश आले असून देखील आजच्या या अभिनंदनाच्या सभेत त्यांनी मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने भाग घेतला आहे. यावरून त्यांच्या मनाचा मोठेपणा व्यक्त होत आहे. डॉ. सोळंकी यांना असेंब्लीच्या निवडणुकीत अपयश आले असले तरी लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये सरकार नियुक्त सभासद म्हणून बसण्याची संधी त्यांना लाभेल, अशी मला आशा आहे.

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल अभिनंदन करण्याला कोणता पक्ष पात्र असेल तर तो स्वतंत्र मजूर पक्षच होय. कारण, स्वतंत्र मजर पक्षाला ज्या इतर पक्षाबरोबर टक्कर द्यावी लागली ते सर्व पक्ष आमच्यापेक्षा अनेक पटीने प्रबल होते. ते सधन आणि संघटित असून त्यांना सर्व प्रकारची परिस्थिती अनुकूल होती. मुंबई इलाख्यात काँग्रेस, ब्राह्मणेतर, मुसलमान, ख्रिश्चन वगैरे अनेक पक्षातील उमेदवार निवडणूक लढवीत होते. त्यापैकी

मुसलमानांनी सवत्या-सुभ्याचे काटेरी कुंपण आपल्या भोवती घातलेले होते. आमचा व काँग्रेसचा आखाडा एकच होता. आमच्या बरोबर ब्राह्मणेतर पक्षही त्याच आखाड्यात उतरला होता. परंतु स्वत:ला लढवय्ये म्हणविणाऱ्या ब्राह्मणेतर पक्षाची काँग्रेसने कशी धुळधाण उडवून दिली हे सर्वांनी पाहिलेच आहे. त्याच प्रमाणे इतर पक्षांच्या पदरीही अपयश आले. परंतु काँग्रेस बरोबर झालेल्या संग्रामात जर कोणता पक्ष विजयी झाला असेल तर तो एकटा स्वतंत्र मजूर पक्षच होय. आमच्या पक्षाजवळ पैसा नव्हता संघटना नव्हती केवळ स्वत:च्या चिकाटीने प्रचार कार्याच्या बळावरच आमची १४ माणसे निवडून येऊ शकली, आणि काँग्रेससारख्या बलवान पक्षाशी दोन हात करून विजय मिळवून अधिकाराने अभिनंदन समारंभ साजरा करण्याचा हक्क आमच्या पक्षाला प्राप्त झाला आहे. निवडणुकीत इतर पक्षाची जी दैना झाली आहे तिच्याशी तुलना करता स्वतंत्र मजूर पक्षाने मिळविलेला विजय अपूर्व होय, ही गोष्ट आमच्या शत्रूंनाही कबूल करावी लागेल.

आपल्या इलाख्याप्रमाणे इतर प्रांतांच्या असेंब्लीतही अस्पृश्य वर्गाला जागा राखून ठेवलेल्या आहेत परंतु मुंबई व्यतिरिक्त इतर प्रांतात काँग्रेसने अस्पृश्य-वर्गीय उमेदवाराच्या निवडणूकीत अक्षम्य ढवळाढवळ केली. मुंबई प्रांतात मात्र आम्ही आमचा लढा वीरवृत्तीने लढविला. कुस्तीकरता एकदा दंड ठोकून उभे राहिल्यावर ज्याला जो डाव साधेल तो करून विजय मिळवावा यात काही वावगे नाही. तथापि महाभारतात सांगितले आहे की धर्मयुद्ध करून नीतीने मिळविलेल्या विजयाची थोरवी आणि आनंद श्रेष्ठ प्रतीचा असतो. दुर्दैवाने गेल्या निवडणुकीच्या युद्धात काँग्रेसने धर्मनीती ठेवलेली नव्हती. ठळक उदाहरणे द्यावयाची झाल्यास अनेक आहेत. मी फक्त एकाच उदाहरणाचा येथे उल्लेख करणार आहे. अलाहाबाद येथे काँग्रेसच्या अधिपतीच्या प्रांतात त्याच सर्वाधिकारी म्हणविणाऱ्या व्यक्तीकडून गेल्या निवडणूकीत घडलेले आचरण अगदी हीन वृत्तीचे नव्हते, असे कोण म्हणेल ? अलाहाबाद शहरात अस्पृश्य समाजाकरिता एक जागा राखून ठेवण्यात आली आहे. या जागेकरिता दोन उमेदवार उभे होते. अस्पृश्य समाजासाठी ज्याने कित्येक वर्षे तन-मन-धनाने कार्य केले असा एक लायक, अनुभवी आणि जुना पुढारी उभा होता. त्यांच्याविरुद्ध काँग्रेसचे पंचप्राण म्हणविणारे पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी आपला हरी नावाचा एक सांगकाम्या नोकर उभा केला. अस्पृश्य पुढाऱ्याच्या आजपर्यंतच्या समाज सेवेच्या तुलनेने पाहता या हरी पाणक्याची पात्रता किती असेल हे न सांगताही समजण्यासारखे आहे. काँग्रेसच्या

पुढाऱ्यांना अस्पृश्यांच्या पुढाऱ्यापेक्षा हरीची कर्तबगारी श्रेष्ठ प्रतीची वाटली. परंतु आपल्याला असल्या गोष्टीची पर्वा बाळगण्याची जरूर नाही. युद्धाला एकदा उभे राहिल्यावर रडत राऊताची वृत्ती स्वीकारण्यात काहीच अर्थ नाही. सुरत येथे डॉ. सोळंकीच्या उमेदवारीच्या वेळी तीच गोष्ट केली. काँग्रेसने डॉ. सोळंकी यांच्याविरुद्ध एका चपराशाला उभे केले होते. या सर्व गोष्टींचा विचार करता गेल्या निवडणुकीत आपला जो विजय झाला तो सामान्य प्रतीचा खास नव्हे. मगराच्या मगरमिठीतून आणलेला हा एक दिव्य मणी आहे. अर्थातच आपण आज जो विजय मिळविला तो अखेरचा विजय नव्हे. केवळ निवडणुकीत विजय मिळविल्याने आपल्या चळवळीचे कार्य संपले, असे समजू नका. नवीन कायदे मंडळाची मुदत पाच वर्षांची असली तरी या मुदतीच्य आतदेखील हे कायदे मंडळ मोडून टाकण्याचा अधिकार गव्हर्नरला आहे. असा प्रसंग केव्हा येईल हे आज जरी सांगता आले नाही तरी फेरनिवडणुकीसाठी आपण आपल्या पक्षाची सर्व प्रकारची जय्यत तयारी ठेवली पाहिजे. आणि सूचना मिळताच अवघ्या पाच मिनिटात आपण निवडणुकीच्या संग्रामाला सिद्ध झाले पाहिजे. स्वतंत्र मजूर पक्षाने आज बहूजन समाजात जो आत्मविश्वास आणि जागृती निर्माण केली आहे. ती अखंड चालू ठेवण्याची योग्य खबरदारी आपण सर्वांनी घेणे अत्यंत जरूर आहे. पक्ष संघटनेच्या दृष्टीने ठिकठिकाणी पक्षाच्या शाखा स्थापन केल्या पाहिजेत. काँग्रेस पक्षाबरोबर पुनश्च दोन हात करण्याचा प्रसंग आल्यास आपल्या पक्षाचा जोम पूर्वीपेक्षाही अधिकच वाढलेला आहे, ही गोष्ट आपण जगाच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

जाता जाता चालू परिस्थितीविषयी दोन शब्द बोलणे जरूर आहे. तुम्हाला ठाऊकच आहे की आज राजकीय क्षेत्रात जिकडे तिकडे थंड वातावरण निर्माण झालेले आहे सारा राजकीय खेळ बंद झाला आहे. आणि सर्व बाजूला उद्वेगजनक परिस्थिती दृष्टोत्पत्तीस येत आहे. मात्र या परिस्थितीची जबाबदारी आपल्यावर बिलकूल नाही राजकारणात अल्पसंख्य पक्षाला पुढाकार घेऊन काही करता येत नाही. लोकहितांसाठी काहीतरी भरीव स्वरूपाचे कार्य करण्याची कायदेमंडळातील जबाबदारी आमच्याकडून पार पडली नाही तर त्याचा दोष ज्यांनी हा विपरीत प्रसंग निर्माण केला त्यांच्याच डोक्यावर बसेल. आज राजकारणाचा डाव बंद पडला असला तरी ज्या दिवशी हा डाव नव्याने सुरू होईल त्या वेळेस जरूर असणारी तयारी आमच्याजवळ मजबूत आहे. आम्हाला जे कायदे घडवून आणावयाचे आहेत त्यांचे बार आमच्याजवळ भरून तयार आहेत. टारगेट लावण्याची खोटी की आम्ही एकदम आमचे पिस्तुल झाडणार आहोत. आज जरी सर्वत्र निराशेचे वातावरण पसरलेले असले तरी लवकरच आशायुक्त परिस्थिती

निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. तुम्हाला निराश होण्याचे बिलकूल कारण नाही. प्रांतिक कायदेमंडळात जी माणसे तुमच्यातर्फे निवडून गेली आहेत ती तुमच्या हितासाठी सदैव जागृत राहतील, असे मी तुम्हाला आश्वासन देतो.

काँग्रेसशिवाय इतर पक्षांतर्फे निवडून आलेल्या उमेदवारांना आपला पक्ष मोडून काँग्रेसमध्ये जावे, असे वाटत आहे परंतु आम्ही अशा दुबळ्या वृत्तीने काँग्रेसला कधीच मिळणार नाही. आम्हाला श्रमजीवी बहुजन समाजाच्या सर्वांगीण हितासाठी स्थापन केलेला स्वतंत्र मजूर पक्ष जिवंत ठेवावयाचा आहे. आमची १४ जणांची संख्या अल्प असली तरी आम्हाला लाभालोभासाठी कोणत्याही संस्थेत विरून जावयाचे नाही. काँग्रेस ही संस्था सर्व प्रकारच्या लोकांची खिचडी आहे. भांडवलदार मजूर, जमीनदार-शेतकरी, खोत-सावकार व कुळे; शत्रू मित्र अशा परस्पर विरोधी वर्गाचा सबगोलंकार म्हणजेच काँग्रेस होय. अशा सबगोलकारी काँग्रेसकडून गोरगरीबांचे कधीही कल्याण होणार नाही. आपला स्वतंत्र मजूर पक्ष कामकारी व शेतकरी वर्गावर श्रीमंतांकडून जो जुलूम व अन्याय होत आहे तो नाहीसा करण्यासाठी स्थापन झालेला आहे काँग्रेसच्या आजच्या परिस्थितीवरून पाहता तिच्यामध्ये पुढे मागे दुफळी झाल्याशिवाय राहणार नाही, याची मला खात्री आहे. आणि त्यावेळी काँग्रेसमधील आपल्या विचाराची माणसे आपल्या पक्षाला येऊन मिळतील याबद्दलही मला शंका वाटत नाही.

तात्पुरत्या लाभाकरिता आम्ही काँग्रेसला मिळून अप्रामाणिकपणा करू शकत नाही. आम्हाला राष्ट्रकार्य करावयाचे आहे. सार्वजनिक प्रश्नाच्या हितासंबंधी एकमत होईल त्यावेळी तात्पुरते भेदभाव विसरून आम्ही काँग्रेसबरोबर सहकार्य करू. परंतु सर्व प्रकारचे भेदभाव कायमचे विसरून काँग्रेसबरोबर एकजीव होणे आम्हाला कधीच शक्य होणार नाही.

सध्याच्या तात्पुरत्या मंत्रीमंडळात मी दिवाणगिरी का स्वीकारली नाही, असा प्रश्न पुष्कळ लोक मला विचारतात, त्याचे उत्तर एवढेच की ज्या मंत्रीमंडळाला बहुमताचा पाठिंबा नाही ते मंत्रीमंडळ फार दिवस टिकणे शक्य नाही. आणि असल्या औटघटकेच्या राज्यकारभारात भाग घेण्याने कोणत्याही तऱ्हेचा फायदा होऊ शकत नाही.

मंत्रीमंडळे बनविण्याचे नाकारून काँग्रेसने राजकारणाच्या गाडग्याला खीळ घालण्याचा जो सध्या प्रयत्न चालविलेला आहे त्यापासून काँग्रेसचा काही एक फायदा होणार नाही. काँग्रेसने गव्हर्नराकडून मागितलेले आश्वासन अगदीच

अनावश्यक आहे. काँग्रेस पक्षाच्या पुढाऱ्यांनी अधिकारपदे स्वीकारून राज्यकारभार चालविणे हाच मार्ग काँग्रेसच्या दृष्टीनेदेखील श्रेयस्कर आहे राज्यघटना मोडण्याचे धोरण स्वतंत्र–मजूर–पक्षाला मान्य नाही. घटना रद्द झाल्यास पिळल्या जाणाऱ्या शेतकरी–कामकरी वर्गाची दुःखे आणि गाऱ्हाणी थोडयाबहुत प्रमाणात नाहीशी करण्याचा मार्गदेखील बंद होईल. कांग्रेसचा साम्राज्यशाही विरोधी लढा संपेपर्यंत आम्ही आपली दुःखे उराशी बाळगून कष्ट सोशीत बसण्याला मुळीच तयार नाही. कायदेमंडळापुढे मांडावयाच्या कायद्यांचे मसुदे आमच्या खिशात तयार आहेत. आम्ही फक्त खेळ सुरू होण्याचीच वाट पाहात आहोत.

– ० –

२२. स्वावलंबनाने संघटनेचे कार्यक्षेत्र वाढवा

(धुळे दि. ३१–७–३७ चे भाषण, जनता, दि. १४–८–३७)

उद्या. ता. १ आगष्ट रोजी गुढीपाडव्याप्रमाणे स्वराज्याचा प्रारंभ दिन म्हणून साजरा करावा, असे काँग्रेसने फर्माविले आहे. काँग्रेस पक्षाने राज्यकार-भाराची सूत्रे हातात घेतली म्हणून ते स्वराज्य झाले आणि आमच्यासारख्याने कोणी दिवाणपद घेतले तर मात्र ते स्वराज्य नव्हे, हे म्हणणे योग्य आहे काय ? भावना व तत्त्वज्ञान क्षणभर बाजूला ठेवून व्यवहारी दृष्टीने विचार केला तर असे दिसून येईल की गळे कापणारे सावकार, मजुरांना नाडणारे गिरण्यांचे मालक व आपल्याला अन्य तऱ्हेने गांजणारे लोक जसे होते तसेच या देशात राहणारे आहेत. जमीनदार लोक, पाटील लोक हे सर्व तसेच राहणार. इंग्रज लोक निघून गेले तरी हे लोक कायम राहणारे आहेत. म्हणून पूर्वीपेक्षाही आपणाला जास्त चिंता बाळगली पाहिजे. इतके दिवस एक गोष्ट आम्हाला पोषक होती. ती अशी की इंग्रज मनुष्य जातीविषयक भावना व स्पृश्यास्पृश्य विचार पाहात नव्हता. यापुढे तुम्हाला गांज-णाऱ्या लोकांच्या हातात सत्ता गेली आहे. आता आपल्या लोकांची दाद घेणार तरी कोण ? हे स्वराज्य नसून इतर लोकांचे आमच्यावर राज्य होणार आहे. म्हणून संघटना करणे हे तुमचे कर्तव्य आहे. संघटना न केल्यास तुमची दैना शतपट होईल. आज महारांवर जुलूम झाला तर पाटील, शिपाई, मामलेदार कोणी त्याला मदत करीत नाही इतकेच नव्हे तर एक महारही दुसऱ्या महाराला मदत करीत नाही. म्हणून जातीय संघटन अवश्य करा. अन्यायाच्या वेळी तरी त्याला मदत करा. पैशाशिवाय काही काम होत नाही. वकील, साक्षीदार, कोर्टाची प्रोसेस, मोटारचे भाडे या सर्व गोष्टींना पैसा लागतो. सबब न्याय मिळविण्यासाठी जातीचा फंड उभारा.

एका गावात प्रयत्न करून तुम्ही न्याय मिळविला तर त्याची दहशत इतर गावांवर पडेल. तुमचे काम दुसऱ्याने करावे, अशी अपेक्षा का करता ? तुमच्या-साठी श्री. बर्वे यांनी छात्रालय काढावे किंवा गांधींनी काढावे असे का ? महा-राष्ट्रात दहा लाख महार अस्पृश्य लोक आहेत. प्रत्येकाने एक रुपया दिला तर दहा लाखाचा फंड जमा होईल.

इंग्रज आता काही करू शकत नाही. याचे मी उदाहरण देतो. मंत्रीमंडळात होता होईल तो अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधी घ्यावेत, असे बादशहाने गव्हर्नरला दिलेल्या आज्ञा पत्रिकेत म्हटले आहे. हल्लीची मंत्रीमंडळे गांधींच्या सांगण्यावरून

तयार झाली मुंबईच्या मंत्रीमंडळात महार–मांगांचा एकही प्रतिनिधी नाही; तरी पण गव्हर्नराने त्यात हात घातला नाही.

मी काँग्रेसला का मिळाली नाही, असा प्रश्न काही लोक विचारतात. त्याची कारणे अशी आहेत :–

(१) काँग्रसच्या राजकारणात जर काही निष्पन्न झाले असेल तर ब्राह्मण्याचा उदय झाला एवढेच मला दिसते. सहा प्रांतात कोण लोक दिवाण झाले ते पाहा. ब्राह्मण मुख्य प्रधान झाले आहेत. साम्राज्यशाहीपेक्षा ब्राह्मणशाही हजारोपट वाईट आहे.

(२) मी अस्पृश्यांकरता जी चळवळ करतो ती बंद करा, असे मला सांगण्यात येते; परंतु मला पगाराची मातब्बरी नाही, किंवा मान मिळविण्याचीही मला पर्वा नाही. तुम्ही लोकांनी स्वाभिमानी बनावे हीच माझी आकांक्षा आहे; व त्याकरता स्वतंत्र चळवळ करणे मला अवश्य आहे तुमच्यात व माझ्यात फरक एवढाच की तुमच्यापेक्षा मला जास्त ज्ञान आहे. म्हणून मी जास्त पाहू शकतो व धोका कोठे आहे हे मला समजते काँग्रेसच्या लोकांनी काहीही म्हटले तरी मला त्याची पर्वा नाही. तुम्ही माणसे झालात म्हणजे माझे श्रम सफल झाले. हे स्वराज्य धोकादायक आहे ज्यांच्या हाती सामाजिक सत्ता होती त्यांच्याच हाती राजकीय सत्ताही गेली आहे. तरी आता दर एक गावाने दहा रुपये तरी फंडाला द्यावे. म्हणजे तुम्हा लोकांना न्याय मिळविता येईल. आपल्या स्वतंत्र मजूर पक्षाची पंधरा माणसे मुंबईच्या असेंब्लीत आहेत. ही माणसे एका दावणीत पक्की बांधलेली आहेत. एकाचे तोंड एकीकडे व दुसऱ्याचे दुसरीकडे असे नाही. यामुळे काँग्रेस पक्षाला कोणाची भीती वाटत असेल तर ती आमच्या पक्षाची आहे. काँग्रेस पक्षाला मुसलमानांची भीती वाटत नाही. किंवा लोकशाही पक्षाची भीती वाटत नाही. ही गोष्ट वल्लभभाई यांनी पुणे येथे जे भाषण केले त्यात उघड झाली. आपण निवडणुकीच्यावेळी संघटनेने वागलो म्हणून हे फळ मिळाले निवडणुकीच्यावेळी जी शपथ घेतली ती कायम ठेवा. आपल्या संस्थेची शाखा प्रत्येक जिल्ह्यात स्थापन केली पाहिजे. वरून मदत करणारा दाता कोणी नाही, जो कष्ट करील त्याची सत्ता असते. प्रत्येक संस्थेत आपली जास्त माणसे जातील, अशी एकजुटीने खटपट करा काँग्रेसला हरिजनांची दया असती तर कोणतीही शर्त न घालता एखादा हरिजन. त्यांनी मंत्रीमंडळात घेतला नसता काय ? पण यासाठी आपण कोणाजवळ भिक्षा मागू नये. मी काँग्रेसच्या मंडळीशी कधी मसलत केली नाही; सव्वा मैल दूर राहिलो

खानदेशात आपल्या पक्षाचे श्री. दौलत गुलाजी जाधव हे निवडून आलेले आहेत, त्यांच्याकडून काम करवून घ्या. या देशात आपणाला माणुसकीने वागवीत नाहीत, ही गोष्ट तुम्ही विसरता; परंतु मी कधीच विसरू शकत नाही. सतत जागृत राहा म्हणजे यश मिळेल.

—०—

२३. हा काँग्रेसचा जय नसून ब्राह्मणशाहीचा जय आहे

(हे भाषण दि. १४–८–१९३७ च्या जनतेच्या अंकात अग्रलेखाच्या जागी दिलेले आहे. भाषण कोठे व केव्हा झाले याचा उल्लेख नाही.)

प्रिय बंधूंनो,

आपल्या सभेस हजर राहण्यास मला अत्यंत आनंद होत आहे. स्वतंत्र-मजूर पक्षाला व्यवस्थित स्वरूप देण्याचा व आपल्या लोकात संघटना घडवून आणण्याचा हा जो उपक्रम तुम्ही सुरू केला आहे तो स्तुत्य व अत्यंत महत्वाचा आहे.

सहा महिन्यांपूर्वी होऊन गेलेल्या असेंब्ली इलेक्शनचे आपण सिंहावलोकन केल्यास त्यावेळी आपल्या लोकांनी बजावलेल्या कामगिरीबद्दल मला धन्यता वाटते. कारण अत्यंत प्रभावशाली व श्रीमंत अशा काँग्रेसशी आपणास त्यावेळी स्पर्धा करावयाची होती. स्वतंत्र मजूर पक्षांचा एकही उमेदवार निवडून येऊ द्यावयाचा नाही, असा काँग्रेसने पण केला होता. आपल्या उमेदवारास पाडण्यासाठी काँग्रेसने आटोकाट प्रयत्न केला होता. अशा बिकट परिस्थितील तोंड देण्याचे काम मला करावे लागले इतर प्रांताकडे आपण पाहिल्यास सर्वांनी काँग्रेसला शरणचिठ्ठी दिल्याचे आपणास दिसून येईल. संबंध हिंदुस्थानात काँग्रेसबरोबर लढा करण्यास काय तो मी एकटाच उभा होतो; व त्यात मी यशस्वीही झालो. मात्र ही गोष्ट केव्हाही खरी आहे की तुम्हा लोकांच्या पाठिंब्याशिवाय मला यश येणे शक्य नव्हते तुम्हाला माहीतच आहे की त्यावेळी आपल्यातीलच काही माणसे काँग्रेसला बळी पडली होती. परंतु असे असतांनासुद्धा त्यावेळी आपण मोठे यश संपादन केले। ही गोष्ट काँग्रेसचे पुरस्कर्ते देखील कबूल करतात. त्यावेळी सबंध हिंदुस्थानात काँग्रेसला तीनच जागा महत्वाच्या वाटत होत्या. त्या म्हणजे डॉ. वाडांची मुंबई युनिव्हर्सिटीची जागा, लोकशाही स्वराज्य पक्षाचे अध्वर्यू श्री लक्ष्मण बळवंत भोपटकर यांची पुण्यातील जागा आणि तिसरी स्वतंत्र मजूर पक्षाची माझी मुंबईची जागा. यापैकी पहिल्या दोन जागा काँग्रेसला मिळविता आल्या. मात्र तिसरी आपली जागा त्यांना घेता आली नाही. यामुळे काँग्रेसच्या लोकांना सुद्धा आपल्या सामर्थ्याची कल्पना आली आहे. जे वल्लभभाई पटेल इलेक्शनपूर्वी

कोणत्याही पक्षाला वर्तमानपत्राची फार जरुरी असते. वर्तमानपत्राशिवाय आपणास कार्य करता येणार नाही. म्हणून आपल्या पक्षाचे जनतापत्र चांगल्या-तऱ्हेने चालले पाहिजे तुम्ही सर्वांनी त्याचे वर्गणीदार झाले पाहिजे. कौन्सिलमध्ये तुम्ही पाठविलेले लोक तुमच्यासाठी काय करतात ते समजावून घ्यावयाचे झाल्यास तुम्हाला ते जनता पत्रावरूनच समजेल याकरिता तुम्ही सर्वांनी जनता पत्राचे वर्गणीदार जरूर झाले पाहिजे. काही लोक इतर पत्रे घेऊन वाचतात. का? तर त्यात सट्ट्याचे नंबर व भविष्ये दिलेली असतात. सट्टा खेळून कोणाचेही बरे झाले नाही. शिवाय वर्तमानपत्रात वर्तवलेली भविष्ये खरी ठरत नाहीत. आपल्या पत्राशिवाय आपल्या पक्षाचे अधिकृत कार्यक्रम व चळवळीची खरी दिशा इतर वर्तमानपत्रात वाचावयास मिळणार नाही. यासाठी आणि आपल्या पक्षाचा अभिमान बाळगण्यासाठी सर्वांनी जनता पत्राचे वर्गणीदार झाले पाहिजे.

शेवटी तुम्हाला मला एकच अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगावयाची आहे ती ही की तुम्ही तुमच्यात असलेली मानापानाची वाईट भावना काढून टाकली पाहिजे. माझे नाव आले नाही तर मी पुढे आलेल्या कार्याला विरोध करीन ही भावना अत्यंत वाईट आहे तुम्ही काम करा की नाव तुमच्या पाठीस लागेल. मला व माझ्या सहकारी मित्रांना माहीत आहे की जोपर्यंत आम्ही काही कार्य करून दाखविले नव्हते तोपर्यंत टाईम्ससारख्या पत्रात थोडासा मजकूर छापण्या-साठी आम्हास कितीतरी मनधरणी करावी लागत होती. परंतु आता तेच लोक "तुमचा काही मजकूर आहे काय ? असल्यास पाठवा" असे आमच्या पाठीमागे लागतात. सर्व लोकांनी राजकारणातील व समाजकारणातील भांडणे तात्काळ विसरून गेले पाहिजे. मागे होऊन गेलेल्या महार परिषदेच्या वेळेस मला असे दिसून आले की ज्यांच्या हातात त्या परिषदेची अधिकारसूत्रे मिळाली होती त्यापैकी काही लोकांनी त्या अधिकाराचा आपसातील भांडणाकडे दुरुपयोग केला. असे होता कामा नये.

या संस्थेचे मुख्य काम इलेक्शनच्यावेळी एकमताने वागणे हेच राहील. या संस्थेने उभे केलेल्या उमेदवारासच तुम्ही सर्वांनी मते दिली पाहिजेत. यासाठीच तुम्ही संघटना केली पाहिजे; व ती इतकी मजबूत केली पाहिजे की आपल्यापैकी एकही माणूस फुटून जाता कामा नये. असे करण्याशिवाय आता आपणास गत्यंतर नाही. मागच्या इलेक्शनच्या वेळी माझ्या व पी. बाळूच्या मतात फार तर हजार दोन हजार मताचेच अंतर होते. त्यावेळी तुम्हापैकी काही लोकांनी कुच-राई केली असती तर इलेक्शनमध्ये माझी धडगत नव्हती. तुमच्या उन्नतीची सर्व भिस्त राजकारणावरच आहे. म्हणून तुम्ही संघटना करून स्वतंत्र मजूर पक्षाला बलवान करा, एवढेच मला तुम्हाला सांगावयाचे आहे.

०—०

२५. अशी फसवाफसवी का ?


(मुंबई असेंब्लीत मंत्र्यांच्या पगारासंबंधीच्या बिलावर चर्चा चालू असता दि. १७ ऑगस्ट १९३७ रोजी दिलेले भाषण. जनता, दि. २१–८–१९३७.)

मी भाषण करावयास आता उभा राहिलो आहे. मी 'भाषण' असे मुद्दामच म्हटले. कारण या मुद्यावर सभागृहात मतविभागणी नोंदणी करण्याची माझी मुळीच इच्छा नाही. प्रस्तुत बिलावर माझा पहिला आक्षेप असा आहे की सरकार-तर्फे असे बिल आपण होऊन मांडण्यात येण्यापेक्षा सर्व पक्षांच्या संमतीने मांडण्यात यावयाला पाहिजे होते. दुसरी गोष्ट अशी की हा मुक्रर करण्यात आलेला तनखा (५०० रु पगार, १०० रु. भाडे व १५० रु. मोटार अलाऊन्स) योग्य नाही. ब्रिटिश साम्राज्यातील इतर वसाहतीतील मंत्र्यांच्या पगाराकडे आपण क्षणभर दृष्टिक्षेप केला तर तिकडील मंत्र्यांचे पगार सर्वसाधारणपणे २००० रु. च्या आसपास असल्याचे आढळून येते. हंगामी मंत्रिमंडळाच्या कामात त्या मंत्र्यांना हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतांत नेमून दिलेले पगारही एकट्या ओरिसा प्रांताखेरीज २००० रु. च्या वर होते असे आपणाला दिसून येईल. पण आता एक नवीन रुढी घातली जात आहे. यापुढे मंत्र्यांना दरमहा ५०० रु. पगार मिळेल, असे सुचविण्यात आले आहे. या दोन्ही रकमातील फरक हा केवळ आकडयांचाच नसून तो एक तत्त्वाचा फरक आहे. कोणत्याही जागेचा पगार मुक्रर करताना चार गोष्टी ध्यानात घेणे जरूर आहे. (१) मंत्र्याचे सामाजिक स्थान, (२) कार्यक्षमता, (३) लोकशाही व (४) राज्य कारभाराचे पावित्र्य आणि integrity (प्रामाणिकपणा) याच त्या चार गोष्टी होत. प्रांताचे मंत्री हे प्रांताचे पहिले नागरिक असल्याने त्यांचे जीवन सुसस्कृत असावे, हे रास्तच आहे. पण त्याबद्दल त्यांच्यावर सक्ती करता येणार नाही तथापि मंत्र्यांच्या पगाराचा विचार करताना शेवटच्या तीन गोष्टींकडे काणाडोळा करून चालणार नाही. खुद्द आज मंत्र्यांना काय वाटते, हे मला माहीत नाही. तथापि झेंडावंदन करणे किंवा केशरिया स्वयंसेवकांची सलामी घेणे एवढीच त्यांची मंत्रिपदाची कल्पना नाही अशी माझी भावना आहे. राज्य कारभाराच्या तीन प्रमुख अंगांपैकी 'कार्यकारी' मंडळ हे महत्त्वाचे अंग होय.

प्रांताचे प्रधानमंडळ हा प्रांताच्या बुद्धिमत्तेचा अलौकिक संचय असला पाहिजे. या बिलात नमूद केलेल्या पगारांमुळे राज्यकारभारात उत्पन्न होणाऱ्या कठीण प्रश्नांना तोंड देऊन ते सोडविण्यास लायक असे लोक पुढे येतील किंवा नाही, याची शंका वाटते. कारण इतर दुसऱ्या ठिकाणी याहून कितीतरी अधिक आमिषे त्यांना आढळतील. दुसरी गोष्ट अशी की आपल्याकडे सुशिक्षित वर्ग फार लहान

आहे. आपल्या सामाजिक व्यवस्थेमुळे शिक्षणाचा फायदा फक्त एका लहान वर्गालाच मिळत गेला आहे. या समाज व्यवस्थेचा ब्रिटिश सरकारलाही उच्छेद करता आला नाही. चातुर्वर्ण्यात शिक्षण एका वर्गालाच बहाल करण्यात आले आहे आता लोकशाहीच्या दृष्टीने याचा परिणाम काय होतो ते पाहा. ज्या लोकांजवळ पैसा आहे त्या लोकांना आपल्या खाजगी किंवा इतर हेतूंच्या पुरस्कारार्थ राजकीय सत्ता काबीज करता येईल. किंवा ज्यांना कोठे काहीच मिळू शकत नाही असे लोक मंत्रिमंडळात शिरतील. माझे म्हणणे असे आहे की मंत्र्यांचा पगार हा त्यांना मोहापासून दूर ठेवण्याइतका अवश्य हवा. कल्पना करा की ज्यावेळी मंत्र्यांचा पगार ४००० आणि ३००० रुपये होता त्यावेळीही आपल्या प्रांतात अनेक गोष्टींचा दुर्लौकिक होता मग आता मंत्र्यांचा पगार ५०० रुपये झाल्यावर त्यांची संख्या वाढेल असे म्हटले तर काय बिघडेल ? कंत्राटे देतानासुद्धा आपण ती नेहमीच सर्वात कमी रकमेच्या टेंडरला देत नाही. कमी पगार घेण्याला तयार असणे ही काही पगार कमी ठेवण्याला योग्य सबब नाही. बचत करावयाची ती देखील योग्य विचारानेच केली पाहिजे. दुसरा एक मुद्दा असा आहे की हे पगार कमी ठेवले याचे कारण राष्ट्रीय जीवनाच्या दर्जाशी ते सुसगत आहे. हरिजन मध्ये निरनिराळ्या देशातील रहिवाशांच्या सामान्य उत्पन्नाचे जे आकडे दिले आहे त्यात हिंदी इसमाचे सामान्य उत्पन्न ४ पौंडाचे असता हा पगार त्यात सुचविल्याप्रमाणे दरमहा ७५ रुपये असणेच उचित ठरेल. त्या दृष्टीने ५०० रुपये पगार ही मोठी उधळपट्टीच ठरेल. मग प्रामाणिकपणे ७५ रुपये पगारच का देत नाहा ? मला असे सांगावयाचे आहे की अशा रीतीने जनतेच्या मनात तुमच्याबद्दल भरवसा उत्पन्न होणार नाही. अशी फसवाफसवी का ? उघड्या अंगाने हिंडण्याने, सिगारेटच्या ऐवजी बिड्या ओढण्याने, बैलगाडीतून हिंडण्याने किंवा तिसऱ्या वर्गाने प्रवास करण्याने लोकांच्या डोळ्यात धूळ का फेकता ? विलायतेतील मध्ययुगीन भिक्षू ब्रह्मचर्य, शूचिर्भौत्य व दारिद्र्य यात आपले जीवन कंठण्याची प्रतिज्ञा करीत. आपल्या मंत्र्यांना ब्रह्मचर्याचा प्रश्न नाही कारण आता तो प्रश्न त्यांच्या हाताबाहेर गेलेला आहे. शुचिर्भौत्याच्या प्रतिज्ञेचा त्यांनी भंग केला तर या सभागृहाला त्याबद्दल तक्रार करण्याचे कारण नाही. दारिद्र्याबद्दल म्हणाल तर ते भिक्षू सडेफटिंग असल्याने त्यांना ते जड नसे. पण सध्याच्या मंत्र्यांना दारिद्र्यात जीवन कंठणे शक्य आहे काय ? मला असे म्हणावयाचे आहे की ५०० रुपये पगार ठरविण्यात मंत्रिमंडळाचा हेतू पवित्र नाही. त्यामागे त्याचा एक डाव आहे. हे मंत्रिपद कायमचेच आपल्याकडे राहून त्यावर दुसऱ्या कोणालाही आरूढ होता येऊ नये हाच यात त्यांचा डाव आहे. मंत्र्याचा पगार दरमहा ४००० किंवा ३००० असावा असेही मला म्हणावयाचे नाही मी जी या बिलावर टीका करीत आहे ती केवळ सार्वजनिक धोरणाची चर्चा व्हावी या हेतूनेच केली आहे. डॉ जान्सन एकदा म्हणाले होते की " बदमाश लोकांना देशभक्तीचा आश्रय घेणे सुलभ जाते. " असे म्हणण्याची पाळी आमच्यावर कधीही येणार नाही.

— ० —



२६. धर्मांतर हे होणारच !

(दिनांक २८-८-१९३७ रोजी वांद्रे, मुंबई येथील भाषण. जनता, दि. ४-९-१९३७.)

प्रिय भगिनींनो व बंधूंनो,

मी या सभेला येणार नव्हतो. परंतु मला समजले की येथे जुन्या परंपरेला चिकटून राहणारे असे काही लोक आहेत व ते महार परिषदेने पास केलेल्या धर्मांतराबद्दलच्या ठरावाची अंमलबजावणी पूर्णपणे करीत नाहीत. तेव्हा अशा लोकांच्या शंकानिरसनासाठी मी येथे आलो आहे. माझी मते यापूर्वीच मी अनेक वेळा बोलून दाखविली आहेत. त्याबद्दल तुमच्या मनात शंका असू नये. १९३६ साली भरलेली मुंबई इलाखा महार परिषद ही महार जातीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखी झाली आहे. ती परिषद अपूर्व, अवाढव्य व पूर्ण प्रातिनिधिक अशी झाली आहे. तेव्हा अशा परिषदेने पास केलेले ठराव वास्तविक सर्व महार जातीने मानावयास पाहिजेत व महार जातीतील बहुसंख्याक लोक ते ठराव मानतातही. मात्र महार जातीतील काही थोडे लोक अद्याप जुन्या परंपरेलाच धरून आहेत, असे माझ्या कानावर आले आहे. अशा लोकांना मला असे सांगावेसे वाटते की अल्पमतवाल्या लोकांना नेहमी बहुमतवाल्या लोकांप्रमाणे वागावे लागते. सध्याच्या कौन्सिलचेच उदाहरण घ्या. सध्या कौन्सिलमध्ये काँग्रेसचे बहुमत आहे. त्यामुळे ते करतील त्या कायद्यांना मान देणे आपणास भागच पडते. 'जातीसाठी खावी माती' अशी म्हण आहे. मग जातीने धर्मांतराबद्दल दिलेला निर्णय मानणे आपले कर्तव्य नाही काय ?

अनेक कार्यांसाठी जातीकडेच आपणास जावे लागते. मग जातीने ठराव केला तो मान्य का नसावा ? हिंदू धर्माप्रमाणे आपण जे पाळीत होतो ते सर्व धार्मिक सण-वार सोडून दिले पाहिजेत. हे सोडून देण्याचे कारण आज जे मी सांगणार आहे ते मात्र निराळे आहे. हिंदू धर्माप्रमाणे काही विधी करतात ते धर्माच्याच नव्हे तर नीतीच्या दृष्टीने रास्त असतात काय, याचा आपण विचार केला पाहिजे. काही विधीत तर अतिशय बाष्कळपणा भरलेला असतो. उदाहरणार्थ शंकराच्या नावाने लोक सोमवारी उपवास करतात व शंकराच्या पिंडीची बहुतप्रकारे पूजा करतात. परंतु शंकराची पिंड ही काय वस्तू आहे, याचा कोणी विचार केला आहे ? ती दुसरे तिसरे काहीही नसून पुरुष-स्त्रीच्या संयोगक्रियेची

प्रतिमा आहे. अशा बीभत्स प्रतिमेचे गोडवे आपण गावे का ? रस्त्यावर श्वाना-प्रमाणे जर नर-नारी वाह्यातगिरी करू लागले तर आपण त्यांची फुलाने पूजा करायची की जोड्याने ? मग पार्वती शंकर यांच्या त्याच क्रियेच्या प्रतिमेला म्हणजे देवाच्या बीभत्सपणाला आपण पूजावे काय ?

गणपतीचासुद्धा तसलाच प्रकार ! गणपती कथा अशी आहे की एकदा पार्वती नग्न स्नान करीत होती त्यावेळेस शंकर कोठे तरी दुसरीकडे गेला होता. म्हणून पार्वतीने आपणास कोणापासून उपसर्ग पोहोचू नये म्हणून आपल्या अंगावरचा मळ काढून त्याचा रक्षणकर्ता गणपती बनविला. तेव्हा मळातून उत्पन्न झालेल्या अमंगळाला देव कसे मानावयाचे ? ईश्वर निष्कलंक, मूर्तीमंत पावित्र्य असावयास पाहिजे परंतु हिंदू धर्मातील देव मोठे विचित्र आहेत ! म्हणून त्यांची पूजा करू नये, अशी माझी प्रामाणिक समजूत आहे.

तिसरी गोष्ट दत्तात्रयाची. अत्री ऋषीची बायको अनुसूया ही महान पतिव्रता आहे, असे ब्रह्मा, विष्णू व महेश या तीन देवांच्या बायकांना नारद सांगत गेला. आपल्यापेक्षा कोणी स्त्री अधिक पतिव्रता असावी हे त्यांना पाहवेना. तेव्हा या तिन्ही बायकांनी आपापल्या नवऱ्यांना अनुसुयेचे पातिव्रत्य हरण करण्यास सांगितले व बायकांचे म्हणणे ऐकून हे तिघे वीरही त्या कामास तयार झाले. हे तिघेजण अनुसूयाच्या घरी गेले. तिच्या नवऱ्याला काही कारण सांगून दुसरीकडे पाठविले व आपण अनुसूयेच्या सहवासात राहू लागले. या अवस्थेत तिने एका मुलाला जन्म दिला आणि या बालकाचे जनकत्व कोणाकडे हा विचार पडल्यामुळे त्या तिघांवर सारखीच जबाबदारी टाकण्याकरिता त्याला तीन तोंडे लावली; व तोच हा दत्तात्रयाचा अवतार ! पुष्कळ लोकांचा असा समज झाला आहे की धर्मांतराची लाट आता थंडावली आहे. परंतु तसे नाही. धर्मांतर हे होणारच आहे. ही चळवळ मी सोडली नाही, हे तुम्ही पक्के लक्षात ठेवा. पुष्कळ हिंदू लोक मला म्हणतात की, "तुमच्या धर्मांतराच्या प्रश्नाने आमचे डोळे उघडले आहेत. आम्ही आता सावध झालो असल्यामुळे तुमच्या बाबतीतल्या कर्तव्यात आता तुम्ही चुकणार नाही; म्हणून तुम्ही धर्मांतराची चळवळ परत घ्या." परंतु आतापर्यंत मी जे बोललो त्या कारणासाठीच मला चळवळ परत घ्यावयाची नाही. तुम्ही पूर्ण विचार करा. दुसरा धर्म स्वीकारावयाचा तो पूर्ण तावून सुलाखूनच स्वीकारला पाहिजे. मला आशा आहे की यापुढे महार जातीतील सर्व लोक महार परिषदेने केलेल्या ठरावाप्रमाणेच वागतील.

— ० —

२६. पक्षाशी पूर्ण इमानी राहिले पाहिजे

(सातारा जिल्हा अस्पृश्य परिषद मु. मसूर, जि. सातारा येथे दिनांक ६–११–३७ रोजी भरली. त्याप्रसंगी केलेले अध्यक्षीय भाषण. जनता, दिनांक २०–११–१९३७)

मसूर या गावचे नाव घेतले की मला माझ्या बालपणी अस्पृश्यतेसंबंधी अनुभवलेल्या कडू अनुभवांची आटवण होऊन डोळ्यात अजूनही अश्रू उभे राहतात. माझी या गावी गेल्या ३५ वर्षांनंतर ही दुसरी खेप आहे. या भागात गोरेगावला ज्यावेळी तळे बांधले, त्यावेळी त्या कामावर माझे वडील कॅशियर म्हणून काम करीत होते. मी, माझे दोघे बंधू आणि माझ्या बहिणीचा मुलगा असे चौघेजण सातारा येथे शिक्षणासाठी राहात होतो. माझी मातोश्री त्यावेळी स्वर्गवासी झाली होती. आम्हा सर्व मुलांवर आमचे वडिलांचे एक स्नेही-शेजारी राहात असत ते लक्ष ठेवीत असत. उन्हाळ्याच्या सुट्टीत आमच्या वडिलांनी आम्हास गोरेगावी बोलाविले. आम्ही तेथे येणार असल्याचे एक पत्र अगोदर एका हमालाबरोबर पाठविले होते. आम्हाला रेल्वे गाडीने जाण्यात मोठा आनंद झाला. कारण यापूर्वी ही गाडी इंजिनने कशी चालते, हे पाहिले नव्हते. त्यामुळे आम्हास एक प्रकारची आतुरता लागली होती. प्रवासासाठी नवीन कपडे, जरीच्या टोप्या वगैरे खरेदी करून आम्ही साताऱ्याहून पाडली स्टेशनावर गाडीत बसलो. तेथून मसूर पर्यंतचा प्रवास अत्यंत आनंदात गेला. मसूर स्टेशनवर पोचताच आम्हास कोणीच उतरून घ्यावयास आलेले नाही, हे पाहून आश्चर्य वाटले. दुपारी ४ ते रात्री ७ वाजेपर्यंत आम्ही मसूर स्टेशनवर बसून राहिलो. आम्ही असे तिष्ठत बसलेले पाहून स्टेशन मास्तरने आमची चौकशी केली. आम्ही आमची जात सांगताच स्टेशनमास्तर चमकला. शेवटी त्याने मोठ्या मुश्किलीने गोरेगावास जाण्याकरिता एक गाडी ठरवून दिली. पण गाडीवानाला आमची जात सांगताच तो बिचकला. तो आम्हास महाराची पोरे म्हणून नेण्यास तयार होईना. शेवटी आमच्या बंधूने अशी तडजोड केली की ठरलेल्या भाड्यापेक्षा एक रुपया अधिक देऊन गाडी आम्ही हाकू व गाडीवानाने बरोबर चालावे. तडजोड मान्य करून त्याने गाडीस बैल जुंपले; व आम्ही गाडी हाकू लागलो. पुढे मसूर गावच्या नाल्याजवळ गाडी उभी केली. त्यावेळी आम्हास अत्यंत तहान लागली होती. आम्ही गाडीवानास कुठे पाणी प्यायचे असे विचारताच त्याने अस्पृश्य लोकांसाठी असलेला शेणसड्याने भरलेला

खड्डा दाखविला. येथील दुर्गंधी पाणी पिणे अशक्य होते. आम्हाला तहान फार लागली होती. परंतु या पाण्याच्या गैरसोयीमुळे मुकाट्याने पुढचा मार्ग धरावा लागला. रात्र पडत होती पाण्याने व भुकेने जीव तळमळत होता. दुसऱ्या स्पृश्यांच्या नाल्यावर पाणी पिण्यास किंवा मागून घेण्यास आम्हास मज्जाव होता. मध्य-रात्रीच्या सुमारास आम्ही टोलनाक्यावर आलो. तेथेही महार जातीमुळे पाणी मिळाले नाही. अखेर अशा घायाळ अवस्थेत आम्ही गोरेगाव मुक्कामी पोहोचलो. वडिलांनी आम्हास असे अगोदर कळविल्याशिवाय का आलात म्हणून विचारले. त्यावरून आमचे एका इसमाबरोबर पाठविलेले पत्र त्यांना अजून मिळाले नव्हते. त्यांना आमची ही वाटेतली शोचनीय अवस्था पाहून गहिवर आला. या प्रवासाने आपण अस्पृश्य आहोत, आपणास कमी लेखतात, आपले पाणवठे गलिच्छ ठिकाणी असतात, स्पृश्य लोक आपला विटाळ मानतात' वगैरे संबंधीचा पहिला अनुभव माझ्या आयुष्यात मला मिळाला. माझ्या बालमनाला ही गोष्ट फारच लागून राहिली. आणि ती गोष्ट आज येथे जमलेल्या हजारो लोकांपुढे सांगण्याची वेळ येईल, असे स्वप्नातही त्यावेळी वाटले नव्हते. असो.

आज येथे आपल्या स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करण्यासाठी आपण सर्वजण जमलो आहोत. आपल्या पक्षाच्या कार्यक्रमाची आपणा सर्वांना जाणीव आहे. हिंदुस्थानावर लादलेल्या नवीन सुधारणात भरपूर दोष व व्यंगे असल्यामुळे त्या पूर्ण जबाबदारीचे स्वराज्य प्राप्त करून देण्यास असमर्थ आहेत. प्रांतिक राज्य-कारभारातील कित्येक घटना विशेषत: सेकंड चेंबरची घटना ही आपल्या पक्षास आक्षेपार्ह वाटते. तथापि या नवीन सुधारणा राबविण्यास हरकत नाही. मात्र जबाबदारीच्या स्वराज्याचे स्वरूप निष्प्रभ करून टाकण्याजोगे जे खास व अनियंत्रित स्वरूपाचे अधिकार गव्हर्नरास मिळालेले आहेत त्यांचा उपयोग या मुदतीत होऊ नये याबद्दल स्वतंत्र मजूरपक्ष जागृत राहील. तसेच अस्पृश्य बांधव, मजूर व शेतकरी यांचे नाते इष्ट कसे होईल याचा विचार करून सर्वसाधारण श्रमजीवी वर्गासाठी विधायक कार्य करण्याचा आपल्या पक्षाचा संकल्प आहे. तुम्हास ठाऊक असेलच की गिरणीतील मजूर वर्गात स्पृश्य मजूर व अस्पृश्य मजूर असा उघड भेदभाव आहे. स्पृश्य मजुरास कापड खात्यात काम मिळते व तो जॉबरचे जागेपर्यंत वर चढू शकतो. परंतु अस्पृश्य मजूरास तो कितीही लायक असला तरी त्याला कापड खात्यात काम मिळत नाही. तो तेलवालाच राहतो. सर्वसाधारणपणे मजुरांची परिस्थिती हलाखीची व कष्टमय आहे. स्पृश्य मजुराचे दारिद्र्य मालकशाहीमुळे तर अस्पृश्य मजुराचे दारिद्र्य मालकशाही अधिक अस्पृश्यता या दोहोमुळे आहे. परंतु दु:खाची गोष्ट ही की काँग्रेसमधील व बाहेरील मजुरांचे पुढारी या गोष्टीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहेत. स्वतंत्र मजूर-पक्षाचा सवतासुभा स्थापना करण्यास जी काही कारणे आहेत त्यापैकी हे एक

होय. मजुरांना जातिभेदाने अगर वर्गभेदामुळे त्यांच्या लायकीला धक्का मिळणार नाही व त्यांचा उन्नतीचा मार्ग सुखकर होईल असा प्रयत्न आज काँग्रेस अगर इतर पक्षाचे मजूर पुढारी करू शकत नाहीत. कारण काँग्रेसचे पुढारी आज भांडवलवाल्यांच्या कचाटीत सापडल्यामुळे गरीब मजुरांचे व शेतकऱ्यांचे कल्याण त्यांच्याकडून होऊ शकत नाही. काँग्रेस 'भांडवलवाल्याचे हित करणार व गरिबांचे ही हित करणार' अशी घोषणा करते. अशा दुटप्पी परिस्थितीत एका म्यानात दोन सुऱ्या राहू शकत नाहीत. अशा परिस्थितीत आपल्या श्रमजीवी वर्गाने काँग्रेस च्या विश्वासावर राहणे व्यर्थ आहे. काँग्रेसचे पंचप्राण महात्मा गांधी यांच्या मनाचा ठाव मला पूर्णपणे आहे. त्यांचे हृद्‌गत जितके मला मला माहीत आहे तितके तुम्हास नाही. त्यांचा व माझा जो परिचय आहे त्यावरून पाहता महात्माजी तुमचे कल्याण करू शकत नाहीत. त्यांचे व आपले या बाबतीतले मार्ग अगदी भिन्न आहेत. ज्याला भाकरी पाहिजे त्याला देवळांचा काय उपयोग? गेल्या राऊंड-टेबल-कॉन्फरन्समध्ये अस्पृश्य समाजाविषयी मोठा दुर्घट प्रश्न होता. नोकरशाहीची सत्ता काढून ती बहुजन समाजाचे हाती देताना त्यातील काही अंश अस्पृश्यांचे हाती द्या, असे सर्वांचे म्हणणे होते. परंतु हे महात्माजीच त्यावेळी अस्पृश्यांच्या हक्कांविरुद्ध गेले मात्र मुसलमान, ख्रिस्ती वगैरे अल्पसंख्याकाना या सत्तेतील काही अंश देण्यासाठी ते तयार होते. अशा बिकट प्रसंगी या हिंदूच्या महान पुढाऱ्याशी आपल्या स्वतंत्र हक्कासाठी झगडावे लागले. अस्पृश्यांचे कल्याणकर्ते म्हणविणारे हे हिंदुस्थानचे महात्मे या वेळी आपल्या विरुद्ध जावयास नको होते. ते आपले खरेखुरे कल्याणकर्ते असते तर त्यांच्याशी वादविवाद करण्यात मला माझी शक्ती खर्च करण्याचे कारण घडले नसते.

महात्माजींस स्वराज्यासाठी चटकन एक कोट रुपये देणारे स्पृश्य लोक अस्पृश्यता निवारण्यास पाच-सहा लाखापर्यंत वर्गणी देण्यास समर्थ का होऊ शकत नाहीत? यावरून स्पृश्य समाजाला अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याची किती तळमळ आहे, हे दिसून येते. ही जुलमाच्या रामारामाची गांधीजींची चळवळ आपला उत्कर्ष कसा काय करणार? आणि तुमचा विटाळ, तुमचेवरील जोरजुलूम, तुमची सामाजिक हालअपेष्टा, मानहानी. दारिद्र्य हे लोक कशा रीतीने नष्ट करणार? खरे पाहिले असता स्पृश्य हिंदू दिखाऊ कामे करण्यात पटाईत आहेत. आतून तुमच्या सामाजिक जीवनात काटे पसविण्याचा ते नेटाने प्रयत्न करतात. अस्पृश्यांचे कैवारी म्हणविणारे हे हिंदुस्थानचे महात्मे या वेळी आपल्या विरुद्ध जावयास नको होते. श्रीमंत, सावकार, खोत, भांडवलवाले हे तुमचे आर्थिक जीवन कष्टप्रद करीत आहेत, तर इकडे बहुजन समाजाची प्रातिनिधिक काँग्रेस दिमाखाने काँग्रस

हीच अस्पृश्यांची, गोरगरीब म्हणविणाऱ्या लोकांची, रंजल्या गांजलेल्यांची असे तोऱ्याने म्हणत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता काँग्रेस ही संस्था जर आपली कल्याणकर्ती आहे असे वाटले असते तर मी मोठ्या आनंदाने तीमध्ये सामील झालो असतो. पण मला काँग्रेसकडून आपल्या समाजाचे मजुरांचे, शेतकऱ्यांचे व गोरगरिबांचे हित होत नाही असे वाटल्यावरून मी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली आहे.

या देशातून एकवेळ इंग्रज लोक जाऊ शकतील, परंतु सर्व गरीब जनतेला नागवून तिचे रक्त शोषण करणारा जळवांसारखा जो धनिक भांडवलवाला वर्ग आहे तो या देशातून जाणारा नाही तो काँग्रेसमध्ये सामील झाला म्हणून त्याची रक्तशोषक वृत्ती नाहीशी होणार नाही. त्याची भरमसाठ व्याज घेण्याची आसुरी वासना नष्ट होणार नाही. त्याची गोरगरिबांच्या घरादारावर निखारे ठेवण्याची बुद्धी नाहीशी होणार नाही.

आपल्या मुंबई इलाख्यातील ब्राह्मणेतर पक्ष गरिबांसाठी काही कार्य करील असे वाटत होते. इतकेच नव्हे तर त्याचा काही काळ अभिमान वाटत होता. परंतु शेवटी शिस्तीच्या व संघटनेच्या अभावी आणि वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याच्या वृत्तीमुळे या पक्षाचे सारे बळ लयास गेले आहे. आणि उच्च म्हणविणाऱ्या ब्राह्मण समाजाचे चढेल धोरण नेस्तनाबूत करण्याचा त्यांचा हेतू कोठल्या कोठे लयास गेला आहे. एका प्रबळ अशा पक्षाची ही आजची शोचनीय अवस्था आपण लक्षात घेतली पाहिजे; आणि आपल्या प्रत्येक माणसाने पक्षाशी पूर्ण इमानी राहिले पाहिजे. त्याने पुढाऱ्याचो आज्ञा शिरसावंद्य मानली पाहिजे. पक्षाच्या कार्यक्रमावर नितांत विश्वास ठेवून प्रतारणा न करता अंमलात आणण्याचा जोमाने प्रयत्न केला पाहिजे. त्याने वैयक्तिक स्वार्थ सोडला पाहिजे. पक्षासाठी हाल, कष्ट सोसले पाहिजेत व शिस्तीने सारे कार्य करणे हे ध्येय बाळगले पाहिजे. म्हणून स्वतंत्र मजूर पक्षात सामील होणारांनी या सर्व गोष्टींचा नीट विचार केला पाहिजे.

आज असेंब्लीमध्ये आपल्या पक्षाचे प्रतिनिधी थोडे असले तरी असेंब्लीमधील दुसऱ्या पक्षांना त्याची भीती वाटते. याचे कारण आपण लोककल्याणासाठी जो कार्यक्रम आखला आहे तो पूर्णपणे पार पाडण्याचा आपण आटोकाट प्रयत्न करू याची त्यांना खात्री आहे. बहुजन समाजाला सुख मिळेल, त्यांच्यावर अन्याय होणार नाही, असे कायदे सत्ताधारी पक्षाकडून करवून घेतले पाहिजेत. आपणास जे थोडे राजकीय हक्क मिळाले आहेत त्यात तूर्त समाधान मानून अधिकारासाठी झगडले पाहिजे. फौजदार, मामलेदार, सर्कल इन्सपेक्टर, तलाठी, व पाटील यांचे हाती सत्ता नाही. महार ज्याप्रमाणे सरकारी नोकर, त्याचप्रमाणे ते नोकर आहेत. खरी राजसत्ता लोकांचे हाती म्हणजे कौन्सिलच्या हाती आहे.

म्हणून तुम्हास सरकारी नोकरांना भिण्याचे कारण नाही. त्यांनी व इतरांनी तुम्हास त्रास दिल्यास त्याची दाद लावण्यासाठी, तुमची गाऱ्हाणी, दुःखे व जुलूम वेशीवर टांगून स्वतंत्र मजूर पक्ष ती नाहीशी करण्याचा प्रयत्न करील असे आश्वासन मी तुम्हास देतो. स्वतंत्र मजूर पक्षाच्या जिल्हानिहाय शाखा स्थापन होणार आहेत. माझे बालपण व प्राथमिक शिक्षण या जिल्ह्यात झाल्यामुळे या जिल्ह्याची शाखा स्थापन करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

— ० —

२७. मृतमांस खाणे व भीक मागणे सोडा

(मु. दौंड, जिल्हा पुणे. येथील दिनांक ७–११–३७ चे भाषण. जनता, दिनांक २०–११–३७)

मला येथे येऊन फारसे बोलावे लागेल, असे मला वाटले नव्हते. तुम्हा मंडळींची भेट घेतल्याने कार्यभाग संपला असे वाटत होते. परंतु तुमच्या येथील परिस्थिती पाहून मला दोन शब्द बोलणे भाग पडत आहे. आजच्या सभेचा मुख्य उद्देश म्हणजे स्वतंत्र मजूर पक्षाची शाखा काढणे हा आहे. हा आमचा पक्ष फक्त अस्पृश्य वर्गाकरिता नसून जे लोक मजुरी करून पोट भरतात व शेतकरी वर्ग आहे अशांचा मुख्यत्वेकरून या पक्षात समावेश होतो. आपल्या पक्षाची स्थापना होऊन एक वर्षही झालेले नाही. परंतु त्याच्या कार्याचा विस्तार व्यापकतेने वाढत आहे. यावरून या पक्षाच्या आवश्यकतेची जाणीव होईल. श्रमजीवी वर्गाचे काँग्रेस मुळीच कल्याण करणार नाही. काँग्रेस ही माया आहे. या महामायेच्या पाशात सापडून आपला अधःपात करून घेऊ नका. तुम्हाला ठाऊक आहे की एखादा लांडगा जर मेंढीला म्हणाला की, 'चल मी तुला स्वर्गात नेतो पण तो तिला स्वर्गात घेऊन जाण्याऐवजी तिला मध्येच खाऊन खरा स्वर्ग' दाखविल्याशिवाय राहणार नाही. यासाठी आपण वेळीच सावध राहा. खरे खोटे कोणते ते स्वतःच्या बुद्धीने ठरवा. तुमचे खरे हित व्हावे, अशी जर तुमची इच्छा असेल तर आजच स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद व्हा. कायदे-मंडळात आपले लोक अधिक प्रमाणात जाणे जरुरीचे आहे. तेच आपले प्रतिनिधी आपल्या हिताचे काम करतील.

तसेच वतनाच्या बाबतीत काँग्रेसचे लोक तुमचा गैरसमज करतील. खेडेगावात तुमची वस्ती थोडी असते. तुमची उपजीविका येथील स्पृश्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे. त्यासाठी ते तुमची हडकी हाडवळे जातील म्हणून दिशाभूल करतील. त्यांच्यावर तुम्ही विश्वास ठेऊ नका. दिवाळीत महारणीने पाटलास ओवाळण्यास जावे आणि म्हणावे 'बळीचे राज्य येवो.' आतापर्यंत त्याने पुष्कळ राज्य भोगले आहे. मग पाटलाच्या बायकोने महारास का ओवाळू नये ? दसऱ्याच्या दिवशी महाराने आपटा आणावा व तो पाटलाने खुशाल लुटावा. अशावेळी पाटलाला आपटा आणावयास काय झाले ? पंचायती वगैरे महत्त्वाच्या कामासाठी सर्व लोकास बोलविण्याकरिता महारास पाठविले जाते, पण पंचायतीमध्ये बसण्याचा

अधिकार महारास का नसावा ? मयताचे निरोप पोस्टाने किंवा तारेने पाठवावयाचे सोडून ते सारे महाराने पायपीट करून काय म्हणून कळवावे ? मी आतापर्यंत फक्त दोन गोष्टी सोडावयास सांगितल्या आहेत. त्या म्हणजे १) मृतमांस न खाणे, २) उच्छिष्ट अन्न न खाणे. भाकरी वगैरे भीक मागून आणण्याच्या प्रकाराविरुद्ध मी आहे. अशामुळे आपण इतरांप्रमाणे मनुष्य असूनही भाकरीसाठी स्वाभिमानशून्य का व्हावे.

अशा परिस्थितीत मी तुम्हास स्पृश्य लोकांकडे भाकरीसाठी भीक मागा, असे कसे सांगेन ? मला येथे जमलेल्या स्त्रियांना सांगावयाचे आहे की तुम्ही मुलांना जन्म दिल्यानंतर त्यांची योग्य निगा न करता त्यांना इतर स्पृश्य समाजातील मुलाबाळांप्रमाणे वळण लावून त्याचे शिक्षणाकडे लक्ष न वेधविता गावातून भीक मागीत का फिरविता ? तुम्ही मनुष्य आहात. स्पृश्य समाजातील मुले शिकून आपला नावलौकिक काढतात, त्याप्रमाणे तुम्ही आपल्या मुलांना का वळण देत नाही ? माझ्या सांगण्याप्रमाणे जर येथले लोक वागायला लागले असे कळले तरच मला आनंद होईल.

० – ०

२७. मृतमांस खाणे व भीक मागणे सोडा

(मु. दौंड, जिल्हा पुणे. येथील दिनांक ७–११–३७ चे भाषण. जनता, दिनांक २०–११–३७)

मला येथे येऊन फारसे बोलावे लागेल, असे मला वाटले नव्हते. तुम्हा मंडळींची भेट घेतल्याने कार्यभाग संपला असे वाटत होते. परंतु तुमच्या येथील परिस्थिती पाहून मला दोन शब्द बोलणे भाग पडत आहे. आजच्या सभेचा मुख्य उद्देश म्हणजे स्वतंत्र मजूर पक्षाची शाखा काढणे हा आहे. हा आमचा पक्ष फक्त अस्पृश्य वर्गाकरिता नसून जे लोक मजुरी करून पोट भरतात व शेतकरी वर्ग आहे अशांचा मुख्यत्वेकरून या पक्षात समावेश होतो. आपल्या पक्षाची स्थापना होऊन एक वर्षही झालेले नाही. परंतु त्याच्या कार्याचा विस्तार व्यापकतेने वाढत आहे. यावरून या पक्षाच्या आवश्यकतेची जाणीव होईल. श्रमजीवी वर्गाचे काँग्रेस मुळीच कल्याण करणार नाही. काँग्रेस ही माया आहे. या महामायेच्या पाशात सापडून आपला अधःपात करून घेऊ नका. तुम्हाला ठाऊक आहे की एखादा लांडगा जर मेंढीला म्हणाला की, 'चल मी तुला स्वर्गात नेतो पण तो तिला स्वर्गात घेऊन जाण्याऐवजी तिला मध्येच खाऊन खरा स्वर्ग दाखविल्याशिवाय राहणार नाही. यासाठी आपण वेळीच सावध राहा. खरे खोटे कोणते ते स्वतःच्या बुद्धीने ठरवा. तुमचे खरे हित व्हावे, अशी जर तुमची इच्छा असेल तर आजच स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद व्हा. कायदे-मंडळात आपले लोक अधिक प्रमाणात जाणे जरुरीचे आहे. तेच आपले प्रतिनिधी आपल्या हिताचे काम करतील.

तसेच वतनाच्या बाबतीत काँग्रेसचे लोक तुमचा गैरसमज करतील. खेडेगावात तुमची वस्ती थोडी असते. तुमची उपजीविका येथील स्पृश्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे. त्यासाठी ते तुमची हडकी हाडवळे जातील म्हणून दिशाभूल करतील. त्यांच्यावर तुम्ही विश्वास ठेऊ नका. दिवाळीत महारणीने पाटलास ओवाळण्यास जावे आणि म्हणावे 'बळीचे राज्य येवो.' आतापर्यंत त्याने पुष्कळ राज्य भोगले आहे. मग पाटलाच्या बायकोने महारास का ओवाळू नये ? दसऱ्याच्या दिवशी महाराने आपटा आणावा व तो पाटलाने खुशाल लुटावा. अशावेळी पाटलाला आपटा आणावयास काय झाले ? पंचायती वगैरे महत्त्वाच्या कामासाठी सर्व लोकास बोलविण्याकरिता महारास पाठविले जाते, पण पंचायतीमध्ये बसण्याचा

अधिकार महारास का नसावा ? मयताचे निरोप पोस्टाने किंवा तारेने पाठवावयाचे सोडून ते सारे महाराने पायपीट करून काय म्हणून कळवावे ? मी आतापर्यंत फक्त दोन गोष्टी सोडावयास सांगितल्या आहेत. त्या म्हणजे १) मृतमांस न खाणे, २) उच्छिष्ट अन्न न खाणे. भाकरी वगैरे भीक मागून आणण्याच्या प्रकाराविरुद्ध मी आहे. अशामुळे आपण इतरांप्रमाणे मनुष्य असूनही भाकरीसाठी स्वाभिमानशून्य का व्हावे.

अशा परिस्थितीत मी तुम्हास स्पृश्य लोकांकडे भाकरीसाठी भीक मागा, असे कसे सांगेन ? मला येथे जमलेल्या स्त्रियांना सांगावयाचे आहे की तुम्ही मुलांना जन्म दिल्यानंतर त्यांची योग्य निगा न करता त्यांना इतर स्पृश्य समाजातील मुलाबाळांप्रमाणे वळण लावून त्याचे शिक्षणाकडे लक्ष न वेधविता गावातून भीक मागीत का फिरविता ? तुम्ही मनुष्य आहात. स्पृश्य समाजातील मुले शिकून आपला नावलौकिक काढतात, त्याप्रमाणे तुम्ही आपल्या मुलांना का वळण देत नाही ? माझ्या सांगण्याप्रमाणे जर येथले लोक वागायला लागले असे कळले तरच मला आनंद होईल.

० – ०

२८. तुम्ही आपले अस्तित्व भिन्न राखले पाहिजे

(मद्रास भागातील बहिष्कृत आदिद्रविड समाजाने बाबासाहेबांचा सत्कार माटुंगा, मुंबई येथे दिनांक १४-११-३७ रोजी केला. त्या प्रसंगीचे भाषण. जनता, दिनांक २०-११-१९३७.)

तुम्ही सर्व मंडळी मद्रास प्रांतातून मुंबई येथे कामकाजाकरिता आला आहात. आपापल्या गावात तुम्ही जात येत असता. तेव्हा तुमचा आणि तुमच्या प्रांतातील इतर लोकांचा ज्या ज्या वेळेस संबंध येईल त्या त्या वेळेस तुम्ही त्यांना एक गोष्ट पटवून द्यायला हवी. सध्या जी नवीन राज्यघटना अमलात आहे तीत अस्पृश्य वर्गास जे राजकीय हक्क प्राप्त झाले आहेत ते अभूतपूर्व असे आहेत. अद्यापपावेतो आपल्या वर्गाच्या बाबतीत अशी गोष्ट घडली नव्हती. हे जे हक्क प्राप्त झाले आहेत त्यांचा उपयोग जर अस्पृश्यवर्गाच्या हिताकरिता पूर्णपणे झाला नाही तर ते मिळून न मिळून सारखेच. इतर कोणत्याही प्रांतापेक्षा मद्रास प्रांतातील बहिष्कृत वर्गाला अधिक जागा मिळाल्या आहेत. तसेच इतर कोणत्याही प्रांतापेक्षा तुमच्या प्रांतातील अस्पृश्यवर्गाची दुःखे अधिक आहेत. अशा परिस्थितीत तुम्हाला मिळालेल्या राजकीय हक्कांचा उपयोग तुम्ही योग्य रीतीने केला आहे का, असा प्रश्न केल्यास मोठचा कष्टाने असे म्हणावे लागते की तुम्ही याबाबतीत आपल्या कर्तव्याला जागला नाहीत. ३० जागांपैकी काही अगदी थोडचा प्रतिनिधींशिवाय सर्वजण आज काँग्रेसमध्ये विरून गेले आहेत. त्याचा परिणाम असा झाला आहे की त्या प्रांतातील अस्पृश्य वर्गाच्या गाऱ्हाण्यांना त्यामुळे गौणत्व आलेले आहे. तुम्हाला अस्पृश्य म्हणून लेखणारे व तुमच्यावर जुलूम करणारे कोण तर हिंदू व त्याच लोकांनी आज सर्व काँग्रेस व्यापलेली आहे. आता त्यांच्याशीच जर अस्पृश्य वर्ग एक झाला तर तुमची गाऱ्हाणी दूर कशी होणार? काँग्रेसमध्ये सामील झालेल्या अस्पृश्य वर्गाच्या प्रतिनिधींना अधिकारारूढ झालेल्या काँग्रेस मंत्रिमंडळाला पक्षाच्या शिस्तीमुळे कोणत्याही गाऱ्हाण्याबद्दल कायदेमंडळात प्रश्न विचारता येणे शक्य नाही. तर मग त्यांच्याविषयी आकांडतांडव करून मंत्रिमंडळास ती गाऱ्हाणी दूर करण्यास भाग पाडणे तर दूरच राहिले. दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न असा की तुमच्यावर जुलूम करणारे हिंदू म्हणजे काँग्रेस यांचेवर जर तुमचा एवढा विश्वास आहे तर तुम्हाला तुमचे भिन्न अस्तित्व मानण्याचे कारण काय? उद्या तुम्हाला असा कोणीही

प्रश्न विचारील की तुम्हाला खास राजकीय हक्कांची आवश्यकता तरी कोठे राहिली ? तेव्हा अस्पृश्य वर्गाचे जर कोठे हित होत असेल तर काँग्रेसमध्ये विरून जाण्यामध्ये नाही; तर आपले अस्तित्व आज स्वतंत्रपणे जाहीर करून त्याच्या अनेकविध दुःखांना वेळोवेळी तोंड फोडणे या नीतीमध्येच आहे. त्याशिवाय अस्पृश्यवर्ग जाचातून मुक्त होणार नाही; व त्याची उन्नती होणार नाही. याच-प्रकारचे उद्‌गार मद्रासकडील एक अस्पृश्यांचे पुढारी श्री. दि. ब. श्रीनिवासन यांनी काढले आहेत. ते बहिष्कृत वर्गातील तरुण मंडळींना उद्देशून एका सभेत बोलत होते. त्यांनी सांगितले की " कांग्रेसची मंत्रिमंडळे स्थापन झाल्यास आज बरेच महिने झाले. तेवढचा अवधीत अस्पृश्य प्रतिनिधींनी आपल्या वर्गाच्या बाबतीत एकदेखील प्रश्न उपस्थित करून सरकारचे लक्ष तिकडे वेधले नाही. " याचे कारण तुमच्या प्रांतातील अस्पृश्यांचे प्रतिनिधी काँग्रेसमध्ये विलीन झाले, हे होय. तेव्हा अस्पृश्य वर्गाचे खरे हित साधावयाचे असेल तर तुम्ही आपले अस्तित्व भिन्न राखून झगडत राहिले पाहिजे व ही गोष्ट तुम्ही सर्वांनी जाणली पाहिजे. आणि त्याप्रमाणे वागलेचं पाहिजे.

— • —

२९. समाजकार्य अव्याहत चालून ते चिरकाल टिकले पाहिजे

(श्री. भाऊराव गायकवाड यांना मानपत्र देण्याच्या समारंभाच्या प्रसंगी वडाळा येथे दिलेले भाषण दिनांकाचा उल्लेख नाही. जनता. २७-११-१९३७)

आजच्या प्रसंगी या समारंभाला मला हजर राहता आले याबद्दल मी स्वत:ला धन्य समजतो आणि म्हणून हा समारंभ घडवून आणल्याबद्दल मी येथील चालक मंडळींचा फार आभारी आहे. आपण नेहमी चळवळीची ज्योत पाजळण्यासाठी ज्या कामचलाऊ सभा करतो तशा प्रकारची ही सभा नाही. एका सन्माननीय अशा व्यक्तीच्या अभिनंदनाची ही सभा असून तिचे महत्त्व तितकेच मोठे आहे. श्री. भाऊराव यांचा दर्जा किती मोठा आहे, हे नव्याने सांगावयास नको. आजच्या मानपत्रातील भाषा त्यांना अतिशयोक्तीची वाटते, पण माझ्या-मते उलट ती पाण्यासारखी पातळ आहे. त्या मानाने भाऊरावांची कामगिरी अधिक अमोल अशी आहे. मला यावेळी वाईट वाटते ते हे की हा मानपत्र अर्पण समारंभ वडाळा येथील सर्व रहिवाशांतर्फे न होता काही लोकांतर्फेच तो होत आहे. आणि दुसरे, हा समारंभ सर्व मुंबई इलाख्यातर्फे, निदान मुंबई शहरातर्फे तरी व्हावयास पाहिजे होता. असो. तरीपण या गोड प्रसंगी अध्यक्षपद स्वीकार-ण्याविषयीच्या विनंतीला मला नाही म्हणता येईना.

गेल्या १० वर्षांच्या आरल्या समाजाच्या प्रगतीचा जेव्हा मी शांतपणे विचार करतो त्यावेळी माझ्या मनात वारंवार दोन विचार घोळत असतात. एक: परमेश्वराच्या कृपेशिवाय गेल्या १९ वर्षात आपल्या समाजाची इतकी कल्पनातीत प्रगती झालेली नाही. गांधीजींसारख्या पुरुषाबरोबर झगडण्यात यश मिळून आम्हास राजकीय हक्क मिळाले आणि आपणाला राजकारणात समानतेचा दर्जा मिळाला. ब्राह्मण, क्षत्रिय यांच्या मांडीला मांडी लावून कायदेमंडळात बसण्याची, त्यांच्याबरोबर विचारविनिमय करण्याची संधी ही केवळ ईश्वरी कृपा नव्हे काय ? हे सारे मिळवून घेण्याला मी फक्त निमित्तमात्र झालो आहे, असे मला वाटते. दुसरी गोष्ट, श्री. भाऊराव गायकवाडसारख्यांचे साहाय्य मिळाले नसते तर एकटी परमेश्वरी कृपाही काही करू शकली नसती. आज जनतेकडून माझ्या कामगिरीबद्दल जे मला धन्यवाद मिळत आहेत, त्यापैकी शेकडा ८० टक्के भाग श्री. गायकवाड यांचा आहे, हे येथे नमूद करावयाला मला मुळीच दिक्कत वाटत नाही. अशा सर्वतोपरी लायक पुढाऱ्याचा आज जो येथे मानपत्र देऊन सन्मान करण्यात येत आहे तो माझ्या दृष्टीने योग्य व अपूर्व असा आहे.

नाही. अशा या सर्वतोपरी लायक पुढाऱ्याचा आज जो येथे मानपत्र देऊन सन्मान करण्यात येत आहे तो माझ्या दृष्टीने योग्य व अपूर्व असा आहे.

आता याप्रसंगी आपल्या चळवळीसंबंधी दोन गोष्टी सांगण्यास काही हरकत नाही. या हिंदुस्थान देशात राष्ट्रीय काँग्रेस ही मोठी प्रबळ संस्था मानण्यात येते असे असूनही मी स्वतंत्र मजूर पक्षाचा सवतासुभा का निर्माण केला ? याचे कारण एकच की काँग्रेसमध्ये ज्या भांडवलदार वर्गाचा अधिक भरणा आहे ते आपले हित करावयाचे सोडून गोरगरीब, कामगार व शेतकरी वर्गाचे खरे हित कधीही करणार नाहीत. तसेच दुसरा एक पक्ष कामगार वर्गात निर्माण झालेला आहे. या लाल बावटचाच्या चळवळीने श्रमजीवी वर्गाचे आजच्या परिस्थितीत हित होईल किंवा नाही याची मला शंका वाटते. आणि म्हणून या नवीन स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना आपणाला करावी लागली आहे. आपल्या पक्षाच्या वतीने गेल्या मुंबई प्रांतिक असेंब्लीच्या निवडणुकीत नाशिक जिल्ह्यातर्फे श्री. भाऊराव गायकवाड यांची आपल्या पक्षातर्फे उमेदवार म्हणून निवड केली होती; आणि काँग्रेसबरोबर सामना दिला. या निवडणुकीचा जेव्हा निकाल लागला तेव्हा काँग्रेस पक्षाचा उमेदवार पहिला येऊन त्याला १६९०० मते तर श्री भाऊरावांना १२६५० मते पडली. अवघ्या २५० मतांचे अंतर या उभय उमेदवारांत पडले खरे ! पण माझ्या मते हा हिशेब चुकीचा आहे. कारण आमच्यातील एक इसम आयत्यावेळी विरुद्ध उठला. त्याचे नाव घेणेही याप्रसंगी योग्य वाटत नाही. त्याला ४००० मते पडली. ही मते विभागली गेली नसती तर श्री. भाऊराव गायकवाडांनी कांग्रेसच्या उमेदवाराला ३७५० मतांनी मारला असता. यावरून श्री. भाऊरावांची लायकी किती आहे, याची सहज खात्री पटेल. मला सांगावयास आनंद वाटतो की कायदेमंडळात निवडून आलेली सर्व माणसे लायक आहेत. आणि ज्या माणसाविषयी कायदे कौन्सिलमध्ये लोकांना आदर वाटतो त्यापैकी श्री. भाऊराव हे एक आहेत.

आपण स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाचे हरेक स्त्री-पुरुषांनी सभासद झाले पाहिजे. मी आपणास आव्हान देऊन सांगतो की मी या सर्व राजकारणाच्या बाबतीत चांगला अभ्यास केला आहे आणि या अभ्यासानुसार स्वतंत्र मजूर पक्षाचा कार्यक्रम आखला आहे. ज्यांना या कार्यक्रमाविषयी शंका वाटत असेल त्याने माझ्याकडे यावे त्याची संशयनिवृत्ती मी करीन; परंतु असे न करता लोकांची दिशाभूल करणारा मनुष्य खास लुच्चाच असला पाहिजे. असो. काँग्रेस ही विश्वामित्राची माया आहे. मायेविषयी मुक्तेश्वराने जे वर्णन केले आहे त्यात मुंगूस–सापाची मैत्री होती; उंदीर-मांजरीचे दूध पीत आहे ! सिंह व हत्ती बंधुप्रेमाने राहात होते वगैरे गोष्टी आहेत. या गोष्टी सत्यसृष्टीत किंवा व्यवहारात कितपत पटतील ? तीच काँग्रेसची गोष्ट आहे. समाजाची अशी घटना झाली पाहिजे की तिचे प्रमुख पुढारी निघून गेले–दिवंगत झाले तरी समाजकार्य अव्याहत चालून ते चिरकाल टिकले पाहिजे. आणि अशाच प्रकारच्या कार्याची योजना झाली तरच तो पक्ष किंवा समाज जगात वभवशाली ठरेल.

— ० —

३०. जातिभेद ही वरून वाहात आलेली गटारगंगा आहे

(कर्कंम, जि. सोलापूर, दिनांक ३१–१२–१९३८ रोजी मातंग समाजापुढे झालेले भाषण. जनता दि. ८–१–१९३८)

उद्या म्हणजे ता. १–१–१९३८ रोजी सोलापूर मुक्कामी मातंग समाजाची एक परिषद भरणार आहे. त्यावेळी मला आमंत्रणाने बोलविण्यात आले असल्या-मुळे मी त्याप्रसगी सविस्तर रीतीने बोलणार असल्या कारणाने यावेळी दोन शब्दच बोलणार आहे. आणि ते बोलण्याचा उद्देश हा की आपल्यापैकी काही इसम परिषदेस हजर राहणार असले तरी काही मंडळी तेथे न जाणारीही असणार ! तेव्हा या लोकांना माझे म्हणणे ऐकावयास मिळावे. प्रथमत: अस्पृश्य समाजात मोडणाऱ्या महार, चांभार, भंगी वगैरे ज्या जाती आहेत त्यात एकी नाही हे आपणा सर्वांचे दुर्दैव होय. ही एकी नसण्याचे खरे कारण म्हणजे हिंदू समाजातील जातिभेद हेच आहे. या जातिभेदाला महार, मांग, चांभार किंवा भंगी हे जबाबदार नाहीत. जातिभेद ही वरून वाहात आलेली गटारगंगा आहे. हा आपले कडे वाहात येणारा नरक आहे. आणि त्यामुळे जातिभेदाची कटू फळे व त्याचा दुष्परिणाम आपल्याला सोसावा लागत आहे. आणि खेदाची गोष्ट ही की हे हिंदू लोक आपल्यातील जातिभेद तर दूर करीत नाहीतच; उलट अस्पृश्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचा जातिभेद दृढ करावयास झटतात मातंगांना हाती धरून महाराविरुद्ध उठवावयाचे, चांभारांना हाती धरून त्यांना महार-मांगांविरूद्ध उठवावयाचे व आपली भेदनीती आमच्यात पसरवायाची आणि आपली एकी होऊ द्यायची नाही. मात्र या जातिभेदाची मूळ जबाबदारी जरी हिंदु–समाजावर असली तरी आपण आपली जबाबदारी विसरणे आत्मघातकी ठरेल आपल्यातील जातिभेद नाहीसे करणे व आपल्यात भेदनीतीचा फैलाव न होऊ देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. आणि आपण हे साधल्याशिवाय आपला भाग्योदय कधीच होणार नाही. महार-मांगातील रोटीबंदी, बेटीबंदी अजिबात नष्ट झाली पाहिजे. प्रत्येक जात जर आपली शेखी मिरविण्याकरिता आपल्या जातीसच चिकटून राहील-महार महारच राहील व मांग मांगच राहील तर आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार आपण करू शकणार नाही. महार किंवा मांग या नावात असे काय आहे की त्यात तुम्हाला अभिमान वाटावा. या नावाने असा कोणता उज्ज्वल इतिहास तुमच्या डोळ्यासमोर उभा राहतो की जुनी परंपरा चालू ठेवण्यास तुम्ही झटावे ? सर्व समाज या नावांना तुच्छ लेखीत आहे. तुम्हाला आज

उकीरडयावरील कचऱ्याची देखील किंमत नाही. तेव्हा या नावाचा अभिमान न बाळगता आपले दोनही समाज एका वरवंटयाखाली चिरडले जात आहेत, हे जाणले पाहिजे व दोघांनी एकजुटीने राहिले पाहिजे. या बाबतीत महार समाजापुरते जर सांगावयाचे असेल तर ते कोणताच जातिभेद मानावयास तयार नाहीत. मांग, चांभार किंवा भंगी यांच्याशी रोटी व्यवहार किंवा बेटी व्यवहार करावयास त्यांची तयारी आहे. आणि जर महार लोक या गोष्टी करण्यास कचरत असतील तर त्यांना त्या करण्यास भाग पाडण्याची मी हमी घेतो.

दुसरी गोष्ट तुम्हास सांगावयाची म्हणजे तुम्ही सध्या काँग्रेस या संस्थेपासून दूर राहिले पाहिजे. याचे कारण एकच आहे ते म्हणजे हे की काँग्रेस ही मायावी सृष्टी आहे मला तुम्ही असे सांगा की गावातील मारवाडी किंवा सावकार याने ४ आण्याची काँग्रेसची वर्गणी भरली किंवा गांधी टोपी डोकीवर चढवली म्हणजे तो आपला देहस्वभाव विसरू शकेल ? तो आपल्या गरीब कुळांकडून व्याज उकळल्याशिवाय कसा राहील ? तुमच्या माना मुरगळणे तो कसा सोडून देईल ? आणि आज काँग्रेस सांगत आहे की आम्ही सावकाराचे व गरिबांचेही हित साधणार आहोत. मांजर व उंदीर या दोघांनाही ती एके ठिकाणी कशी वागवणार व मांजराच्या पुढ्यात उंदीर ठेवून उंदराचा जीव कसा बचावणार ? हे तुम्हीच पाहिले पाहिजे. आपल्याला मांजराशी काही कर्तव्य नाही. आपल्याला उंदराचा जीव बचावायचा आहे. म्हणून आपण आपलीच शक्ती वाढविली पाहिजे. आणि ती शक्ती वाढविणे म्हणजे तुमच्याच हिताकरिता अस्तित्वात आलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद होणे हे होय. तुम्हाला ह्या पक्षात सामील होण्याकरिता वर्षाचे काठी फक्त ४ आणे द्यावे लागतील. तरी तुम्ही सर्वांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद झाले पाहिजे एवढेच तुम्हाला मला आज सांगावयाचे आहे.

—०—

३१. या लढ्यात तुमच्याजवळ हरण्यासारखे काय आहे ?

(सोलापूर जिल्हा अस्पृश्य राजकीय परिषद दिनांक ३१-१२-१९३७ रोजी पंढरपूर मुक्कामी भरली होती त्याप्रसंगी दिलेले अध्यक्षीय भाषण. जनता' दिनांक ८-१-१९३८,)

वास्तविक या परिषदेचे अध्यक्षीय भाषण लिहून काढून ते आपल्यासमोर वाचावयास पाहिजे होते. परंतु वेळेच्या अभावी तसे मला करता आले नाही. याबद्दल दिलगीर आहे. तेव्हा उगाच पाल्हाळिक भाषण करण्याचे मला कारण नाही. आज मी प्रामुख्याने तीन प्रश्नांसंबंधी बोलणार आहे (१) आपल्याला हिंदू समाजात समतेचे स्थान मिळेल काय ? (२) आपल्या आर्थिक परिस्थितीच्या बाबतीत आपल्याला विचार करावयाचा म्हणजे आपल्याला संपत्तीचा योग्य वाटा मिळाला आहे काय ? (३) आपण आत्मोन्नतीची चळवळ केली तर आमचेवर जुलूम होतो, याचा प्रतिकार करण्यास आपण कसे समर्थ व्हावयाचे ?

पहिल्या प्रश्नाचा विचार आपण पूर्ण केलेला आहे या प्रश्नाशीच धर्मांतराचा प्रश्न निगडित आहे. त्यासंबंधी मी आज या ठिकाणी जास्त बोलू इच्छित नाही. मात्र तुम्हास या पंढरपूर गावी मुद्दाम चोखोबाची स्मृती करून द्यावयाची आहे. मंगळवेढ्यास कूस बांधावयाचे होते आणि त्याकरता पंढरपुराहून महारास वेठीस धरले होते. त्यामध्ये चोखोबाही होता. काम चालू असता एक भित कोसळून पडली आणि त्यामध्ये चोखोबादेखील भितीखाली सापडून मृत्यू पावला. नंतर चोखोबाची समाधी बांधावयाची होती आणि त्याकरता चोखोबाची हाडे लोकांना पाहिजे होती. बरेच महार त्याठिकाणी मरण पावले असल्यामुळे त्या सर्वांचीच हाडे त्याठिकाणी पुरली गेली होती. त्यापैकी चोखोबाची हाडे कोणती हे कळण शक्य नव्हते. तेव्हा लोक नामदेवास भेटले व त्यांनी याबाबतीत मार्ग काढण्यास नामदेवास विनंती केली. नामदेवाने सांगितले की चोखोबाची हाडे अनेक हाडांतून हुडकून काढणे अवघड नाही. कारण चोखोबाची हाडे विठ्ठल नामाचा गजर करीत असणार. तरी ज्या हाडांतून विठ्ठल विठ्ठल असा ध्वनी निघेल ती हाडे चोखोबाची असे समजून ती उचलून आणावी व त्यावर समाधी चढवावी. आता हाडांतून ध्वनी निघण्याचा प्रश्न जरी बाजूला ठेवला तरी चोखोबाच्या योग्यतेसंबंधी एवढे निर्विवाद की त्याच्या निर्जीव अस्थीतूनदेखील विठ्ठल नामाचा उच्चार व्हावा इतकी त्याची महती होती. ज्ञानदेव, सोपानदेव,

मुक्ताबाई इत्यादी संतांच्या मालिकेत चोखोबाला स्थान प्राप्त झाले होते. पण त्यालादेखील विठ्ठलाच्या मंदिरात प्रवेश करता आला नाही. त्याची समाधीदेखील मंदिरापासून दूर अंतरावर ठेवण्यात आली आहे व चोखोबाच्यावेळेस जी परिस्थिती होती; त्याच्याकाळी ज्या रीतीने त्याच्या जातिबांधवांना वागविले जात होते त्याच रीतीने चोखोबाचा जन्म ज्या वर्गात झाला होता त्या वर्गास आजदेखील त्याच हीन दर्जाने लेखले जात आहे त्याच मापाने आज आपल्याला मोजले जात आहे. म्हणून ज्या धर्माची चोखोबाने कास धरली त्याच धर्माची आम्ही कास का धरावी ? त्या धर्मात आपल्याला नेहमी हीन लेखले जाणार ! याकरिता त्या धर्मापासून आपल्याला दूरच राहिले पाहिजे.

दुसरा प्रश्न म्हणजे आर्थिक प्रश्न–आपल्या पोटापाण्याचा प्रश्न. आज देशातील सर्व संपत्ती पांढरपेशा वर्ग बळकावून बसला आहे. त्यांचा ऐषआराम चालू आहे तर तुम्हाला पोटभर खायाला नाही किंवा अंग झाकायला वस्त्र नाही. नुकतीच एक बाई मजजवळ तिच्या मुलाला आंगडे घेण्याकरिता दोन आणे मागत होती. ती जो बाईची स्थिती, तीच आपल्या सर्व वर्गाची आहे. याचे कारण त्यांच्या वाटचास संपत्ती आली आहे तर तुमच्या वाटचास दारिद्र्य आले आहे. म्हणजेच संपत्तीची विभागणी न्यायाची झाली नाही. आणि ती कशी करावयाची हाच आपला आज जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. गावाजवळील रानातील पडिक जमीन आपणास कसण्यास मिळावी म्हणून आपण सरकारकडे मागणी केल्यास ती जमीन आमच्या गुराढोरांच्या चाऱ्याकरिता पाहिजे म्हणून तो आपल्याला देण्यात येऊ नये, असा प्रयत्न गावातील लोक करतात व ती जमीनदेखील आपल्याला लाभू देत नाहीत ज्यावेळेस माझी व मुख्यमंत्री ना. खेर यांची भेट झाली होती, त्यावेळेस या बाबतीत मी त्यांना विचारले की गावातील लोकांच्या गाईम्हशीपेक्षाही आमचे जीव कमी किमतीचे आहेत काय ? सरकारने आमच्या लोकांच्या जिवाकडे न पाहता गावच्या गुराढोरांच्या पोटापाण्याची व्यवस्था करावा का ? सरकारने प्रथम माणसांचा जीव वाचविला पाहिजे व नंतर जनावरांचे जीवित्व रक्षण केले पाहिजे तुम्हाला सांगावयाचे म्हणजे एवढेच की आज तुमची किंमत जनावरापेक्षाही कमी आहे. आज शेटसावकारांचे सर्व वाली आहेत. गरिबांचे वाली कोणी नाही. गरीबांचे वाली गरीबच आहेत आणि गरिबांना जर आपली स्थिती सुधारून घ्यावयाची असेल तर त्यांनी कायदे करण्याची जी राजकीय सत्ता ती हस्तगत केली पाहिजे. ते जर कायदे मंडळात निःस्वार्थी लोक पाठविणार नाहीत तर त्यांची फसगत झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून आपल्याला कायदे मंडळात आपल्या हिताचे कायदे करून घेणारे लोक पाठविता आले पाहिजेत व त्याकरिता नेहमी सघटित राहिले पाहिजे. त्या करिताच स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना झाली आहे. आज कायदे

करणारे सरकार काँग्रेसचे आहे. ती काँग्रेस म्हणजे एक विश्वामित्राची मायावी सृष्टी आहे. तेथे मुक्तेश्वराने वर्णन केल्याप्रमाणे उंदीर मांजरीचे दूध पीत आहे. वाघ शेळी एका शय्येवर झोप घेत आहेत. मुंगूस सापाचे पटापट मुके घेत आहे. तेथे शेठ सावकार लोक कुळांचे हित साधू म्हणून सांगत आहेत. भांडवलदार मजुरांचे कोटकल्याण करू म्हणून बरळत आहेत. ते बोलणे किती फोल आहे–ती जनतेची कशी फसवणूक आहे, हे गरीब लोकांना सांगण्याची आवश्यकता नाही. शेठ सावकार हे आपले हितशत्रू आहेत, याचे आपल्यास उपजत ज्ञान आहे. काँग्रेस लोकांची अशी फसवणूक करीत असल्यामुळे मी तिच्यात सामील झालो नाही. आणि म्हणूनच तुम्हालाही सांगत आहे की तुम्ही काँग्रेसपासून अगदी दूर राहा.

तुमच्या हिताचे कायदे आणणे व त्या करिता झगडणे हे माझे कर्तव्य आहे व ते मी करीन, असे मी तुम्हाला आश्वासन देतो. मी माझ्या कर्तव्यास जागेन पण त्याच वेळेस तुम्ही तुमच्या कर्तव्यास जागले पाहिजे, हे मला तुम्हास सांगावयाचे आहे. तुम्ही आपली चळवळ जोमदार केल्याशिवाय आपल्यास यश लाभणार नाही व आपले जीवित सुखाचे होणार नाही.

तिसरा प्रश्न आपण आपल्या उन्नतीचे कार्य करीत असता आपल्यावर जो जुलूम होतो त्याचे कसे निवारण करावयाचे ? तुम्हाला माहीत आहे की आपल्या विरुद्ध सर्व जग आहे. आणि त्याला तोंड द्यावयाचे म्हणजे ते दोन प्रकाराने द्यावयास हवे. प्रथमतः आपण प्रत्येकाने आपल्या मनातील भीती नाहीशी केली पाहिजे. ज्या ज्या वेळेस आपल्यावर कोणताही जुलूम होईल त्या वेळेस जुलूम करणाराशी दोन हात करावयास न डगमगता तयार झाले पाहिजे. काय व्हायचे असेल ते होईल त्याला भिण्याचे कारण काय आहे ? तुमच्याजवळ आहे काय की ते हरण्याची धास्ती वाटावी ? तुम्ही मरणासदेखील भिता कामा नये. इतके तुम्ही निर्भय झालात तरच तुमच्यावरील जुलमांचा तुम्हास प्रतिकार करता येईल. आपल्यातील तरुण माणसांनी आपल्या पेहेरावात देखील सुधारणा करावयास हवी. धोतराच्या ऐवजी आखूड तुमान व अंगात एक कुडते म्हणजे स्काऊटचा ड्रेस केला पाहिजे. १८ वर्षांपासून ४० वर्षांपर्यंत प्रत्येकाने असा सुटसुटीत पोशाख केल्यास तुमच्या मनोवृत्तीत देखील बदल झाल्याशिवाय राहणार नाही व तुमच्या मनातील भीती नाहीशी होईल. शिवाय अंतःशुद्धीस जोड म्हणून जुलमापासून रक्षण करण्याकरिता आपल्याला एक फंड उभारला पाहिजे. त्या निधीतून कायदेशीर इलाज व पीडितांचे दुःख निवारण हचा गोष्टी कराव्या लागतील.

मी सांगितलेल्या सर्व गोष्टी करण्यास तुम्ही आता सिद्ध झाले पाहिजे आणि तसे तुम्ही व्हाल अशी माझी खात्री आहे.

— ० —

३२. शेतकरी बांधवांना स्फूर्तीदायक संदेश

(हे पत्रक असून जनतेच्या दिनांक १ जानेवारी १९३८ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे.)

शेतकरी बंधूंनो,

तुमची दुःखे अनेक आहेत. ती दूर करण्यास तुम्हीच कंबर कसली पाहिजे व आपली बळकट संघटना केली पाहिजे. मी स्वतंत्र मजूर पक्षातर्फे खोती नष्ट करण्याचे जे बिल कायदेमंडळात आणले आहे ते पास करवून घेणे हे माझ्या प्रयत्नांपेक्षा तुमच्या एकजुटीवर अधिक अवलंबून आहे तुमची संघटना जितकी अधिक मजबूत कराल तितकी स्वतंत्र मजूर पक्षाची शक्ती वाढेल व तुमच्या हिताचे अनेक कायदे पास करून घेता येतील. तुमच्या सामाजिक भेदांचा फायदा घेऊन तुमचे हितशत्रू तुमची एकी होऊ देणार नाहीत. तरी या बाबतीत कुणबी, मराठे, महार, चांभार वगैरे या सर्वांनी शेतकरी तेवढा एक आहे, असे समजून आपल्या हिताच्या आड कोणाला येऊ देऊ नका. रत्नागिरी जिल्ह्यातील कुणबी जातीतील शेतकऱ्यांनी आपली संघटना जोराने सुरू केलेली आहे, हे पाहून मला अत्यानंद होत आहे व हाती घेतलेल्या कामात मला उमेद येत आहे.

तुमच्या फायद्याच्या गोष्टी आम्ही करणार आहोत अशा भूलथापा देऊन इतर पक्ष तुमची फसवणूक करतील. तरी या बाबतीत तुम्ही सावध राहिले पाहिजे. लोकशाही स्वराज्य पक्ष तर बोलून चालून खोती पद्धतीचा बचाव करण्याचा उद्योग करीत आहेत त्या पक्षाच्या वाऱ्याला देखील तुम्ही उभे राहणार नाही, ही माझी खात्री आहे. राहिला काँग्रेसचा पक्ष. त्या पक्षाचे एक मंत्री ना. मोरारजी देसाई यांनी कोकण प्रांतात नुकताच दौरा काढला होता. त्या दौऱ्यामध्ये त्यांचे वर्तन किती निराशाजनक होते हे आपल्याला माहीत आहे काँग्रेसला शेतकऱ्यांचे हित खरोखर साधावयाचे असते तर मूठभर खोतांची भीड मुर्वत न राखता त्यांना आम्ही खोती नष्ट करणार आहोत, असे सांगण्यास हरकत नव्हती. पण ही गोष्ट तर त्यांनी केली नाहीच परंतु उलट नामदार देसाई यांनी 'आपण खोती नष्ट करणार नाही' असे आपल्या कुलाबा जिल्ह्यातील दौऱ्यात स्पष्टपणे सांगितले. असे असता त्यांच्या पक्षाकडून म्हणजे काँग्रेसकडून शेतकऱ्यांचे हित साधणे शक्य नाही. हे कोणी सांगण्याची आवश्यकता नाही.

शेतकऱ्यांच्या कल्याणाकरिता स्वतंत्र मजूर पक्षाने खोती नष्ट करणारे बिल कायदेमंडळात दाखल करून आपले बोलणे प्रत्यक्ष कृतीत उतरविले आहे व येत्या कायदेमंडळाच्या बैठकीत तो पक्ष शेतकऱ्यांच्या मानेभोवतालचे सावकारी पाश दूर करण्याकरिता सावकारशाहीस आळा घालणारे दुसरे बिल दाखल करणार आहे. तरी शेतकरी बंधूंनो. स्वतंत्र मजूर पक्ष हा तुमचा स्वतःचा पक्ष आहे. त्याच्याच पाठीमागे तुम्ही एकजुटीने व धीराने उभे राहून त्याचो शक्ती वाढवा. म्हणजे त्या पक्षाचे हजारोनी सभासद व्हा. तरच आपल्याला आपल्या कार्यात यश येईल.

आज म्हणजे एक जानेवारी १९३८ रोजी कुणबी शेतकऱ्यांनी दापोली मुक्कामी खोती नष्ट करणाऱ्या बिलास पाठिंबा देण्याकरिता जी परिषद घेतली आहे तिच्यायोगे सर्व नाडलेल्या वर्गाच्या उज्ज्वल भवितव्यतेची मुहूर्तमेढच रोवली जात आहे, असे मी समजतो व आपल्या कार्यास यश लाभो अशी इच्छा प्रदर्शित करतो. तरी शेतकरी बंधूंनो, आपसातील काल्पनिक भेद विसरा व कार्याला लागा एवढाच तुम्हास माझा कळकळीचा संदेश आहे.

आपला नम्र,

राजगृह, दादर, मुंबई
ता. १-१-१९३८

भीमराव रामजी आंबेडकर
अध्यक्ष, स्वतंत्र मजूर पक्ष

— ० —

३३. तुमचे हितकर्ते कोण याचा नीट विचार करा

दिनांक १० जानेवारी १९३८ रोजी कोकण, सातारा, नाशिक वगैरे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी असेंब्ली हॉलवर मोर्चा आणला. त्या मोर्चास मार्गदर्शन-पर केलेले भाषण, जनता, दि. १५–१–१९३८)

कष्टाळू लोकांची संघटना करावयाची झाल्यास त्यात जातिभेद, धर्मभेद यांना मुळीच थारा मिळता कामा नये. हा कष्टाळू वर्ग अगोदरच बिकट आर्थिक दडपणाने दडपला गेलेला आहे. अशा परिस्थितीत जी संघटना झाली आहे तीत मी म्हणत आहे त्याप्रमाणे विषमता दिसता कामा नये. आणि आज मी म्हणत आहे अशा तऱ्हेचे सर्व जातींच्या कष्टाळू वर्गाचे हे संघटन पाहून मला आनंद होत आहे म्हणूनच आजचा दिवस मी मोठ्या भाग्याचा समजतो. कारण की आजची आपली ही संघटना केवळ स्वार्थत्यागाच्या बळावर उभारलेली आहे. श्रमजीवी वर्गाने यासाठीच श्रीमंत वर्गाच्या म्हणजे काँग्रेससारख्या पक्षाशी सहकार्य करून किंवा त्याच्यावर विश्वास ठेवून उपयोगी नाही. आपणास माहीतच आहे की या जगात ज्याचे घर पेटते, ज्याच्या घराला आग लावली जाते त्याचे व जो आग लावतो त्याचे कधी तरी संगनमत होईल काय? आपण साधारणपणे प्राणिमात्रा-कडेही दृष्टी फेकली तरी साप व मुंगूस कधीतरी एकत्र होऊ शकतील का? तसेच उंदीर मांजराची मैत्री जमेल का? अशा रीतीने निसर्गाविरुद्ध सृष्टी निर्माण करणाऱ्याविषयी आपण कधी तरी विश्वास बाळगाल का? आणि आपण त्याच दृष्टीने श्रीमंतांची पाठीराखी काँग्रेस हिच्याकडे पाहिले पाहिजे.

आपण मुंबई असेंब्लीमधील काँग्रेसच्या सभासदांकडचे पाहा. बहुतेक सारे निवडून आलेले सभासद सावकार, जमीनदार, खोत आणि श्रीमंत असे लोक आहेत. ते आपल्या हिताविरुद्ध काँग्रेसला काहीच करू देणार नाहीत. त्यांच्यापैकी कित्येकांची सावकारी ५० हजारांच्या वर आहे. आणि हे व्याजबट्टचाने आपले धन वाढविणारे लोक आपल्यासारख्या श्रमजीवी वर्गाच्या कल्याणाची गोष्ट कशी करू शकणार? तुम्ही आपल्या मनात पक्की खात्री ठेवा की हे असेंब्लीमध्ये काँग्रेसच्या कृपाप्रसादानं निवडून आलेले सभासद तुमच्या हितसंबंधाच्या कोणत्याही गोष्टी करणार नाहीत. आपण १९३७ साली या काँग्रेसच्या प्रतिनिधींना निवडून दिलेत त्यावेळी हे लोक आपली कशा तऱ्हेने पायधरणी करीत होते, ही गोष्ट लक्षात ठेवा. तुमच्या हिताचा प्रश्न आम्ही प्रथम हाती घेऊ, तुमच्या सुखासाठी काँग्रेसने फकिरी पत्करली आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन आपण काँग्रेसलाच मते द्या, असे

म्हणणारे हे निवडून आलेले प्रतिनिधी तुमच्याकडे आता ढुंकूनही पाहावयास तयार नाहीत. म्हणून मी म्हणतो आपण या तोंडपुंजे लोकांची यापुढे मुळीच पर्वा करू नका.

असल्या फसव्या लोकांची यापुढे खरी पूजा पायाच्या ठोकरीने केली पाहिजे, आणि आपला खरा हितकर्ता कोण हे निवडताना यापुढे फार सावधगिरी बाळगा. तुम्हाला ईश्वराने बुद्धी दिलेली आहे त्या बुद्धीच्या बळावर तुम्ही सारासार विचार-सरणीने तुमचे खरे हितकर्ते कोण, कोणता पक्ष तुमच्यासाठी प्राणाचीही पर्वा न करता झगडण्यास समर्थ आहे, याची तुम्हीच निवड करा.

खरे पाहिले असता जगात फक्त दोनच जाती आहेत. पहिली श्रीमंताची व दुसरी गरिबाची याशिवाय तिसरा वर्ग म्हटला म्हणजे मध्यम वर्ग होय. जगातल्या कोणत्याही उज्ज्वल चळवळीच्या नाशास हाच वर्ग कारणीभूत होत असतो. आपण कल्पना करा की आपल्या देशात कष्टाने आपले पोट भरणारे बांधव शेकडा ८० आहेत. या संख्येच्या मानाने इतर वर्ग किती अल्प आहे याची कल्पना करा. परंतु केवळ अज्ञानामुळे आणि या वरिष्ठ म्हणणारांच्या हाती सत्ता असल्यामुळे आपणासारख्या बहुसंख्याक जनतेला ते शह देऊ शकतात. परंतु आपण सर्व लोक जागृत झालात, तुम्हाला तुमचे हित कशात आहे हे संघशक्तीने आणि स्वावलंबनाने कळावयास लागले तर आपण एका चुटकीसरशी सर्व अधिकार आपल्या हाती घेऊ शकाल. आपण राष्ट्रीय काँग्रेसच्या मागील कायदेभंगाच्या चळवळीचे बारकाईने निरीक्षण केल्यास आपणास स्पष्टपणे कळून येईल की कष्ट करणाऱ्या लोकांच्या साहाय्यावरच काँग्रेसला आपला लढा इतक्या प्रभावाने लढविता आला. या कष्ट करणाऱ्या लोकांना या काँग्रेसच्या सत्ताधारी लोकांनी त्यावेळी पुष्कळ आशायुक्त वचने दिली होती. काँग्रेसच्या हाती राजकीय सत्ता आल्यावर काँग्रेस पहिल्या प्रथम गोरगरीब श्रमजीवी वर्गाच्या हितरक्षणाचा प्रश्न हाती घेईल; असे ती म्हणे. परंतु आज तुम्हास काय दिसत आहे ? आज काँग्रेसच्या हाती सत्ता आहे, पण त्यांनी अजून कोणत्याही प्रकारची कामगिरी मोठ्या आस्थेने किंवा तातडीने केलेली नाही. आज त्यांचे प्रतिनिधी मुंबई असेंब्लीमध्ये बहुसंख्याक असे आहेत. बहुमताच्या बळावर त्यांना तुमच्या हितसंबंधासाठी वाटेल ते कायदे करणे अशक्य नाही. आमच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे अवघे १४–१५ सभासद आहेत. इतक्या थोड्या सभासदांच्या बळावर आम्हाला तुमच्या हितसंबंधाचे कायदे पास करून घेणे अशक्य आहे. म्हणून यापुढे लक्षात ठेवा की या काँग्रेसच्या भांडवलदार लोकांना आपली मते देऊन निवडून देऊ नका. आज जसे आपण संघटितपणे येथे आला आहात तसेच जातिभेद-धर्मभेद विसरून आपली संघटना जोरदार करा.

आपण कोकण प्रांतातली स्थिती पाहिली तर खोतादी सावकार लोक अवघे हजार किंवा दोन हजार असतील. आणि तुम्ही काबाडकष्ट करणारे लोक १३ लक्षावर आहात. अशा परिस्थितीत आपण इतके दुबळे का, याचे मला मोठे आश्चर्य

वाटते. आज हजार दोन हजार लोक आपणासारख्या १३ लक्ष लोकांवर हुकूमत चालवीत आहेत. याचे मूळ कारण आपली दारुण गरिबी होय. तुम्ही या मूठभर श्रीमंतांकडून पिळले गेला आहात. तुमच्यामध्ये या पिळलेल्या अवस्थेत प्रतिकार करण्याची शक्ती च राहिलेली नाही यासाठी ज्यांनी तुमची अशी असह्य अवस्था केली त्या खोतादी श्रीमंतांना यापुढे कोणत्याही प्रकारचे साहाय्य करू नका. आणि हीसुद्धा गोष्ट लक्षात ठेवा की काँग्रेस या सर्व धनिकांना दुखवून तुमचे हित करणार नाही. तसेच तुम्ही येथे जमलेले निरनिराळचा जातीचे लोक आजपर्यंत आपापल्या जातीची निरनिराळी संघटने करून कार्य करीत होता. त्यामुळे श्रमजीवी म्हणून एका वर्गाची एकत्रित अशी संघटना झाली नव्हती. परंतु ती संघटना यापुढे होण्याचे भाग्य दिसू लागले आहे. ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

श्रीमंत वर्गाला साहाय्य करणाऱ्या काँग्रेसला कोणत्याही प्रकारे साहाय्य करून आपले हित होणार नाही, हे आजची प्रत्यक्ष परिस्थितीच सांगत आहे. गेल्या असेंब्लीच्या निवडणुकीत आम्ही स्वतंत्र मजूर पक्षातर्फे काँग्रेसशी दोन हात करुन जशा निवडणुकी लढविल्या व जे थोडेफार यश मिळविले तसेच जर कम्युनिस्टादी जहाल पक्षातील पुढाऱ्यांनी आचरण केले असते तर त्यांनाही निवडणुकीत थोडे फार यश मिळून त्यांचे साहाय्य आम्हाला आज असेंब्लीमध्ये झाले असते. परंतु त्यांनी यापुढे तरी आपले कर्तव्यकर्म बजावण्यास मुळीच कुचराई करता कामा नये. तसेच माझ्या कम्युनिस्ट मित्रांना दोन हिताचे शब्द सांगणे अयोग्य होणार नाही, असे मला वाटते. मी या कम्युनिस्टांच्या तत्त्वज्ञानाची येथील सर्व पुढाऱ्यांपेक्षा खात्रीने अधिक पुस्तके अगदी अभ्यासपूर्वक वाचली आहेत. त्या पुस्तकांवरून पाहता कम्युनिस्टांचे तत्त्वज्ञान कितीही सुंदर असले तरी त्याचा कितपत उपयोग करता येईल, हे पाहिले पाहिजे. आणि त्या दृष्टीने कार्य केल्यास रशियन लोकांना जे यश मिळवावयास बरेच श्रम व कालावधी लागला, तितका हिंदुस्थानातील परिस्थितीमुळे लागणार नाही, असे मला वाटते. आणि म्हणून मला श्रमजीवी वर्गाच्या चळवळीच्या लढ्याबाबत कम्युनिस्ट तत्त्वज्ञान अधिक जवळचे वाटते. आपली परिस्थिती अशी आहे की आपणाजवळ आज धन नाही. आपल्या चळवळीचा सर्व ठिकाणी प्रचार करण्याकरिता एखादे प्रभावी दैनिक वर्तमानपत्र नाही. सरकारचे साहाय्य मिळविण्याची आशा नाही. म्हणून आपण आपली स्वतंत्र आणि संघटित अशी संघटना करा आणि आपला लढा सर्व प्रकारचे भेद विसरून लढविण्यास धैर्याने तयार व्हा हीच विनंती.

(मुंबई सरकारपुढे सादर केलेल्या मागण्या)

मूलभूत मागण्या

(१) शेतकरी वर्गाला स्वतंत्रपणे व सुखासमाधानाने राहता यावे म्हणून जमिनीचा प्रत्यक्ष मशागत करणाऱ्यालाच त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले पाहिजे.

(२) जमिनीची मशागत करून तीवरच जगणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय द्यायचा असेल व त्यांच्या आर्थिक हिताची व्यवस्था व्हायची असेल तर खोत-इनामदारासारखे मध्यस्थ नसले पाहिजेत.

(३) जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यावर कर अगर पट्टी बसविण्यापूर्वी त्याला चरितार्थापुरती योग्य ती सोय करून देणे हे सरकारने आपले कर्तव्य मानले पाहिजे.

(४) त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना किमान मजुरी देण्याची कायद्याने सोय करून त्यांच्या हिताला जपणे, हेही लोकमतवादी सरकारचे कर्तव्य आहे.

तातडीच्या मागण्या

(१) ज्याप्रमाणे थकलेल्या शेतसाराबाक्या माफ करण्यात आल्या त्याच-प्रमाणे आजपर्यंत थकलेल्या खंडाच्या बाक्याही ताबडतोब माफ करण्यात याव्यात.

(२) जमिनीचे किमान उत्पन्न ठरवून त्यापेक्षा कमी उत्पन्नावर सारा अजिबात माफ करावा व किमान उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या जमिनीवर वाढत्या मानाने साऱ्याची आकारणी करण्याच्या दृष्टीने जमीन महसूल कायद्यात दुरुस्ती झाली पाहिजे. त्याचप्रमाणे बाजारभाव उतरले असल्यामुळे ही दुरुस्ती होईपर्यंतच्या मुदतीत ज्यांना सालिना ७५ रु. अगर त्यापेक्षा कमी शेतसारा द्यावा लागतो, त्यांचा सारा ताबडतोब ५० टक्क्यांनी कमी केला पाहिजे.

(३) खोतीपद्धती व इनामदारीपद्धती या आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक व सामाजिकदृष्ट्या जुलमी असल्यामुळे या पद्धती भरपाईसह अगर भरपाईशिवाय नष्ट करण्यासाठी कायदा करण्याची व्यवस्था ताबडतोब झाली पाहिजे. त्याचप्रमाणे कुळांकडून वसूल करण्यासाठी व त्यांना छळण्यासाठी जमीनदार जे जे मुदती दाव्यासारखे जुलमी उपाय योजतील अगर योजण्याचा बेत करतील ते ते सर्व ताबडतोब बंद पडले पाहिजेत; व सरकारने यासाठी योग्य ती व्यवस्था करावयास पाहिजे.

(४) (१) तीन वर्षे जमीन कसणाऱ्या कुळाला कायम कूळ समजले जावे, असा कायदा सर्व जमीनदारांच्या कुळांना लागू केला पाहिजे. या कायद्याला बगल देण्याची कारवाई जमीनदारांना करता येऊ नये म्हणून एक लँड कमिशन नेमण्यात यावे; व या कमिशनच्या परवानगीखेरीज कुळाच्या अंगाखालील जमीन काढून घेतली जाता कामा नये. कूळ जोपर्यंत खंड देत आहे तोपर्यंत त्याजकडे तीन वर्षे असलेली जमीन कोणत्याही सबबीवर काढून घेतली जाता कामा नये.

(२) साऱ्याच्या मानाने फक्त तिसरा हिस्सा अधिक खंड घ्यावा. जास्त खंड कुळाकडून घेता येऊ नये.

(५) लहान शेतकऱ्यांची पाणीपट्टी ५० टक्क्यांनी कमी केली पाहिजे. बहुसंख्य लहानलहान शेतकरी व कुळे यांना फायदेशीर होईल असे धोरण इरिगेशन खात्याने चालविण्याच्या दृष्टीने इरिगेशन कायद्यात दुरुस्ती केली पाहिजे.

(६) सर्व खेडचांना मोफत चराई राने असावीत.

(७) कर्जनिवारणाचा योग्य तो कायदा सर्वत्र लागू होईपर्यंत कर्ज तहकुबी जाहीर करावी.

(८) शेतकऱ्याच्या हातून सावकाराच्या हाती जमीन जाऊ नये यादृष्टीने सावकारीवर बंधन घालावे.

(९) शेतकऱ्यांच्या निर्वाहासाठी लागणारी किमान जमीन व त्याच्या चरितार्थाला लागणाऱ्या वस्तूंवर सावकारी जप्ती आणण्यास बंदी झाली पाहिजे.

(१०) वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुषास मताधिकार.

(११) वेठ-बिगार करून घेणे व बेकायदेशीर रीतीने पैसे उकळणे, हे फौजदारी गुन्हे ठरविले पाहिजेत.

(१२) जमीन महसूल खात्यातील सर्व मॅजिस्ट्रेटी अधिकार काढून घ्यावेत.

(१३) कसता येण्याजोगी सर्व पडित जमीन उपरी शेतमजुरांना मोफत वाटून द्यावी.

---

३४. एकराष्ट्रीयतेसाठी सामाजिक बंधने तोडली पाहिजेत.

(लोकल बोर्ड दुरुस्ती बिलावर दिनांक १८-१-३८ रोजी चर्चा चालू असताना असेंब्लीत मांडलेले विचार जनता, दि. २२-१-१९३८)

या दुरुस्ती बिलात थोडचा-अगदी अल्प प्रमाणातल्या प्रगतीशिवाय बिलात विशेष राम आहे, आसे मला वाटत नाही. या बिलातील संयुक्त मतदान पद्धती-विषयी मला बोलावयाचे नाही. कारण पी पुणे कराराने संयुक्त मतदान पद्धतीला बांधला गेलो आहे. तरीपण या पद्धतीविषयी माझा दष्टिकोण कोणता आहे हे मी स्पष्टपणे निवेदन करीत आहे. या संयुक्त मतदान पद्धतीने विशेष काय घडून आले इकडे दृष्टी देताना असे दिसून येईल की फक्त निवडणुकीच्या दिवशी हिंदू व मुसलमान जाती मतदानासाठी एकत्र येऊ शकतील, मते देतील. पण त्यामुळे उभय समाजाच्या मनोवृत्तीत कोणता बदल होईल ? ज्या भावनेसाठी – ज्या राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेसाठी ही संयुक्त मतदान पद्धत अमलात आणली जात आहे, त्या दृष्टीने याने कोणता बदल घडून येणार ? निवडणुकीच्या दिवसानंतर या उभय समाजाचे विभक्तीकरण कायमच राहणार ! व्यवहाराच्या दृष्टीने पाहिले तर हे दोघे भिन्न धर्मांचे समाजबंधू एकाच चाळीत एकत्र कधीही राहू शकणार नाहीत; एकत्र सहभोजन करणार नाहीत. बेटी-व्यवहार तर अशक्य कोटीतली गोष्ट ! मग नुसत्या संयुक्त मतदार संघाने या उभय समाजात एकी कशी होणार ? यासाठी आजची सारी सामाजिक बंधने ताडकन तोडून टाकली पाहिजेत. आणि यासाठी प्रथम हिंदू समाजाने पुढाकार घेतला पाहिजे. याशिवाय असल्या बिलात असल्या राष्ट्रभावना जागृत करण्याच्या योजना योजून मुळीच कार्यभाग होणार नाही. आणि या सर्वसाधारण दुरुस्ती बिलाविषयी स्पष्टपणे बोलायचे म्हणजे माझी निराशा झालेली आहे. या बिलात समाधान होण्यासारखे काय आहे, असे शोधू लागल्यास 'दर्यामें खसखस' अशीच अवस्था व्हावयाची !

* * *

(सोलापूर येथील हिंदी ख्रिस्ती समाजापुढे दिलेले भाषण. दिनांकाचा उल्लेख नाही. जनतेने 'ज्ञानोदय' वरून त्याचे पुनर्मुद्रण केले. त्यामुळे त्याचा बराचसा भाग त्रोटक व रिपोर्टवजा आहे. देता येण्यासारखा भाग पुढे दिला आहे. जनता, दि. ५-२-१९३८.)

जगात उपलब्ध असलेल्या प्रमुख धर्मांपैकी दोनच धर्म व त्यातील दोनच व्यक्ती धर्मांतराचे दृष्टीने माझ्यासमोर आहेत. त्यापैकी पहिली व्यक्ती बुद्ध आणि दुसरा ख्रिस्त. मनुष्याचे मनुष्याशी कर्तव्य काय व मनुष्याचे देवाशी कर्तव्य काय आहे, मुलाने बापाशी कसे वागावे, सर्व माणसात समता, स्वतंत्रता ज्या धर्मात अनुभवावयास सापडेल असाच धर्म मला व माझ्या अनुयायांना हवा आहे.

मिशनरींना वाटते की आपण मनुष्याला ख्रिस्ती केले की आपले काम झाले. त्याच्या राजकीय हक्काची सोय काही ते पाहात नाहीत. मला ख्रिस्ती लोकात हा एक फार मोठा दोष दिसतो. कारण त्यांनी आजपर्यंत राजकारणात घालावा तसा हात घातला नाही. कोणत्याही संस्थेला राजकीय आधार असल्याशिवाय ती टिकणे फार कठीण आहे. आम्ही अस्पृश्य अडाणी व अशिक्षित जरी आहोत तरी आम्ही चळवळ करीत आहोत व त्यामुळेच आमच्या १५ जागा लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत आहेत. अस्पृश्य मुलांना सरकारी स्कॉलरशिपा मिळू लागल्या आहेत व आमच्या मुलामुलींकरता सरकारने बोर्डिंग काढलेले आहेत. पण ख्रिस्ती लोकांच्या बाबतीत तसे काही नाही. एखादा अस्पृश्य मुलगा, तो अस्पृश्य आहे तोपर्यंत त्याला सरकारी स्कॉलरशिप मिळते, पण तोच उद्या ख्रिस्ती झाल्यास ती बंद होते. म्हणजे धर्मांतर केल्याबरोबर त्याचे दारिद्र्य जात नाही. पण धर्मांतरामुळे त्याला ही आर्थिक हानी सोसावी लागते. तेच तुमचा राजकारणात हात असला तर ह्याच्या उलट परिस्थिती झाली असती.

तुमचा समाज शिकलेला आहे. शेकडो मुलगे व मुली मॅट्रीक झालेले आहेत. त्यांनी हया सार्वजनिक अन्यायाविरुद्ध अशिक्षित अस्पृश्यांसारखी कधीही चळवळ केलेली नाही. एखादी मुलगी नर्स झाली की ती आपल्याच धंद्यात डोके घालते व आपल्या पुरतेच पाहते. कोणी मास्तर झाला की तो आपल्या मास्तरकीत दंग होतो व सार्वजनिक कामात पडत नाही. कोणी कारकून किंवा कोणत्याही हुद्यावर असला तरी तो आपल्याच व्यापात असतो व सामाजिक अन्यायाकडे दुर्लक्ष करतो. तुमचा समाज इतका जरी सुशिक्षित आहे तरी तुमच्यापैकी कितीसे डिस्ट्रिक्ट जज्ज किंवा मॅजिस्ट्रेट आहेत ? याचे कारण तुमचे राजकारणाकडे असलेले दुर्लक्ष होय, हे मी सांगतो; कारण तुमच्या हितासाठी बोलायला भांडायला सरकारात कोणीच नाही. राजकारणाचा गाडा ओढायला तुमच्यातील कोणी असल्यास जरी आपल्या इच्छेप्रमाणे तो चालत नसला तरी निदान त्याचे चाक आपल्या अंगावर न येऊ देण्याची तरी तुम्हास खबरदारी घेता येईल.

तुम्ही मुक्कामावर आहात व आम्ही मार्ग चालत आहोत. तुमच्या मुक्कामाच्या बऱ्यावाईटपणावरच आमचा त्या ठिकाणी मुक्काम येणार !

— ० —

३५. मुंबई प्रांताचे भिकार बजेट !

(बजेटावरील भाषण. तारखेची जागा फाटलेली आहे. जनतेचा हा अंक पूर्ण उपलब्ध नसल्यामुळे व जे पान उपलब्ध झाले तेही अत्यंत फाटलेल्या स्वरूपात असल्यामुळे हे भाषण अपूर्ण स्वरूपात दिलेले आहे. जनता, दिनांक ५–३–१९३८.)

मुंबई सरकारच्या नवीन बजेटावर काल-परवा जी भाषणे झाली त्यामध्ये या बजेटाचे अभिनंदन करण्यात आले. परंतु या अभिनंदनात मी भाग घेणे अशक्य आहे, असे खेदाने म्हणावे लागते. बजेटाकडे दृष्टी वळविताच प्रथम-दर्शनीच हे बजेट निराशाजनक आहे, असे वाटते. या अंदाजपत्रकाची अशा रीतीने योजना केलेली आहे की श्रीमंताच्या खिशाला बिलकूल चाट न देता गरिबांना हालअपेष्टेत दिवस काढण्याम भाग पाडले आहे तसेच या बजेटाने भावी सुखकर परिस्थितीची अंधुकही जाणीव होत नाही किंवा आपल्या प्रांतात उज्ज्वल भविष्य-काळाचा प्रभातकाल सुरू झाल्याचीही कल्पना होत नाही. पोकळ आश्वासनावर या बजेटाची सजावट केलेली आहे. तरीपण या बजेटातील पोलीस फोर्सबद्दल केलेली योजना फक्त काही अंशी अभिनंदनीय आहे, परंतु या योजनेचे श्रेय मी ना. फडणीसांपेक्षा ना. गृहमंत्र्यांनाच देऊ इच्छितो. याच पोलिसांच्या फोर्ससंबंधी विद्यमान अधिकारारूढ काँग्रेस व पूर्वीची काँग्रेस यांचे नाते कसे विसंगत होते, याची जाणीव सर्वांना आहेच. मागे काँग्रेसच्या असहकारितेच्या चळवळीच्या काळात पोलिसांविषयी काँग्रेसवाल्यांच्या मुखातून 'पिवळी पाडी हाय हाय, म्हणून निघणारी मुक्ताफळे ऐकणारांना आज त्याच अधिकारारूढ काँग्रेसला जादा ३६ हजार रुपयांची तरतूद त्याच पोलीस फोर्सकरता करण्याची पाळी यावी ही जितकी अभिनंदनाची तितकीच आश्चर्याची गोष्ट होय !

सध्याचे मुंबई सरकार असेंब्लीच्या अधिकाराचे अतिक्रमण करीत आहे असे मला वाटते. अजूनपर्यंत कोणत्याही सरकारने आपल्याच अधिकारात अंदाज-पत्रकातील खर्चाच्या बाबतीत मोठ्याशा रकमा जमेला धरल्या नव्हत्या. तसेच या बाबतीत सरकारने प्रथम या खर्चाच्या योजनेसंबंधी असेंब्लीला आगाऊ जाणीव करून द्यायला पाहिजे होती. दुसरे असे की अकाऊन्टन्ट जनरलला ही रक्कम कशा रीतीने उपयोगात आणावयाची आहे, याची कल्पना द्यायला पाहिजे होती. परंतु या सर्व गोष्टींकडे सत्तेच्या बळावर दुर्लक्ष करून मुंबई सरकार आज आपल्या कल्पनेच्या बळावर किंबहुना हवेतील बंगले बांधावयाच्या योजनेसाठी

एकदम ३६ लाख रुपयांची रक्कम जमा करीत आहे. या बाबतीत असेंब्लीचे मत घेतलेले नाहीच आणि आपण विधायक असे कोणते कार्य करणार आहोत याचीही अंधुकसुद्धा कल्पना दिलेली नाही. तसेच या गृहाचे जे कायदे मंजूर करण्यात येतात त्या कायद्याखाली नियम करण्याचा या गृहाचा काहीच हक्क नाही, असे ना. गृहमंत्र्यांचे मत आहे, असे वाटते. ते आज यावेळी गैरहजर असल्यामुळे त्यांच्यासंबंधी खुलासा मिळणे शक्य जरी नसले, तरी या ना. गृहमंत्र्यांच्या सत्तेच्या दुरुपयोगाबद्दल मला येथे स्पष्टपणे इशारा देणे भाग पडत आहे.

नवीन लोकोपयोगी कामाची तरतूद करण्यासाठी सरकारने एक कोटी सोळा लक्ष रुपयांची योजना केल्याचे सांगण्यात येते. परंतु या सर्व आकडचांची छाननी केली तर आपणास काय दिसून येईल ? या प्रचंड रकमेतून दरवर्षी होणाऱ्या खर्चापैकी ४८ लक्ष ११ हजार रुपये व दारूबंदीच्या खर्चासाठी ३१ लक्ष रुपये राखून ठेवले आहेत ते वजा केले म्हणजे या लोकोपयोगी कामासाठी ३७ लक्षच रुपये खरे जमेला धरलेले दिसून येतील त्याचप्रमाणे शिक्षण, पाणीपुरवठा, वैद्यकीय मदत वगैरेसाठी खर्च होणारी रक्कम परत मिळणे अशक्य असते किंवा त्या खाती खर्च केलेल्या रकमेतून उत्पन्न मिळणे अशक्य असते. तसेच प्रांतातील बेकारी निवारण, आजारीपणाचा विमा, म्हातारपणासाठी विमा, अपघाताचा विमा, स्त्रियांच्या बाळंतपणासाठी मदत वगैरे अनेक आवश्यक अशी लोकोपयोगी कार्ये करण्याची आवश्यकता आहे. परंतु याबाबतीत मुंबई सरकारने मुग्धता स्वीकारलेली दिसते. आज वरील लोकोपयोगी कार्यासाठी जी रक्कम जमेस धरली आहे ती पुढील वर्षी धरणे कठीण होईल असे वाटते.

गेल्या ऑगस्ट महिन्यात याच अधिकाररूढ सरकारने कामगारांचे हितसंबंध रक्षण करण्यासाठी जे धोरण आखल्याचे जाहीर केले होते त्या योजनेचा या प्रांताला खर्च किती येईल याचा अंदाज ना. मंत्र्यांनी दिला असता तर अधिक बरे झाले असते.

आपल्या प्रांताच्या लोकोपयोगी योजनेसाठी ना. फडणीसांची योजना थोडा-वेळ दृष्टिआड ठेवल्यास माझ्या अल्पमतीप्रमाणे या योजनेला १४ कोटी रुपये खर्च येईल. इतका खर्च करण्याची ज्या सरकारच्या अंगी धमक आहे तेच सरकार त्या प्रांताचा राज्यकारभार चालविण्यास योग्य आहे, असे माझे मत आहे. परंतु रक्कम उभी करण्याचा आमचे प्रांतिक सरकार प्रयत्न करील काय ? इतर पाश्चिमात्य देशातील सरकार प्रत्येक माणशी किती खर्च करू शकते याचे प्रमाण असे दिसून येईल की कॅनडा ९ पौंड ८ शिलिंग; साऊथ ऑस्ट्रेलिया १९ पौंड; न्यूझीलंड २२ पौंड; अमेरिकेतील फ्रीस्टेट १० पौंड आणि मुंबईमध्ये केवळ ७ पेन्स ! हे प्रमाण पाहिल्यावर आपल्या भिकार आर्थिक परिस्थितीचे चित्र किती भेसूर आहे याची चांगली जाणीव होते. (पुढील भाग फाटलेला आहे.)

अपूर्ण

— ० —

३६. गरिबांचा पक्ष गरिबांनीच चालविला पाहिजे

(दि. २७–३–१९३८ रोजी नायगाव, मुंबई येथे स्वतंत्र मजूर पक्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्याप्रसंगी केलेले अध्यक्षीय भाषण. जनता, दिनांक २–४–१९३८.)

आजच्या या स्वतंत्र मजूर पक्षाच्या मुंबई शाखेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहण्यास मला आनंद वाटतो. आपले स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्य शिस्तीने व नियमबद्धतेने चालू ठेवण्याकडे लक्ष देणे जरूर आहे. आजची सभा महत्त्वाची आहे. आज सकाळी मी स्वतंत्र मजूर पक्षाच्या मुंबई शाखेच्या ऑफिसला भेट दिली व दोन अडीच तास तेथे राहून चाललेल्या कामाची तपासणी केली. त्यात मला तेथे जे पाहण्यास मिळाले ते पाहून आनंद व आश्चर्यही वाटले. आश्चर्य वाटण्याचे कारण हे की स्वतंत्र मजूर पक्षाचे येथील कार्य अत्यंत व्यवस्थितपणाने व सुरळीत चालल्याचे मला दिसून आले, आणि दुसरा कोणीही माणूस ऑफिसमध्ये जाऊन पाहील तर त्याच्याही मनाची खात्री झाल्याशिवाय राहणार नाही. ज्या कोणाला ऑफिसमध्ये जाऊन सदर काम पाहणे शक्य नसेल त्यांची मी खात्री करू शकतो की एकंदर कामाची व्यवस्था चांगल्या तऱ्हेने चालली आहे. ऑफिसमध्ये काम करणारे जे स्वयंसेवक किंवा थोडासा मोबदला घेऊन काम करणारे ९–१० वर्कर्स आहेत त्यांनाही या कामाचे श्रेय दिले पाहिजे. आपला पक्ष गरिबांचा असल्यामुळे आपणाला त्यांना भरपूर मोबदला देता येत नाही. असे असूनही ते व्यवस्थित काम करतात हे त्यांना भूषणावह आहे. आता तुम्हाला जो जमाखर्चाचा अहवाल वाचून दाखविण्यात आला त्यावरून तुम्हाला दिसून आले असेल की आतापर्यंत हजार बाराशे रुपयांचा खर्च झाला आहे; व हजार बाराशे रुपये शिल्लक आहेत. या जमाखर्चाची काँग्रेसच्या जमाखर्चाशी तुलना केल्यास काँग्रेसच्या मीठमिरचीलाही ही आपली रक्कम पुरणार नाही; एवढी थोडी आहे. आतापर्यंत कार्यकारी मंडळातील ४०–५० लोकांनी व बाहेरील २५–३० प्रचारकांनीच हे कार्य केले आहे. तुम्ही सर्वांनी जर मनावर घेतले तर यापेक्षाही मोठे कार्य घडून आल्याशिवाय राहणार नाही. मुंबई शहरात अस्पृश्य वर्गाचीच लोकसंख्या एक लाखावर आहे त्यापैकी आतापर्यंत स्वतंत्र मजूर पक्षाचे चार हजार सभासद झाले आहेत, ही लाजिरवाणी गोष्ट आहे. येथे बसण्याची जी लोकांची व्यवस्था केली आहे त्यावरून स्त्रियांचे दोन गट व पुरुषांचेही दोन गट असलेले मला दिसून आले. चौकशी केल्यावर मला समजले की अलीकडील

गटातील सर्व स्त्रिया स्वतंत्र मजूर पक्षाच्या सभासद झालेल्या असून पलीकडील स्त्रियांचा गट सभासद न झालेल्या स्त्रियांचा आहे. या दोन्ही गटात सभासद न झालेल्या स्त्रियांचाच गट मोठा दिसतो. ज्या पुरुषांना व स्त्रियांना येथे सभेला येऊन काय कार्य चाललेले आहे हे ऐकावेसे वाटते त्यांना आठ आणे देऊन सभासद होण्याची बुद्धी का झाली नाही, याचे मला आश्चर्य वाटते. हा स्वतंत्र मजूर पक्षाचा एकंदर कारभार कोणाकरिता व कशासाठी आहे, याचा तुम्ही विचार केला आहे काय ? हा सर्व कारभार तुमच्या-आमच्यावर जो इतरांचा जुलूम चालू आहे तो नाहीसा करण्याकरिता आहे तेव्हा या कारभाराला मदत करणे, हे तुमचे कर्तव्य नाही काय ? या जमलेल्या स्त्रियांमध्ये पुष्कळांना पानसुपारी खाण्याची सवय असेल. त्यासाठी दरमहा त्यांचे रुपया-दोन रुपये खर्च होत असतील ! असे असता स्वतंत्र मजूर पक्षालाच वर्षाकाठी आठ आणे देण्यास त्यांना जड का वाटावे ? माझी सर्व मदार, स्त्रियांवरच भिस्त आहे. त्या पुढे येऊन स्वतंत्र मजूर पक्षाच्या सभासद होतील तर पुरुषांनाही त्यांचा कित्ता गिरविणे भाग पडेल. आतापर्यंत तुम्ही सर्व स्वतंत्र मजूर पक्षाचे आठ आणे देऊन सभासद झाला नाहीत याबद्दल मला खेद वाटतो. परंतु मला आशा आहे की थोडयाच अवधीत तुम्ही सर्वजण स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद व्हाल.

पुरुषांनाही मला हेच सांगावयाचे आहे की तुमच्या हितासाठी स्वतंत्र मजूर-पक्ष निघाला असून त्याचे आतापर्यंत चार हजारच सभासद व्हावेत ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी आहे. तुम्ही सर्वांनी या पक्षाचे सभासद का होऊ नये हे मला कळत नाही. काँग्रेसच्या-श्रीमंताच्या कैवारी संस्थेच्या-विरुद्ध गोरगरिबांची दाद लावण्याचे कार्य हा पक्ष करीत आहे. आज असेंब्लीत काँग्रेसच्या झिज्या उपटणारा व गरिबांचा कैवार घेणारा कोणता पक्ष असेल तर तो एकटा स्वतंत्र मजूर पक्ष हाच होय ! मला या पक्षासाठी काँग्रेससारखे श्रीमंताकडून पैसे मिळणार नाहीत, असे नाही. मी प्रयत्न केला तर श्रीमंताकडूनही या पक्षाला पुष्कळ पैसे मिळवू शकेन. परंतु अशा रीतीने श्रीमंताच्या पैशावर जर या पक्षाचे कार्य चालू लागेल तर मग या पक्षाचे वैशिष्ट्य नष्ट होईल. हा पक्ष श्रीमंत लोकांनी विकत घेतल्यासारखे होईल. मग या पक्षाला गरिबांच्या हितासाठी कसे झटता येईल ? म्हणून गरिबांच्या हितासाठी निघालेल्या या स्वतंत्र मजूर पक्षाला गरिबांनाच मदत केली पाहिजे असे करण्यानेच तुमचे स्वातंत्र्य कायम राहील. गरिबांचा संसार गरिबांनीच चालविला पाहिजे हे जर तुम्हाला समजले असेल तर मला आशा आहे की मुंबई शाखेच्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सभासदाची संख्या चार हजारांची चाळीस हजार होण्यास वेळ लागणार नाही.

— • —

३७. स्वावलंबनाच्या लढ्याचा परिणाम !

(डेव्हिड मिल चाळ मैदानावर १–४–१९३८ रोजी सभा झाली. त्याप्रसंगी दिलेले अध्यक्षीय भाषण. हे भाषण सारांश रूपाने दिलेले असून जनतेच्या पुढील अंकात सविस्तर देऊ, अशी तळटीप आहे. परंतु पुढील अंकात मात्र ते आढळले नाही. जनता, दिनांक ९ एप्रिल १९३८.)

माझी येथे सभेला येण्याची ही दुसरी वेळ आहे. गेल्या सात–आठ वर्षांपूर्वी मी जेव्हा येथे सभेला आलो होतो तेव्हाच्या आणि आजच्या सभेत जमीन अस्मानाचे अंतर आहे. आजच्या सभेने त्यावेळच्या परिस्थितीत कल्पनातीत फरक पडलेला दिसून येईल. मी ज्यावेळी पहिल्याने येथे सभेला आलो त्यावेळी साळुंके नावाच्या एका गोसाव्याचा कीर्तन सप्ताह येथे चालू होता. माझ्या भाषणापेक्षा येथील लोकांना त्याच्या कीर्तनाची उत्सुकता अधिक लागली होती. मी फक्त आठ–दहा मिनिटेच बोललो आणि निघून गेलो. आणि आज त्याच जागेत येथे हजारानी जमलेले लोक माझेच भाषण ऐकण्यास इतके आतुर झालेले पाहून मला एक प्रकारचे कौतुक व आश्चर्य वाटते. लोकांच्या मनावर गेल्या आठ–दहा वर्षात झालेला परिणाम किती परिणामकारक आहे, याची तत्काळ खात्री पटते. अशा-तऱ्हेने आपल्या गेल्या दहा वर्षांच्या स्वाभिमान व स्वावलंबनाच्या लढ्याच्या चळवळीचा परिणाम आपल्या अस्पृश्य बांधवांवर किती झालेला आहे ते पुन्हा सांगण्याची आवश्यकता नाही. येथील मंडळी माझ्या भाषणाशिवाय इतर कोणाही वक्त्याचे भाषण ऐकण्यास तयार नाहीत. आज बदललेल्या परिस्थितीचे मूळ आणि मुख्य कारण म्हटले म्हणजे आपल्या समाजात सामाजिक, धार्मिक व आर्थिक उन्नतीच्या दिशेने झालेले यशस्वी प्रयत्नच आहेत.

– ० –

३८. कर्नाटक विभक्तीकरण

(दि. ४ एप्रिल ३८ रोजी कर्नाटक विभक्तीकरणाचा ठराव असेंब्लीत आला. त्यावर बाबासाहेबांनी मांडलेले विचार. जनता, दिनांक ९–४–१९३८.)

या ठरावाचा प्रश्न माझ्या दृष्टीने अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे हा ठराव म्हणजे भावनावश होऊन करावयाचे कार्य नव्हे. कर्नाटकाच्या विभक्तीकरणाचा प्रश्न सहजगत्या सोडविण्यासारखा नाही. आम्हा अस्पृश्यवर्गीय बांधवांना आम्ही निराळ्या प्रांताचे असलो तरी – हा गुजराथी, हा महाराष्ट्रीयन किंवा हा कन्नड असा भेदभाव वाटत नाही व तो आम्ही पाळतही नाही. मी या प्रश्नाकडे भावनाविरहित दृष्टीने पाहात आहे. आपल्या मुंबई इलाख्याच्या संयुक्त कुटुंबात या तिन्ही प्रमुख प्रांतातील लोक गेली ११५ वर्षे गुण्यागोविंदाने एकत्र राहात आहेत. सिंध प्रांत आपल्याबरोबर जवळ जवळ ९० वर्षे होता त्याचे विभक्तीकरण झालेले आहे. परंतु त्यामुळे आर्थिक बाबतीत त्या विभक्त सिंधची किती बिकट परिस्थिती होत असेल याची कल्पना आपणास असेलच. कर्नाटकाचे विभक्तीकरण करण्याचे मुख्य कारण म्हटले म्हणजे कानडी भाषा बोलणारांचा एक निराळा प्रांत व्हावा, असे आहे. परंतु हे त्यांचे एकीकरण कितपत साध्य होईल याची जबरदस्त शंका वाटते. कारण या कर्नाटकाचा बराच मोठा भाग संस्थानात आहे. कानडी संस्थानी मुलुख कर्नाटकात सामील करून घ्यावयाचा म्हणजे त्याचा मोबदला दुसरा भाग संस्थानांना द्यावा लागेल. तशात खालसा प्रांतातील लोक या मोबदल्यासाठी संस्थानात जावयास कधीही तयार होणार नाहीत. याचा काही विचार तुम्ही केलेला आहे काय? तसेच आजच्या परिस्थितीत कर्नाटकाला अन्याय होत आहे, या म्हणण्यात काही अर्थ आहे काय? याचा आपण सूक्ष्मरीत्या विचार केला तर असे आढळून येईल की नवीन राज्यघटनेनुसार या प्रांताला मिळालेले प्रतिनिधित्व काय कमी आहे? आपण भाषावर लोकसंख्या विचारात घेतली तर मराठी भाषा बोलणारांची लोकसंख्या ९८ लक्षावर, गुजराथी ३४ लक्ष व कर्नाटकी ३० लक्ष अशा रीतीने विभागलेली आहे. आणि या लोकसंख्येच्या प्रमाणाप्रमाणे गुजराथी लोकांना २७ व कर्नाटकींना २१ जागा मिळणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्ष विभागणीमध्ये गुजराथला ३१ व कर्नाटकला २८ जागा मिळाल्यामुळे महाराष्ट्रीयांवर अन्यायच झालेला आहे. मला प्रांतभेद पाळावयाचा नाही परंतु आता कर्नाटक प्रांत विभागणीकरणाचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळे ही प्रत्यक्ष स्थिती पुढे मांडणे भाग आहे. तीच गोष्ट अधिकारांच्या जागांसंबधी आहे.

या जागांची विभागणी करण्यातही मराठी प्रतिनिधींवर अन्याय झालेला आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ९३ गुजराथींचे ३.६ व कानडींचे ३.४ असे आहे. पण अधिकाऱ्यांच्या जागांची वाटणी अनुक्रमे ६, ६ व ४ अशी केलेली आढळून येईल. यावरून कर्नाटकावर अन्याय झालेला नाही, ही गोष्ट उघडपणे सिद्ध होते. बरे या प्रांताच्या आर्थिक स्थितीकडे पाहिले तर उत्पन्नाची अडीच कोटींपेक्षा अधिक तरतूद नाही. आमच्या मुंबई शहराचे वार्षिक उत्पन्न ४ कोटी असूनही या शहराच्या गरजा अजून भागत नाहीत. आणि आधुनिक पद्धतीने प्रांताची व्यवस्था ठेवण्याच्या बाबतीत केवळ अडीच कोटीने कर्नाटकाला काय करता येणार आहे ?

दुष्काळाने नेहमी पीडलेला व लोकांची वस्त्र व अन्नामुळे होणारी अवहेलना पाहिल्यावर या अल्प उत्पन्नात स्वतंत्र होऊ पाहणाऱ्या प्रांताचा खर्च कसा भागणार? फार तर ज्या थोड्याशा लोकांना अधिकाराची सूत्रे हलविण्याची लालसा लागली आहे त्यांचेच थोडेसे समाधान होईल. यासाठी मी या प्रांताचे विभक्तीकरण करण्यास केव्हाही मान्यता द्यावयास तयार नाही तसेच विजापूर व वल्लारी यासारखे दुष्काळी जिल्हे आ पसरून समोर उभे असता प्रांताच्या जमाखर्चाची तुम्ही कशी काय तोंड मिळवणी करणार ? आमच्या समाजाला या प्रांतात फक्त दोनच जागा आहेत. येथील असेंब्लीत आमच्या इतर प्रतिनिधींमुळे त्यांना पाठिंबा आहे. परंतु या विभक्तीकरणाने त्यांची वरिष्ठ वर्ग कुचंबणा केल्याशिवाय राहणार नाही. मी कोणत्याही प्रकारचा प्रांतभेद, इतकेच नव्हे तर स्वतःला महाराष्ट्रीय म्हणवून घेण्यात भूषण मानीत नाही. तसेच भाषा, प्रांतभेद संस्कृती वगैरे भेदभाव पाळू इच्छित नाही 'प्रथम हिंदी नंतर हिंदू किंवा मुसलमान' हेही तत्त्व मला पटत नाही. 'प्रथम हिंदी व अखेरही हिंदी' असेच मानायला मी तयार आहे आणि हीच वृत्ती हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याला परिपोषक आहे. म्हणून या ठरावाला मी कसून विरोध करतो.

० — ०

३९. मुंबईच्या गुंडांवर गडांतर

(मुंबईच्या गुंडांना दंग्याच्या वेळी पकडून हद्दपार करण्याचे सरकारी बिल दि. २७ मार्च ३८ रोजी चर्चेला आले. त्याला पाठिंबा देऊन बाबासाहेबांनी आपली एक उपसूचना जोडली. ते बिल सूचनेसह पास झाले. चर्चा चालू असता बाबासाहेबांनी मांडलेले विचार. जनता, दि. ३० एप्रिल १९३८.)

गुंडांच्या मवालगिरीविषयी हे बिल सादर करताना ना मुनशी यांनी जे उद्‌गार काढले त्याविषयी मला पोलीस कमिशनर किंवा ना. मुनशी यांच्यापेक्षा अधिक माहिती आहे. १९११ ते १९३३ सालापर्यंतचा माझ्या आयुष्यातील काळ मुंबई इम्प्रूव्हमेन्ट चाळीत राहण्यात गेलेला असल्यामुळे गुंड किंवा मवाल्यापासून गरिबांना कसा भयंकर उपद्रव होतो, याची मला माहिती आहे. तसेच ज्या दंग्यासाठी या कायद्याची उपाययोजना अमलात आणण्यात येत आहे त्या विषयीचा थोडा पूर्वेतिहास येथे नमूद करण्यास कोणतीच हरकत नाही. १८५१ पासून तो १९३८ पर्यंत एकंदर भयंकर स्वरूपाचे असे ९ जातीय दंगे मुंबईत झाले. त्यातील पहिला दंगा १८५१ साली मुसलमान व पारशी यामध्ये झाला. दुसरा १८७४ साली पारशी व मुसलमान यांच्यामध्ये झाला. त्यानंतर झालेले दंगे – १८९३, १९२९, १९३२, १९३३, १९३७ व १९३८ असे झाले. हे सर्व दंगे मात्र हिंदू व मुसलमान यांच्यामध्ये झालेले आहेत.

या दंग्यांच्या वृत्तीकडे पाहिल्यावर त्यांना आळा घालण्यासाठी काही तरी कडक उपाय योजना अमलात आणणे भाग आहे. दरसाल या सुधारणेच्या मार्गास लागलेल्या मुंबई शहरात रक्तस्नानाचे प्रकार घडावे ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होय. आणि याचा योग्य बंदोबस्त होण्याकरिता मी या बिलाला पाठिंबा देत आहे. तसेच या बिलामुळे पोलीस कमिशनरला जे नवीन हक्क मिळणार आहेत त्यांच्यापासून नागरिकांच्या स्वातंत्र्याचे योग्य संरक्षण व्हावे म्हणून ही उपसूचना या बिलाला जोडीत आहे. म्हणूनच मी माझ्या उपसूचनेत आणीबाणीच्या वेळी अगोदर जाहीरनामा काढूनच उपाययोजना अमलात आणावी, असे सुचविले आहे. तसेच या अंमलबजावणीची मुदत एक महिन्याची ठेवावी अशी जी सूचना मांडली आहे त्यामुळे पोलीस कमिशनरच्या अधिकाराचे क्षेत्र या जातीय दंग्याच्या कालापुरतेच मर्यादित राहील. ना. मुनशी यांनीही आपल्या आपणात या कायद्याचा जातीय दंग्याशिवाय उपयोग करण्यात येणार नाही, असे स्पष्ट आश्वासन दिले आहे.

० ० ०

तुमची पवित्र मते विकू नका

(सातारा जिल्ह्यात इस्लामपूर ओंड, येथे २०-४-३८ रोजी झालेल्या जाहीर सभांतील भाषणांचा सारांश. जनता, दि. ३०-४-३८)

या जिल्हयात पुढील महिन्यांच्या २४ तारखेस जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांकरता स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने जे उमेदवार उभे राहिलेले आहेत त्यांनाच आपण सर्व मतदारांनी मते देऊन निवडून आणा, असे सांगण्यासाठी मी उभा आहे. या सभेत मराठे व अस्पृश्य यांचा एकत्रित जमाव आहे. त्यामुळे मराठे मंडळींना मला जे निराळे सांगावयाचे आहे ते अशक्य दिसते. असो. या देशातील हिंदू समाजाची रचनाच अशी आहे की सर्व लोकांवर ब्राह्मण प्रभुत्व असणारच. कोणताही विधी ब्राह्मणाखेरीज होत नाही. तसेच इतर व्यवहारही त्यांच्याविना चालत नाही. हायकोर्टातील वरिष्ठ जागांपासून तो खेडेगावातील तलाठ्यापर्यंत ब्राह्मणाशिवाय कुणीही दिसणार नाही. १९१९ पासून तो १९३८ पर्यंत कौन्सिलमध्ये अवघे चार पाच ब्राह्मण दिसत असत. पण आता या ब्राह्मण कौन्सिलदारांची संख्या जवळजवळ २७ आहे. माझ्या समजुतीप्रमाणे असेंब्लीमध्ये ज्या ११ जागा अधिकाराच्या आहेत त्यापैकी ६ ब्राह्मणांनी पटकावल्या आहेत यात पाटलाची किंमत आहे काय ? १७५ सभासदात त्यांना कोणीही विचारीत नाही. खरे पाहिले असता या देशातले राजकारण ब्राह्मण जातीशिवाय चालले पाहिजे. आज राजकारणात भटजी, शेटजी व गुजर, सावकारांचे कडबोळे झाले आहे त्यात गरीब शेतकरी वगैरे श्रमजीवी वर्गाला वाव नाही. आजच्या या परिस्थितीचा विचार केल्यानंतर गांधीजींच्या पश्चात राजकारणात गोंधळ माजल्याशिवाय राहणार नाही. आज आपण जो राजकारणात धुडगूस घालीत आहोत त्याला गांधींच्या पश्चात कोणी किंमत देईल काय, याचा अजून कोणीही विचार केलेला नाही. म्हणून आपल्या हितासाठी, देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतंत्र चळवळ करा. मी माझ्या पक्षात येऊन मिळा असेच म्हणत नाही. पण आपल्या न्याय्य हक्काचे संरक्षण होईल अशीच चळवळ करा. तुम्हा मराठे मंडळींना सांगायचे म्हणजे तुमच्या हितासाठी आमचे श्री. विचारे मास्तर यांनी एक शेतकरी पक्ष काढला आहे. त्याला तुम्ही मराठे मंडळींनी अवश्य मदत करावी. तसेच जेथे राखीव जागा नाहीत तेथील अस्पृश्य लोकांनी या नवीन शेतकरी पक्षातर्फे जे उमेदवार उभे आहेत त्यांना अवश्य मदत करावी. या लोकल बोर्डाच्या निवडणुकीच्या वेळी कोणी खोटचा थापा किंवा आमिष दाखविले असेल त्याला तुम्ही भुलू नका. तुमची पवित्र मते विक नका तर ती सत्कार्यी लावा.

० ० ०

निवडून दिलेली माणसे आपले कर्तव्य करतात की नाही यावर पाळत ठेवा

(दि. १०-५-३८ रोजी झालेल्या नागपूर येथील भाषणाचा सारांश. जनता, दि. २१-५-१९३८.)

बंधू भगिनींनो,

इतक्या अल्पावधीत वारा, पाऊस व विजांच्या कडकडाटात माझ्या अपेक्षेच्या बाहेर जमलेला समुदाय पाहून मी आपल्या सर्वांचे अभिनंदन करतो. दुसरे असे की मी ज्या कामाकरिता येथे आलो त्या कामाची मंडळी माझ्या मुक्कामाच्या ठिकाणी वाट पाहात आहेत. अशावेळी त्यांना जास्त वेळ तिष्ठत ठेवणे हे देखील मला योग्य होणार नाही. तरी आपला जास्त वेळ न घेता एक दोन गोष्टींचा उल्लेख करून मी माझे भाषण संपवीन. तुमच्या प्रांतात झालेल्या बेकीचा विचार करण्याकरिता मला आता वेळ नसल्यामुळे त्याचा विचार मी पुढे कधीतरी करीन. तुम्हास माहीत असेल की तुमच्या प्रांतास ज्या ३० जागा मिळविल्या आहेत; त्या किती कष्टाने व त्रासाने मिळविल्या आहेत. तेव्हा त्या राखणे तुमचे कर्तव्य आहे. अस्पृश्य समाज गरीब व निर्धन आहे. त्याला राजकीय सत्ता हाती ठेवणे महा कठीण आहे. त्यातल्या त्यात काँग्रेस सारख्या मोठ्या संस्थेशी टक्कर देणे अत्यंत कठीण आहे तेव्हा अशा कठीण वेळी ही तुम्हास मिळालेली राजकीय सत्ता राखणे अत्यंत कठीण आहे तुम्ही निवडणुकीच्या वेळी निवडून दिलेली माणसे आपल्या हिताचे कार्य करतात किंवा नाही हे पाहणे तुमचे कर्तव्य आहे. त्यांच्या कामावर पाळत ठेवणे, कौन्सिलमध्ये जे कार्य होते त्यात आपल्या हिताचे प्रश्न, ठराव वगैरे मांडतात की नाही हे पाहणे तुमचे कर्तव्य होय. प्रत्येक सेशनच्या शेवटी या लोकांनी केलेल्या कामगिरीचा जाब आज भरविलेल्या सभेप्रमाणे सभा बोलावून त्या सभेत त्यांना विचारू शकता. जे तुमच्या हिताचे कार्य करीत नाहीत त्यांच्याविरुद्ध ते ज्या कॉन्स्टिटचूअन्सीमधून निवडून आले असतील त्या कॉन्स्टिटचुअन्सीमध्ये त्यांच्याविरुद्ध प्रचार करणे हे तुमचे कर्तव्य होय. जसे निवडून देणे हे तुमचे कर्तव्य आहे तसेच त्यांच्या कार्यावर नजर ठेवणे हे तुमचे आद्य कर्तव्य होय. त्यांच्यावर अशा रीतीने पाळत ठेवल्याने ते भीतीने तरी कौन्सिलमध्ये कार्य करतील. अशा रीतीने तुमचे कार्य करतील. अशा रीतीने तुमचे कार्य चालल्यास तुमच्या हिताचे बरेच कार्य होईल. आज मला वेळ नसल्यामुळे माझे भाषण येथेच संपविणे बरे होईल.

— ० —

तुमची पवित्र मते विकू नका

(सातारा जिल्ह्यात इस्लामपूर ओंड, येथे २०-४-३८ रोजी झालेल्या जाहीर सभांतील भाषणांचा सारांश. जनता, दि. ३०-४-३८)

या जिल्ह्यात पुढील महिन्यांच्या २४ तारखेस जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांकरता स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने जे उमेदवार उभे राहिलेले आहेत त्यांनाच आपण सर्व मतदारांनी मते देऊन निवडून आणा, असे सांगण्यासाठी मी उभा आहे. या सभेत मराठे व अस्पृश्य यांचा एकत्रित जमाव आहे. त्यामुळे मराठे मंडळींना मला जे निराळे सांगावयाचे आहे ते अशक्य दिसते. असो. या देशातील हिंदू समाजाचो रचनाच अशी आहे की सर्व लोकांवर ब्राह्मण प्रभुत्व असणारच. कोणताही विधी ब्राह्मणाखेरीज होत नाही. तसेच इतर व्यवहारही त्यांच्याविना चालत नाही. हायकोर्टातील वरिष्ठ जागांपासून तो खेडेगावातील तलाठ्यापर्यंत ब्राह्मणाशिवाय कुणीही दिसणार नाही. १९१९ पासून तो १९३८ पर्यंत कौन्सिलमध्ये अवघे चार पाच ब्राह्मण दिसत असत. पण आता या ब्राह्मण कौन्सिलदारांची संख्या जवळजवळ २७ आहे. माझ्या समजुतीप्रमाणे असेंब्लीमध्ये ज्या ११ जागा अधिकाराच्या आहेत त्यापैकी ६ ब्राह्मणांनी पटकावल्या आहेत यात पाटलाची किंमत आहे काय ? १७५ सभासदात त्यांना कोणीही विचारीत नाही. खरे पाहिले असता या देशातले राजकारण ब्राह्मण जातीशिवाय चालले पाहिजे. आज राजकारणात भटजी, शेटजी व गुजर, सावकारांचे कडबोळे झाले आहे त्यात गरीब शेतकरी वगैरे श्रमजीवी वर्गाला वाव नाही. आजच्या या परिस्थितीचा विचार केल्यानंतर गांधीजींच्या पश्चात राजकारणात गोंधळ माजल्याशिवाय राहणार नाही. आज आपण जो राजकारणात धुडगूस घालीत आहोत त्याला गांधींच्या पश्चात कोणी किंमत देईल काय, याचा अजून कोणीही विचार केलेला नाही. म्हणून आपल्या हितासाठी, देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतंत्र चळवळ करा. मी माझ्या पक्षात येऊन मिळा असेच म्हणत नाही. पण आपल्या न्याय्य हक्काचे संरक्षण होईल अशीच चळवळ करा. तुम्हा मराठे मंडळींना सांगायचे म्हणजे तुमच्या हितासाठी आमचे श्री. विचारे मास्तर यांनी एक शेतकरी पक्ष काढला आहे. त्याला तुम्ही मराठे मंडळींनी अवश्य मदत करावी. तसेच जेथे राखीव जागा नाहीत तेथील अस्पृश्य लोकांनी या नवीन शेतकरी पक्षातर्फे जे उमेदवार उभे आहेत त्यांना अवश्य मदत करावी. या लोकल बोर्डाच्या निवडणुकीच्या वेळी कोणी खोट्या थापा किंवा आमिष दाखविले असेल त्याला तुम्ही भुलू नका. तुमची पवित्र मते विक नका तर ती सत्कार्यी लावा.

० ० ०

निवडून दिलेली माणसे आपले कर्तव्य करतात की नाही यावर पाळत ठेवा

(दि. १०-५-३८ रोजी झालेल्या नागपूर येथील भाषणाचा सारांश. जनता, दि. २१-५-१९३८.)

बंधू भगिनींनो,

इतक्या अल्पावधीत वारा, पाऊस व विजांच्या कडकडाटात माझ्या अपेक्षेच्या बाहेर जमलेला समुदाय पाहून मी आपल्या सर्वांचे अभिनंदन करतो. दुसरे असे की मी ज्या कामाकरिता येथे आलो त्या कामाची मंडळी माझ्या मुक्कामाच्या ठिकाणी वाट पाहात आहेत. अशावेळी त्यांना जास्त वेळ तिष्ठत ठेवणे हे देखील मला योग्य होणार नाही. तरी आपला जास्त वेळ न घेता एक दोन गोष्टींचा उल्लेख करून मी माझे भाषण संपवीन. तुमच्या प्रांतात झालेल्या बेकीचा विचार करण्याकरिता मला आता वेळ नसल्यामुळे त्याचा विचार मी पुढे कधीतरी करीन. तुम्हास माहीत असेल की तुमच्या प्रांतास ज्या ३० जागा मिळविल्या आहेत; त्या किती कष्टाने व त्रासाने मिळविल्या आहेत. तेव्हा त्या राखणे तुमचे कर्तव्य आहे. अस्पृश्य समाज गरीब व निर्धन आहे. त्याला राजकीय सत्ता हाती ठेवणे महा कठीण आहे. त्यातल्या त्यात काँग्रेस सारख्या मोठ्या संस्थेशी टक्कर देणे अत्यंत कठीण आहे तेव्हा अशा कठीण वेळी ही तुम्हास मिळालेली राजकीय सत्ता राखणे अत्यंत कठीण आहे तुम्ही निवडणुकीच्या वेळी निवडून दिलेली माणसे आपल्या हिताचे कार्य करतात किंवा नाही हे पाहणे तुमचे कर्तव्य आहे. त्यांच्या कामावर पाळत ठेवणे, कौन्सिलमध्ये जे कार्य होते त्यात आपल्या हिताचे प्रश्न, ठराव वगैरे मांडतात की नाही हे पाहणे तुमचे कर्तव्य होय. प्रत्येक सेशनच्या शेवटी या लोकांनी केलेल्या कामगिरीचा जाब आज भरविलेल्या सभेप्रमाणे सभा बोलावून त्या सभेत त्यांना विचारू शकता. जे तुमच्या हिताचे कार्य करीत नाहीत त्यांच्याविरुद्ध ते ज्या कॉन्स्टिटचूअन्सीमधून निवडून आले असतील त्या कॉन्स्टिटचुअन्सीमध्ये त्यांच्याविरुद्ध प्रचार करणे हे तुमचे कर्तव्य होय. जसे निवडून देणे हे तुमचे कर्तव्य आहे तसेच त्यांच्या कार्यावर नजर ठेवणे हे तुमचे आद्य कर्तव्य होय. त्यांच्यावर अशा रीतीने पाळत ठेवल्याने ते भीतीने तरी कौन्सिलमध्ये कार्य करतील. अशा रीतीने तुमचे कार्य करतील. अशा रीतीने तुमचे कार्य चालल्यास तुमच्या हिताचे बरेच कार्य होईल. आज मला वेळ नसल्यामुळे माझे भाषण येथेच संपविणे बरे होईल.

— ० —

४०. प्राण पणाला लावून हक्क बजावण्यास तयार व्हा

(कोकण पंचमहाल महार परिषदेच्या निमित्ताने दिनांक १४-५-३८ रोजी कणकवली येथे झालेल्या सभेतील भाषण. जनता, दि. ४-६-३८.)

या ठिकाणी मला निराळचा तऱ्हेचे भाषण करावे लागणार आहे. ते असे की ज्या दिवसापासून मुंबईत इंग्रजांचा पाय पडला त्या दिवसापासून आपल्या महार समाजाला नशीब काढायला वाव मिळाला. इंग्रजांच्या राज्यामुळे आपल्याला नशीब काढण्याचा मार्ग मोकळा झाला. इंग्रज परदेशातून आले. त्यांच्याजवळ सैन्य शिपाई नव्हते व सैन्य उभे केल्याशिवाय राज्य मिळण्याची आशा नव्हती. पेशव्यांच्या राज्यात वरच्या वर्गांना मोठेपणा व सुखसंपत्ती मिळू शकत असल्यामुळे इंग्रजांच्या सैन्यात वरचा वर्ग जात नव्हता. अस्पृश्यादी पददलित वर्गाला पेशवाईत अगदी अमानुषपणे वागविले जात होते. मनुष्य म्हणून जगण्याचा जणू काय त्यांना हक्कच नव्हता. शूराची जात असून पददलितपणामुळे त्यांचे चीज पेशवाईत झाले नाही. इंग्रजांच्या सैन्य भरतीमध्ये शिरण्याशिवाय महार, मांग व चांभारांना गत्यंतर नव्हते.

हिंदुस्थानात इंग्रजांनी राज्य कमावले ते महार-मांग चांभारादी अस्पृश्य वर्गीय शूर सैनिकांच्याच मदतीने. त्याला इतिहासाची साक्ष पटवून द्यायची म्हणजे कोरेगावला जो मनोरा बांधला आहे त्यावरून कळून येईल. नाही तर इंग्रजांना या देशाचे राज्य कधीच मिळाले नसते. त्याचा परिणाम चांगला की वाईट हे आपणाला माहीत आहेच. पेशवाईच्या काळातील अशी गोष्ट सांगण्यात येते की महारांना राजरोसपणे रस्त्यातून फिरण्याची मुळीच मोकळीक नव्हती. एखादा महार रस्त्यावर थुंकला व त्यावर एखाद्या ब्राह्मणाचा पाय पडल्यास तो विटाळतो, त्याला पुन्हा स्नान करावे लागते. यासाठी महाराच्या गळचात मडके बांधीत असत. महार ओळखता यावा म्हणून त्याच्या हाताला काळा दोरा बांधावा लागत असे. कुत्र्या मांजराइतकीसुद्धा किंमत महाराला नव्हती. परंतु इंग्रजांच्या सैन्यभरतीमुळे महारांच्या परिस्थितीत बदल झाला. त्यांना माणुसकीने वागविले जाते याचा अनुभव मिळाला. अशा इंग्रजांच्या राज्याच्या पहिल्या आमदानीत शे-सव्वाशे सुभेदार, त्याहून कितीतरी जास्त जमादार-हवालदार होऊन गेले. पूर्वी गावातील मराठा ज्यांची सावली घेत नव्हता तोच सैन्यात दाखल झाल्यावर त्याच्याच गावच्या महार सुभेदाराला त्याला सलाम करावा लागत होता. हा सारा इतिहास आपल्या फुशारकीकरता किंवा बडेजावाकरता मी

सांगत नाही. १८९६ साली इंग्रज सरकारने महार लोकांची सैन्यात भरती करणे बंद केले. त्यामुळे हुद्यावर जाण्याची बंदी झाली. ज्या इंग्रज सरकारकरिता भात शिजवून देऊन पेज आपण खाल्ली–आपले रक्त सांडले त्यांनीच आम्हाला बंदी का केली, असा प्रश्न उभा राहतो. परंतु यात इंग्रजांचा काही दोष नसून तुमचा आमचा आहे. महार जात ही अत्यंत दलित जात. या जातीला कोणत्याच प्रकारचा मानसन्मान नाही. अशा प्रकारचा इसम इंग्रज सरकारच्या अधिकारावर चढल्यास मराठा, क्षत्रिय अशा वरच्या वर्गांतील लोकांना त्यांना सलाम करावा लागल्याने बंड–बेबंदशाही माजेल यामुळे त्यांना पलटणीत बंदी झाली तेव्हापासून करंडी हाती घेऊन भीक मागण्याचा धंदा आपल्याला पत्करावा लागला आहे.

आज येथे आलेल्या सर्व तरुणांनी यापुढे आम्ही मेलेल्या गुरांना हात लावणार नाही व उष्टे खाणार नाही, अशी प्रतिज्ञा केली पाहिजे. बाबांनी (बायांनी ?) व तरुणांनी या गोष्टी अमलात आणण्यासाठी प्राण गेला तरी हरकत नाही, अशी वृत्ती दाखविली पाहिजे. (हिअर हिअर ! टाळ्या) वरिष्ठ वर्गाची याचना करण्याचा दीनवाणा कारभार यापुढे आपण बंद केला पाहिजे. आणि यापुढे कायद्याने दिलेले हक्क आम्ही प्राण गेला तरी बजावण्यासाठी तयार असले पाहिजे. आज महारांची वीस लाख वस्ती आहे. यातील अधिकार गाजविण्यासाठी एक लाख माणसे मेली तरी काय बिघडले ? मला म्हाताऱ्यांना सांगण्यापेक्षा तरुणांना सांगावयाचे आहे की तुम्ही आज न्याय्य हक्काचेसाठी मरणाचे द्वारी (देखील) जाण्यास तयार राहायला पाहिजे.

आता शेवटची एक गोष्ट सांगावयाची आहे या देशात नवीन राजकारण सुरू झाले आहे. या देशात इंग्रजांचे राज्य सुरू आहे ही भावना खरी नाही. १९३५ सालापर्यंत इंग्रजांची सत्ता होती. परंतु १९३५ सालच्या कायद्याने ती लोकांच्या स्वाधीन करण्यात आली आहे या सत्तेचा फायदा कोणाला होईल हे ज्याच्या त्याच्या राजकारणपटुत्वावर अवलंबून आहे काही काळापूर्वी तुम्ही प्रसंगानिमित्त कलेक्टरकडे, मामलेदाराकडे (अर्ज केल्यास ते त्याचा विचार करीत असत पण आज तसा अर्ज केल्यास) ते सांगतील : आज सत्ता आमचे हातात नाही; कायदे कौन्सिलच्या हातात आहे.' ही गोष्ट खरी आहे. कायदे–मंडळाच्या कार्यावर बारकाईने लक्ष ठेवा. कोणता ठराव पास झाला, कोणता नापास झाला याची बारकाईने चौकशी करा. अस्पृश्य लोकांकरिता १५ जागा आहेत. हे लोक काय करतात याकडे लक्ष देऊन त्यांना आणखी जास्त लोक कसे येऊन मिळतील व बहुमत कसे होईल इकडे लक्ष दिले पाहिजे. जास्त लोक मिळविण्यासाठी मी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली आहे. तो आज जरी लहान असला, त्याची संख्या कमी असली तरी त्याची वाढ होण्यासाठी प्रयत्न करा. अत्यंत मोठी अशी एक संस्था आपल्या इलाख्यात आहे ती काँग्रेस होय. काँग्रेस कितीही मोठी

असली तरी ती गोरगरिबांचे कल्याण करू शकत नाही, हे लक्षात ठेवा. कोणत्या वर्गांपासून तुम्हाला हित होते ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ज्यांनी (आपली) माणूसकी हिरावून घेतली ते शेटजी–भटजी होत. आणि आज आपल्याला अन्न मिळत नाही ते याच वर्गामुळे आणि याच वर्गामुळे आपण या स्थितीला पोहोचलो आहोत.

सर्व ब्राह्मणेतर कुणबी वर्गास सांगावयाचे आहे की तुम्ही काँग्रेसमध्ये जाऊ नका. तुम्ही आम्ही त्रासले-गांजलेले लोक एक आहोत; तसेच एक होऊ या. काही लोक असे म्हणतात की "मी साम्राज्यशाहीविरुद्ध नाही मला इंग्रज सरकारला घालवून देण्याची बिलकूल इच्छा नाही." (पण ते बरोबर नाही.) शेटजी-भटजी हे घरचे चोर आहेत. त्यांची लबाडी बंद केली पाहिजे. आपण आपल्या पायावर उभे राहिल्यास त्याला वेळ लागणार नाही. इंग्रज बोटीत बसून जाणार ! तेव्हा त्यांना घालविणे आवश्यक की खोत-सावकारांना ? या घरातील चोरांशी आपणाला लढा दिला पाहिजे. तुम्हाला इंग्रज सरकार नको असेल तर ते मलाही नको आहे.

ब्राह्मणेतर वर्ग आज जो काँग्रेसमध्ये सामील होत आहे त्या वर्गाच्या पुढाऱ्यांना माझे हे म्हणणे पटत नाही त्यांना आज जरी नाही तरी येत्या पाच वर्षात ते पटून ते आमच्या पक्षात सामील होतील हे लक्षात ठेवा. (टाळचा) खोती पद्धती ही एक गुलामगिरी आहे. याबाबतीत किती अन्याय होतात, किती दुःखे भोगावी लागतात हे तुम्हाला ठाऊक आहे. खोती नष्ट करण्याबाबत काँग्रसने पुढाकार घेतला नाही यावरून काँग्रेस कोणाची हे तुमच्या लक्षात येईल. काँग्रेसची बढती यापुढे होणार नाही. स्वतंत्र मजूर पक्ष हे झाड आज लहान असेल तरी ते झपाटचाने वाढणार आहे. तुम्ही त्याच्या छायेला बसणार असून सर्व ब्राह्मणेतर श्रमजीवी जनताही बसणार आहे.

— ० —

४१. काँग्रेस गरिबांच्या कल्याणाकरिता नाही

(चिपळूण येथे दिनांक १६–५–३८ रोजी प्रचार दौऱ्यावर असताना दिलेले भाषण. जनता, दि. २८–५–३८)

खरोखर येथे तुम्हा शेतकऱ्यांजवळ राहून तुमची यथाशक्ती सेवा करण्यात मी धन्यताच मानली असती. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की तुमच्याप्रमाणेच मलाही माझा व्यवसाय आहे व तो व्यवसाय केल्याशिवाय माझा पोटापाण्याचा प्रश्न सुटत नाही. माझा व्यवसाय मोठ्या दर्जाचा असला तरी मी बांधलेला आहे. माझा जन्म गरीब परिस्थितीत झाला माझेवर वडिलांच्या ३–४ हजार रुपये कर्जाचा बोजा होता. सांगण्याचा हेतू की मी गर्भश्रीमंत नाही. त्यामुळे माझ्या इच्छेविरुद्ध तुम्हाला सोडून माझ्या व्यवसायाकरिता मला मुंबईस जाणे भाग आहे.

आता रत्नाबाईंच्या भाषणानंतर काही गृहस्थांनी टवाळी करण्याच्या उद्देशाने टाळ्या वाजविल्या त्यांच्या टाळ्यांच्या अर्थ मी असा समजतो की त्यांच्या दृष्टीने आमच्या पक्षाची परस्पर 'हजामत' झाली. परंतु मी विचारतो की या लोकांना टाळ्या वाजविण्याचा काय हक्क आहे ? आम्ही जरी मुंबईस राहत असलो तरी हे बाराही महिने येथेच राहतात. त्यास काय तुमची दुःखे दिसत नाहीत ? परंतु त्याना तुमच्याकरिता काहीही करावयाचे नाही काही खोत कुळांस म्हणतात की "तुझा आंबेडकर काय करतो ते पाहून घेईन !" हे खोत त्यांची व माझी लायकी सारखी समजतात की काय ? कोणताही खोत माझेपुढे असल्यास बुद्धीने मी सहजासहजी त्याचा पाडाव करीन. ते माझी व त्याची तुलना करीत असल्यास मी म्हणेन की कोठे मी हिमालय पर्वत व कोठे हा मुतखडा ! मी श्रीमंत नसलो तरी आतापर्यंतचे माझे आयुष्य अत्यंत निर्मळ असे आहे. व माझे दृष्टीने तुमच्या हितास आवश्यक वाटते ते मी करीत आलो आहे; आणि करीत राहणार.

निवडणुकीचे वेळेस काँग्रेसने जी वचने दिली त्यापैकी कोणती पाळली आहेत ? काँग्रेसने जी बिले पास केली त्यात शेतकऱ्यांच्या हितसंबंधाचे काय आहे ? उलट खोती बिलासारखे महत्त्वाचे बिल गेले १० महिने काँग्रेस लांबणीवर टाकीत असून निवडणुकीचे वेळी दिलेल्या वचनास हरताळ फासत आहे. आज मी काँग्रेसमध्ये गेल्यास तेथे मला योग्य स्थान मिळणार नाही अगर तेथे माझी प्रतिष्ठा

राहणार नाही असे तुम्हास वाटते काय ? मी काँग्रेसमध्ये गेल्यास माझ्या बुद्धीचे जोरावर तेथेही माझी छाप पाडल्याशिवाय व मानाचे स्थान प्राप्त करून घेतल्याशिवाय राहणार नाही; अशी माझी खात्री आहे. गांधींचे प्राण कोणी वाचविले ? मी वाचविले. परंतु गांधींची ही काँग्रेस गरिबाच्या कल्याणाकरिता नाही, अशी माझी ठाम समजूत झाल्यामुळे मी काँग्रेसमध्ये जाण्यास तयार नाही. गांधींच्या व्यक्तित्वापुढे सुभाष बोस, पं. जवाहरलाल नेहरू यांनी आपली मान वाकविली. परंतु गांधींची माझेवर केव्हाच छाप पडली नाही. काँग्रेस ही आतापर्यंत 'भटजी शेठजींच्या' पैशावर पोसली जात असल्यामुळे ती त्यांची 'बटीक' होऊन राहिली आहे. जो ज्यांचे अन्न खातो त्यांचा मिधा असतो. मग तुम्हीच सांगा, शेठसावकारांच्या पैशावर पोसलेली ही काँग्रेस त्यांचे विरुद्ध कशी जाईल ? आजपर्यंत 'भट भिक्षुक' वर्गाने तुमचेकरिता काय केले आहे ? तुम्ही लोकांनी त्यांच्या घरची भांडी घासणे व त्यांच्या बायकांची लुगडी धुणे याखेरीज काय केले आहे ? आज सरकारी नोकरीत कोणते लोक आहेत ? आज कोठेही जा; मामलेदार, मुनसब, कलेक्टर हे सर्व पांढरपेशा वर्गाचे आहेत. आज तुमची संख्या शेकडा ८० पेक्षा जास्त असताना सरकारी नोकरीत तुमचे इतके थोडे लोक असावेत हे कशाचे निदर्शक आहे ? मला तुमच्यापैकी प्राईम मिनिस्टर झालेला पाहावयाचे आहे. मला या मूठभर भटजी शेठजीचे राज्य नको असून तुम्हा ८० टक्के लोकांचे राज्य हवे आहे.

आज तुम्ही खोतांच्या जुलुमामुळे भीरू व भेकड बनला आहात. खोताने नुसते तुमचेकडे पाहिल्यास तुमचे अंगाचा थरकाप होतो. परंतु आता ही भीती सोडून त्याने 'अरे' म्हटल्यास तुमची 'कारे' म्हणण्याची तयारी झाली पाहिजे व त्याने काठीने मारल्यास तुमचीही काठी उचलण्याची तयारी पाहिजे. प्रत्येक मनुष्यास स्वसंरक्षणाचा कायदेशीर अधिकार असतो. हे मी तुम्हास बॅरिस्टर या नात्याने सांगतो. या सर्व गोष्टी तुम्हास स्वतःच करण्यास शिकले पाहिजे कारण प्रत्येकाचे मदतीस आम्हास पोलिसशिपाई देता येणार नाहीत. आज तुम्ही सर्वांनी जातिभेद, धर्मभेद विसरून खोतशाहीस नामशेष केले पाहिजे. सर्व कुळांनी आपली एकच जात आहे, असे समजले पाहिजे. तसेच खोताने महार कुळाकडून जमीन काढली तर ती कुळवाडी अगर मुसलमान कुळाने करू नये. तसेच कुडवाडयाकडून काढल्यास महार अगर मुसलमान यांनी करू नये. मुसलमान कुळाकडून काढल्यास महार अगर कुळवाडी यांनी करू नये. आज खोत तुमच्यावर जुलूम करीत असेल तरी ती त्यांची शेवटची धडपड आहे, हे विसरू नका. मनुष्य मरताना हातापायाची जास्त धडपड करीत असतो. स्वतंत्र मजूर पक्षाने तुमच्याकरिता खोती बिल आणले आहे, हे तुम्हास माहीत असेलच. परंतु आज कायदे-

मंडळात कांग्रेसचे बहुमत असल्यामुळे हे खोती बिल पास होईलच अशी हमी देता येत नाही. परंतु हे बिल पास झाले नाही तर माझ्याकडून हुकूम झाल्याबरोबर सर्व कुळांनी खोतास ' मक्ता ' देण्याचे बंद केले पाहिजे. तुम्हाला माहीतच आहे की तुम्ही खोतास 'मक्ता' न घातल्यास तुमचेवर तो 'मुदतदावे' करून जप्ती वॉरंट आणवून तुमचेकडून धान्य वगैरे बेलिफाकरवी जप्त करून नेतो. परंतु रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी खोतास ' मक्ता ' घालण्याचे बंद केल्यास सरकार वठणीवर आल्याशिवाय राहणार नाही. कारण साधारणपणे प्रत्येक तालुक्यात ५०-६० हजार शेतकरी असतात. या हिशेबाने तितकेच ' मुदतदावे ' खोतास करावे लागतील व प्रत्येक तालुक्यात दोन तीनच बेलीफ असल्यामुळे इतक्या शेतकऱ्याकडून ' वसूल ' करणे अशक्य होईल. अशा प्रकारे या खोतशाहीस धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. या कारणास्तव तुम्हावर तुरुंगात जाण्याची पाळी आल्यास तयारी पाहिजे. मी येथे जाहीर करतो की तुमचेकरिता तुरुंगात जाण्यास मी प्रथम तयार आहे त्याचप्रमाणे स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्यकर्ते हेही वेळ पडल्यास तुमचे हिताकरिता तुरुंगात जाण्यास एका पायावर तयार आहेत. परंतु तुमचीही आत्मबलिदान करण्याची तयारी असली पाहिजे. तुरुंगात जाण्यात कोणताही कमीपणा नाही. कारण आजचे अधिकारावर असलेले 'काँग्रेसचे सर्व दिवाण ' (मंत्री) तुरुंगात जाऊन आलेले आहेत. तुम्ही चोरी अगर इतर गुन्ह्याबद्दल तुरुंगात जाणार नसून एका तत्त्वाकरिता तुरुंगवास पत्करणार आहात, हे लक्षात ठेवा.

काँग्रेसचे काही प्रचारक स्वतंत्र मजूर पक्षाबद्दल भलताच गैरसमज पसरवीत असून असे भासवीत आहेत की स्वतंत्र मजूर पक्षाची चळवळ ही निव्वळ लबाडीची व अज्ञ शेतकऱ्यास फसविण्याची असून ती डॉ. आंबेडकर यांनी महारांकडून इतर जातीस बाटविण्यास व रोटीबेटी व्यवहाराची गल्लत करण्यास स्थापन केलेली आहे अशी तुम्ही चुकीची समजूत करून घेऊ नका, असे माझे तुम्हास सांगणे आहे आमच्या महारात काय चांगल्या मुली नाहीत की काय ? महार जातीवर माझा पूर्ण विश्वास असून ते कायमचे माझे मागे येतील असा भरवसा आहे. परंतु तुम्ही व इतर कुळवाडी लोक खोती बिल पास झाल्यावर स्वतंत्र मजूर पक्षाशी असलेला संबंध ' काम झाले रुजू; पगडी करा उजू ' या म्हणीप्रमाणे तोडणार नाही, अशी माझी अपेक्षा आहे. तुम्ही पिढ्यान् पिढ्या स्वतंत्र मजूर पक्षाशी आपला संबंध कायम ठेवा. कारण खोती बिलानंतर इतर अनेक बिले स्वतंत्र मजूर पक्ष आणणार आहे. कारण स्वतंत्र मजूर पक्षाचे अंतिम ध्येय हेच आहे की शेतकरी व कामकरी यांचे हातात सर्व सत्ता जाऊन त्यांचे सरकार स्थापन व्हावे

० ० ०

(दि. २०-५-३८ रोजी महाड येथे प्रचार सभा झाली त्याप्रसंगी दिलेले भाषण. जनता, दिनांक ४-६-१९३८.)

निवडणुकीपूर्वी काँग्रेसने शेतकऱ्यांना पुष्कळशी गोड आश्वासने देऊन त्यांची मते मिळविली. काँग्रेसने अधिकार स्वीकार करून अकरा महिने होऊन गेले तरी अद्याप तिनकडून लोकहिताचे एकही काम झालेले नाही. पदवीदान विरोध, लोकलबोर्डसारखी निष्फळ व निरुपयोगी बिले पास करण्यात कांग्रेस मंत्रिमंडळाने कसातरी वेळ काढून लोकांना झुलवीत ठेवले नाही म्हणावयास शेतकऱ्यांच्या मोच्यं मुळे घाबरून कग्रेस सरकारने शेतकऱ्यांची जमीन विकण्याला बंदी करणारे बिल पास केले. त्यातसुद्धा म्हणण्यासारखा दम नव्हता. स्वतंत्र मजूर पक्षाने शेतकऱ्यांच्या हिताच्या मांडलेल्या अनेक उपसूचना सरकारने फेटाळून लावल्या. मोठ्या कष्टाने शेतीच्या उपयोगाचे दोन बैल जप्त न करण्याची उपसूचना मात्र त्यांनी मान्य केली. अशा तऱ्हेने काँग्रेसने शेतकऱ्यांची फसवणूक केलेली आहे. शेठसावकारांच्या पैशावर निवडून आलेले काँग्रेस सरकार आपल्या अन्नदात्याच्या विरुद्ध कायदे करून शेतकऱ्यांचे हित केव्हाच करू शकणार नाही, हे लक्षात ठेवा.

खोती नष्ट करण्याचे मी हाती कंकण बांधले आहे कांग्रेस सरकार बिलाला पाठिंबा देईल किंवा नाही ते सांगता येणार नाही. परंतु वारा उलट दिशेने वाहात आहे जर खोती बिल नापास झाले तर मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी तुरुंगात जाण्याचा निश्चय केला आहे. तुम्ही आमच्या मागे आले पाहिजे. इतकी तयारी असल्यावर खोती नष्ट करण्याला अवधी लागणार नाही.

० ० ०

(पुणे जिल्हा, मु. घोडे वतनदार, दिनांक २२-५-३८ चे भाषण. जनता, दि. ४-६-१९३८.)

मी एक हजार मैलांचा प्रवास करून या परिषदेस हजर राहिलो. पुणे जिल्ह्याचे महार लोक हे सर्व जिल्ह्यापेक्षा अगदी गबाळ आहेत. ते मृतमांस व खरकटे खातात, असे मी ऐकतो. यांच्यात कायमची दुही चालू आहे. दुहीच्या योगाने यांचे कोणतेही काम नीट होत नाही. हे धर्मवेडे आहेत व (तथाकथित) देशाभिमानी आहेत. माझा देवाधर्मावर बिलकूल विश्वास नाही. देवाधर्माच्या खुळचट व वेडगळपणाविषयी एकदा मी माझ्या हिंदू मित्रांना शंकराच्या पिंडी-विषयी माहिती विचारली. त्यांना ती सांगता आली नाही. शंकराची पिंड काय आहे याचे येथे जास्त स्पष्टीकरण करता येत नाही. ते निव्वळ संभोगदृश्य आहे. या ठिकाणी धर्मश्रद्धाळू प्राण्यांनी वर्गणी गोळा करून एक दिवसाच्या यात्रेकरिता धर्मशाळा बांधणे हे केवळ स्वार्थ साधण्याचे उपाय आहेत. धर्मशाळेला १५० रुपये

देऊ केलेत. तुम्ही दोनशे द्याल तरच आम्ही (तुम्हाला) मते देऊ असे वाडे गटाचे म्हणणे होते. म्हणजे वाडे गटातील मंडळी किती नीच आहेत, हे लक्षात येते. जिल्हा बोर्डात एखाद्या दगडास उभा करून मानासाठी मोबदला मागणारा समाजाच्या नुकसानीस किती पात्र होतो याची तुम्हीच कल्पना करा. तेव्हा समाजाने अशांचा संबंध मुळीच ठेवू नये. जरी त्यांनी एखादा दगड मते देऊन निवडला तरी अखेर माझ्याशीच काम आहे. म्हणून स्वतंत्र मजूर पक्षातर्फे मी जे उभे केलेले उमेदवार श्री. केशव राणूजी शिशुपाळ व महादेव बाळाजी कोकणे यांनाच मते देऊन निवडून आणा म्हणजे मी तुमचा आभारी होईन.

— ० —

४२. राजकारणातील आपली प्रगती ब्रह्मदेवही थांबवू शकणार नाही !

(धुळे येथे दिनांक १७ जून १९३८ रोजी झालेले भाषण. जनता, दिनांक २३ जुलै १९३८)

प्रिय भगिनींनो आणि बंधूंनो,

या भागात बरेच दिवसांपासून येणे झाले नाही. मला निरनिराळ्या जिल्ह्यातील पत्रे आली आहेत. मध्यप्रांत, संयुक्त प्रांत, पंजाब वगैरे प्रांतांतून अनेक लोकांची पत्रे आलेली आहेत. किबहुना सर्व हिंदुस्थानातून मला बोलविण्याविषयी पत्रे आलेली आहेत. सर्व हिंदुस्थानातून मला बोलविण्याविषयी पत्रे येतात असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. हा देश किती अफाट आहे ! एकटचा माणसाने कितीसा कामाचा बोजा न्यावा ? दुसरी गोष्ट माझी प्रकृती हल्ली बरी नाही गेल्या दोन महिन्यात ३८ पौंड वजन कमी झाले आहे. तरी पण इतर भागाच्या मानाने या भागाकडे दुर्लक्ष झालेले आहे. याची भरपाई मी केव्हा तरी करीन, इतकेच आश्वासन मी आज देऊ शकतो.

गेल्या दहा वर्षांपासून जे राजकारण व समाजकारण चालू आहे त्या चळवळीचा ओघ कोणत्या थराला जाईल याची मला भीती वाटते. एक गोष्ट मात्र खरी की राजकीय बाबतीमध्ये भीती बाळगण्याचे कारण नाही. डोकावून सुद्धा ज्यांची सावली लोक घेत नव्हते त्यांचीच १५ माणसे असेंब्लीत बसून अधिकाराने व हक्काने गाऱ्हाणी सांगू शकतात. आज मुंबईच्या कायदे मंडळात काँग्रेससारखी प्रबळ संस्था आहे. एवढचा मोठचा संस्थेस स्वतंत्र मजूर पक्षाची भीती वाटते (टाळचा) ही गोष्ट अस्पृश्य समाजाच्या दृष्टीने काही कमी नाही काँग्रेसमध्ये आज लाख रुपये खर्च करणारे सावकार आहेत. शिक्षणामध्ये पारंगत झालेल्या ब्राह्मणांचा भरणा आहे. नाही म्हटले तरी ४० वर्षांचा तिच्या पाठीमागे इतिहास आहे. स्वतंत्र मजूर पक्ष स्थापून अवघे एक वर्ष झाले आहे. तरी एका वर्षात कामगिरी इतकी मोठी झाली आहे की स्वतंत्र मजूर पक्षाचे नाव ठाऊक नाही असा एकही स्त्री–पुरुष आढळणार नाही परंतु त्याची इतर पक्षास भीती वाटते हा राजकारणातील विलक्षण प्रकार आहे. मराठा अगर कुणबी यांना आपणाजवळ याचना करण्याची लाज वाटत होती ते लोक जाहीर रीतीने तिकिटावर उभे राहिले.

स्वतंत्र मजूर पक्षात कायस्थ, मराठे वगैरे जातींचा समावेश आहे, ही गोष्ट हिंदुस्थानच्या इतिहासात अपूर्व आहे. राजकारणातील आपली प्रगती ब्रह्मदेव जरी आड आला तरी थांबू शकणार नाही. (टाळ्या) हा नदी-नाला नाही, पण सिंधू नद आहे. धरण बांधले तरी फुटून जाईल. राजकारणातील हक्क मिळवून घेण्यास अडचण पडणार नाही. १५ माणसांनी काय केले ? काहीही झाले तरी ते आजच सांगणे कठीण आहे. आज २००० वर्षांपासून रुढी मानगुटीवर बसली आहे. तिला समूळ नाहीशी करण्यास १०–२० वर्षे देणे अन्यायाचे होईल. राजकारणात ऐक्य व संघटना जितकी जास्त, तितकी लवकर प्रगती होते. या बाबतीत आपल्या समाजाविषयी मला अभिमान वाटतो इलेक्शनच्या वेळी आपण जो प्रामाणिकपणा, धैर्य व संघटना दाखविली त्याच्याइतका प्रामाणिकपणा, धैर्य व संघटना या प्रांतामध्ये इतर कोणत्याही जातीने दाखविली नाही. आपण दारिद्र्याने व्यापलेले, दुःखाने गांजलेले आहोत, याचा विचार तुम्ही त्यावेळी केला नाही. ज्याचे पोट उपाशी मरते, मारवाडी देईल ते खाईल, अशी ज्यांची स्थिती आहे त्या तुम्ही दाखविलेला प्रभाव प्रशंसनीय आहे. तुम्ही आम्ही खेड्यापाड्यांमध्ये विखरून राहिलेलो आहोत. (खेड्यात) आपली फक्त ५-२५ घरे, इतरांची १००च्या वरती घरे आहेत. 'अमुक एक करा नाहीतर तुमची वस्ती हाकलून देऊ' असे जर त्यांनी ठरविले तर ते सहज करू शकतील (अशी तुमची स्थिती होती.)

आपल्या माणसांनी स्वतंत्र मजूर पक्ष बलवान केला पाहिजे. त्याच्या सांगण्याच्या विरुद्ध काहीही जाता कामा नये. त्यात समाजाच्या हिताच्या दृष्टीने तुमचाच फायदा आहे. मला सांगण्यास आनंद वाटतो की काँग्रेसचे अध्वर्यू वल्लभभाई पटेल यांनी आपल्या शिस्तीचे असे वर्णन केले आहे. " संघटना असावी तर डॉ. आंबेडकरांच्या संघटनेसारखी ! " (टाळ्या) तुम्ही या संघटनेमध्ये बिघाड होऊ देऊ नका. हंडाभर दूध नुसत्या मिठाच्या खड्याने नासते. पुष्कळसे अमृत विषाच्या नुसत्या थेंबाने बिघडते.

त्याचप्रमाणे स्वार्थी दुर्गुणी लोक आपला स्वार्थ साधण्यासाठी प्रवृत्त असतात त्यांची स्वार्थाकडे विचारसरणी असते. अशी माणसे निर्माण होतील. हाच काळ कायम राहील, असे वाटत नाही. धान्य निवडताना खडा आपण फेकून देतो, त्याप्रमाणे कंटक-स्वार्थी माणसाला खड्यासारखे निवडून टाकले पाहिजे. (टाळ्या) महार जातीत तरी कोणताही मनुष्य स्वतंत्र मजूर पक्षाच्या विरुद्ध निर्माण होऊ नये. राजकारणात संघटना व संघशक्ती केल्याखेरीज काही एक साधता यावयाचे नाही. संघ शक्ती निर्माण करण्याकरिता पैसा पाहिजे. घरामध्ये संसाराला पैसा लागतो, मीठ मिरचीसाठी पैसा लागतो. पैशाशिवाय काही चालत नाही, त्याप्रमाणे सार्वजनिक कार्याला पैसा लागतो. कांग्रेसजवळ राज-

कारण खेळविण्यासाठी पैसा आहे. मला असे कळले की नुकत्याच झालेल्या डि. बो. लोकल इलेक्शनमध्ये एका काँग्रेसच्या उमेदवाराने ३००० रु. खर्च करून यश मिळविले. पैशाशिवाय राजकारणाचा गाडा हाकता येत नाही. दुसऱ्याच्या अंकित न राहता स्वत:च्या पायावर आपण उभे राहण्यास शिकले पाहिजे. यावेळी मी आपणाला एका गोष्टीची आठवण देतो भीष्म आणि द्रोण कौरवांच्या बाजूला होते कौरवांची बाजू खोटी व पांडवांची बाजू खरी, असे त्यांना माहीत होते. 'राज्यच काय पण सुईच्या अग्रावर मावेल इतकी मातीही पण मिळणार नाही' असे कौरवांनी पांडवांना सांगितले होते. खरी खोटी बाजू न जाणता भीष्म आणि द्रोण कौरवांच्या बाजूने लढले. सत्याने युक्त अशा पांडवांच्या बाजूने का लढले नाहीत, असे विचारले असताना 'आम्ही कौरवांचे अन्न खातो' म्हणून सांगितले.

जो दुसऱ्याच्या मदतीवर जगतो अगर जिवंत राहतो तो दुसऱ्याचा गुलाम अगर अंकित झाल्याशिवाय राहणार नाही मी काँग्रेसच्या हरिजन सेवक संघाचा फंड घेतला नाही. त्यांचे ८–१० लाख रुपये घेतले असते तर मी त्यांचा गुलाम म्हणून राहिलो असतो; व मला तुमच्याकरता काही करता आले नसते त्यांच्या हजारो रुपयांपेक्षा तुमची पावली मला लाखाची आहे. (टाळ्या) तुमचा संसार तुम्ही स्वत:च्या शिरावर घ्या. त्यात तुमचाच फायदा आहे आपणास काँग्रेसचा पैसा नको. काँग्रेसचे प्रचारक दरमहा ३०–४० रु घेऊन काम करतात. आपले सेवक नुसता दरमहा १० रुपये घेऊन काम करण्यास तयार होतील. स्वतंत्र मजूर पक्ष तुमचा आहे. त्यास तुम्ही मजबूत केले पाहिजे.

मी २० वर्षांचा असताना बी. ए झालो. मला २००० वर पगार सांगून आले आहेत. माझ्या बरोबरीचे मुलगे डिस्ट्रिक्ट जज्ज आहेत. यात मला काय फायदा आहे ? मोटारीतून हिंडतो, बॅरिस्टर म्हणून कोणता लाभ आहे ? तुम्ही पडला गरीब, तुमच्या तक्रारी थोडयाच माझ्याकडे येणार आहेत ? तंटे स्पृश्य वर्गाचे तेच धनवान लोक ! मला पैसा मिळण्याचा संभवही त्याच लोकांकडून आहे. पण मी तुमच्या फायद्यासाठी त्यांच्याशी झगडतो. म्हणून त्यांना माझी भीती वाटते.

माझ्या पश्चात कोण माणसे किती जबाबदारीने काम करू शकतील ? व माझी जबाबदारी कोण घेईल ? मला आशा आहे की काही जबाबदार तरुण निपजतील व ही जबाबदारी ते आपल्या शिरावर घेतील. नाहीतर चढणीवर चढलेली गाडी डोंगराच्या माथ्यावर गेल्यानंतर बैलाच्या अभावी घसरून पडते तशी आपली स्थिती होईल, याबद्दल मला मोठी भीती आहे. आज आपण

पर्वताच्या उतरणीवर आहोत. चढण चढू लागलो आहोत. आपला अंतिम हेतू अद्याप साधला नाही. यात्रेसाठी निघालो आहोत पण अजून देवाला पाहिले नाही. यात्रा संपेपर्यंत आपण सर्वांनी पीठ, मीठ वगैरे सामुग्री बरोबर घेऊन चालावयास पाहिजे. आज राजकारणाची भीती वाटत नाही. परंतु राजकारणाच्या धुळवडीमध्ये जो प्रश्न आम्ही हाती घ्यावयास पाहिजे तो प्रश्न मागे राहिला आहे. आपल्या स्वतःच्या दृष्कृत्यागुळे आपणास जनावराचीही किंमत नाही. कारण तुम्ही गावातील तुकडे मागून खाता; व मेलेल्या जनावराचे मांस फाडून खाता. आज राजकारण लढविले तरी त्याचा काय उपयोग ? देऊळ बाहेरून मढविले तर त्याची काय शोभा ? तुम्ही मृतमांस खाणे सोडून दिले तर कोण खाईल ? ते मेलेले जनावर गिधाड व कुत्रा खाईल. यात तुमची काय किंमत आहे ? त्याची तुम्हास लाज कशी नाही ? समजा उद्या जाधव मुख्यप्रधान झाला–ही काही अशक्य कोटीतली गोष्ट आहे असे नव्हे–तर त्याला स्पृश्य लोक मान देतील काय ? सध्याप्रमाणे ते आरती ओवाळतील काय ? जे जीवन तुम्ही आज व्यतीत करीत आहात ते जीवन तुम्ही बंद केले पाहिजे व स्वच्छतेने नीटनेटके राहावयास पाहिजे.

" तुम्ही जर आमचे मृत मांस व तुकडे खाण्याचे बंद करता तर मग आम्ही काय खाणार ? " असा प्रश्न काही लोक विचारतात. त्यांना मला असे सांगावयाचे आहे की समजा या जवळ असलेल्या चितोड गावच्या दोन मुली ते गाव सोडून मुंबईला गेल्या. त्यापैकी एकीने संसाराला फाटा दिला व वेश्येचा धंदा पत्करला. तिला घडीचा पलंग, तक्या, गाद्या, खुर्च्या, टेबल वगैरे आहे. एक नोकर आहे. इराण्याचा दुकानावरून ती मस्काल्लाईस, खिमा, रोटी माडीवरून मागविते, दिवसातून चार पितांबर नेसते, पावडर लावते, किती सुबक जीवन नाही ? दुसरी मुलगी ७ रु. पगारावर काबाडकष्ट करते. नवऱ्याला १ किंवा १॥ रुपया मिळेल त्याच्यावर गुजराण करते, कथलाच्या गोटाशिवाय तिजजवळ दुसरा दागिना नाही मीठ भाखरी खाऊन कैक वेळा उपाशीही राहते, तेव्हा या दोन मुलींपैकी तुम्ही कोणत्या मुलीला मान द्याल ? देह विक्रय करून पितांबर नेसते तिला की जी गरिबीने दुःखाने गांजलेली व अन्नाला मोताज झाली तिला ? मला वाटते सर्व न्यायी माणसे पतिव्रता स्त्रीलाच मान देतील.

तेव्हा तुमची पोटाची खळगी भरो, न भरो तुम्ही चांगल्या रीतीनेच वागावयास पाहिजे. स्वाभिमान, धैर्य, नीती काही आहे की नाही ? आम्ही जे करतो ते बरे, वाईट, न्याय, इभ्रत याच्याकडे लक्ष देऊन आपण करतो की नाही याकडे लक्ष दिले पाहिजे. तुम्ही येथून सभेतून गेल्यावर नवीन कार्यक्रमास सुरवात करावी

(स्त्रियांस उद्देशून) इतर स्त्रियांप्रमाणे तुम्हीही आहात. आम्ही तुमचे दूध पिऊन वाढलो आहोत इतर स्त्रियांची मुले मामलेदार, हायकोर्ट जज्ज आहेत आणि तुमची मुले गुराखी आहेत. याचे कारण तुम्ही नरकात गुंतला आहात. हे तुमचे पाप आहे. तुमचे वर्तन असेच अशुद्ध राहिले तर तुमची मुले ही अशीच राहतील ' नर करनी करे तो नर का नारायण बने ' इतर स्त्रिया काही देवावतार नाहीत. त्याही स्त्रियाच आहेत, त्यांना वाव आहे, तुम्हाला वाव नाही म्हणून तुम्ही सर्वांनी स्वाभिमानाने व धैर्याने वागावयास शिका. आपले अंतिम ध्येय गाठण्यासाठी कसोशीने प्रयत्न करा.

— ० —



४३. फेडरेशन विरोधी प्रचंड चळवळ उभारा

(हे बाबासाहेबांनी काढलेले पत्रक असून ते जनतेच्या दि. २३-७-१९३८ च्या अंकात छापले आहे.)

आगामी फेडरेशन हिंदी राष्ट्राच्या भवितव्यास विघातक असून हिंदुस्थानावर ओढवलेली ही एक मोठी आपत्तीच होय. तेव्हा आपसातील मतभेद विसरून फेडरेशनच्या संकटास तोंड देण्याकरिता सर्व पुरोगामी गटांनी आपली शक्ती एकवटली पाहिजे. हिंदी स्वातंत्र्य लढ्यातील आणीबाणीच्या प्रसंगी अत्यंत स्वार्थ-त्यागाची आवश्यकता आहे.

स्वतंत्र मजूर पक्षाची घोषणा

१९३५ च्या कायद्यात अंतर्भूत असलेला फेडरेशनचा ठराव स्वीकारणे किंवा झिडकारणे हा आजच्या हिंदी राजकारणातील राष्ट्रीयदृष्टया अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. ब्रिटिश व साम्राज्यशाहीचे प्रतिनिधी हे फेडरेशन शक्य तितक्या लवकर लादण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. सर्वसाधारणपणे अखिल हिंदी राष्ट्राचा फेडरेशनला विरोधच आहे. परंतु प्रत्येक पक्षाचा विरोध करण्याचा दृष्टिकोन निरनिराळा आहे. फेडरेशन हाणून पाडण्याचा चंग बांधलेल्या काँग्रेस-मध्ये देखील फेडरेशनबाबत प्रत्यक्षात कोणते धोरण आखावे याविषयी पुष्कळच मतभेद आहेत. काँग्रेसने पास केलेल्या फेडरेशन विरोधी ठरावात दिसून येणाऱ्या विरोधाइतका काँग्रेसमधील जुन्या व प्रतिगामी पुढारी मंडळींचा फेडरेशनला तीव्र विरोध नाही, असे समजण्यास भरपूर पुरावा आहे. तसेच ते फेडरेशनचे आनंदाने स्वागत करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत, असे समजण्यासही काहीच हरकत नाही.

फेडरेशनपासून मिळेल तितका फायदा करून घेण्याकरिता अगर फेडरेशन हाणून पाडण्याकरताच फेडरेशनचा स्वीकार करावयाचा अशा ढोंगी अभिनिवेशा-खाली काँग्रेसमधील प्रतिगामी पुढारी काँग्रेसच्या तरुण व जहाल गटांना गप्प बसवतील अशी भीती वाटण्यास जागा आहे. एकदर परिस्थितीच्या अवलोकना-वरून असेच दिसून येते की फेडरेशन विरोधी ओरड कितीही जोरात चालू असली तरी इंग्लंडमध्ये त्याचप्रमाणे हिंदुस्थानात हिंदुस्थानवर फेडरेशन लादण्याची गुप्त

कारस्थाने चालू आहेत. या वाटाघाटीवरून असे दिसून येते की फेडरल घटनेत थोडेफार फेरफार करून तिचा स्वीकारच करण्यात येईल.

स्वतंत्र मजूर पक्षाचे धोरण

स्वतंत्र मजूर पक्षाचे असे मत आहे की हिंदी राष्ट्रीय लढ्यातील हा अत्यंत आणीबाणीचा असा प्रसंग आहे. आणि म्हणूनच प्रत्येक पक्षाचे हेच कर्तव्य आहे की या प्रश्नाकडे प्रत्येक पक्षाने आपल्या पक्षस्वार्थाच्या कोत्या दृष्टीने न पाहता संबंध हिंदी राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनेच पाहायला पाहिजे. स्वराज्याच्या पूर्ण हक्कास या घटनेने बाध येतो. म्हणूनच बऱ्याचशा हिंदी मुत्सद्यांचा या घटनेस केवळ विरोध आहे, असे दिसते. या घटनेतील खरेखुरे दोष यापैकी कोणालाही कळलेले आहेत असे दिसत नाही. म्हणून या पुढाऱ्यांच्या बाबतीत त्यांनी चालविलेली फेडरेशन विरोधी ओरड ही नुसतीच धमकी आहे. काँग्रेसमधील बहुसंख्याक पुढारी या अशाच पुढाऱ्यांपैकी आहेत, हे सांगण्यास मला वाईट वाटते.

हिंदी राष्ट्राचो स्वातंत्र्याच्या मार्गावर पुढे पुढे प्रगत होत असता केवळ काही फुटकळ व नाशवानेच मोठ्या असणाऱ्या आमिषाकरता स्वतंत्र मजूर पक्ष हिंदुस्थानला मागे खेचण्याचा प्रयत्न कधीही करणार नाही. प्रगतीच्या मार्गावर असताना हिंदुस्थानला पुढे मागे फेडरेशनचा स्वीकार करावा लागेल परंतु ते फेडरेशन १९३५ च्या कायद्याने प्रस्थापित केलेल्या फेडरेशनपेक्षा अगदी निराळ्या स्वरूपाचे असेल.

फेडरेशनमधील दोष

फेडरेशनमधील दोषांचे दोन भाग पाडता येतील (१) घटनेचा अपुरेपणा (२) घटनेचे स्वाभाविक दोष. संस्थानांना वाजवीपेक्षा जास्त दिलेले प्रतिनिधित्व, संस्थानी प्रतिनिधी निवडण्याची नॉमिनेशनची पद्धत, ब्रिटिश हिंदुस्थान आणि संस्थाने यांच्यावरील आर्थिक जबाबदारीची विषम विभागणी, फेडरल असेंब्लीच्या प्रत्यक्ष निवडणुकी आणि गव्हर्नर जनरलला देण्यात आलेले जादा अधिकार या सर्व गोष्टी घटनेच्या अपुरेपणात मोडतात. दुसऱ्या भागात खालील गोष्टी मोडतात. (१) सार्वभौमत्वाचे राखीव अधिकार (२) लष्करावर पूर्ण ताबा मिळविण्याची आवश्यकता व (३) तिजोरीवर पूर्ण ताबा मिळविण्याची आवश्यकता.

या घटनेत असलेली अपूर्णता जरी गंभीर स्वरूपाची असली तरी काही काळानंतर ती घालविता येईल. परंतु घटनेतील स्वाभाविक दोषांच्या बाबतीत मात्र हे अशक्य आहे. सबंध फेडरल घटना मोडून टाकल्याखेरीज घटनेतील हे दोष नाहीसे होणार नाहीत. एखादी घटना अपुरी आहे म्हणून तक्रार करण्याचे कोणालाही काहीच कारण नाही. कारण परस्पर सहमताने ही अपूर्णता जाण्या-

सारखी आहे. हो गोष्ट अशक्य नाही हे अनुभवसिद्ध आहे. घटनेतील अपूर्णता आता जरी नाहीशी झाली नाही तरी कायद्याच्या फेरतपासणीच्या वेळी ती नाहीशी होईल हे निःसंशय. परंतु घटना जर दोषयुक्त व घटनेच्या वाढीस बाधक अशा तत्त्वावर उभारलेली असली तर मात्र तिचा स्वीकार मुळीच करता येणार नाही.

जालीम विष

१९३५ सालच्या कायद्याने प्रस्थापित केलेल्या फेडरेशनला सर्व बाजूंनी व सर्व प्रकारांनी कसून विरोध केला पाहिजे, असे स्वतंत्र मजूर पक्षाचे मत आहे. नवीन राज्यघटनेतील फडरेशनचा भाग जालीम विष समजून तो फेकून दिला पाहिजे.

काँग्रेसमधील जहाल पक्षास पाठिंबा

काँग्रेसने जर बहुमताने फेडरेशनविरोधी लढा उभारला तर काँग्रेसला स्वतंत्र मजूर पक्षाचा पूर्ण पाठिंबा मिळेल. परंतु जर काँग्रेसमधील बहुमत प्रतिगामी पुढाऱ्यांच्या बाजूचे झाले आणि सुभाष बोस यांनी आपला फेडरेशनविरोध कायम राखला तर स्वतंत्र मजूर पक्ष सुभाष बाबूंच्या पक्षाशी सहकार्य करील. नवीन राज्यघटनेतील फेडरल घटना हाणून पाडण्याचा लढा जे जे पक्ष उभारतील त्या सर्वांशी आमचा पक्ष सहकार्य करील.

फेडरेशन हाणून पाडा

— ० —

४४. श्रमजीवी वर्गास जाहीर विनंती

मध्य प्रांत व वऱ्हाड शाखा

(ह. बाबासाहेबांचे स्वतंत्र मजूर पक्षाचा अध्यक्ष या नात्याने काढलेले पत्रक आहे ते जनतेच्या ३० जुलै १९३१ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे.)

हिंदुस्थानातील बहुसंख्याक लोकांना म्हणजे जवळ जवळ शेकडा ८० टक्के लोकांना रात्रंदिवस काबाडकष्ट करून आयुष्य कंठावे लागते. कोट्यवधी लोकांना रक्ताचे पाणी करून देखील पोटाची खळगी भरता येत नाही की अंगभर वस्त्र मिळत नाही. जमीनदारी, मालगुजारी, खोती, तालुकदारी, सावकारी, इनामदारी, भांडवलशाही वगैरेसारख्या ज्या जुलमी पद्धती देशात रूढ आहेत त्या पद्धतींमुळे केलेल्या कामाचा पूर्ण मोबदला शेतकरी, किसान, कास्तकार किंवा मजूर यांच्या पदरात पडत नाही. म्हणून देशातील या ८० टक्के लोकांवरील होणारा जुलूम समूळ नष्ट करून त्यांचे जीवन सुखाचे करणे, हेच खरे राजकारण होय. आणि ज्या राजवटीत शेतकरी मजुरास पिळणारे शेठसावकार यांचेच प्राबल्य असते ती राजवट देशाचे खरे हित कधीच साधू शकणार नाही. शेठ–सावकाराचे स्वातंत्र्य म्हणजे देशाचे स्वातंत्र्य नव्हे. ज्या वेळेस शेतकरी किंवा मजूर हे स्वतंत्र होतील त्याच वेळेस देश खराखुरा स्वतंत्र होईल. जी राजकीय संस्था शेठ–सावकाराचे, मालगुजारांचे–खोताचे–भांडवलदारांचे हित साधण्याचा प्रयत्न करते ती संस्था शेतकरी व मजूर यांचे हित साधू शकत नाही. 'शेतकरी व मजूर यांचे आम्ही हित साधू' अशा प्रकारच्या कितीही वलगना त्या राजकीय संस्थेने मारल्या तरी त्या फोल असून नाडलेल्या वर्गाने या संस्थेपासून दूरच राहिले पाहिजे. आज काँग्रेस या राजकीय संस्थेत शेठ–सावकार–मालगुजार यांचेच प्राबल्य आहे. त्यांच्याच सल्ल्याने सत्ताधीश झालेल्या काँग्रेसचा राज्यकारभार चाललेला आहे. हे शेठ सावकार काँग्रेसला शेतकरी मजुराच्या हिताच्या गोष्टी कधीच करू देणार नाहीत. अशावेळी शेतकरी मजूर वर्गाचे कर्तव्य म्हणजे एकच, व ते हे की आपल्या वर्गाची संघटना जोराने सुरू करून आपल्याच वर्गाच्या हातात सत्ता आणण्याच्या उद्योगास लागणे.

मुंबई प्रांतात शेतकरी मजूर वर्गास ही गोष्ट पटली असून ते आपसातील भेदाभेद विसरून एकजूट करू लागले आहेत व स्वतंत्र मजूर पक्षात सामील

होत आहेत. कोकणात स्पृश्यास्पृश्यता, जातिभेद, धर्मभेद बाजूला ठेवून मराठे, कुणबी, महार, चांभार मुसलमान वगैरे सर्व शेतकरी स्वतंत्र मजूर पक्षाच्या झेंड्याखाली हजारोंनी दाखल होत आहेत.

मुंबई कायदे मंडळात स्वतंत्र मजूर पक्षाने खोती नष्ट करणारे बील, वतनात सुधारणा करणारे बिल, सावकारीस आळा घालणारे बिल इत्यादी पिळल्या जाणाऱ्या वर्गाच्या हिताचे कायदे घडवून आणणारी बिले सादर करून आपल्या पक्षाचे धोरण काय आहे, हे जनतेच्या निदर्शनास आणले आहे.

गेल्या जानेवारी महिन्यात मुंबई कायदे मंडळाची बैठक चालू असता स्वतंत्र मजूर पक्षाने शेतकऱ्यांची एक प्रचंड मिरवणूक काढून ३० हजार शेतकऱ्यांचा अजस्र समूह कायदे मंडळासमोर उभा करून सरकारचे धाबे दणाणून टाकले व आपली वाढती शक्ती जगास पटवून दिली. स्वतंत्र मजूर पक्षाचे खोती बिल मुंबई कायदे मंडळात चर्चेकरिता लवकरच येणार आहे. त्यावेळेस काँग्रेसच्या व स्वतंत्र मजूर पक्षाच्या सामन्यास तोंड लागेल.

स्वतंत्र मजूर पक्ष हा एकाच जातीकरिता किंवा धर्माकरिता नाही. हा पक्ष हिंदुस्थानातील एकंदर श्रमजीवी जनतेच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्काच्या लढ्यासाठी स्थापन झाला आहे. यात स्पृश्य-अस्पृश्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, हिंदू-मुसलमान असा बिलकूल भेद नाही. त्यात कोणाही व्यक्तीस सामील होता येईल. मुंबई प्रांतातील सर्व जिल्ह्यांत या पक्षाच्या शाखा स्थापन झाल्या असून ठिकठिकाणी पक्षाचे कार्य चालू आहे.

मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतात यापूर्वीच जरी थोडीशी सुरवात झाली असली तरी त्याठिकाणी सुसंघटित असे कार्य सुरू झाले नव्हते. याकरिता नागपूर येथे स्वतंत्र मजूर पक्षाची रीतसर स्थापना होत आहे; आणि आनंदाची गोष्ट ही की तेथील स्थानिक कार्यकर्ते या कामात पुढाकार घेण्यास पुढे सरसावले आहेत.

नागपूर प्रांतातील प्रसिद्ध कार्यकर्ते भाईजी जयवंत, दशरथ पाटील व चंद्रभान चव्हाण इत्यादी मंडळी स्वतंत्र मजूर पक्षाच्या संघटनेचे कार्य शिरावर घेत आहेत, व त्यांना शाखेचे 'ऑर्गनायझर्स' म्हणून नेमण्यात येत आहे.

मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतातील पक्षाचा तूर्तचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

(१) मालगुजारी नष्ट करणे.

(२) जुने कर्ज रद्द करविणे.

(३) शेतकऱ्यांवरील शेतसारा कमी करणे.

(४) कास्तकारांना सध्या जाचक असलेले इतर कायदे रद्द करून त्यांना पोषक असे नवे कायदे करविण्याची चळवळ करणे.

(५) शेत मजूरांची (ठलव्यांची) किमान मजूरी ठरविणे.

(६) औद्योगिक कामगारांना पुरेसा पगार, पगारी सुट्टी, कामगार संघांना मालकांकडून मान्यता, कायम नोकरी, आठ तासाचे काम, नोकरीचा व अपघाताचा मालकाकडून विमा, नुकसान भरपाई व इतर कायद्यांची कायदेशीर तरतूद करवून घेण्याकरिता चळवळ करणे. आजारीपणा व बेकारीचा भत्ता वगैरे मिळण्यासाठी लढा उभारणे वगैरे.

(७) येऊ घातलेली जुलमी राज्यघटना (फेडरेशन) हाणून पाडणे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सर्व कास्तकार, कामगार, कारकून व श्रमजीवी वर्गाने या पक्षाचे सभासद होऊन जोराची चळवळ करण्यास मदत केली पाहिजे. पक्षाच्या प्रचारकाजवळ मुख्य कचेरीच्या अध्यक्षांच्या सहीची शिफारस-पत्रे दिलेली आहेत. सर्वांना सभासद होण्याची विनंती.

बाहेदिना मॅन्शन, पोयबावाडी, परळ
मुंबई नं. १२.
ता. १ जुलै १९३८.

भीमराव रामजी आंबेडकर
अध्यक्ष, स्व. म. पक्ष, मुंबई.

— ० —

४५. जबाबदार राज्य पद्धतीची तत्त्वे

(डॉ. खरे यांचे अभिनंदन करण्याकरिता सर्व्हन्टस् ऑफ इंडियाच्या हॉल-मध्ये दिनांक ४-८-३८ ला झालेल्या सभेतील अध्यक्षीय भाषण. जनता दि. १०-८-३८)

आपण जे आज येथे जमलो आहोत ते डॉ. खरे यांचे स्वागत करण्याच्या उद्देशाने होय, हे सर्वांना ठाऊकच आहे. हे स्वागत करण्यास आपण कोणत्या कारणांनी व हेतूंनी उद्युक्त झालो आहोत याचे थोडेसे सविस्तर स्पष्टीकरण करणे जरुरीचे आहे आजच्या या सभेतील मंडळींकडे नजर फेकता आपण सर्व एकाच भावनेने अथवा एकाच कारणाने या स्वागतासाठी येथे जमा झालो आहोत, असे मला वाटत नाही राजकारणातील मतांच्या दृष्टीने पाहिले तर आजचा हा जमाव अनेकजिनसीच असल्याचे दिसून येत आहे काहींनी तर विशिष्ट पक्षाच्या काँग्रेसच्या राजकीय विचारसरणीची खूण पटविणारा पोशाखही केलेला आहे. हिंदुस्थाना-तील पुष्कळशा हिंदूंना हाच एक जगन्मान्य पंथ वाटत आहे इतर काही लोक जे येथे आले आहेत ते माझ्याप्रमाणे देशातल्या आजच्या त्या अग्रगण्य पक्षाचे सदस्य नाहीत. उलट त्यांचा त्या पक्षाला विरोधच आहे. या खेरीज इतर काहीजण येथे उपस्थित झाले आहेत ते राजकारणाच्या बाबतीत उदासीनच आहेत. हे लोक जात प्रेमामुळे अथवा तशाच स्वरूपाच्या काही कारणामुळे आलेले असतील. ते कसेही असो डॉ. खरे तरी आपल्यामुळे आज तीन भिन्न स्वरूपात उभे आहेत यात शंका नाही. पहिली गोष्ट म्हणजे ते महाराष्ट्रीय आहेत; दुसरी गोष्ट म्हणजे ते काँग्रेसवाले आहेत आणि तिसरे त्यांचे स्वरूप म्हणजे मध्यप्रांतातील पदच्युत केलेले मुख्य प्रधान या नात्याने ते येथे उभे आहेत. आजच्या प्रसंगी येथे येऊन अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मी का उत्सुक झालो असेन, असे आपणाला वाटते ? डॉ. खरे व माझी भेट होण्याचा योग पूर्वी कधीही आला नव्हता. काल आमची एका समस्नेहाच्या कचेरीत गाठ पडली व तेथेच डॉ. खऱ्यांची व माझी प्रथम ओळख झाली. अर्थात त्यांच्या राजकारणाने प्रभावित होऊन मी काही येथे आलेलो नाही, ही गोष्ट उघडच आहे. राजकारणाच्या बाबतीत माझ्यापेक्षा ते भिन्न विचारसरणीचे व विरोधी अशाच पंथाचे अनुयायी आहेत. डॉ. खरे महाराष्ट्रीय आहेत ही गोष्टही महत्वाची आहे. त्यांच्या बाबतीतील अन्यायामुळे बऱ्याच महाराष्ट्रीयांची मने विशेष क्षुब्ध व्हायला ही गोष्ट कारणीभूत झालेली आहे,

हे निःसंशय होय. आणि असे होणे स्वाभाविकही आहे. हिंदी राजकारणातील महाराष्ट्रीयांच्या वाटचाचा इतिहास पाहिला तर महाराष्ट्रीय त्यात मागे चालले आहेत, या गोष्टीबद्दल मला तरी निदान शंका वाटत नाही. महाराष्ट्रीय लोक व्यापारात आतापर्यंत कधीच पडलेले नाहीत. यामुळे विपुल द्रव्य अथवा पैसाही त्यांनी कधी केला नाही. ज्यावेळी इतर भागातले हिंदी लोक परकीयांच्या जुलमाखाली पीडले जात होते त्यावेळी महाराष्ट्रीयांच्या पूर्वजांनी आपले सारे आयुष्य स्वराज्याचा कारभार हाकण्यात घालविले. त्यांचे रक्त त्यापायी खर्ची पडले. महाराष्ट्रीयांची पीछेहाट का झाली, याची परवाच एका काँग्रेस पुढाऱ्याने मुंबईतील आपल्या एका भाषणात मीमांसा केली महाराष्ट्रीयांना व्यवहारज्ञान कमी म्हणून ते मागे पडत आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. पण मला ही गोष्ट मुळीच पटत नाही. माझ्या मते महाराष्ट्रीयांइतकी व्यवहारबुद्धी हिंदुस्थानातील इतर कोणाही प्रांतीयात आढळू शकणार नाही. महाराष्ट्रीयांचा ऱ्हास इतर कोणत्याही कारणाने झालेला असो; पण व्यवहारबुद्धीच्या अभावामुळे मात्र तो खचित झालेला नाही. महाराष्ट्रीयांची पीछेहाट का झाली याचे कारण त्यांचे जीवित देशाच्या स्वातंत्र्यासाठी कामी आले. राजकारण खेळविण्यात, राज्यकारभार हाकण्यात त्यांचा काळ निघून गेला. माझ्या या म्हणण्याची इतिहासच साक्ष देत आहे. धनाढ्य श्रेष्ठींचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात तुम्हाला ऐकू येणार नाही; पण सेनानी, मुत्सद्दी, राजकारणी पुरुष यांची नावे तुम्हाला घडोघडी सापडू शकतील. जगातील कोणत्याही देशाला अभिमान वाटावा अशी ही नावे आहेत.

महाराष्ट्र मागे का ?

महाराष्ट्राची पीछेहाट झाली याचे कारण हेच की त्यांनी इतरांप्रमाणे व्यापाराचा मार्ग स्वीकारला नाही, लक्ष्मीची कृपा संपादण्याचा प्रयत्न केला नाही, तिच्या मागे ते लागले नाहीत. आज कशाला किंमत असेल तर ती एका पैशाला ! पैशाने बुद्धी काबीज केली आहे; शील हाताखाली घातले आहे. निदान बुद्धी व शील या दोहींवर त्याने मात केली आहे, हे तरी खासच होय.

एकेकाळी आपण राजकारणात अग्रभागी होतो. टिळक, गोखले व रानडे या तीन महाबुद्धिवान व राजकारणधुरंधर व्यक्ती आपल्यामध्ये होत्या. या व्यक्तींचे राजकारण आजच्यासारखे खळबळीचे नसेल किंवा आजच्यासारखे औत्सुक्यपूर्णतेचे नसेल, पण ते आजच्यापेक्षा अधिक प्रामाणिक व अधिक विचार-प्रवर्तक खास होते ! पण या बाबतीतील देखील पुढारीपण आमच्याकडे राहिले

नाही. आजची स्थिती अवलोकन करता कारकून व मजूर या पेशांपलीकडे काहीच कर्तृत्व नसलेले लोक अशीच महाराष्ट्रीयांची अवस्था होत चाललेली अधिकाधिक दिसून येत आहे. ही घसरगुंडीची गोष्ट लक्षात घेता ज्या काही थोडचा महाराष्ट्रीयनांना या घसरगुंडीतूनही राजकारणात काहीतरी स्थान मिळविता आले, अशांचीही तेथून उजलबांगडी व्हावी ही गोष्ट महाराष्ट्रीयांना बोचू लागल्यास त्यात (रकान्याच्या पुढील अंदाजे १० ओळी फाटलेल्या आहेत.)

पण माझ्या महाराष्ट्रीयत्वाचा मात्र मला फार फार अभिमान आहे, ही गोष्ट मी येथे ठासून सांगतो. महाराष्ट्रीयात असे काही गुण आहेत की ते इतर प्रांतीयात तुम्हाला दिसून यावयाचे नाहीत. लंडनसारख्या परक्या ठिकाणी सर्व प्रांतीयांचा मेळावा जमलेला असतो त्यावेळी हा फरक सहज लक्षात येऊ शकतो. कोणाचे कसे गुणदोष आहेत हे त्यावेळी ओळखणे सहज शक्य होते.

जबाबदार राज्यपद्धतीची तत्त्वे

डॉ. खरे हे महाराष्ट्रीयन आहेत यामुळे जसा मी येथे आलो नाही तसाच ते काँग्रेसवाले आहेत यामुळेही आलेलो नाही. डॉ. खऱ्यांनी काँग्रेसचे अनुयायित्व पत्करले आहे. त्या संस्थेचे जे काय नियम असतील अथवा जी काय शिस्त घालून देण्यात आलेली आहे ती पाळण्याचेही त्यांनी पत्करले आहे, हे सरळच आहे. या शिस्त पालनाबाबत त्यांच्या संस्थेशी त्यांचा काही वाद असला तर त्यात आमच्यासारखे जे काँग्रेसच्या बाहेर आहेत त्यांच्याकडून त्यांना साह्य होणे शक्य नाही. मी येथे आलो याचे कारण हेच की मुख्य प्रधानाच्या हक्काचा लढा डॉ. खरे हे आज लढवीत आहेत. मुख्य प्रधानाचे हे हक्क मला जनतेच्या, मतदारांच्या व जबाबदार राज्यपद्धतीच्या दृष्टीने अत्यंत बहुमोलाचे वाटत आहेत. आणि यासाठीच डॉ. खऱ्यांचे स्वागत करण्याकरिता मी येथे उपस्थित झालो आहे.

मुख्य प्रधान हा जबाबदार राज्य पद्धतीच्या कमानीतला खिळीचा दगड होय, असे मी म्हटले होते, तेच मला पुन्हा एकदा येथे फिरून सांगावेसे वाटते. माझ्या मते जबाबदार राज्यपद्धतीला दोन गोष्टींची मुख्य आवश्यकता असते. पहिली गोष्ट म्हणजे आपल्या प्रतिनिधींच्या कृत्यावर डोळचात तेल घालून नजर ठेवणारी जनता व दुसरी गोष्ट म्हणजे जनतेच्या मताचा कौल ज्यांनी घेतला नाही अशांना नव्हे तर ज्यांनी हा कौल घेऊन स्वतःला निवडून घेतले आहे अशांनाच फक्त जबाबदार राहणारा मुख्य प्रधान. मुख्य प्रधानाच्या कृत्याची रास्तारास्तता जोखण्यास जनता आपल्याकडे अखेरचा निर्णायक हक्क घेऊन बसलेली असते. तो हक्क तिचा आहे. काँग्रेस वर्किंग कमिटीने आपला जो हक्क सांगितला आहे त्यामुळे जबाबदार राज्यपद्धतीची माझ्यामते शिरापुरी विटंबनाच होत आहे.

काँग्रेस वर्किंग कमिटीचे दोन तत्त्वे अमलात आणली आहेत. ही तत्त्वे माझ्यामते अत्यंत विघातक व कोणत्याही लोकशाही राष्ट्रास असंमत ठरणारी आहेत. वर्किंग कमिटीने पहिले तत्त्व असे सांगितलेले दिसत आहे की मुख्य प्रधानाला आपल्या सहकाऱ्यांची निवड करण्याचा हक्क पोहोचत नसून हे त्याचे सहकारी व मंत्री मतदारांना अथवा कायदेमंडळाशी जबाबदार नसलेल्या अशा एखाद्या बाह्य संस्थेनेच निवडले पाहिजे ! मंत्रिमंडळाच्या सामुदायिक जबाबदारीचे तत्त्व प्रस्थापित करून घेण्यासाठी गोलमेज परिषदेत आम्ही किती झगडलो आहोत याची गृहस्थहो, तुम्हाला कल्पना नाही. सायमन कमिशनने या बाबतीत आपल्या रिपोर्टात अशी शिफारस केली होती की प्रांतातील राज्यपद्धती पूर्ण जबाबदारीची असावी. असे जरी ठरविले असले आणि कायदा व सुव्यवस्था हे खाते जरी राखीव असू नये असे मान्य केले गेले असले तरी ते खाते गव्हर्नरकडून नेमण्यात आलेल्या मंत्र्याच्या ताब्यात असावे आणि त्या मंत्र्याचा लोकनियुक्त मंत्र्यांच्या बरोबरीने मंत्रिमंडळात समावेश व्हावा ही शिफारस हाणून पाडण्यासाठी साऱ्या हिंदी प्रतिनिधींनी एकजुटीने कसा झगडा केला याबद्दलची साक्ष येथे हजर असलेले डॉ. मुंजेही देऊ शकतील. सदर शिफारशीने सामुदायिक जबाबदारीचे तत्त्व नष्ट होऊन जाईल, असे आमचे म्हणणे होते. सामुदायिक जबाबदारीचे हे तत्त्व मुख्य प्रधानाच्या राज्यघटनेतील स्थानावर अवलंबून आहे. मुख्य प्रधानाच्या स्थानाचे महत्त्व आहे ते येथेच. या तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी दोन गोष्टींची जरुरी असते. या विषयाचा मी थोडासा अधिक अभ्यास केला असल्याने अधिकारवाणीने बोलण्याचा थोडासा अधिक हक्क मला पोहोचू शकतो. सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वासाठी पहिली जी गोष्ट आवश्यक असते ती म्हणजे मुख्य प्रधानाला आपले सहकारी निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. सामुदायिक जबाबदारीचे तत्त्व नांदवावयाचे तर हा अधिकार इतर कोणालाही मिळता कामा नये. दुसरी आवश्यक गोष्ट ही की एखादा मंत्री आपल्याला नको असेल तर त्याला घालवून देण्यास सांगण्याचा अधिकार मुख्य प्रधानाला असला पाहिजे. मुख्य प्रधानामुळे आपण अधिकारपदावर आरूढ झालेलो आहोत व आपल्याला अधिकारच्युत करणेही त्याच्याच हातात आहे ह्या गोष्टी साऱ्या मंत्र्यांच्या मनावर बिंबल्याखेरीज सामुदायिक जबाबदारीचे तत्त्व नांदणे कदापि शक्य होणार नाही. प्रत्येक मंत्र्याला ती जाणीव असेल तरच फक्त हे महत्त्वाचे तत्त्व चालू शकेल.

मतदारांना कोणी लाथाडले ?

मंत्रिमंडळातील मंत्र्यांची निवड करण्याचा अधिकार व काम मुख्यमंत्र्याचे नसून तो अधिकार आपला आहे, असे जे तत्त्व वर्किंग कमिटीने घालून दिले आहे

ते सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वाला सर्वस्वी विसंगत असे तत्त्व आहे. दुसरा जो हक्क वर्किंग कमिटीने आपला म्हणून सांगितला आहे तो म्हणजे मंत्र्यांच्या शासनाबाबतचा होय. एखाद्या मंत्र्याला शासन (खाते) द्यावयाचे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार वर्किंग कमिटीसारख्या बाहेरच्या संस्थेला आहे, असे तिचे म्हणणे आहे.

गृहस्थहो, आपल्याला हे ठाऊकच आहे की जबाबदार राज्य पद्धतीचे मुख्य तत्त्व हेच की ज्यांनी आपल्याला निवडून दिले त्याखेरीज इतर कोणालाही मंत्र्याला जबाबदार राहावयाचे नसते; पण वर्किंग कमिटीने या मतदारांना तर पुरेच धाब्यावर बसविले आहे.

मतदार म्हणजे कोणीच नव्हे, अशीच वर्किंग कमिटीची वृत्ती दिसते थोडक्यात सांगावयाचे म्हणजे एखाद्या यःकश्चित उंदराइतकीच वर्किंग कमिटीने मतदारांची किंमत केली आहे. एखाद्या ठराविक दिवशी त्याने यावे, ताकीद दिल्याप्रमाणे मत नोंदावे आणि मग लाथेच्या ठोकरीसरशी परत पिंजऱ्यात जाऊन पडावे; एवढेच त्याचे काम ! वर्किंग कमिटीने पुकारलेल्या तत्त्वांचा अर्थ हाच आहे.

मुख्य प्रधानाच्या मूलभूत हक्कासाठी डॉ. खरे भांडत आहेत. म्हणूनच त्यांचे स्वागत मी करीत आहे. आणि या त्यांच्या लढ्यात सर्वांनी पाठिंबा देणे त्यांचे कर्तव्यच आहे. आता शेवटी एक-दोन सर्वसाधारण मुद्द्याच्या गोष्टी सांगून मी आपले भाषण पुरे करणार आहे. ह्या गोष्टी सांगताना डॉ. खऱ्यांच्या काही विधानांचा मला उल्लेख करावा लागणार आहे. त्याबद्दल ते मला क्षमा करतील; अशी आशा आहे. 'आपण काँग्रेसमध्येच राहणार आहोत, काँग्रेसमध्येच राहून आपल्याला ज्या टोळक्याने इतक्या नीच रीतीने वागविले त्या टोळक्याशी आपण दोन हात करणार आहोत,' असे डॉ. खरे सांगत आहेत. अर्थात त्यांनी तसे केले तर आमचे काही म्हणणे आहे अशातली मुळीच गोष्ट नाही; पण या कामात त्यांना कितीसे यश मिळेल याची मात्र मला शंकाच वाटते. डॉ. खरे मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांच्या हातात अधिकार होता. मध्यप्रांताचे मुख्य प्रधान म्हणून जनतेच्या दृष्टीने मानाचे वैभव त्यांना प्राप्त झाले होते. पण इतक्या गोष्टी प्राप्त असता त्यावेळीही वर्किंग कमिटीच्या विरुद्ध त्यांना काही करता येणे शक्य झाले नाही. मग आता केवळ एक काँग्रेस पक्षाचा सामान्य सभासद म्हणून राहून त्यांना तीच गोष्ट साध्य करून घेता येणे कसे शक्य होईल, हे मला समजत नाही. पण काही लोक असे असतात की अधिकारस्थानावर असल्यावेळेपेक्षा स्थानभ्रष्ट झाल्यावेळेस त्यांचे धैर्य द्विगुणित होत असते. डॉ. खरे हेही अपवादभूत मानलेल्या व्यक्तीपैकीच असू शकतील !

लोकशाही हवी असेच तर

मी येथे राजकीय प्रचारासाठी बोलत नाही अथवा आमच्या स्वतंत्र मजूर पक्षासाठी सभासद मिळविण्यासाठी मी प्रचार कार्य करीत नाही. तथापि एक गोष्ट मात्र मला अगदी स्पष्ट व मनःपूर्वक सांगावीशी वाटते ती ही की तुम्हाला जर लोकशाही हवी असेल तर दोन गोष्टी तुम्हाला केल्या पाहिजेत. लोकशाहीला जरूर असलेली पहिली गोष्ट पक्षपद्धती ही होय यापैकी एक पक्ष अधिकारारूढ तर दुसरा विरोधी असला पाहिजे. विरोध करणारा पक्ष अस्तित्वात नसेल तर देशाच्या कारभारात जनता लक्ष घालू शकणार नाही. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. एवढेच नव्हे पण परवाच स्टेटस्‌मन नावाच्या एका इंग्लिश मासिकात एका इंग्लिश मुत्सद्याने असे म्हटल्याचे मला आठवते की एखाद्या प्रश्नाला दोन बाजू आहेत असे दाखविणे हेच राजकारणी पुरुषाचे काम, किंबहुना कर्तव्यच असते. मग त्या प्रश्नाला दोन बाजू खरोखरच असोत की नसोत. प्रत्येक प्रश्नाला दुसरीही एक बाजू आहे हे कळून घ्यावयास आपण शिकले पाहिजे. काँग्रेस जे सांगते ती त्या प्रश्नाची एकमेव बाजू होय, दुसरी बाजू तिला नाही, असे मानता कामा नये

माझी मुख्य भूमिका

दुसरी एक गोष्ट आपण शिकावयास पाहिजे ती अशी की सरकारची नेहमीच कसोटी घेत राहिल्याखेरीज लोकशाही सुरक्षित राहणे शक्य नाही. सुलतानशाही अथवा एकसत्ता आणि लोकशाही अथवा लोकसत्ता या मधला फरक काय ? राज्यशास्त्राचे पंडित याची व्याख्या काय देतील हे मला ठाऊक नाही. पण राजकारणी इसम या नात्याने त्यामध्ये हाच एक खरा फरक दिसतो की सुलतानशाहीमध्ये सरकारची कसोटी अथवा चौकशी कधीच होऊ शकत नाही. एकदा स्थापन झाली की ती अव्याहत चालूच राहते मग तो हिंदी संस्थानातल्याप्रमाणे वंशपरंपरेने चालो अथवा काही युरोपिअन देशातल्याप्रमाणे एका डिक्टेटरशाहीच्या चाकोरीतून चालू. कशीही ती चालली तरी एक गोष्ट स्पष्ट आहे, ती अशी की लोकशाहीची कसोटी दरक्षणी लागत असते. आपल्या प्रत्येक रास्ततेबद्दल जाबा द्यावा लागतो; तशी स्थिती सुलतानशाहीत नसते. सुरक्षितता तुम्हाला हवी असेल, प्रगती व्हावी अशी इच्छा असेल तर सर्वचजण एकाच संस्थेला चिकटून राहू नका, मग इतर लोक काय वाटेल ते म्हणू द्या. त्याची पर्वा करू नका. मी काँग्रेसमध्ये जात नाही याचे कारण मला माझ्या कर्तृत्वाला व बुद्धीला साजेलशी जागा मला तेथे मिळू शकणार नाही, हे नव्हे. मला तेथे दडपून टाकता येणे कोणालाही शक्य होणार नाही काँग्रेसमध्ये मी जात नाही याला तसेच कारण आहे; आणि ते कारण हेच की त्या संस्थेबाहेर

राहणे हेच मला अधिक व अत्यंत आवश्यक वाटते. टीकाकाराची भूमिका स्वीकारून प्रत्येक प्रश्नाची दुसरी बाजू उलगडून दाखविणे हेच मला अधिक श्रेयस्कर वाटते आणि जनतेची फसवणूक करता येऊ नये म्हणूनच ही भूमिका मला पत्करावीशी वाटत आहे.

आपल्या लोकांच्या अंगचे वैशिष्ट्य सध्या व्यक्त होऊ लागल्याची जाणीव मला होऊ लागली आहे. इंग्लंडमध्ये चालू असलेल्या जबाबदार राज्यसत्तेसारखी सत्ता आपल्या देशात स्थापन करण्यासाठी आपण झगडलो. आणि आमच्या राज्य-घटनेत तिचा अंतर्भाव करण्यास त्यांना भाग पाडले. पण त्या राजसत्तेला निराळेच विशिष्ट स्वरूप प्राप्त होत असल्याचे जाणवू लागले आहे. जबाबदार राज्य-पद्धतीला आज वर्षानुवर्षे आपण पारखे झालो आहोत. सुलतानांचीच सत्ता आपल्यावर चालत आली. आपले भवितव्य इतरांच्या हातात देऊन स्वतः स्वस्थ बसणे हे आपले आतापर्यंतचे वैशिष्ट्य ! आपला धनी हा आपला देव ! आणि त्याची पूजा करीत राहणे हाच आपला धर्म ! हेच वैशिष्ट्य सध्याही प्रस्थापित होऊ पाहात आहे. मालकाचेच म्हणणे खरे, त्याच्याविरुद्ध टीका करणे हे आपले काम नव्हे, अशी मतदारांची वृत्ती व्हावयासही हेच वैशिष्ट्य कारण आहे. पण अशा अंधभक्तीने जबाबदार राज्यपद्धतीला मात्र गोड फळे कदापि येऊ शकणार नाहीत. पण जबाबदार राज्यपद्धती नांदावयाची तर सरकारची कसोटी पाहण्या-साठ एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे सहजपणे वळण्याची तयारी असलेल्या लोकसमुदायाची प्रथमतः गरज असते. असा लोकसमुदाय निर्माण झाला नाही तर असा प्रकार घडून येईल की ब्रिटिशांकडून जी काही सत्ता आपण मिळवू शकू ती बहुजन समाजाच्या हाती न जाता एखाद्या टोळक्याच्या हाती जाईल आणि पूर्वीपेक्षाही वाईट परिस्थिती ओढवल्याचे प्रत्ययाला येईल. ह्यापेक्षा आणखी अधिक बोलण्याची माझी इच्छा नाही.

० – ०

४६. मंत्रिमंडळाला निवडणारे मतदार हेच अंतिम सत्ताधारी होत !

(मध्यप्रांत वऱ्हाडाचे मुख्यमंत्री डॉ. खरे यांना मंत्रिपदावरून काँग्रेसने काढून टाकले त्या संदर्भात दि. ५-८-३८ रोजी परळ येथे हिंदू पुढाऱ्यांनी सभा घेतली. तीत बाबासाहेबांचेही भाषण झाले जनता. दि. १३-८-१९३८)

सभापती, भगिनी व बंधूंनो,

आजच्या प्रसंगी मला भाषण करण्याचे काही प्रयोजन आहे, असे वाटत नाही कालच मव्हेंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या दिवाणखान्यामध्ये माझ्या अध्यक्षतेखाली एक सभा झाली तीमध्ये माझे सर्व म्हणणे मी सांगितले होते. परंतु कालचे भाषण इंग्रजीत झाले व मला वाटते मराठी वृत्तपत्रांचे जासूद त्या वेळेला हजर होते व त्यांनी माझ्या भाषणाचा तरजूमा योग्य तोच दिला असेल.

मी काँग्रेसचा सभासद नाही हे तुम्हास परिचित आहे. डॉ. खरे यांनी जी कहाणी सांगितली ती त्यांच्या भाऊबंदकीच्या वादापैकी एक आहे. मी अर्थातच तिऱ्हाईत व त्यांचा शेजारी. मी या वादात का पडावे ? हा प्रश्न मला आपण विचारणे साहजिकच आहे. कोणी म्हणतील घरच्या भाकरी खाऊन या उचापती मी का करतो ? म्हणूनच माझा आज भाषण करण्याचा अधिकार नाही. परंतु शेजारच्या घरी त्याला आग लागली म्हणजे माझे घर सुरक्षित आहे—त्याला आग लागली नाही—म्हणून कोणी स्वस्थ बसत नाही कारण एकदा आग लागली म्हणजे तिची धग कुणाला लागेल हे सांगता येणार नाही. शिवाय आपणास माहीतच आहे की मुंबई असेंब्लीमध्ये माझी स्थिती दहाबारा अंडी पंखाखाली उबेला घेणाऱ्या कोंबडीसारखी आहे. तुम्हाला माहीतच आहे की दहा बारा मुले घेऊन मी असेंब्लीत अपोझिशनला बसलेला असतो ही मुले हळूहळू मोठी होतील व न जाणो त्यांची संख्याही हळूहळू वाढेल; व कोणी सांगावे मला देखील प्राईम-मिनिस्टर होण्याचा योग येईल. अशावेळी डॉ. खरे यांच्यावर आलेल्या आपत्ती-विषयी मी जर मुग्ध राहिलो तर जी आपत्ती डॉ खरे यांच्यावर आलेली आहे तीच जर माझ्यावर आली तर मी काय करावे, हाही प्रश्न आहे म्हणून स्वस्थ न बसता माझे म्हणणे काय आहे हे आपणापुढे मांडलेच पाहिजे. तथापि या

नाटकातील मुख्य पात्र डॉ. खरे रंगभूमीवर येऊन गेल्यावर माझ्यासारख्या दुसऱ्या पात्राच्या बोलण्यात काहीच स्वारस्य नाही, हे मी जाणून आहे.

डॉ. खरे यांच्यावर प्रसंग गुदरल्यानंतर ते आपल्या प्रांतात आले आहेत. त्यांनी जी भाषणे केली ती मी मन लावून वाचली आहेत. शत्रूची आपापसातील भांडणे वाचणे किंवा ऐकणे मनरंजक तर खरेच; पण मी त्यांची भाषणे त्या दृष्टीने वाचली नाहीत. या वादात उत्पन्न झालेले काही मुद्दे अत्यंत महत्त्वाचे आहेत व त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. या वादातील मुख्य बाब लँडलॉर्ड व टेनन्ट यांच्या परस्पर संबंधासारखी आहे. जर सर्व टेनन्टस् एक होऊन त्यांनी आपल्या राहात असलेल्या घराला आग लावून पेटविले तर कायद्याच्या दृष्टीने मुख्य प्रश्न असा उपस्थित होतो की ही आग कोणी पेटवली ? ती अजाणतेपणी लागली की ज्याला आम्ही कोर्टामध्ये अर्सन (Arson) म्हणतो त्याप्रमाणे लागली आहे ?

या वादामध्ये उत्पन्न झालेली मुख्य तत्त्वे अशी आहेत. हल्लीच्या राज्य-घटनेत प्राईम मिनिस्टरचे अधिकार काय आहेत ? डॉ. खरे यांचे म्हणणे असे आहे की मंत्रिमंडळातील सर्व मंत्री मुख्य प्रधानांनी निवडावयाचे असून बाहेरच्या कोणत्याही व्यक्तीने त्या संबंधात ढवळाढवळ करता कामा नये व मंत्रिमंडळातील एखादा मंत्री नालायक, लुच्चा किंवा भांडखोर ठरला तर त्याला काढून टाकण्याचा अधिकार मुख्यमंत्र्याचा आहे. हे भांडण शासनपद्धतीतील एका तत्त्वासंबंधी आहे. व मला वाटते की कॉन्स्टिट्यूशनवर बोलणारा असा एक तज्ज्ञ मी आहे. मुंबईच्या चीफ जस्टिसनेसुद्धा एका प्रसंगी मुंबईच्या कॉलेजच्या व्हिजिट पुस्तकात असे चक्क लिहून ठेवले आहे की कॉन्स्टिटयूशन डॉ. आंबेडकरांनीच शिकवावी ! तशात मी निरनिराळ्या कॉन्स्टिटयूशनचा अभ्यास केलेला आहे व त्यांचा तौलनिक अभ्यासही माझा झालेला आहे.

आता मुख्य प्रश्न असा येतो की मंत्रिमंडळाचा कारभार जर व्यवस्थित होत नसेल तर त्यांना शास्ता करणारा कोण ? मला असे वाटते की मंत्रिमंडळाचा शास्ता त्यांना निवडून देणारे हजारो मतदार हे आहेत. वर्किंग कमिटीचे म्हणणे असे आहे की मंत्रिमंडळाचे शास्तेपण मतदारांकडे नसून ते तिजकडे आहे. वल्लभ-भाईने गेल्या असेंब्लीच्या निवडणुकीत हजारो दगड उभे केले परंतु महात्मा गांधी काय किंवा वल्लभभाई काय निवडणुकीला उभे राहिले नाहीत. कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर महात्मा गांधी वल्लभभाई किंवा वर्किंग कमिटीतील सर्व लोक हे उपटसुंभ आहेत. सर्व जबाबदार राज्यपद्धतीचा हाच अर्थ आहे की न्याय देणारी शेवटची संस्था म्हणजे मंत्रिमंडळाला निवडून देणारा मतदार संघच होय. या दृष्टीने पाहू गेले म्हणजे असे आढळून येते की न्याय आणि सत्य हे डॉ. खरे

यांच्याकडे असून वर्किंग कमिटीकडे न्यायही नाही व सत्यही नाही. डॉ. खरे यांच्याच म्हणण्यावरून माझे विचार असे झाले आहेत.

यावेळी मला माझ्या लहानपणच्या एका गोष्टीची आठवण होते. लहानपणी माझा सांभाळ आत्याने केला. ज्या गावी आम्ही राहत होतो तेथे शेजारी एक मुलगी होती. मुलगी दहा-बारा वर्षाची झाल्यावर तिच्या आई-बापांनी एक चांगलासा मुलगा पाहून तिचे लग्न केले. मुलगी नंतर सासरी राहावयास गेली व ती तेथे आनंदात आहे या समजुतीवर तिचे आईबाप आपल्या गावी स्वस्थ राहिले. बरोबर वर्ष झाले व चिट्ठी-चपाटी न पाठविता कोणा एका शेजाऱ्याबरोबर ती मुलगी आपल्या आईबापाच्या दारी एक दिवस दत्त म्हणन उभी राहिली; आणि अगदी वरच्या सुरात ओक्साबोक्शी मोठमोठ्याने रडू लागली. आई बापाला वाटले की मुलीला झाले आहे तरी काय ? चांगला शिकलेला सवरलेला मुलगा पाहून दिला. घरदार चांगले दिले, मग अचानक ही काय भानगड झाली? मुलीच्या आईने तिची समजूत केली व तिच्या पाठीवरून हात फिरवीत असताना तिला असे दिसून आले की मुलीचे अंग मारामुळे चांगलेच सुजून आले आहे व पाठीवर मारामुळे मोठे वळही आहेत. बिचारीने मुलीच्या पाठीला तेलतूप लावले. व आईबापांनी सांगितले की अशा सासुरवासात तू आपल्या नवऱ्याकडे नांदावयास जाऊ नकोस. ती मुलगी म्हणू लागली की माझी चूल आपण अमक्या घरी लावलेली आहे. तेथेच माझे काही बरे वाईट व्हायचे असेल ते होईल. मला आपली सासरी पाठवा असे म्हणून ती मुलगी हट्टाने पुन्हा सासरी नांदावयास गेली. नवऱ्याकडील माणसे म्हणू लागली की मुलगी पाहा किती सालस ! ती आमच्याकडे नांदावयास कबूल. पण तिचे आईबाप काहीतरी तिला शिकवितात. व अशा तऱ्हेने मुलगी सासरी झाली गोड आणि तिला तिच्या संकटाच्या वेळी आश्रय देणारे आई बाप झाले शत्रू ! परंतु मुलीची सासूच होती कजाग तिचे एळकोट जाईना. एक दिवस ती मुलाला म्हणाली की तू आता दुसरे लग्न कर. मुलीच्या आईबापाला मोठा प्रश्न पडला. मुलीला पुन्हा आपल्याकडे आणावी तर ती इतकी बेवकूफ की पुन्हा म्हणणार मी जाते आपल्या सासरी ! अशावेळी आईबापाने काय करावे ? हा मोठा पेच होता. डॉ. खऱ्यांची परिस्थिती काही अंशी आमच्या या शेजारच्या मुलीसारखीच आहे. त्यांना काँग्रेसमध्ये जाच झाला त्यांना अन्याय झाला म्हणून ते महाराष्ट्रात त्यांच्या सगे सोयऱ्यांकडे आपले गाऱ्हाणे घेऊन आले आहेत. व इतक्या अन्यायानेसुद्धा ज्याप्रमाणे ती मुलगी सासरीच नांदावयास कबूल, त्याप्रमाणे डॉ. खरे म्हणतात मी आपला काँग्रेसमध्येच राहणार !

डॉ. खरे यांना झालेला अन्याय पुसून काढता येत नाही. लोकशाहीची तत्त्वे अशी पुसली जाऊ नयेत हाच विचार या प्रसंगानंतर सर्वांनी केला पाहिजे. ज्या

दगडांनी किंवा देवांनी डॉ. खऱ्यांचा बळी घेतला ते दगड आणखी बळी घेणार नाहीत कशावरून ? डॉ खऱ्यांचे म्हणणे की सर्वांनी काँग्रेसमध्ये यावे. काहींचे म्हणणे असे की घाण करणारे तुम्ही ! अर्थात तुम्ही केलेली घाण तुम्हीच काढली पाहिजे मी माझ्या स्वच्छ कपडयांनी येऊन ती घाण का काढू ? तुमची घाण तुम्ही उपसून टाका. म्हणजे मग माझ्या स्वच्छ कपडयांनी काँग्रसमध्ये यावयाचे किंवा नाही, हे मी पाहीन. आता एक मुद्दा उपस्थित होतो की एक स्वतंत्र राजकीय पक्ष काढावा की सर्वांनी आपली शेंडी काँग्रेसच्या हातात अडकवावी ? मला असे प्रामाणिकपणे वाटते की देशामध्ये एकाच बैलाचा गाडा असणे हा देशाच्या उन्नतीला हितावह नाही. ज्या देशामध्ये एकापेक्षा अधिक राजकीय पक्ष नाहीत तेथे बुद्धीची वाढ होणे शक्य नाही व जेथे बुद्धीची वाढ नाही तेथे स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे.

राहता राहिल्या एका गोष्टीचा उल्लेख करणे मला भाग आहे. कोणीतरी मला सांगितले की मुंबईच्या प्रभात पत्रात मध्यप्रांत मंत्रिमंडळाविषयी लिहिताना असे लिहिले आहे की डॉ खरे हे आंधणात असून मुंबईचे आमचे बाळासाहेब खेर हे सुपात आहेत. मला एवढेच सांगावयाचे आहे की आमचे बाळासाहेब सुपात नाहीत व आंधणात तर कधीच यावयाचे नाहीत. एखादी चांगली सून असली म्हणजे तिला आपण आदर्श (Ideal) सून म्हणतो. बाळासाहेब खेर ही काँग्रेसची आयडियल सून आहे. ज्याप्रमाणे आयडियल सून दिराला नमस्कार कर, सासरा-सासूला, नणंदेला, जावेला नमस्कार कर, जरा कुणाही वडील माणसाला पाय लागला की नमस्कार कर, सगळ्यांशी गोड गोड बोल, खाली वाकले तर पायाची पोटरी उघडी पडली आहे की काय हे पाहा व नसली पडली तर उगाच लुगडयावरून हात फिरवून ते साफसूफ कर अशा तऱ्हेचे वर्तन आयडियल सुनेकडून होते. व तोच कित्ता आमचे बाळासाहेब खेर हुबेहूब गिरवीत आहेत. आणि म्हणूनच मला असे वाटते की बारा महिनेच काय पण बारा वर्षे किंवा बारा तपे देखील आमचे बाळासाहेब काँग्रेस अधिकारात राहिली तर मुख्य प्रधान राहतील. अर्थात सुपात किंवा आंधणात जाण्याची त्यांना कधीच वेळ येणार नाही.

— ० —

४७. गांधी विश्वासघातकी आहेत !

(अहमदाबादचे हे भाषण 'जनते'ने चित्रा साप्ताहिकावरून घेतलेले असून ते जनतेच्या दि. २६-११-३८ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे.)

माझ्यावर असा आरोप आहे की मी गांधींचा विरोधक आहे. मी त्यांना मानीत नाही. हे अगदी खरे आहे आणि ही गोष्ट मी गुजराथच्या या पटांगणात–गांधीवादाच्या या बालेकिल्ल्यात– आपणा सर्वांच्या समक्ष जाहीर रीतीने सांगतो. हे सांगताना मला बिलकूल दिक्कत वाटत नाही. मला हे ठाऊक आहे की गांधींच्या विरुद्ध बोलणे ही गोष्ट हलकी सलकी नाही. आज कोटचवधी लोक त्यांना अवतारी पुरुष मानीत आहेत. जगापुढे ते हिंदुस्थानचे एकमेव प्रतिनिधी म्हणून मिरवीत आहेत. ते साधू, महात्मा समजले जात आहेत. गांधींच्या पायाशी गोंडा घोळून 'जो हुजूर' करण्यात काय फायदा होतो हे काय मला ठाऊक नाही ? सुभाष बोसकडेच पाहा. १९३२ साली विठ्ठलभाई पटेलच्या हाताला हात लावून त्यांनी गांधींबद्दल काय म्हटले होते ?

"महात्मा गांधींनी कायदेभंगाची चळचळ तहकूब ठेवल्याचे ऐकून आश्चर्य वाटले. म. गांधींनी आजपर्यंत राष्ट्राकडून झालेल्या भरीव कार्यावर लेखणीच्या एका फटकाऱ्याने काळिमा फासला आहे गेल्या १३ वर्षांत विलक्षण स्वार्गत्याग व आत्मयज्ञ करून हिंदी राष्ट्राने आपल्या चळवळीची कामाव ली कीर्ती व इभ्रत महात्माजींच्या या चळवळ तहकुबीच्या खुलाशाने पार घालविली आहे. त्यांना अशा चळवळी मध्येच तहकूब ठेवण्याचा काय हक्क आहे, हे अजूनही मला समजले नाही. एकदा नेपोलियनने I am the State (मी मूर्तिमंत राज्य आहे) असे उद्‌गार काढले होते आज गांधी : "I am the Congress" (मी मूर्तिमंत काँग्रेस आहे) असे अप्रत्यक्ष रीतीने लोकांना सांगत आहेत ..... सविनय कायदेभंगाची चळवळ तहकूब ठेवणे म्हणजे सध्याचा काँग्रेसचा कार्यक्रम अयशस्वी झाला, अशी कबुली देण्यासारखेच आहे. महात्मा गांधी राजकीय पुढारी या दृष्टीने अयशस्वी ठरले आहेत. असे आमचे व्यक्तिशः मत आहे."

गांधींना अशा शिव्या देणारे हे गृहस्थ राष्ट्रपती आहेत. ही कायापालट होण्याचे कारण त्यांनी मागाहून पांघरलेली गांधीभक्तीची झूल ! वर्गणीचे चार आणे आणि पांढऱ्या टोपीचे दोन आणे खर्चून मी काँग्रेसमध्ये जाईन तर चाहीन

तो मान मला मिळेल, हे मला ठाऊक आहे. पण असला मान मी ठोकरेने उडवतो. मी महात्मा गांधींचा विरोध का करतो ? मी गांधींचा विरोध करतो तो माझ्या स्वार्थासाठी करीत नाही. हा महात्मा विश्वासघातकी आहे म्हणून मी त्याला विरोध करतो. त्याच्या विश्वासघातकीपणाचा माझ्याजवळ भरपूर पुरावा आहे. त्याचा मला माझ्या कार्यात प्रत्यक्ष अनुभवही आलेला आहे. म्हणून मी त्याचा विरोध करतो, आणि करीत राहीन.

गांधीना मी विश्वासघातकी का म्हणतो हे मी तुम्हाला सांगतो. राऊंड-टेबल कॉन्फरन्ससाठी हिंदुस्थानातील दलित वर्गांचा प्रतिनिधी म्हणून इंग्लंडला जाण्यापूर्वी मी गांधींना भेटलो होतो. त्यावेळी ते म्हणाले होते की अस्पृश्यांना स्वतंत्र जागा देण्याच्या मी विरुद्ध आहे. तथापि अधिक बोलणे झाल्यावर त्यांनी कबूल केले की इतर अल्पसंख्य गटांच्या प्रतिनिधींनी अस्पृश्यांच्या मागण्या मान्य केल्या तर आपण त्यांच्या आड येणार नाही. पुढे आम्ही विलायतेत गेलो. दुसऱ्या वर्तुळ परिषदेला गांधीही आले. मी ज्या कामासाठी गेलो होतो, त्यासंबंधी चर्चा चालल्याच होत्या. एक दिवस सरोजिनीबाईंनी मला गांधींच्याकडे नेले. त्यांना अस्पृश्यांचे म्हणणे काय आहे ते समजून घ्यावयाचे होते. वेळ रात्री १० ची होती. आम्ही पोहोचलो तेव्हा गांधी चरखा फिरवीत बसले होते. मला जे काही सांगावयाचे होते ते मी सांगितले. माझे बोलणे चालू होते; गांधींचा चरखा चालू होता मी दीड तास तिथे होतो. तेवढ्या अवकाशात गांधी एक शब्द माझ्याशी बोलले नाहीत. शेवटी त्यांचे चरख्याचे चक्र थांबल्यानंतर आम्ही उठलो तेव्हा गांधी मला एवढेच म्हणाले : " मी तुमचे बोलणे ऐकले आहे. मी त्याचा जरूर विचार करीन. " मी निघून आलो.

पुढे एकदा निरोप आला की गांधींनी सर्व अल्पसंख्य प्रतिनिधींना बोलाविले आहे. आम्ही सगळे गोळा झालो. तिथे मग नामदेवाच्या लग्नात जसे एकाने व्याह्याकडच्या प्रत्येक माणसाला विचारले होते, " तुम्हाला काय पाहिजे ? तुम्हाला काय पाहिजे ?' तसे गांधींनी आमच्यापैकी प्रत्येकाला विचारले. ज्यांनी त्यांनी आपापल्या मागण्या त्यांच्यापुढे मांडल्या. सगळे ऐकून घेऊन गांधी संथपणे म्हणाले, " मी तुमचे म्हणणे ऐकले आहे; मी सगळचा गोष्टींचा नीट विचार केला आहे. मला अस्पृश्यांना काही द्यायचे नाही. "

पुढे अल्पसंख्य प्रतिनिधींची (मायनॉरिटीज कमिटीची) तिसरी बैठक झाली. रॅम्से मॅक्डोनाल्ड अध्यक्षस्थानी होते. कामकाजाला आरंभ व्हावयाच्या आधी मुसलमानांनी तहकूबीची सूचना आणली. कारण काय ? तर त्याना गांधींशी काही खाजगी चर्चा करावयाची होती. मी आश्चर्याने स्तंभित झालो. मला या घटनेचा अर्थच कळेना. मी उठलो आणि तहकुबीला विरोध केला. मी

म्हटले, "जर ही चर्चा अल्पसंख्याकांच्या हक्कांसंबंधी असेल तर ती एकट्या गांधींशी खाजगी काय म्हणून ? तीत आम्हाला बोलावणे का नाही ? खाजगी भेटी-गाठी यापूर्वीही झालेल्या आहेत. जर ही चर्चा अस्पृश्यांच्या मागण्यासंबंधी असेल तर ती आम्हाला वगळून का ? यासंबंधी गांधींनी आपले म्हणणे स्पष्ट केले पाहिजे." त्यावर अध्यक्षांनी गांधींना त्यांचे यासंबंधी काय म्हणणे आहे, असे स्पष्ट विचारले. तेव्हा गांधी म्हणाले, "मला स्वत:ला अस्पृश्यांना काहीही द्यावयाचे नाही; पण इतर अल्पसंख्य प्रतिनिधींनी जर अस्पृश्यांच्या मागण्या मान्य केल्या तर त्यांना मी विरोध करणार नाही." या गोष्टी मी आपल्या मनाच्या सांगत नाही. राऊंड-टेबल कॉन्फरन्सच्या प्रोसिडिंग्जमध्ये त्या नमूद आहेत. त्या वाटेल त्याला पाहायला मिळतील. शेवटी माझ्या विरोधाचा उपयोग न होता सभा तहकूब झाली.

त्यानंतर ज्या काही गोष्टी घडल्या–त्यानंतर गांधींनी ज्या काही गोष्टी केल्या–त्या माझ्या काळजावर डागल्या गेल्या आहेत आणि त्यामुळे माझी खात्री पटली की गांधी विश्वासघातकी मनुष्य आहे.

अल्पसंख्य समितीच्या सभेत वरील प्रकारचे भाषण केल्यानंतर या महात्म्याने काय केले असेल ? आपलाच हेका तडीस नेण्यासाठी यांनी आपल्या मते एक नवी युक्ती शोधून काढली. त्यांनी एक कुराणाची प्रत मिळविली, तिची पाने चाळली आणि एक मनाशी ठरवून रीझ (Ritz) हॉटेलमध्ये ना. आगाखानांच्या मुक्कामी मुसलमानांची खाजगी सभा चालली होती तिथे ते गेले. आणि कुराणाची प्रत त्यांच्यासमोर धरून ते म्हणाले, "हे पाहा तुमचा धर्मग्रंथ काय सांगतो कोणत्याही समाजात फूट पाडणे पवित्र इस्लाम धर्माला विहित आहे काय ?" ते म्हणाले : "नाही" गांधी म्हणाले : "तर मग तुम्ही एक फार मोठे अधर्म्य कृत्य करीत नाही काय ? अस्पृश्यांच्या मागण्यांना मान्यता देऊन तुम्ही हिंदु समाजात फूट पाडीत आहात. हे तुमचे कृत्य इस्लाम धर्माच्या विरुद्ध आहे." त्यावर ते म्हणाले, "गांधीजी, यात धर्माचा संबंध काय ? हा प्रश्न राजकीय हक्कांचा आहे. आम्ही अस्पृश्यांपेक्षा अधिक संपन्न, अधिक सुस्थित, अधिक प्रगत असूनही काही राजकीय हक्कांकरिता झगडत आहोत. आम्हाला आणि इतर अल्पसंख्य समाजांना जे हक्क मागण्याचा व मिळविण्याचा अधिकार आहे ते हक्क अस्पृश्यांना देणे रास्त आणि सरळ आहे. यात अधर्म्य ते काय ?"

कुराणाच्या मागे दडून केलेला हा वार फुकट गेलेला पाहून गांधींनी दुसरा आणि अधिक बेशरम प्रयोग केला. ते म्हणाले, "बरं असो. तुमच्या चौदा मागण्या तर तुम्हाला हव्या आहेत ना ?"

"अलबत ! त्या हव्या आहेत."

" मग मी त्या तुम्हाला मिळवून देतो. मात्र तुम्ही माझे काम केले पाहिजे. तुम्ही जर कमिटीच्या सभेत अस्पृश्यांना मागण्या नाकाराल तर मी तुमच्या चौदाच्या चौदा मागण्या स्वीकारल्या जातील, असे करीन."

अस्पृश्यांकरिता काहीही द्यायचे नाही, ही आपली बैठक धरून बसण्याकरिता हा महात्मा कोणत्या थरापर्यंत जाऊ शकतो हे पाहिल्यानंतर त्याच्यावर कोणाचाही विश्वास बसेल काय ? मुसलमानांशी त्यांनी केलेल्या ह्या कराराचा मसुदा माझ्याजवळ आहे. तो मी माझ्या पुस्तकात प्रसिद्धही करणार आहे. मी वाऱ्यावरच्या गोष्टी बोलत नाही.

माझ्यावर आणखी एक आरोप म्हणजे मी काँग्रेसला मिळत नाही. गोष्ट खरी आहे. काँग्रेसला जाऊन मिळण्याने काय काय लाभ होतात याची थोडीशी कल्पना मी दिली आहे. काँग्रेसला मिळावे यासाठी प्रयत्नही करण्यात आलेले आहेत. त्यापैकी एकासंबंधी मी सांगतो. म्हणजे काँग्रेसला जाऊन मिळण्याचे स्वरूप काय असते, हे तुम्हाला कळून येईल. १९३५ साली एकदा माझ्या मित्राने मला आग्रह कर करून गांधींकडे वर्ध्याला नेले. मला माहीत होते की या जाण्याचा काही उपयोग होणार नाही पण मित्राच्या भिडेखातर मी गेलो. शेगावला गांधींची भेट झाली आणि माझा अंदाज खरा ठरला. आम्ह परत वर्ध्याला शेठ जमनालालजीकडे आलो. त्या ठिकाणी पुन्हा काही मंडळी माझे मन वळविण्याचा प्रयत्न करू लागली. जमनालालजी म्हणाले,

" देखो डॉक्टरसाब आप बडी भूल कर रहे हो."

मी म्हटले, " ते कसे काय ?"

ते म्हणाले, " पाहा काँग्रेसला येऊन मिळून तुमचे किती हित होईल ते. अस्पृश्योद्धाराची चळवळ आम्ही तुमच्या हाती देऊ. तुम्हाला माहिती आहे ? पूर्वी आमच्या मारवाडी समाजाबद्दल लोक काय म्हणत असत ? हे लोक समाजाच्या जळवा आहेत, कुळाच्या घरादारावरून नांगर फिरविणारे, उलटचा काळजाचे बदमाष आहेत. पण आज मारवाडी राष्ट्रपुरुष आहेत. जिथे तिथे त्यांची शेखी आहे. याचे कारण काय ? याचे कारण आज आम्ही काँग्रसला मिळालो आहो. तुम्ही काँग्रेसला मिळा. तुम्हीही राष्ट्रपुरुष व्हाल !"

" मी म्हटले; हे कसे शक्य आहे ? माझा गांधीवर विश्वास नाही. त्यांच्या कार्यावर विश्वास नाही. माझे त्यांच्याशी मतभेद आहेत. मी काँग्रेसमध्ये येऊन कसे काय करणार ?"

" यह कोई बात नाही, मतभेद असला म्हणून काय झाले ? जवाहरलाल नेहरू पाहा. त्यांचेही गांधींशी मतभेद आहेत. पुष्कळ बाबतीत त्यांच्या झटापटीही

होतात. पण ते मधून मधून 'गांधी माझे गुरू आहेत' असे म्हणत असतात. तसेच तुम्हीही केले म्हणजे झाले. फिर सब बात ठीक होयगा।"

मी हसून म्हणालो, "एखाद्यावर आपला विश्वास असला म्हणजे मतभेद असला तरी त्याच्याबरोबर काम करीत राहता येते. पण माझा गांधींवर विश्वासच नाही. मग मधून मधून तरी यांना गुरू कसे म्हणणार? आणि त्यांच्याबरोबर काम कसे करणार?"

यावरच बोलणे थांबले. मग परत गांधींचा निरोप घ्यायला म्हणून आम्ही शेगावला गेलो. तिथे गेल्यावर मी पाहतो (तो) माझ्या आधीच वर्ध्याच्या संभाषणाची हकीगत शेगावला पाठविलेली! मी तिथे पोचून गांधीजींच्यासमोर जाताच महादेव देसाई गांधींना म्हणाले, "खबर छे बापूजी, डॉक्टरसाहेब सूं कहे छे?"

"काय? काय म्हणतात?" गांधींनी विचारले.

गांधींच्यासमोर मी माझे त्यांच्यासंबंधीचे मत सांगायला कचरेन असा भाव दाखवून महादेव देसाई म्हणाले,

"ते म्हणतात की तुमच्यावर त्यांचा विश्वास नाही. म्हणून ते तुमच्याबरोबर कार्य करायला तयार नाहीत."

गांधींनी माझ्याकडे प्रश्नार्थक दृष्टी टाकली. मी म्हणालो;

"खरे आहे अगदी. माझा तुमच्यावर मुळीच विश्वास नाही."

काँग्रेसमध्ये शिरून कोणताही चढाईचा कार्यक्रम हाती घेता येणार नाही म्हणून मी तीत शिरत नाही.

— ० —

४८. मी सोशालिस्ट आहे

(दिनांक २३–१०–१९३८ रोजी अहमदाबादेतील 'महाराष्ट्र समाजा'–तर्फे समाजाचे अध्यक्ष डॉ. वि. भा. आपटे यांनी घेतलेली बाबासाहेबांची ही मुलाखत आहे. जनता, दि. ७–११–१९३८.)

प्रश्न : फेडरेशनमधील दोष कोणते ?

उत्तर : फेडरेशनच्या बाबतीत दोन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत, त्यात अपुरेपणाचे दोष (उणिवा) व अंगभूत दोष, असे दोन प्रकारचे दोष आहेत. १८५७ साली अमेरिकेतील हॅमिल्टन वगैरे प्रभृतींचे म्हणणे होते की त्यांची राज्य-घटना चिरकाल राहील. परंतु त्यांना अनुभवाने एका वर्षात घटनेत १४ अॅमेन्ड-मेन्टस कराव्या लागल्या. या मूलभूत दोषामुळे आपल्या देशाच्या राजकीय प्रगतीला खुंट बसणार आहे काही हिंदुस्थानच्या बड्या लोकांनी या बाबतीत पुढे पाऊल टाकल्यास मीही फेडरेशनविरोधी लढ्यात सामील होणार आहे. फेडरेशनमध्ये लष्कर व फायनान्स ही राखीव खाती आहेत. आणि हिंदुस्थानच्या ताब्यात लष्कर व फायनान्स ही खाती घेण्यासाठी फेडरेशनच मोडावी लागेल.

प्रश्न : सैन्य व फायनान्स का रिझर्व्हड् ठेवली आहेत ?

उत्तर : इंग्रज लोकांनी राजेरजवाडे यांच्या फायद्यासाठी संस्थानिकांशी तहनामे केले आहेत. संस्थानिक राजे म्हणतात की ब्रिटिश सार्वभौम राजाशी आमचे करारमदार झालेले आहेत. आमच्यावर परचक्र आले तर आमचे रक्षण करण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. शिवाय आमच्या राज्यात बंडाळी झाली असताना ती मोडण्याची शक्तीही या तहनाम्याने आमच्यात येत नाही.

या कारणांमुळे आर्मीवरचा ताबा हिंदुस्थानच्या लोकांचा राहात नाही व अनायसेच सैन्य व्हॉईसरॉयच्या हातात येते. सैन्य व फायनान्स एकमेकांवर इतके अवलंबून आहेत की ते विलग करताच येणे शक्य नाही. फायनान्समुळेच लष्कर चालू शकते. ही दोन्ही खाती ताब्यात घेण्यासाठी एक तर संस्थानिकांना घालवून द्यावे लागेल किंवा फेडरेशन तरी मोडावे लागेल, आणि यदाकदाचित जर दुसरी राऊंड-टेबल कॉन्फरन्स बोलावण्यात आली, तर ब्रिटिश लोक प्रिन्सेसकडे बोट दाखवतील. व ह्या बाबतीत प्रिन्सेस व इतर स्वराज्यवादी लोकांची एकी होणे अशक्य आहे.

प्रश्न : काँग्रेस फेडरेशन स्वीकारील असे अनुमान तुम्ही का काढता ?

उत्तर : काँग्रेस मेजॉरिटीसाठी धडपड करताना दिसून येते. बॅ. जिनाबरोबर वाटाघाट चालू आहे. हयाचवेळी ती सलगी करण्याचे कारण कोणते ? उभय पक्षामध्ये एकी घडवून आणण्याचे कारण बहुमत मिळविण्यासाठी असावे, असा अंदाज दिसतो. शिवाय संस्थानिकांशी काँग्रेसचे सध्याचे धोरणही त्यासाठीच आखण्यात आलेले दिसून येते. १२३ प्रिन्सेसच्या जागा ८० मुसलमानांसाठी, ५० अर्वांतर धरल्या तर काँग्रेसचे बहुमत होऊ शकत नाही. बहुमत होण्यासाठी एक तर मुसलमान अगर प्रिन्सेस यांच्याशी संगनमत केले पाहिजे व ज्याअर्थी काँग्रेस तसा प्रयत्न करताना दिसून येते त्याअर्थी ती फेडरेशन स्वीकारील, असे वाटते. नाही स्वीकारले तर मला मोठाच आनंद होणार आहे.

प्रश्न : आपण काँग्रेसला का मिळत नाही ?

उत्तर : मी सोशालिस्ट आहे.

प्रश्न : काँग्रेसमध्ये सोशालिस्ट नाहीत काय ?

उत्तर : ते आत आहेत, मी बाहेर आहे ! मला उघडी हवा पाहिजे; गुदमरून मरावयाचे नाही.


प्रश्न : काँग्रेसला शिव्या देण्यापलीकडे आपण कोणते कन्स्ट्रक्टिव्ह काम करता ?

उत्तर : काँग्रेसचे लोक तरी काय करतात ? ते कॅबिनेटला धरून बसले आहेत. गूळाला जसा काळा मुंगळा चिकटून बसतो त्याप्रमाणे त्यांची स्थिती आहे. आपण महाराष्ट्रात आल्यास कन्स्ट्रक्टिव्ह वर्क आपणास दिसेल. मी जर कुबेर असतो तर हजारो आश्रम बांधले असते. माझ्यापाठी कुबेर नाही.

प्रश्न : २५ वर्षांपासून दलित वर्गाची सुधारणा झालेली दिसते किंवा नाही?

उत्तर : मला तसे वाटत नाही. आम्ही जागृत झालो आहोत इतके फक्त आढळते.

REFBK-0025762



उन्मतांचे आदेश झुगारून देणाऱ्या डॉ. आंबेडकरांचे

राम आणि कृष्णांचे कोडे	५–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अतिशय गाजलेली भाषणे	३०–००
डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय गाजलेले लेख	३०–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय गाजलेले अग्रलेख	३०–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रासंगिक विचार	३०–००
डॉ. आंबेडकरांचे हिंदू धर्मावरील अप्रकाशित लेख	६०–००
डॉ. आंबेडकर लिखित हिंदूची जाती प्रथा मोडण्याचा मार्ग	२४–००
डॉ. आंबेडकरांचा विद्यार्थ्यांना उपदेश व शिक्षण विषयक विचार	१८–००
डॉ. आंबेडकरांचे चिंतनात्मक लेख	३०–००
महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन दर्शन	२१–००
विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानस व तत्वविचार	१२–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र व कार्य	१५–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार न	१२–००
बौद्ध पर्व (वा. गो. आपटे यांचा बाबांना अतिशय आवडलेला ग्रंथ)	४५–००
गौतम बुद्धाचे चरित्र (दादा केळूस्करांचा बाबाच्या बालपणी प्रभाव पाडणारा ग्रंथ)	४५–००
भगवान बुद्धाचे सर्वांग सुंदर चरित्र व शिकवण	२४–००
हिंदू (उच्चवर्णीय हिंदुचे अंतरंग नागडे उघडे करणारा ग्रंथ)	४५–००
महात्मा फुले लिखित ब्राह्मणांचे कसब व इतर लेख	३६–००
महात्मा फुले लिखित ब्राह्मणी आडपडद्यात गुलामगिरी	१८–००
महात्मा फुले लिखित शेतकऱ्यांना असूड व इशारा	१८–००
महात्मा फुले लिखित सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक	१८–००
महात्मा फुले यांचा आवडता ग्रंथ जाती भेद विवेकसार	४५–००
लोकमान्य टिळक व राजर्षी शाहू एक मूल्य मापन	३०–००
सार्थ मनुस्मृती (बाबांनी ती का जाळली हे जाणून घ्या)	६०–००
हिंदू धर्माचे गूढ (रिल्डस् ऑफ हिंदू इझमचे संपूर्ण मराठी भाषांतर)	६०–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हिंदू धर्मावर घणाघाती हल्ला	६०–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जनतेला संदेश	२७–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जनतेला पत्ररूपी संदेश	३०–००
डॉ. बाबासाहेबांचा जनतेला उपदेश	३०–००
देशाचे वाटोळे करणारी हिंदूची रोगट ब्राह्मणी मनोवृत्ती	३६–००

आत्मोन्नतीकारक नवा जोम ओश निर्माण करणारे अप्रतिम ग्रंथ

रमेश रघुवंशी यांनी लिहिलेले ग्रंथ

चिंतामुक्त जीवन कसे जगावे ?	१०–००
व्यवहार चतुर कसे व्हावे !	९–००
अलौकिक स्मरणशक्ती कशी वाढवावी	१०–००
चांगल्या मार्गाने श्रीमंत होण्याचे गुपित	१२–००
ओळखी कशा वाढवाव्या ? मित्र कसे जोडावे	१०–००
संभाषण चतुर कसे व्हावे !	१०–००
विचारसामर्थ्य कसे वाढवावे	१२–००
नोकरी मिळण्याचे गुपित	९–००
व्यापारात यश मिळवण्याचे रहस्य	१०–००
परीक्षा पास होण्याचे गुपित	९–००
आत्मविश्वास कसा वाढवावा !	१०–००
इच्छासामर्थ्य कसे वाढवावे	६–००
जगात धाडसाने पुढे कसे यावे	१५–००
व्यापारात पुढे कसे यावे	१८–००
इंदिरा गांधी यांच्या यशाचे रहस्य	३–००
सरस्वतीच्या दरबारात (कादंबरी)	३६–००
मनःची ताकद कशी वाढवावी	१८–००
पितापूत्र (कादंबरी)	६०–००
देशाचे वाटोळे करणारी हिंदूंची रोगट ब्राह्मणी मनोवृत्ती	३६–००
अलौकिक यशासाठी अनोखे डावपेच	४५–००

मागवा :– श्री गजानन बुक डेपो, पुणे ३० / मुंबई २८.

जोशी ब्रदर्स, अप्पा बळवंत चौक, पुणे २.

– डॉ. आंबेडकरांची पुस्तके –

राम आणि कृष्णाचे कोडे	५–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अतिशय गाजलेली भाषणे	३०–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय गाजलेले लेख	३०–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय गाजलेले अग्रलेख	३०–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रासंगिक विचार	३०–००
डॉ. आंबेडकरांचे हिंदू धर्मावरील अप्रकाशित लेख	६०–००
डॉ आंबेडकर लिखित हिंदूंची जाती प्रथा मोडण्याचा मार्ग	२४–००
डॉ. आंबेडकरांचा विद्यार्थ्यांना उपदेश व शिक्षण विषयक विचार	१८–००
डॉ. आंबेडकरांचे चिंतनात्मक लेख	३०–००
महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन दर्शन	२१–००
विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर-मानस व तत्वविचार	१२–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र व कार्य	१५–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन	१२–००
बौद्ध पर्व (वा गो. आपटे यांचा बाबांना अतिशय आवडलेला ग्रंथ)	४५–००
गौतम बुद्धाचे चरित्र (दादा केळूसकरांचा बाबांच्या बालपणी प्रभाव पाडणारा ग्रंथ)	४५–००
भगवान बुद्धाचे सर्वांग सुंदर चरित्र व शिकवण	२४–००
हिंदू (उच्चवर्णीय हिंदुंचे अंतरंग नागडे उघडे करणारा ग्रंथ)	४५–००
महात्मा फुले लिखित ब्राह्मणाचे कसब व इतर लेख	३६–००
महात्मा फुले लिखित ब्राह्मण आडपद्यात गुलामगिरी	१८–००
महात्मा फुले लिखित शेतकऱ्यांना आसूड व इशारा	१८–००
महात्मा फुले लिखित सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक	१८–००
महात्मा फुले यांचा आवडता ग्रंथ–जातीभेद विवेकसार	४५–००
लोकमान्य टिळक व राजश्री शाहू एक मूल्यमापन	३०–००
सार्थ मनुस्मृती (बाबांनी ती का जाळली हे जाणून घ्या)	६० ००
हिंदू धर्माचे गूढ (रिडल्स् ऑफ हिंदूइझचे संपूर्ण मराठी भाषांतर)	६०–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हिंदू धर्मावर घणाघाती हल्ला	६०–००
डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जनतेला संदेश	२७–००
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जनतेला पत्ररूपी संदेश	३०–००
डॉ. बाबासाहेबांचा जनतेला उपदेश	३०–००
देशाचे वाटोळे करणारी हिंदूंची रोगट ब्राह्मणी मनोवृत्ती	३६–००

मिळण्याचे ठिकाण –

श्रीगजानन बुक डेपो

भवानीशंकर रोड, जैनमंदिरासमोर, दादर मुंबई २८. फोन नं. : ४२२७५८४

भरतनाट्य मंदिरासमोर, सदाशिव पेठ, पुणे ३०. फोन नं. : ४४३३०४

जोशी ब्रदर्स : अप्पा बळवंत चौक, पुणे २. फोन नं. ४४९४२४